

# महाभारत

## खंड २३ : भिषमपर्व १

मराठी अनुवाद :

## श्री. अशोक कोठारे

# महाभारत

## महाभारत खंड तेविसावा

## भिष्म पर्व भाग पहिला

अशोक कोठारे

**ई साहित्य प्रतिष्ठान**

विशेष सुचना - महाभारताचे सर्व खंड वाचण्यासाठी कृपया खालील लिंक वर जा.

http://www.esahity.com/23092343238123512366234023812350.html

# महाभारत

## मराठी अनुवादक : श्री. अशोक कोठारे

ashokkothare@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

**ई साहित्य प्रतिष्ठान**

G1102, Eternity, Eleventh floor

Eastern Express Highway. Thane, 400604

**www.esahity.com**

**esahity@gmail.com**

©esahity Pratishthan®2018

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फॉरवर्ड करू शकता.

• हे पुस्तक वेबसायटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

**प्रकाशन : १० डिसेंबर २०१९**

## - अनुवादकाचे दोन शब्द -

हिंदू मान्यतेत ज्या कांहीं रचना सर्वमान्य आहेत त्यातील एक महाभारत आहे. हिंदूंच्या सगळया परंपरा, चालीरिती, संस्कार ह्यांची मुळं महाभारतात आहेत. चौकस हिंदू व्यक्तिला बर्याच वेळा अमुक प्रथा कां प्रचारात आली असा प्रश्न पडतो परंतु, त्याचे समाधानकारक उत्तर मात्र त्याला मिळत नाही. चार जण चार कल्पना सांगतात व त्याचा गोंधळ उडतो. ते होऊ नये व त्या वहिवाटी, प्रथा ह्यांचे मूळ कोठे आहे ते लक्षात यावे ह्यासाठी हा प्रयत्न आहे, हा अनुवाद वाचला कीं, त्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरं मिळतील अशी माझी अपेक्षा आहे. म्हणून, मी महाभारत ह्या महाकाव्याचा मराठीत अनुवाद करण्याचे ठरवले. आता पर्यंत महाभारतावर बरेच लिहीले गेले आहे व ह्यापुढेसुद्धा पुष्कळ लिहीले जाईल पण महाभारत, जसें आहे तसें, एक शैक्षणिक माध्यम म्हणून वाचकांना मिळणे आवश्यक आहे व ते ह्या भाषांतराने मी वाचकांना देत आहे.

महाभारत हे एक महाकाव्य आहे. असें म्हणतात, हा सर्वात मोठा ग्रंथ आहे. मी मात्र अनुवाद करतांना तो गद्यात केला आहे कारण, मला कवितेचे अंग नाही. महाभारताच्या उपलब्ध प्रतिंत कांहीं भेद आढळतात. त्यासाठी सगळे भेद भाषांतरात घेतले आहेत म्हणजे, कांहीं राहून जावू नये. त्या शिवाय, सामान्य वाचकांना कथाभाग अधिक चांगल्या प्रकारे समजावा म्हणून कांहीं टीपा दिल्या आहेत.

माझे वाचक साधे मराठी आहेत ज्यांचे ज्ञान मोजके आहे असें गृहीत धरून मी अनुवादाची भाषा बाळबोध मराठी ठेवली आहे, त्यामुळें कोणालाही ते सहजपणे वाचता येईल व समजेल. कांहीं लेखक अशा ग्रंथाचे अनुवाद करतांना प्राचीनतेचा अनुभव यावा म्हणून मुद्दाम प्राचीन (Archaic) शब्दप्रयोग वापरतात परंतु, माझा असा अनुभव आहे किं, बहुतेक वाचकांना ते वाचण्यास त्रास होतो. म्हणून भाषा आपली नेहमीचीच ओघवती ठेवली आहे.

महाभारताचे अठरा पर्व आहेत व त्या आधीचा असा आदिपर्व म्हणून एक जोडला आहे. आदिपर्वामुळे महाभारतातील मुख्य कथाभागाचा पूर्वेतिहास वाचकांना समजेल. आदिपर्वात हिंदूंच्या अनेक पुराणांच्या मुळसुत्राची कल्पना येते. म्हणून तो माझ्यामते फार महत्वाचा आहे. मी मात्र अनुवाद करण्याच्या सोयीसाठी संपूर्ण महाभारत चाळीसांपेक्षां जास्त खंडांत विभागून दिले आहे. त्यामुळें इंटरनेटवर चढवतांना व उतरवतांना सोपे जाईल अशी अपेक्षा आहे. त्यातील हा तेविसावा खंड, भिष्म पर्व, आपण आता वाचणार अहात, त्यात जंबूखंड निर्माण पर्व, भूमी पर्व, भगवत गीता पर्व, युधिष्ठीरावरील कृष्णकृपा पर्व, आपण पहाणार आहोत.

महाभारत कधी लिहीले गेले असा प्रश्न नेहमी ते वाचणार्याच्या मनात डोकावतो म्हणून त्याबद्दल थोडे लिहीत आहे. महावीर व गौतम बुद्ध आपल्याला माहीत आहेत, साधारणपणे इसवीसन पूर्व ५५० वर्षे ते दोघे महानुभाव होऊन गेले. जर महाभारताची रचना त्या आधीची असती तर त्याचा उल्लेख त्या काळातील जैन व बुद्ध साहित्यात निश्चितच आला असता. बुद्धाला सांख्यमुनी असें संबोधतात. कारण, त्याचे तत्त्वज्ञान सांख्य विचारावर आधारीत आहे. व्यासांची भगवत गीता वेदांताचे तत्त्वज्ञान मांडते जे तुलनेने अर्वाचीन आहे व सांख्य विचार हा हिंदू तत्त्वज्ञानातील पहिला म्हणजे, सर्वात जास्त जुना समजला जातो. जर ते बुद्धाच्या आधीचे असते तर निश्चितच त्याचा प्रभाव बुद्धाच्या विचारांवर झालेला दिसला असता. विशेष करून हे दोघे राजघराण्याचे होते म्हणजे त्यांचे शिक्षण त्या काळातील सर्वोत्तम असणारच मग त्याच्या अभ्यासात गीता, कृष्ण हे आले असते. विशेषकरून जर ते दोघे धर्मावर काम करत होते तर हे अपेक्षित आहे. परंतु, प्रत्यक्ष असें दिसते किं, त्या दोघाच्याही तत्कालिन साहित्यात तो उल्लेख आढळत नाही. ह्याचा अर्थ महाभारत त्या नंतरच्या काळात रचले गेले असावे. दुसरा अंदाज असा कीं, वेदांत तत्त्वज्ञान लिहीणारे व्यास व महाभारतकार व्यास एकच व्यक्ति होती असें साधार मानले जात आहे. वेदांताचा सार महाभारतातील गीतेत आहे. वेदांत तत्त्वज्ञानाचा उगम त्याच सुमारास झाला हे सर्वमान्य आहे. महाभारत लिहीणारे व्यास सांगतात, वेदांचा विसर पडत चालला आहे तरी ते ज्ञान सोप्या भाषेत सामान्यानां समजावे म्हणून कथारुपातून ते उपलब्ध व्हावे ह्यासाठी त्यांनी महाभारत ही काल्पनिक रचना केली आहे. असें सर्व पहाता आपण अंदाज

करू शकतो किं, महाभारत इसवीसन पूर्व ४००च्या सुमारास म्हणजे, सम्राट अशोकाच्या आधी लिहीले गेले असावे.

महाभारतात स्वतः व्यास एक पात्र अशी भूमिका करतांना दिसते. त्याप्रमाणे कृष्ण म्हणून जे पात्र आहे त्याचे सगळे कर्तव्य पहाता व्यास ज्यांचे खरे नांव कृष्ण द्वैपायन आहे, तेंच करीत आहेत असे वाटते. म्हणजे महाभारतकार व्यास त्यांच्या रचनेत दोन भूमिका करतांत असें म्हणावे लागेल. त्यामुळें असे समजण्यास हरकत नसावी कीं, महाभारत त्यांच्या कल्पनांचाच एक भाग आहे. कदाचित असें म्हणता येईल कीं, महाभारत हा एक दंतकथांचा संग्रह आहे व त्याद्वारा नैतिकमुल्ये शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे.

माझ्या मते, अशा चर्चेत वेळ व्यर्थ न घालवतां हिंदूंनी महाभारतातील कथांतून काय सांगावयाचे आहे ते पहावे. एक ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून महाभारत उपयोगी येईल असें वाटत नाही. महाभारतातील कथा पहाता, त्यातील अतिरंजित प्रसंग हेंच सांगतात किं हे सगळे कपोलकल्पित आहे. परंतु, त्यांतून जे शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे तो अप्रतिम आहे.

आपल्याकडे इंग्रजांनी सांप्रतची शिक्षण पद्धती आणली त्या आधी हिंदूंतील द्विज, पाठशाळांतून प्राथमिक शिक्षण घेत असतं. त्यात प्रथम, अक्षर ओळख नंतर गणित व महाभारत शिकवले जाई (पुरोहित ब्राह्मणांच्या पाठशाळांतून त्याशिवाय कर्मकांडाच्या पोथ्या शिकवल्या जात) हे लक्षात घेतले पाहिजे. कारण, महाभारतातून माणसाला जीवन कसे जगावे त्याबद्दलचे मार्गदर्शन मिळते. महाभारत हे एक शैक्षणिक माध्यम म्हणून वापरात होते. आपल्या शिवाजी राज्यांचे शिक्षण महाभारतातूनच झाले होते. त्यातून जे नितीशास्त्र शिकवले आहे तेंच आपले शिक्षण होते. माझ्यामते, हांच उद्देश वाचकांनी डोळयासमोर घेऊन महाभारत वाचावे, धार्मिक ग्रंथ समजून भाबडेपणे वाचू नये कारण तो धार्मिक ग्रंथ नाही असे माझे मत आहे. महाभारतात अनेक बौद्धीकं आहेत जसें भगवत गीता, विदूर गीता, कणिक गीता, व्याध गीता वगैरे. ते सगळे जीवनाचे ज्ञान आहे म्हणून प्रत्येक शहाणा हिंदू, महाभारत वाचण्यात ठेवेल तर त्याचे भले होईल.

त्यांना ते सहजपणे मिळावे म्हणून हा प्रपंच आरंभला आहे. ई-साहित्य त्याचे विनामुल्य वितरण करणार आहेत म्हणून त्यांना शतशः

धन्यवाद. अशोक कोठारे

माझा ई-मेल – ashokkothare@gmail.com , ashokkothare@yahoo.co.in

ह्या वरून आपण माझ्याशी संपर्क करू शकता.

ह्या पुस्तकाचे मुद्रण करण्यासाठी अनुवादकाची आधी परवानगी घेणे आवश्यक आहे. न घेतल्यास तो गुन्हा ठरेल व त्यावर योग्य कारवाई होईल.

ह्या ई-पुस्तकाचे विनामुल्य वितरण ई-साहित्य करणार आहेत परंतु, हे ई-पुस्तक कोणीही कोणालाही विनामुल्य भेट देऊ शकतो.

**माझे ब्लॉग –**

Ashok Kothare, http://ashokkotharesblog.blogspot.com/ for stories

I reckon, http://kotharesviews.blogspot.com/ for philosophy

Ideas and tips on any subject, http://kotharay.blogspot.in/ for intelligent discussions.

Freedom of Expression, http://kothare-thinks.blogspot.in/

My Marathi Blog, http://kothare-marathi.blogspot.in/ मला असे वाटते



# जंबूखंड निर्माण पर्व (सुरू)

## भाग पहिला

ओम नमो नारायणा आणि नरा, जे सर्वात श्रेष्ठ माणसे आहेत. त्याबरोबर माता सरस्वतीला स्मरून जय बोलून मी जनमेजय विचारतो, अहो वैशंपायन गुरू मला सांगा, ते महान योद्धे ज्यांत पांडव, कौरव, सोमक आणि इतर राजे आहेत, कसे त्यांच्या विविध राज्यांतून तेथे कुरुक्षेत्री लढण्यासाठी आले. वैशंपायन सांगू लागतात, "ऐक मी जे सगळे तुला सांगत आहे. ते वेदशास्त्र संपन्न आणि विविध शस्त्रविद्येत प्रवीण असलेले पांडव, कौरव आणि सोमक कुरुक्षेत्री युद्ध करण्यासाठी मोठ्या उत्साहाने जात होते. ते दोघे त्या युद्धात यशस्वी होण्याच्या इराद्याने भाग घेत होते. कौरवाच्या बाजूचे लढवय्ये कुरुक्षेत्राच्या पश्चिमेकडील भागात तळ ठोकतात. त्यांचे चेहरे पूर्वेकडे होते. युधिष्ठीराचे राजे ठरलेल्या नियमांनुसार समंतपंचकाच्या पलिकडील भागात त्यांचा डेरा घालतात. सगळी पृथ्वी जणू तेथे उतरली आहे असे वाटत होते. माणसे, घोडे, हत्ती, वगैरे सगळे तेथे आले होते फक्त लहान मुलं, बायका आणि वृद्ध घरी राहिले होते. असें ते सगळे जंबूद्विपातून आलेले होते. त्या सैनिकांत सगळया जाती, वंशाचे, जमातीचे लोक आलेले होते. तो परिसर अनेक योजने चौफेर पसरलेला होता. त्यात अनेक नद्या, झरे, डोंगर, दर्या, अरण्ये अशांचा समावेश होता. युधिष्ठीराने सगळयांच्या खाण्यापिण्याची उत्तम व्यवस्था केलेली होती. सैनिकांच्या विरंगुळयासाठी सुद्धा तेथे व्यवस्था केलेली होती. त्या विविध लष्कराच्या जनावरांचीसुद्धा चांगली व्यवस्था केलेली होती. युधिष्ठीराने त्याठिकाणी काम करणार्यांसाठी परवलीचे शब्द ठरवून दिले होते त्यामुळें फक्त पांडवांचीच माणसे तेथे वावरत होती. त्या व्यवस्थेमुळें दुष्मनाचा हेर तेथे वावरू शकत नव्हता. त्याच प्रमाणे कौरवांनी त्यांच्या सुरक्षिततेसाठी त्यांच्या लोकांना बिल्ले दिले होते. तो असणार्यालाच त्यांच्या तळात जाता येत असे. अशाप्रकारे दोघांनी त्यांच्या सुरक्षिततेच्या व्यवस्था केल्या होत्या.

जनमेजय विचारतो, "अहो ऋषीवर्य मला सांगा त्या प्रदेशाला कुरुक्षेत्र कां म्हणतात"?

वैशंपायन सांगतात कीं, "कुरु घराण्याच्या पूर्वजानी तेथे तपस्या केली म्हणून त्या प्रदेशाला कुरुक्षेत्र असे नांव मिळाले".

पांडवांची जय्यत तयारी जशी होती त्याप्रमाणे, धृतराष्ट्राच्या मुलांने त्याची व्यवस्था केली होती, तो हत्तीवर बसून त्याच्या भोवती अनेक हत्तींचा गराडा ठेवून व त्याचे शेकडो भाऊ त्याच्या भोवती असा कुरुक्षेत्री निघाला होता, त्याच्या अंबारीवर शुभ्र रंगाची छत्री होती. खर्या क्षात्रतेजाचे पांचल दुर्योधनाला तसा येत आहे ते पाहून मोठ्याने त्यांची रणवाद्ये ज्यात शंख,

तुतार्या होत्या वाजवू लागले. ते पाहून वासुदेव आणि इतर पांडलांना फार संतोष झालेला दिसत होता. अर्जुन आणि कृष्ण त्यांच्या रथात होते तेसुद्धा त्यांचे शंखू काढून वाजवू लागतात. त्यांच्या त्या शंकनादामुळें तेथे जमलेले लोक घाबरून मुतू हगू लागले. त्या भागाकत असलेले इतर प्राणीसुद्धा तेथून पळून जाऊ लागले. त्यांच्या पळण्यामुळे जमिनीवरील धूळ जोरात हवेत उडू लागली इतकी कीं, त्यामुळे कोणी कांहीं पाहू शकत नव्हते. सूर्यसुद्धा त्यामुळें दिसेनासा झाला होता. आकाशातील काळी ढगं रक्त आणि मांसाचे तुकडे खाली टाकत त्यांचाच पाऊस पडू लागला होता. त्यामुळें जमिनीवरील लहान मोठे फत्तर आकाशात उडू लागले त्यांच्या आघातामुळें कित्येक जण जखमी झाले होते. दोनही बाजूचे लढवय्ये मोठ्या उत्साहात तेथे युद्ध कधी प्रारंभ होते त्यांची वाट पहात होते. तो त्यांचा लढा विलक्षण ठरणारा होता. ती दोन सैन्ये दोन सागरासारखी एकमेकांत भिडणार होती. ते दृष्य पहाण्यासाठी स्वर्गातून देव त्यांच्या वाहनांतून बसून आकाशातच थांबलेले होते. त्यानंतर पांडव, कौरव आणि सोमक एकत्र येतात व त्या युद्धाचे नियम ठरवतात. पुढे युद्ध त्या ठरलेल्या नियमांनुसार होणार असते. म्हणजे युद्ध न्याय्य आणि पवित्र व्हावे असा त्यामागील उद्देश होता. कुलिन क्षत्रियांचे तसे नियम होते त्या प्रमाणेच ते लढत असतं. ते नियम असे होते, शब्दाची लढाई शब्दानेच होणार, रथीशी रथीच लढणार. हत्ती स्वाराशी हत्तीस्वारच लढणार. पाईकाशी पाईकच लढणार. जर कोणी शस्त्र खाली टाकली तर तो युद्धातून बाद होईल व त्याला मारता येणार नाही. जर कोणी लढतांना थकला तर तो द्वंद्व थांबू शकतो, त्याच्यावर प्रतिस्पर्धी त्यानंतर वार करणार नाही. घोडेस्वाराशी घोडेस्वार लढेल. त्याच प्रमाणे लहान योद्ध्याशी मोठा योद्धा लढणार नाही परंतु, जर लहानानी मोठ्यावर वार केला तरच मोठा त्याला प्रत्युत्तर देईल. योद्धे समसामनच असतील परंतु, बाणांच्या वर्षावात कोणीही मारला जाऊ शकतो त्याला दोष नाही. हाच नियम इतर संहारक आयुधं, शस्त्रं आणि अस्त्रांसाठी असेल. जखमी झालेल्या योद्ध्यावर तो खाली पडलेला असतांना त्यावर वार केला जाणार नाही. जखमी योद्ध्यांना घेऊन जाणारे सेवक दोनही बाजूने सुरक्षित असतील. निःशस्त्र योद्ध्यावर वार केला जाणार नाही. घाबरलेला व ज्याने त्याची शस्त्र फेकून दिली आहेत अथवा पळून जात आहे त्यावर वार केला जाणार नाही. दोनही बाजूंचे रथाचे घोडे, हत्ती, सामान वाहणारे, औषधी देणारे, रणवाद्ये वाजवणारे, खाद्य पुरवणारे, पूर्णतया सुरक्षित असतीस. जो हे नियम मोडील त्याला दोनही बाजूचे योद्धे मारू शकतील. असें नियम जे नेहमी कुलिन क्षत्रिय लढण्या आधी करतात ते सर्वमान्य केले गेले. ते झाल्यानंतर ते योद्धे ज्यांत पांडव, कौरव आणि सोमक होते एकमेकांकडे पाहून सर्वसंमती असल्याची खात्री करतात. ते त्यानंतर समाधानी असल्याचे दिसत होते.

जंबूखंड निर्माण पर्व भाग पहिला संपला.

# जंबूखंड निर्माण पर्व

## भाग दुसरा

वैशंपायन पुढे सांगतात, ती दोनही लष्करं समोरासमोर उभी आहेत ते पाहून विचित्रवीर्याचा मुलगा, धृतराष्ट्र अति दुःखाने व्यस्त असतांना सत्यवतीचे पुत्र ऋषी कृष्ण द्वैपायन व्यास जे सर्वज्ञ होते व ज्यांचे भूत भविष्य आणि वर्तमानाचे ज्ञान अचूक होते ते त्याला खाजगीत सांगतात, "तुझ्या मुलाच्या दुष्ट कारवायांना वेळीच पायबंद न घातल्याचा हा परिणाम आहे. आता जमलेले राजे एकमेकांना ठार मारणार आहेत. ते नियतीने ठरवलेले होते असें समजून शांत हो. अरे राजा, जर तुला ते युद्ध तुझ्या डोळ्याने पहावयाचे असेल तर मी तुला ती दिव्य दृष्टी देऊ शकतो. धृतराष्ट्र बोलतो, अहो ब्राह्मण, मला तो संहार पहाण्याची इच्छा नाही. तरी मी तुमच्या कडून ते ऐकू इच्छितो.

वैशंपायन पुढे सांगतात, त्याला पहाण्याची इच्छा नाही परंतु, काय होत आहे ते ऐकण्याची इच्छा आहे असे समजल्यावर व्यास जे कोणताही वर देण्यात समर्थ होते, धृतराष्ट्राच्या सारथ्याला जो धृतराष्ट्राचा सोबतीसुद्धा होता एक वर देतो ज्यामुळें संजयाला ती दिव्य दृष्टी प्राप्त होते. ज्यामुळें तो ते भयंकर युद्ध पाहू शकतो. त्यांने त्या युद्धाचा वृतांत धृतराष्ट्राला सांगावा असे ठरले. संजयाला ते सगळे समजेल जे दृष्य अथवा अदृष्य आहे, तो तुला सविस्तरपणे ते सगळे सांगत राहील, असे ठरते. त्या काळात त्याला कोणतेही शस्त्र, अस्त्र, आयुध मारू शकणार नाही. तो ते पहातांना व सांगतांना थकणार नाही. मी यथावकाश ह्या युद्धाचा वृतांत आणि पांडवांच्या यशाची गाथा सगळ्यांना गाऊन सांगत रहाणार आहे. आता दुःख करू नकोस ते होणार होते कारण ती नियती आहे. जे घडणार आहे ते अनिवार्य आहे. म्हणून तू स्वताला दोष देऊ नकोस. जेथे चांगुलपणा, माणूसकी आणि भूतदया आहे तेथे अखेरीस यश आपसुकपणे ओढले जात असते कारण, तसा स्वयंभूचा आदेश आहे. जे ही तीन दानं करत नाहीत त्याचा नाश होणार हे ठरलेले असते.

वैशंपायन पुढे सांगतात, ते आश्वासन दिल्यानंतर तो पवित्र ब्राह्मण धृतराष्ट्राला सांगतो कीं, फार मोठा संहार होण्याचे नियतीने योजलेले आहे. सर्वदूर अशुभ लक्षणं दिसत आहेत. घारी आणि गिधाडं आकाशात फिरत आहेत. कावळे ओरडत आहेत. सगळीकडे झाडांवर ते बसलेले दिसत आहेत. मांसाहारी पशु त्या मेलेल्या योद्ध्यांचे आणि मेलेल्या हत्तीचे व घोड्यांचे मांस खात असलेले मला दिसत आहेत आत्तापासूनच. मरणार्या योद्ध्यांचे किंचाळणे, ओरडणे मला ऐकू येत आहे आत्तापासूनच. मला दिसते कीं, उगवणारा व मावळणारा सुर्याच्या सभोवार तीन रंगाची

ढग दिसत आहेत. विजांचा चमचमाट, ढगांचा गडगडाट मला ऐकू येत आहेत. मला सगळे तारे, सूर्य आणि चंद्र वेगळया प्रकारे चमकत असल्याचे दिसत आहे. ती सगळी अशुभ लक्षणं आहेत व सांगत आहेत कीं, मोठा संहार होणार आहे. कृतिकेतील शुक्लपक्षातील चंद्र एकदम दिसेनासा होणार आहे. अनेक शूर वीर राजे ह्या युद्धात नाहकपणे मारले जाणार आहेत. मला दररोज रात्री आकाशात जंगली वृषभांचे आणि मांजरांचे ओरडणे ऐकावयाला येत असते. देव आणि देवी जोरजोराने हसत असतांना मी पहात आहे. कधी ते घाबरलेले तर कधी रक्त ओकतांना मला दिसत आहेत. कधी घामाने ओथंबलेले दिसत आहेत. कोणीही नगारे वाजवत नसतांना ते आपोआप वाजू लागत आहेत असे दिसते. क्षत्रियांचे रथ घोड्याशिवाय धावत असलेले मला दिसत आहेत. मोर, सुतारपक्षी, पाणकोंबडे, पोपट, कावळे, कोकीळं जोरांनी ओरडतांना मला दिसत असतात. सैनिक त्यांच्या शस्त्रांसह मोठ्याने किंचाळतांना मला दिसत असतात. सूर्य उगवताना आणि मावळतांना किटकांच्या झुंडी हवेत फिरत असलेल्या दिसतात. सगळीकडे रक्त आणि मांस पडलेले मला दिसत आहे. शनी ग्रह रोहिणाला शह देत असल्याचे मला दिसत आहे, अरुंधती वसिष्ठाच्या मागे लपली आहे असे मला वाटते. चंद्रावरील हरणाचे चिन्ह अंधूक झालेले वाटते मला. हि सगळी लक्षणं कांहीं भयंकर होणार असे सुचवत आहेत, अरे राजा, आकाशात ढगे नसताना ढगांचा गडगडाट ऐकू येत असतो. सगळी जनावरं रडत असल्याचे मला वाटत असते.

जंबू खंड निर्माण पर्व भाग दुसरा संपला.

# जंबू खंड निर्माण पर्व

## भाग तिसरा

व्यास पुढे सांगतात, गाईंच्या पोटी गांढवं जन्मतील, लोक मातेशी संबंध घेतील, वनातील झाडे मोसमाबाहेर फळें व फुलं दाखवतील. बायकांना जलद गर्भधारणा होऊ लागेल व कांहीं स्त्रिया राक्षसांना जन्म देतील. मांसाहारी जनावरं मांसाहारी पक्षांबरोबर मांसं खातांना दिसू लागतील. अशुभ प्राणी उत्पन्न होतील ज्यांना तीन शिंग असतील किंवा, चार डोळे असतील किंवा दोन डोकी असतील, पांच पाय असणारे, दोनही लिंग असलेले, असें विलक्षण प्राणी जन्मू लागतील. कांहींना भयंकर दांत असतील व त्याची तोंड उघडी असतील, कांहींना दोन शेपटं असतील, घोडे तीन पायाचे आणि डोक्यावर तुरा असलेले निपजतील. त्याचं घाबरवणारे ओरडणे सगळयांना भिती देईल. अरे राजा, तुझ्या राजधानीत ब्राह्मणांच्या पोटी गरूड आणि मोर पैदा होतील, घोडीच्यापोटी वासरं जन्मतील. कोल्हे आणि लांडगे, पोपट, सांबरं विचित्र प्रकारे ओरडत रहातील. कांहीं बायकांना चार ते पांच मुली होतील. ती जन्मलेली जन्मल्या बरोबर नांचू लागतील, हंसू आणि गाऊ लागतील. शूद्र लोक मोठ्याने हसून लागतील, नाचू लागतील, ते फार मोठे अशुभ लक्षण समजले जाते. खेळातील मुलं त्याच्या खेळण्यांनी मारामारी करू लागतील. झाडांवर कमळं उगवू लागतील. फार जोराने वादळी वारे वाहतील आणि त्यामुळे सर्वदूर धूळीचे साम्राज्य पसरेल. पृथ्वीत अनेक जागी धरणीकंप होतील. अशा सगळी लक्षणं कुरु घराण्याच्या नाशाची चिन्ह आहेत. एक भयंकर अशनी पुष्य नक्षत्राला शह देतांना दिसेल. त्या कारणांने ही दोन लष्कर एकमेकांवर तुटून पडणार आहेत. मंगळ ग्रह माघाकडे सरकेल, गुरू श्रावणाकडे सरकेल. शनी भगाकडे सरकेल, शुक्र पूर्वाभद्राकडे सरकलेला असेल, पुढे अत्तपा भद्राकडे जाईल. केतू ज्येष्ठाला शह देईल, पुढे उजवाकडे गेल्यानंतर तो चंद्र आणि सूर्याला बाधेल. राहू चित्रा आणि स्वाती मध्ये आलेला असेल. मंगळ श्रवण नक्षत्राला शह देत असेल. पृथ्वी वर जी पिकं नित्य नेमाने येत त्या ऐवजी सगळी पिकं सगळया मोसमात येऊ लागतील. जवाच्या रोपाला पांच कणसं लागतील, भाताच्या रोपाला शेकडो कणसं लागतील. वासरांनी दूध प्याल्यानंतर जेव्हां माणूस दूध घेण्याचा प्रयत्न करील तेव्हां दूधा ऐवजी रक्त येईल सडांतून. धनुष्यांतून आणि तलवारींतून तेजस्वी प्रकाश येऊ लागेल त्याचा अर्थ त्याना लढण्याची इच्छा तीव्र झाली आहे. सगळयातून आग निघत आहे असा भास होईल. ह्याचा अर्थ एक मोठा नरसंहार होणार आहे. अरे राजा, रक्ताच्या नदीतून योद्ध्यांचे जहाज जात आहे व त्या नदीच्या दोनही बाजूला भयंकर प्राणी अक्राळ विक्राळ आवाजात ओरडत आहेत असें मला दिसत आहेत. एक डोळी, एक पाय आणि एक पंख

असलेले पक्षी आकाशात भयंकर अशा आवाजात ओरडत घिरट्या घालताना दिसत आहेत. ती अशुभ लक्षणं आहेत. सप्तर्षीचे तारे आकाशात चमकत नव्हते. विशाखा नक्षत्राकडे गेलेले गुरू आणि शनी तेथेच वर्षभर राहिले आहेत. पंधरवड्याचा महिन्यातील पक्ष तेरा दिवसाचा झालेला असेल. त्यांमुळें महिन्याचे गणित चुकेल. दोनही चंद्र आणि सूर्य राहूने ग्रासलेले असतील. सगळया पृथ्वीवर धुळीचे साम्राज्य पसरलेले असेल. भयंकर वाटणारी ढग आकाशात दिसतील. राहू कृतिकेला शह देईल. वादळी वारे वाहत असतील. अशी अनेक अशुभ लक्षणं दिसू लागतील. पोर्णिमेला होणारे ग्रहण त्या आधीच होईल. अशी अवलक्षणं होतील. विहीरीत पाण्यात फेस दिसेल. अशनी पडू लागतील. त्यांचे आवाज घाबरवणारे असतील. जशी हि रात्र जाईल तुला अशुभ चिन्ह दिसू लागतील. मोठे ऋषी सांगतातकीं, अशी लक्षणं दिसू लागली की पृथ्वी माणसाचे रक्त पिऊ लागते. कैलास पर्वतापासून हिमालयापर्यंत पसरलेल्या प्रदेशात असंख्य भूकंप होतील. डोंगराची शिखरं त्यामुळें कोसळतील. चारही महासागरांना भरती येईल. इतकी कीं ते सागर जमीन खाऊन टाकतील. प्रचंड  वादळांमुळें झाडे उन्मळून पडतील. वीजांचा चमचमाट सर्वत्र दिसू लागेल. ब्राह्मण जेव्हां त्यांचा पवित्र अग्नी पेटवतील तेव्हां त्याच्या ज्वाळा डावीकडे झूकतील. त्याचा अर्थ वाईट घडणार असा होतो. स्पर्श, रुची आणि गंध वेगळे वाटू लागतील. गाया जोरां जोरांने भयंकर आवाजात हंबरू लागतील. जे ऐकल्याने भिती वाटावी. बिथरलेले हत्ती सैरावैरा धावून धुळधाण करतांना दिसतील. नरसंहार टाळेल असें करावे राजाने असें सांगावेसे वाटते.

वैशंपायन पुढे सांगतात, धृतराष्ट्र त्याच्या जन्मदात्याचे ते उद्गार ऐकून बोलतो, "मला वाटते हे सगळे आधीच नियतीने ठरवलेले आहे, त्यात मी काय करणार? राजे त्यांचे क्षात्र कार्य करतांना मेले तर स्वर्गात जातील. त्यांची जागा जिंकणारे क्षत्रिय घेतील. हा क्रम आहे अनंत काळाचा, त्यात मी काय करणार"?

वैशंपायन पुढे बोलतात, त्याच्या मुलाच्या त्या बोलण्यानंतर व्यास मुनी एकचित्त करतात. थोडा वेळ ते केल्यानंतर ते पुन्हा सांगतात, तू जे सांगत आहेस ते खरे आहे, मोठा जनसंहार होण्याचे विधात्याने ठरवलेले आहे. त्यानंतर नवीन क्रम सुरू होईल. जुना क्रम संपेल. नवीन कुळ सत्तेवर येतील, जुनी संपतील. हे होणार आहे. ह्या जगात कांहींही कायम नसते. सगळे सतत बदलत असते. तो निसर्गाचा क्रम आहे. त्याबद्दल शोक करण्यात अर्थ नसतो. तरीसुद्धा तू तुझ्या लोकांना चांगुलपणाचा, माणूसकीचा व भूतदयेचा मार्ग आचरण्यास सांगावे त्यामुळें जी नवीन सत्ता येईल ती बिनदोष असेल. असा संहार तेव्हांच होतो जेव्हां पापाचे प्रमाण वाढलेले असते. मला जे योग्य वाटत नाही ते तू करू नकोस. तुझ्या मुलाच्या रुपाने साक्षात मृत्यू जन्मलेला आहे. असा संहार वेदांना मंजूर नाही. अशारितीने नरसंहार होणे चांगले नाही. त्यामुळें हेंच समजते

कीं, तुझ्या कारकिर्दीत राज्यातील चांगुलपणा, माणूसकी आणि भूतदया लयाला गेली आहे. नाहीतर अशाप्रकारचा नरसंहार होत नाही. जेव्हां राजाची नियत बिघडते तेव्हांच प्रजेची नियत बिघडत असते. तुझी नियत म्हणजेच तुझ्या मुलांची नियत कां व कशी बिघडली ते तुला पहावे लागेल. जर योग्य दक्षता बाळगली तर तुला परिस्थिती सुधारता येईल. पांडवांना त्याचे देऊन टाक कारण ते तुझे नाही. व्यासांचे ते बोलणे मनाला लागणारे होते तरी ते ऐकल्यावर बोलण्यात पटाईत असलेला धृतराष्ट्र त्याला सांगतो, माझे ज्ञान जीवनाबद्दलचे आपल्या इतकेच आहे. मला कोणतेही पाप करण्याची इच्छा नाही. माझे मुलगे माझे ऐकत नाहीत. आता तुम्ही तुमच्या शक्तीने जर कांहीं करता आले तर करावे कारण आपणच माझा आधार अहात. आपण दोघाचे आजोबा अहात. भिष्माच्या जागी आपण अहात.

व्यास त्याला सांगतात, "अरे विचित्रवीर्याच्या मुला, तुझ्या मनात काय आहे ते स्पष्ट शब्दात मला सांग. मी तुझ्या मनातील शंकांचे समधान करीन". धृतराष्ट्र त्यावर बोलतो, "अहो पवित्र मुनी, मला तुमच्याकडून ऐकावयाचे आहे कीं, कोणत्या गुणांमुळें माणसाला लढाईत यश मिळते".

व्यास मुनी सांगतात, जेव्हां पवित्र अग्नीच्या ज्वाळा तेजांने चमकतात व सरळ उभ्या फडकत रहातात. त्यातून धूर येत नाही. तुपाचे अर्घ्य दिले कां सुमधूर सुगंध येतो, अशी भविष्यातील यशाची लक्षणं असतात. शंखांचा नाद खोल व मोठा असतो. ती यशाची लक्षणं समजावीत. सूर्य आणि चंद्रांचे किरण स्वच्छ असावेत. कांवळयांचे ओरडणे त्रासदायक नसावे. गिधाडं, पोपट, बगळे, सुतार पक्षी ह्यांचे ओरडणे सुखद असेल, ते असेल तर त्याचा अर्थ सैन्याने पुढे सरकावे जिंकण्यासाठी. तसे नसेल तर पुढे सरकू नये. जर ते पक्षी उजवीकडे उडत असतील तर ब्राह्मण समजतात कीं, यश मिळणार. ज्या योद्ध्यांचे चिलखत, जिरोटोप चमकू लागतात ते जिंकणार हे समजावे. जे मोठ्या उत्साहात ओरडत लढत असतात ज्यांच्या गळयातील हार कोमेजलेले नाहीत ते जिंकणार असें समजावे. जर ज्ञानेंद्रिये नीट काम करत असतील तर ते शुभ लक्षण समजावे. अरे राजा, हि सैन्याची लक्षणं मी तुला सांगितली. जेव्हां त्या विपरीत असेल तेव्हां अपयश येणार हे समजावे. सैन्य लहान आहे कां मोठे ह्यापेक्षा त्यातील सैनिक किती ताजेतवाने आहेत व उत्साही आहेत हे यशाची ग्वाही देतात. घाबरलेले, नाराज, चिंता करणारे, सतत तक्रारी करणारे सैन्य अपयशाचे चिन्ह समजावे. कारण अशा सैनिकांमुळें इतर चांगले सैनिकसुद्धा बिथरतात. त्यांचे नैतिक बळ संपुष्टात येते त्यांमुळें अपयश येते. एकदा कां असें झाले किं त्यात सुधार करणे शक्य नसते. अशारितीने बिथरलेल्या सैन्यापुढे मोठा सेनानी सुद्धा कांहीं करू शकत नाही. बिथरलेले सैन्य पुन्हा एकत्र आणणे सोपे नसते. ते बिथरलेल्या गुरांच्या खिल्लारासारखे असते. असे सांगतात, जे यश समझौत्याने येते ते खरे यश असते. त्यासाठी आपल्या फौजात एकोपा राखतांना

शत्रूच्या गटात तो नष्ट करण्यात लढाईचे अर्धे यश असते. लढाईत मोठे पाप असते कारण त्यात विनाकारण हिंसात्मक हत्त्या होत असते. जी सहजपणे टाळता येणारी असते बहुधा. एकत्र राहून एकमेकांबद्दल सन्मानाची भावना आहे असें मुठभर योद्धे एकाद्या बिथरलेल्या मोठ्या सैन्याला सुद्धा पराजित करू शकतात. विनताचा मुलगा, गरुड एकाद्या मोठ्या पक्षांच्या थव्याला अडवू शकतो. अखेर सांगावयाचे म्हणजे लढाईतील यश हा भाग्याचा भाग असतो. ज्यांचे भाग्य बलवत्तर आहे ते जिंकतात. तरी ज्यांना यश मिळाले त्यांनासुद्धा कांहीं मार खावा लागत असतोच.

जंबू खंड निर्माण पर्व भाग तिसरा संपला.

# जंबू खंड निर्माण पर्व
## भाग चौथा

वैशंपायन पुढे सांगतात, तेवढे सांगितल्यानंतर व्यास तेथून निघून जातात. धृतराष्ट्र विचार करत रहातो. थोडा वेळ विचार केल्यावर त्याला श्र्वास लागतो. तो संजयाला बोलावतो, त्याला बोलतो, "अरे संजया, हे सगळे राजे युद्धासाठी एवढे उतावीळ कां आहेत? त्यांच्या ह्या कृत्यामुळे यमाच्या राज्यातील लोकसंख्या वाढत असते. ते कोणत्या समृद्धीसाठी हे सगळे करत असतात, पृथ्वी मिळवण्यासाठी ते एकमेकांच्या उरावर बसतात. त्या अर्थी ह्या पृथ्वीत कांहीं खास असले पाहिजे ज्या साठी ते असे जीवावर उदार होऊन लढत असतात. तरी तू मला सांग, पृथ्वीत कोणते असें गुणविशेष आहेत ज्यासाठी ते मरण्यासाठी सुद्धा तयार होत आहेत. आज असंख्य योद्धे कुरुजंगलात लढण्यासाठी आले आहेत. मला ते सगळे तुझ्याकडून ऐकावयाचे आहे कारण आता तुला कृष्ण द्वैपायनांच्या कृपेने ते जाणण्याची सिद्धी प्राप्त झाली आहे. मला प्रथम सांग, ते राजे कोणत्या भागातून लढण्यासाठी आले आहेत".

संजय सांगतो, अहो भरत कुळांचे राजा, कीं, मला प्राप्त झालेल्या दिव्य दृष्टीमुळें जे समजते ते मी प्रामाणिकपणे सांगणार आहे. ह्या पृथ्वीवर दोन प्रकारचे गुणविशेष आहेत. त्यात चर आणि अचर प्राणी प्रथम पाहू. त्यात अंडज, गर्भज आणि चिखलात (मातीत) उगवतात. त्यातील गर्भज महत्वाचे आहेत. त्यात मनुष्य योतो. त्यानंतर महत्वाचे असलेले त्यात वनात रहाणारे आहेत. त्यांत वाघ, सिंह, डुक्कर, रेडा, अस्वलं, हत्ती, गुरंढोरं, माकडं, शेळी, बकरी, घोडे, गाढव, हरणं वगैरे येतात. त्यातील कांहीं माणसाने पाळीव केले आहेत व त्यांच्या मदतीने माणूस त्याचे जीवन सुखकर करत असतो. त्यांचा उल्लेख वेदांत आहे. त्यातील कांहीं जे देवांना आवडतात खाद्य म्हणून ते यज्ञात बळी दिले जातात. असें सगळे प्राणी एकमेकांना खाऊन जीवंत रहातात अशी सृष्टीची व्यवस्था आहे. अचरात प्रामुख्याने विविध वनस्पती येतात. त्यात, झुडपं, वेली, वृक्ष, विविध प्रकारची तृण धान्ये, कडधान्ये, गवतं, बहुवर्षी आणि वर्षिक अशी आहेत. त्यांचा उपयोग शाकाहारी प्राण्यांने त्याच्या खाण्यात होत असतो. माणूस सुद्धा द्विआहारी असल्याने तोसुद्धा त्यातील कांहीं खात असतो त्याच्या उपजिवीकेसाठी. ते सगळे पृथ्वीतून उत्पन्न होतात व शेवटी पृथ्वीत मिळतात. त्यांचा कायम नाश कधीच होत नाही. पृथ्वी त्या सगळया चराचरांचा आधार असते म्हणून त्यांना गायत्री असें म्हणतात. अशा साठी ह्या पृथ्वीच्या जमिनीला अनन्यसाधारण महत्व आहे. ती ज्याच्या ताब्यात तो शक्तीमान समजला जातो म्हणून त्यासाठी राजे एकमेकांशी लढत असतात.

जंबू खंड निर्माण पर्व भाग चौथा संपला.

# जंबू खंड निर्माण पर्व

## भाग पांचवा

धृतराष्ट्र बोलतो, अरे संजया, मला सांग त्या नद्यांची, पर्वतांची, डोंगरांची, प्रदेशांची नांव आणि त्यांचे आकारमान अशी सगळी माहीती दे, ज्या कारणांने मी त्यांचे महत्व समजू शकेन.

संजय सांगतो, अहो राजर्षी, पंचमहाभूतांचा परिणाम स्वरुप ह्या जगात विविध पदार्थ उत्पन्न होत असतात. ते पंचमहाभूत आहेत, आकाश, हवा, अग्नी, पृथ्वी (जमीन), आणि पाणी. त्यांच्यात असलेले गुणविशेष आहेत, आवाज, स्पर्श, दृष्टी, रुची आणि गंध. त्या गुणविशेषांमुळें त्यांच्या अस्तित्वाचे माणसाला त्याच्या ज्ञानेंद्रियांच्या मदतीने आकलन होत असते. त्यातील पृथ्वी सर्वात जास्त महत्वाची आहे. कारण त्यात ते सगळे गुणविशेष असतात. बाकीच्याच ते गुणविशेष कमी असतात. पाण्यात चार (आवाज, स्पर्श, दृष्टी, रुची) असतात, अग्नीत तीन (आवाज, स्पर्श, दृष्टी)असतात, हवेत दोन (आवाज, स्पर्श) असतात, आकाशाला फक्त एकच गुणविशेष (आवाज) असतो. सगळे चराचर त्या पंचमहाभूतांच्या विविध प्रकारे मिसळण्यातून उत्पन्न होत असतात. त्यांचे मोजमाप करता येत नाही. ते ब्रह्माचे वास्तविक रुप समजले जाते. ते विविध प्रकारे जोडले जातात व पुन्हा मोडले जातात. सगळया चराचरात ते निरनिराळया प्रकारे आढळतात. मनुष्य त्यांना विविध प्रकारे समजण्याचा प्रयत्न करत असतो. मनुष्य त्यांना निर्माण करू शकत नाही व नष्टसुद्धा करू शकत नाही. सृष्टीच्या नियमानुसार त्यांच्या जोडणे व मोडणे होत असते व त्यातून पृथ्वीवर विविध प्राणी उत्पन्न होत असतात. हा विषय समजण्यासाठी मी आपल्याला एका बेटाची गोष्ट सांगणार आहे, त्याचे नांव आहे, सुदर्शन. ते आकाराने चाकासारखे वर्तुळाकार आहे. त्या बेटावर पाणी आहे, नद्या, सरोवरं, तळी अशा विविध रुपात. त्यावर डोंगर होते, अनेक नगर आहेत, बगीचे आहेत त्याच फुलं फळं होती, शेती होत होती, अशाप्रकारे त्या बेटात संपत्ती उत्पन्न होत होती. त्या बेटाच्या सभोवार खार्या पाण्याचा समुद्र होता. आरशात पहावे आपला चेहरा तसे जर त्या बेटाकडे पाहिले तर असें दिसते जसें, त्या बेटात एक पिंपळाचे झाड आहे व दोन मोठे ससे आहेत. त्यांच्या भोवती सर्व प्रकारची वनश्री होती. त्या शिवाय सर्वत्र पाणी होते. इतर गोष्टी मी तुम्हाला नंतर सांगीन. आता मी काय सांगतो ते नीट ऐका.

जंबू खंड निर्माण पर्व भाग पांचवा संपला.

# जंबू खंड निर्माण पर्व

## भाग सहावा

धृतराष्ट्र बोलतो, तू शहाणा आहेस संजया, तुला सगळ्या गोष्टींची जाणसुद्धा आहे. त्याप्रमाणे तू त्या बेटाची माहिती सांगत आहेस. परंतु, मला त्या बेटाची माहिती तपशिलात सांग. त्या बेटाची मापं काय आहेत ते सांग. सशासारखा जो भाग दिसतो त्याची माहिती सांग. त्यानंतर पिंपळाच्या झाडाबद्दलची माहिती सांग.

वैशंपायन पुढे सांगतात, अशाप्रकारे राजाने विचारल्यानंतर संजय सांगू लागतो. बेटाचा विस्तार पूर्वेकडून पश्चिमेकडे आहे त्यात सहा पर्वत आहेत. त्या पर्वतात हिमालय आहे, त्याशिवाय हेमकुट आहे. त्याशिवाय प्रसिद्ध पर्वत निशाध आहे. नील पर्वतावर पांचूचे खडक आहेत. श्वेत पर्वत पांढरा आहे आणि त्याशिवाय एक आहे श्रृंगवत. त्यात अनेक प्रकारच्या धातूंच्या खाणी आहेत. त्या पर्वतावर साधू, साधक आणि चरण सदैव जात असतं. त्या पर्वतातील अंतर साधारणपणे एक हजार योजनं होती. त्या बेटावर कितीतरी सुंदर राज्ये होती. त्यांना वर्ष बोलले जात होते. त्यातील एका वर्षात आपण आहोत ज्याचे नांव आहे भारतवर्ष. त्या राज्यांत विविध प्रकारचे प्राणी रहात होते. त्याच्या उत्तरेकडील वर्षाला हिमवत म्हणतात. त्या पलिकडल वर्षाला हेमकुट, त्याच्या पलिकडील वर्ष आहे हैवर्ष. निल पर्वताच्या दक्षिणेला आहे निशाध. त्याच्या पुढे जे पूर्वेकडून पश्चिमेला पसरलेले आहे ते आहे मल्यावत. त्याच्या उत्तरेला आहे पर्वत गंधमादन. मल्यावत आणि गंधमादन ह्यांच्यात आहे पर्वत मेरू जो सोन्याचा आहे. त्याची उंची आहे चैर्यांऐशी योजने. तो अदृष्य जग आणि दृष्य जग ह्यांना जोडणारा आहे. त्याशिवाय भरतवर्षात चार विभाग आहेत. ते भद्रस्व, केतुमल, जंबूद्विप आणि उत्तरकुरू म्हणून ओळखले जातात. त्यात उत्तरकुरूमध्ये ते गुणी राजे रहात आहेत. सुमुख गरुडाचा मुलगा, पहातो कीं, मेरूवरील सगळ्या पक्षांचे पिसांचा रंग सोनेरी आहे. तो ठरवतो कीं, त्याने मेरू पर्वत सोडावा म्हणजे चांगले पक्षी, मध्याम आणि हलके असा फरक पक्षांत केला जाणार नाही. सूर्य आणि चंद्र मेरूला प्रदक्षिणा दररोज घालतो. मेरूवर दैवी फुलं आणि फळं होत होती, त्या पर्वतावर सोन्याचे महाल होते. त्यात दैवी प्रजाती जसें गंधर्व, असुर, राक्षस, अप्सरा रहात होत्या. अप्सरांचा तेथे सदैव क्रीडा क्रम असें. त्याशिवाय ब्राह्मण, रुद्र, आणि शक्र जो देवांचा राजा आहे तेथे भेटत असतं. ते त्या मेरू पर्वतावर यज्ञ करत असतं. तेथे गंधर्व तुमुरु, नारद, विश्र्ववसु, हहस आणि हुहुस तेथे वैदीक गाणीगात असतं. महार्षी काश्यप जे सगळ्या सजीवांचे कारक आहेत, तेसुद्धा तेथे प्रत्येक पर्वाच्या वेळी वावरत असतं. मेरू पर्वताच्या शिखरावर उशन ज्याला कवी म्हणून सुद्धा बोलतात तो दैत्यांचा गुरू दैत्यांच्या बरोबर

रहात असें. मेरूपर्वतावर सगळया प्रकारचे रत्न माणकं उदंडपणे होती. त्या करता त्या पर्वतावर कुबेराचे सुद्धा स्थान होते. त्या संपत्तीच्या सहावा भाग फक्त त्याने माणसाला दिला आहे. मेरूच्या उत्तरेला कर्निकारस नांवाचे अरण्य आहे. त्यातील झाडांवर सदैव फुलं फळं असतात. त्या अरण्यात अनेक डोंगरांच्या रांगा आहेत. तेथे पशुपती स्वतः त्याच्या अर्धांगासह, उमा बरोबर कर्निका फुलांच्या माळा गळयात घालून क्रिडा करत असतो. त्याचे त्रिनेत्र सूर्यासारखे तेजांनी चमकत आहेत. तो फक्त सिद्धांना दिसतो ज्यांचे तप उच्चप्रतीला गेलेले आहे. त्या पर्वताच्या शिखरावरून गंगा जी पावित्र्याची नदी म्हणून समजली जाते ती वहात आहे. तिच्या पाण्याच्या जोरांने वहाण्यामुळें मोठा गडगडाटा सारखा आवाज ऐकू येत असतो. ते पाणी चंद्रमास सरोवरात पडत असते. तो तलाव गंगेच्या पाण्यामुळेंच बनलेला आहे. गंगा पर्वतांनासुद्धा पेलत नसल्यामुळें अनेक युग तिचा भार महादेव घेऊन उभे आहेत. मेरूच्या पश्चिमेला केतुमल आहे. त्याबरोबर जंबूखंड आहे. दोनांमध्ये माणसांची मोठी वस्ती आहे. तेथे मनुष्य गेली दहा हजार वर्षे रहात आहे. तेथे असलेले लोक सोन्यासारखे चमकतात. त्यांच्या स्त्रिया अप्सरेसारख्या सुंदर असतात. त्या लोकांत आजारपण नाही, दुःख नाही, ते सदैव सुखात असतात. गंधमादन पर्वतावर कुबेर त्याच्या सेवकां बरोबर जे गुह्यक म्हणून ओळखले जातात, त्याशिवाय राक्षस, अप्सरा ह्यांच्या सानिध्यात त्याचा वेळ मजेत घालवत असतो.

गंधमादना व्यतिरीक्त इतर कमी महत्याचे पहाड तेथे आहेत. तेथे रहाणार्या माणसांचे सरासरी आयुष्य अकरा हजार वर्षे एवढे असते. तेथील लोक आनंदी व बलवान आहेत. तेथील बायका गुलाबी रंगाच्या सुंदर दिसणार्या असतात. नील प्रवताच्या पलिकडे श्वेता आहे. त्याच्या पलिकडे आहे हिरण्यक. हिरण्यकाच्या पलिकडे आहे ऐरावत. ऐरावतात अनेक देश आहेत. श्वेता, हिरण्यक, इलवित्र, हरीवर्ष, हैमवतवर्ष हे त्यांच्या मध्ये आहेत. तेथील लोकांचे गुणविशेष जवळपास सारखेच आहेत. तेथे विविध प्रकारचे जीव एकत्र रहात असतात. तेथे असलेला प्रचंड पहाड हेमकुट ज्याला कैलास असेंसुद्धा म्हणतात, तेथे वैश्रावण त्याच्या गुह्यकांसह मजेत रहात असतो. कैलास पर्वताच्या उत्तरेला मैनक पर्वत आहे. त्याच्या बाजूला मोठा पहाड आहे त्याला मनीमय म्हणतात. त्याची शिखरं सोन्यासीरखी चमकत असतात. त्या पहाडांच्या दर्यात एक सरोवर आहे त्याला बिंदूसागर म्हणतात. त्या सरोवराच्या तीरावरील वाळू सोनेरी असते. राजा भगिरथ त्या परिसरात बरीच वर्षे तेथे रहात होता. त्याचे नांव गंगेला मिळाले. तेथे अनेक यज्ञवेदी दिसतात कारण तेथे अनेक राजे यज्ञ करत होते. तेथे चैत्य वृक्ष सोन्याचे आहेत. तेथेच हजार यज्ञ इंद्राने केले होते. तेथे जगाचा स्वामी त्याच्या भूतावळीसह वावरत असतो. नर आणि नारायण तेथेच असतात. ब्रह्म, मनु, स्थानू पांचवा असतात. तेथूनच ती स्वर्गीय नदी जी तीन पदरांने

(मंदाकिनी, गंगा आणि भोगवती) वहात असते. तेथून निघाल्यानंतर तिला सात पदर सुटतात. वस्वोकेसर, नलिनी, सरस्वती, जंबूनदी, सीता, गंगा, आणि सिंधू अशा त्या आहेत. महादेवानेच तशी व्यवस्था केली आहे. त्याप्रमाणे त्यांच्या किनर्यांवर युगाच्या सुरूवातीपासून यज्ञ केले जात आहेत. सरस्वती कांहीं ठिकाणी दृष्य असते व एरवी जमिनीतून वहात जाते. अशी सात पदकी गंगा तिनही जगात प्रसिद्ध आहे. राक्षस हिमवतावर रहातात. गुह्यक हेमकुटी नांग निशिधावर, ऋषी लोक नीलपर्वतावर रहातात. श्रृंगवतावर सुद्धा देव रहातात. अशाप्रकारे सात वर्षात ते बेट वाटलेले आहे. विविध प्रकारचे प्राणी, चर आणि अचर त्याच गुण्यागोविंदाने रहात होते. तेथे दैवी आणि मानवी अशा प्रकारची संपन्नता आहे. त्याची गमथी करणे केवळ अशक्य आहे. मी तुम्हाला सशाच्या आकाराच्या प्रदेशाची माहिति सांगितली आहे. ह्या प्रदेशाच्या टोकांना दोन आणखीन वर्ष आहेत. त्यांची सुद्धा माहीती मी तुम्हाला सांगितली आहे. त्याशिवाय नागद्विप आणि काश्यप द्विप त्या सशाच्या कानासारखे आहेत. मलय पर्वतावर मौल्यवान खनिजांचे साठे आहेत. ते सशाच्या आकाराच्या जंबूद्विपात आहेत.

जंबू खंड निर्माण पर्व भाग सहावा संपला.

# जंबू खंड निर्माण पर्व

## भाग सातवा

धृतराष्ट्र पुढे विचारतात, मला सांग अरे संजया, तुझ्या दैवी ज्ञानाने मेरूच्या उत्तरकडील आणि पूर्वेकडील भागांची माहीती त्याशिवाय मल्यावताचीसुद्धा माहीती सांग.

संजय सांगू लागतो, नील पर्वताच्या दक्षिणेकडे आणि मेरूच्या उत्तरेकडे सिद्ध रहातात. तेथे असलेली झाडे गोड फळं देतात. तेथे उमलणारी फुलं सुगंधी असतात. तेथे असलेले कांहीं वृक्ष फळ तोडणार्याला ज्या चवेचे फळ पाहिजे त्या चवेचे फळ देतात. तेथे दूध देणारी झाडेसुद्धा आहेत. त्यांना सहा विविध रुची असलेली फळ लागतात अशी झाडं सुद्धा तेथे आहेत ज्यांची रुची अमृतासारखी असते. कांहीं झाडापासून कापड तयार करता येते तर कांहीं मधून दागिने बनवता येतात. सगळी जमीन सोनेरी वाळूंची बनलेली आहे. त्यातील कांहीं भाग माणका सारखा तेजस्वी आहे. तेथे पाचू व इतर रत्नसुद्धा सापडतात. वर्षाचे सगळे मोसम वातावरण प्रसन्न असते. तेथील टाक्यांतील पाणी चवदार असते. स्वर्गातून फेकले गेलेले लोक येथे जन्म घेतात. ते शुद्ध बिजाचे व सुंदर असतात. तेथे बर्याच वेळा जुळी जन्मतात त्यात एक मुलगी असते व ती अप्सरेसारखी सुंदर असते. तेथील दूध देणार्या झाडांचे दूध अमृतासारखे असते. तेथे फक्त गुणीजनच जन्म घेऊ शकतात. कोणी तमोगुणी अथवा रजोगुणी तेथे जन्म घेऊ शकत नाही. तेथे बाई व पुरूष सारखेच कपडे घालतात. तेथे कोणी रोगट नसते. कोणी दुःखी नसते. सगळे समाधानी असतात. तेथील माणसांचे आयुष्यमान अकरा हजार वर्षे असते. अरे राजा, ते कधी एकमेकांचा त्याग करत नाहीत. जेव्हां ते मरतात तेव्हां भारुंड नावांचे पक्षी ज्यांची चोंच फार लांब असते ते त्याला उचलतात आणि उंच पर्वतावरील गुहांत फेकून देतात. मी आता थोडक्यात उत्तरेकडील कुरु देशाची माहिती सांगितली. अता मी मेरूच्या पूर्वेकडील भागाची माहिती सांगतो. त्या भागाला भद्रस्व असें म्हणतात. तेथे भद्र सालाची मोठी वन आहेत. त्याशिवाय कलम्र वृक्ष आहेत जे फार प्रचंड असतात. त्यांना नेहमी फळं आणि फुलं असतात. त्या झाडाची उंची एक योजनं असते. त्याची पुजा सिद्ध आणि चरण करतात. त्या भागातील माणसे गौरवर्णी आहेत. ते बलवान असतात. त्यांच्या बायका गोर्यापान असून गालावर लाली व असते. पहायला त्या फार देखण्या वाटतात. त्या बायका गाण्यात आणि नृत्यात प्रवीण असतात. तेथील माणसांचे आयुष्यमान दहा हजार वर्षे आहे. कलम्र वृक्षाच्या रसाचे ते सेवन खरतात त्यामुळें ते तरूण रहातात.

निल पर्वताच्या दक्षिणेला आणि निशाधच्या उत्तरेला मोठे मोठे जांभळाचे वृक्ष आहेत. सिद्ध आणि चरण त्यांची पुजा करतात. ते वृक्ष अमर असल्याचे सांगतात. ते वृक्ष तुमची इच्छा पूर्ण करू शकतात. त्या वृक्षांमुळें त्या भागाला त्यांच्या नावावरून जंबूद्विप असें नांव पडले आहे. त्या वृक्षांची उंची एक हजार एकशे योजनं आहे. त्याची वरची पान स्वर्गाला भिडलेली आहेत. त्याच्या फळांचा परिघ दोन हजार एकशे फुट एवढा असतो व जेव्हां ते पिकते तेव्हां ते फुटते. ती फळं जेव्हां झाडावरून जमिनीवर पडतात तेव्हां फार मोठा आवाज होतो. त्यांच्यातून त्यांचा रस बाहेर ओतला जाऊ लागतो. त्या रसाचा रंग चांदीसारखा असतो. त्या रसाची नदी तेथे वाहते व मेरू पर्वताला एक फेरा करते. त्यानंतर उत्तर कुरु प्रदेशात येते. त्याचा रस प्याल्यास मनाला शांती मिळते. त्यानंतर कधी तहान लागत नाही. त्याची प्रकृती नेहमी चांगली रहाते. त्या भागात एक प्रकारचे सोने मिळते. त्याला जंबूनद म्हणतात. त्यापासून दैवी दागिने बनवले जातात. त्याची चमक इंद्रगोपका किटकासारखी असते. तेथे जन्मलेले लोक सकाळच्या सूर्यासारखे लाल असतात. मल्यवत पर्वताच्या शिखरावर एक अग्नी नेहमी दिसतो ज्याला समवतक म्हणतात. तो युग संपते तेव्हां सगळया युगाचा नाश करतो. मल्यवताच्या सभोवार लहान बरेच पहाड आहेत. मल्यवताची उंची अकरा हजार तीन योजनं आहे. त्या पर्वतावर रहाणारे लोक सेन्याच्या रंगाचे असतात. ते सगळे ब्रह्माच्या लोकातून फेकलेले गेलेले आहेत. ते प्रखर तप करत असतात. त्यांची व्रतस्थता विलक्षण आहे. ते सगळे ब्रह्मचारी असतात. प्राण्यांच्या हितासाठी ते सूर्यामध्ये शिरतात. त्यांची संख्या आहे सहासष्ठ हजार. ते अरुणाच्या पुढे असतात. सूर्याच्या उष्णतेमुळे सहासष्ठ हजार वर्षे तापल्या नंतर ते चंद्रलोकात जातात.

जंबू खंड निर्माण पर्व भाग सातवा संपला.

# जंबू खंड निर्माण पर्व (संपले)

## भाग आठवा

धृतराष्ट्र विचारतो, "मला सांग संजया, तेथील सगळया वर्षांची नांव आणि पर्वतांची नांव त्याशिवाय तेथे रहाण्र्यांची माहिती मला समजून घ्यावयाची आहे". संजय सांगू लागतो, श्वेताच्या दक्षिणेला आणि निशाधाच्या उत्तरेला जे वर्ष आहे त्याला रोमानक अलें म्हणतात. तेथील लोक गोरे असतात वर्णाने. त्यांची कुळ चांगली असतात. देखणे असतात. त्यांना कोणी शत्रू नसतो. त्यांची आयुर्मर्यादा पंधराशे वर्षे असते. ते नेहमी मजेत रहात असतात. निशाधाच्या दक्षिणेस जे वर्ष आहे त्याला हिरण्यमय म्हणतात. तेथून हिरण्यवती नदी सुरू होते. तेथे पक्षांचा राजा दुसरा इंद्र गरूड रहातो. तेथे रहाणारे लोक यक्षपुजक आहेत. ते संपन्न असतात आणि दिसायलासुद्धा सुंदर असतात. तेथील माणसे बलवान असतात व स्वभावाने आनंदी असतात. त्यांचे वयोमर्यादा साधारणपणे पंचविसशे वर्षे असते. श्रृंगवत पर्वता कडे तीन सुंदर शिखरं आहेत. एकावर रत्न असतात. दुसरे फारच छान दिसते. त्यावरील घरे दागिन्यानी मढलेली असतात. तेथे संदीली नांवाची स्त्री योगिनी स्वयंप्रकाशित असते ती रहाते. श्रृंगवताच्या उत्तरेला उत्तर समुद्रा पर्यंत ऐरावत नांवाचे राज्य (वर्ष) आहे. तेथे रत्नांचे डोंगर आहेत म्हणून तो सर्वात श्रेष्ठ समजला जातो. सूर्याची उष्णाता तेथे भासत नाही. तेथे कांहीं कुजू नासू शकत नाही इतकी थंडी असते. भर दिवसा आकाशात तारे व नक्षत्रे पाहू शकतो. तो प्रदश कमळासारखा तेजस्वी वाटतो. तेथे असलेल्या लोकांच्या अंगाला कमळांचा गंध येतो. त्यांचे डोळे मिटल्यासारखे वाटतात. ते खाण्याशिवाय राहू शकतात. त्यांचे इंद्रिय संयमन चांगले असते. ते स्वर्गातून पडलेले असतात, त्याच्यात पापभाव नसतो. तेराहजार वर्षें ते जगतात. त्यापुढे दुग्धसागराच्या उत्तरेला विष्णू त्याच्या सोन्याच्या रथात बसलेला असतो. त्या रथाला आठ चाकं असतात. त्यावर अनेक दैवि प्राणी वावरत असतात. तो रथ मनाच्या वेगांने जाऊ शकतो. त्याचा रंग अग्नीचा आहे. तो जंबूनद सोन्याचा बनवलेला आहे. तो सगळया जीवांचा स्वामी आहे. जेव्हां युग संपते तेव्हां ते सगळे त्याच्यात मिळूवन जातात. आणि जेव्हां पुन्हा युग सुरू होते तेव्हां ते त्याच्यातून परत बाहेर येतात. तो सगळया सृष्टीचा कर्ता आहे व तो इतरांना काम करावयाला लावतो. त्याच्या त्यागातून सगळे जीव उत्पन्न होत असतात. तो सगळे पंचमहाभूत आहे. अग्नी त्याचे मुख आहे. वैशंपायन पुढे सांगतात, धृतराष्ट्र त्यावेळी त्याच्या मुलाच्या विचारात गुंतला होता. थोड्या वेळांने तो संजयाला सांगतो, अरे संजया, ह्या जगाच्या नाशाची वेळ आली आहे हे निश्चित. ह्या सृष्टीत कांहींही नित्य नसते. जुने जाऊन नवे येणार हा ह्या सृष्टीचा नियम आहे. त्याबद्दल दुःख करण्यात तथ्य नसते. ते

नर आमि नारायण सगळे करणार आहेत. त्यांनीच हे योजलेले आहे. दुर्योधन केवल कारणमात्र आहे. त्याला कोणी वैकुठ (अतिशक्तीमान) म्हणतात. सामान्य लोक त्याला विष्णू समजतात.

जंबू खंड निर्माण पर्व भाग आठवा संपला.

# भूमी पर्व (सुरू)

## भाग नववा

धृतराष्ट्र बोलतो, अरे संजया मला सांग ह्या भरतवर्षाची आणखीन माहिती. ज्याला प्राप्त करण्यासाठी कुरुक्षेत्री हे मूर्ख लोक एकमेकांना मारण्यासाठी जमा झाले आहेत. ज्यामध्ये माझ्या मुलाला दुर्योधनाला विशेष रस आहे. त्यामध्ये पांडवांनासुद्धा तितकेच स्वारस्य आहे. त्यामुळें मला विवंचना सतावत आहेत.

संजय सांगतो, ऐका मी काय सांगतो ते, प्रथम लक्षात घ्या कीं, पंडुची मुलं त्या बाबत स्वारस्य धरून आहेत असें समजणे अयोग्य होईल. परंतु, दुर्योधन मात्र त्या बाबत पुरता गुंतलेला आहे हे निश्चित. त्याच्या बरोबर शकूनी व इतर कौरवसुद्धा त्यात गुतलेले आहेत. त्या भागावर ताबा असलेले इतर राजेसुद्धा त्यात सत्तेसाठी गुंतलेले आहेत. आता मी तुम्हाला सांगतो भारत म्हणून जो प्रदेश आहे त्याबद्दल विशेष माहिती. ह्या भूमीवर देवांचा राजा इंद्र ह्याला खाल आकर्षण आहे. त्याप्रमाणे मनुलासुद्धा हा प्रदेश आवडतो. त्याशिवाय विवस्वाताचा मुलगा, वैन्यचा पृथू, ययातिचा इश्वाकू, अम्वरिष, मंधात्री, नहुष, मुचुकुंड, उशिनराचा मुलगा सिवी, रघव, ईला, राजा नृग, कौशिक, अजिंक्य गधी, सोमक, राजा दिलीप, अशा अनेक सामर्थ्यवान क्षत्रियांना हा प्रदेश आकर्षित करत आला आहे. ह्यानंतर मी तुम्हाला त्या प्रदेशाची माहिती सांगणार आहे, जशी मला समजली आहे. ती ऐका, भरतवर्षातील काल पर्वत आहेत असें, महेंद्र, मलय, सह्य, शुक्तिमत, रक्षावत, विंध्य, परिपत्र असें ते सात आहेत. त्या प्रमुख पर्वतांशिवाय अनेक छोटे मोठे डोंगर तेथे आहेत. त्यामुळें त्यामध्ये खाल दर्या, नद्यांची खोरी, सपाट भाग असें बरेच कांही आहे. त्यात विविध जमातीचे लोक वास्तव्य करून असतात. त्या प्रमाणे सुसंस्कृत आणि म्लेच्छ लोकसुद्धा रहात आहेत. अरे कौरवा, त्या लोकांच्या चालिरीती सुद्धा विविध आहेत. त्या भरत वर्षात अनेक नद्या झरे आहेत. त्याचे पाणी ते लोक वापरतात. त्यामध्ये विशेष उल्लेख करावयाच्या अशा आहेत, गंगा, सिंधू, सरस्वती, गोदावरी, नर्मदा, यमुना, धृषद्वती, वापी, विपाशा, स्थुलवलूका, वेत्रावती, कृष्णा, वेणा, इरावती, वितस्ता, पयोशिनी, देविका, वेदास्मृता, वेदवती, त्रिदीवा, इक्शूमलवी, कराशिनी, चित्रवाह, चित्रसेना, गोमती, धूतपदा, गंडकी, कौशिकी, निश्चित्रा, कृत्या, निशिता, लोहतारीणी, राशसी, शतकुंभा, शरयू, चर्मवंती, वेत्रावती, हस्तिसोम, दिसा, शरश्वती, वेण्णा, भिमरथी, कावेरी, चुलुका, शतवला, निवारा, महिला, सुप्रयोगा, पवित्रा, कुंडला, रजनी, पुरामालिनी, पूर्वभिम्रा, विरा, भिमा, ओघवती, पलासिनी, पापहरा, महेंद्रा, पातालवती, करीषीनी, असिक्नी, कुशचिरा, मकरा, प्रवरा, मोहा, हिमा,

धृतवती, पूर्ववती, अनुश्ना, सैव्या, तापी, सदनिरा, अदृष्या, कुसाधरा, सदाकांता, सिवा, विरावती, वत्सु, सुवत्सु, कंपना, हिरंवती, वरा, पंचमी, रथचित्रा, ज्योतिरथा, विश्वामित्रा, कपिंजला, उपेंद्रा, वपहला, कुचिरा, मधूवाहिनी, वनदी, पिंगळा, वेन्हा, पुंगवेह्ना, विदाशा, तम्रा, कपिला, शालू, सुवर्णा, वेदस्वा, हरीश्वरा, शिंघ्रा, पिश्चला, भागद्वजा, सोना, चंद्रमा, दुर्गामंत्रशिला, ब्रह्मपुत्रा, ब्रह्मवोध्या, बृहद्वती, यवक्षा, रोहीनी, यम्वूनदी, सुनसा, तामसा, दासी, वसा, वरुणा, असी, निला, धृमती, पर्नसा, पोमसी, वृषभा, ब्रह्ममध्या, वृहधनी, अशा विविद नांवांच्या लहान मोठ्या नद्या भारतवर्षात आहेत. त्याशिवाय सदोनिर्मया, कृष्णा, मंदगा, मंदवाहीनी, महागौरी, दुर्गा, चित्रोपला, चित्ररथा, मंजुला, वाहिनी, मंदाकिनी, वैतरणा, कोसा, महानदी, शुक्सिमती, अनंगा, पुषापवेणी, उत्पलवती, लोहीत्या, करतोया, वृषसभ्या, कुमारी, ऋषीकुला, मरिषा, सुपन्या, सरवसंगा, त्यांच्या पाण्यामुळें भारतवर्षाचे जीवन समृद्ध झाले आहे. त्यांशिवाय आणखीन असंख्य नद्या नाले आहेत ज्याची गणना नाही. मला जेवढ्या आठवल्या तेवढ्यांची नांवं घेतली. आता जे भाग ह्यात आहेत त्यांची नांव सांगतो मला आठवतील त्याप्रमाणे. त्यात प्रमुख आहेत कुरु पांचाल, सल्व, मद्रेय, जंगल, सुरसेना, कलिंग, वोधा, मल, छेड्डी, करुष, भोज, सिंधू, पुलिंदक, उत्तमा, दसर्न, मेकल, उत्कल, पांचाला, कौसिज, निकरप्रिश्था, धुरंधर, सोधा, मद्रभूजिंग, काशिस, जठारा, कुरुकस, कुंतीज, अवंती, दुलरी कुंती, गोमंत, मंडक, शन्धा, विदर्भ, रुपवहीका, अश्र्वका, पन्शुराष्ट्रा, गोपराष्ट्र, करित्य, अधिराजया, कुलद्य, महाराष्ट्रा, केरला, वरत्रस्य, अपवाह, चक्र, वक्रतोपा, शक, विदेही, मगध, श्र्वक्षका, मलय, विजया, अंग, वंग, यक्रीलोम, सुदेला, प्रंद्रास, महिका, शशिक, वल्हीक, वतधन, अभीर, कलजोक्ष, अपरंत, परंत, पह्नभास, चर्ममंदास,अतिविशीखर, मौभूत, उपव्रती, अनुउपव्रती, सौराष्ट्र, केकय, कुत, महेय, कक्षास, समुद्रनिश्कुट, आंध्र, ही त्या प्रदेशात रहाणार्या जमातींची नांव आहेत व ते प्रदेश त्यांच्या नांवानेच ओळखले जातात. इतर जमातींची नांव अशी, अनगमल, मनवंज, प्रविशेय, भार्गव, पुंड्र, किराट. सुदेशन, यमुनी, शक, निशाध, अनर्त, नैरीत, दुर्गल, प्रितमस्या, कुंतल, कुशल, त्रिगर्त, इजक, कन्याकगुणा, तिलभर, समिर, मधूमत्त, सुकंदक, काश्मीर, सिंधूसौवीर, गंधर्व, दर्शक, अभिसर, उतल, शैवल, वल्हीक, दर्विस, वनवदर्व, कौरव्यास, सुदमन, सुमालिक, वध्र, करीशक, कलिंद, उपत्यक, वतयन, रोमन, कुसविंद, कच्छ, गोपालकच्छ, कुरुवर्णक, किराट, वर्वसास, सिद्धा, वैदेह, ताम्रलिप, औंद्रसी, पौंड, सैसिक, पर्वतेय. त्याशिवाय आणखीन कांहीं देश आहेत, ते दक्षिणेला आहेत. ते असे, द्रविड, केरलीय, प्राच्य, मुशिक, वनवाशिक, कर्नाटक, महीशक, विकल्पी, मुशका, झिल्लीक, कुंतल, सौंरीदास, नलकन, कंतुकट, चोल, मलवयक, समंग, कर्का, अंगरमरीष, समंग, कर्का, कुकुर, ध्वाजीनी, उत्सव, शंकेती, शल्वसेनी, वकस, कोकर, पश्त्री, लमवेगवास, विंध्यचौलक, पुलिंद, वल्वक, मावळा, वल्लव, तनवल, सनिय, अलिद, पशिवत,

तनया, सुलन्य, ऋषीक, कंक, तेंलगण, उत्तर तेलंगण, उत्तरेकडील जमातीत म्लेच्छ क्रौर, यवन, चिनी, कंबोजी, दारुन, म्लेच्छांत आहेत, सुक्रीतवाह, कुलथ, त्यानंतर हूण, फारसी, रोमन, चीनी, दशमलिक आहेत. त्यांत क्षत्रिय वैश्य आणि शुद्र वर्णाचे लोक आहेत. त्याशिवाय आहेत शुद्रअभीर, दर्द, कश्मिरी, पट्टण (पठाण), खासी, अत्रेय, भारद्वाज, स्तनपोशिक, पोशक, कलिंग, आणि किराटांचे विविध जमाती आहेत. तोमर, हंसमार्ग, करमंजिक ह्यांचीन राज्ये पूर्वेकडे आणि उत्तरेकडे आहेत. थोडक्यात मी आपल्याला त्या भागातील लोकांची नांव सांगितली. त्यांच्या नांवावरून त्या प्रदेशांना ती नांव मिळाली आहेत. ह्या प्रदेशातील जमिनी विकसित केल्या तर एकाद्या सतत दुध देणार्या गाई सारखा हा भारतवर्ष आहे. शूरवीर राजे म्हणून ह्या वर्षासाठी लढत असतात. ज्याला तो मिळेल तो जगावर राज्य करील.

भूमी पर्व भाग नववा संपला.

# भूमी पर्व

## भाग दहावा

धृतराष्ट्र पुढे विचारतात, "अरे संजय, मला सांग, भिष्म कसे शिखंडीने मारले? माझे पिताश्री जे इंद्रासारखे शूर होते, त्यांच्या रथातून कां कोसळले? भिष्मांचा पाडाव झाल्यावर माझी मुलं कशी काम करणार? भिष्माचार्यांच्या मृत्यूच्या वार्तने मी फार दुःखी झालो आहे. आता शत्रूंवर कसे माझे सैन्य चाल करून जाईल"? कोण त्यांची बाजू घेईल? कोण त्यांच्या प्रमाणे आगेकूच करतील? कोणते शूर योद्धे त्याच्यावर चाल करून जात होते? कोण पंडुच्या मुलांच्या प्रतिकाराला कसे तोंड देत होते"? त्याच्या बाणांच्या वर्षावापुढे पांडवांचे सैन्य कसे लढत होते. अरे संजया, पांडव शंतनुच्या मुलाला विरोध करत होते ते मला सांग. त्या अजिंक्य भिष्माला पंडुच्या मुलांनी कसे हरवले ते सांग. त्याच्या भाग्यात असा मृत्यू कसा आला जो शत्रूंचा नाश करण्यासाठीच जन्मला होता. दहा रात्री त्यांने पांडवांच्या फौजांचा धुव्वा उडवला होता. जे एक अवघड काम होते. दहालक्ष योद्धे त्याने एकट्याने मारले होते. असा तो योद्धा आता जमिनीवर पडलेला आहे हे मला सहन होत नाही. जसे एकादा मोठा वृक्ष कोसळावा तसे ते झाले होते. अशा महायेद्ध्याला पांडव कसे मारू शकले ते मला सांग. पांडव भिष्माशी कसे लढले ते मला सांग. त्याच्या जवळ द्रोण होते, कृप होते असे असतांना पांडव त्याला कसे छेदू शकले? अश्र्वत्थामा कोठे होता. भिष्म जो अतिरथ म्हणून समजला जात होता तो अशाप्रकारे कसा मेला? ज्याला देवसुद्धा मारू शकत नव्हते त्याला तो शिखंडी कसा मारू शकला ते मला सांग. भिष्म जो रामाच्या बरोबरीचा म्हणून समजला जात होता जो रामानेसुद्धा हरला नव्हता तो इंद्राच्या योग्यतेचा योद्धा अशारितीने कसा मेला ते मला समजत नाही. अरेरे, हे कसे झाले? महारथांच्या घराण्यात जन्मलेला तो अशा सरेल हे मला पटत नाही. त्याला संरक्षण देण्यासाठी इतर कोणी योद्धा का पुढे झाला नाही"? पांडव शिखंडीला पुढे करून भिष्माचार्याला घेरत होते तेव्हां दुर्योधनाचे लोक काय करत होते"? भिष्माच्या मृत्यूच्या वार्तेने माझे हृदयाचे ठोके वाढले आहेत. माझी चिंता वाढली आहे. त्याच्या बाणाच्या वर्षावापुढे पांडवांचे, पांचालांचे, श्रींजयांचे सैन्य कसे लढत होते ते सांग. दुर्योधनाचे भाग्य कीं त्यानी शत्रूपक्षाची मोठी सेना आधीच नष्ट केली आहे. मलान सांग संजया त्याच्या मागून पुढून आणि बाजूनी कोण त्यांना संरक्षण देत होते. मला सांग श्रींजयांना कोण अडवत होते. पांडवांच्या जोरदार फौजांना कोण अडवत होते. इतर कसे लढत होते तेसुद्धा मला समजून घ्यावयाचे आहे. पांडवांची सेनी अजिंक्य होती तरी त्यांने त्यांचा पराजय करण्यासाठी आणखीन प्रयत्न कां नाही केले ते मला समजले पाहिजे. एवढी चांगली व्यवस्था

असतांना पांडव भिष्मापर्यंत कसे पोहोचू शकले ते मला सांग, संजया. भिष्म ज्याच्या जीवावर कौरव विसंबून होते तो गेल्यानंतर दुर्योधन काय करणार आहे आहे ते मला सांग. पांडव भिष्मावर हल्ला करूच कसे शकले ते मला समजले पाहिजे. अरे संजया, फार प्राचीन काळी देव दानवांना मारण्यासाठी माझ्या पित्याची मदत घेत होते. त्याच्या मुलांचा अशाप्रकारे मृत्यू व्हावा हे आश्र्चर्य कारक आहे. सगळया श्स्त्र विद्येत प्रवीण असलेला माझा काका असा कसा मारला गेला ते मला समजत नाही. त्याचा मृत्यू झाला म्हणजे कौरवांचे सैन्यच मेले असे मी समजतो. मला असें वाटते, चांगुलपणावर वाईटपणाने मात केली आहे. पंडुची मुलं त्यांच्या वडीलाना मारून विजय मिळवू इच्छित आहेत असें दिसते. पूर्वी जमदाग्नीच्या मुलांने भिष्माला अंबासाठी आव्हान दिले होते. त्यात रामाचा पराजय भिष्माने केला होता. अशा विजयी शूराला पांडव मारतात ह्याचा अर्थ मला समजत नाही. ह्या सारखे मोठे दुःख नाही. मला ते सहन होत नाही. अशा अजिंक्य वीराला शिखंडी मारतो ह्याचे मला नवल वाटते, माझा अजून विश्र्वास त्यावर बसत नाही. त्या युद्धात त्यांच्या बरेबर इतर कोण साथ देत होते ते मला समजून घ्यावयाचे आहे. अरे संजया आता माझे सैन्य पोरक्या बाईसारखे झाले आहे. ते सैन्य डोके उडवलेल्या योद्ध्या सारखे झाले आहे. जेव्हां भिष्म खाली पडले तेव्हां माझ्या योद्ध्यांची काय मनस्थिती झाली होती ते मला सांग. आपला मुख्य मेला आहे तेव्हां आपण आता काय करावयाचे ठरवले आहे, ते मला सांग. माझी मुलं त्या मृत्यूमुळें आक्रोश करत असतील. मी अजून त्या वार्तेवर विश्र्वास ठेवू शकत नाही. मला माहित आहे कीं, ज्ञान, अनुभव, प्राविण्य, सामर्थ्य, बुद्धीमत्ता, वौराग्य, हे कांहींही तुमचा मृत्यू थांबवू शकत नाहीत. तो येणार म्हणजे येणार हे सत्य समजूनच आपल्याला रहावयाचे असते. मला जेव्हां तू सांगितलेस कीं भिष्म मेला तेव्हां मी माझ्या मुलांसाठी दुःखी झालो होतो. आम्ही सगळे भिष्मांच्या ताकदीवर फारच विसंबून होतो. तो आम्हाला एकमेव आधार होता. भिष्माला मातीत पडलेला पाहून दुर्योधनाची काय प्रतिक्रीया झाली ते मला सांग. ह्यापुढे आमच्या बाजूच्या राजांची काय अवस्था असेल व पांडवांच्या बाजूच्या राजांची काय. असेल ते मला सांग. क्षत्रियांचे जीवन फार क्रूरतेवर अवलंबून असते. सतत मृत्यूशी त्यांची गाठ असते. हे कसले जीवन परंतु, तरी ते त्या जीवनात आनंद मानत असतात हे विचित्र वाटते. दोनही बाजूचे क्षत्रिय त्यांचे कर्तव्य बजावत आहेत. आम्ही मोठा त्याग केला आहे भिष्माच्या रुपाने. त्यात कोणी किती चांगला आहे व कोणी किती वाईट आहे हे विचारात घेतले जात नाही. अशा परिस्थितीत आम्हाला जास्त मोठ्या उत्साहाने लढाई चालू ठेवली पाहिजे. हे तेव्हा घडले तेव्हां इतर आपले सैन्य कसे रचलेले होते ते मला सांग. कर्ण, शकूनी, दुःशासन आणि दुर्योधन कोठे होते. ते भिष्माच्या मृत्यूबद्दल काय बोलत होते ते मला सांग. युद्ध हा मोठा जुगार आहे. तो खेळणारे त्यांच्या जीवाची बाजी लावून खेळत असतात. कोण जिंकले, कोण हरले, कोण मेले ह्याचा विचार कोणी करत नाही. कोणती खेळी

कोण खेळला त्याचा विचार होत असतो. अरे संजया भिष्माच्या मृत्यूमुळे माझी शांती नष्ट झालेली आहे. आता माझी सगळी मुलं मरणार ह्या कल्पनेने मला घोर लागला आहे. एकेकांच्या मृत्यूच्या बातम्या देऊन तू माझ्या मनाची अस्वस्थता वाढवत आहेस. आता मला पटू लागले कीं, दुर्योधनाची चाल किती चुकीची होती. त्याने कांहीं गोष्टी गृहीत धरून सगळे योजले होते ते सगळे अंदाज एकेक करून खोटे ठरत आहेत हे लक्षात आल्यामुळे मी जास्त जास्त व्यथित होत आहे. माझ्या मुलाच्या सगळया करणी मला समजल्या पाहिजेत. त्या योग्य असतील अथवा अयोग्य असतील कशाही असल्या तरी त्या मला समजल्या पाहिजेत. भिष्माने ह्या दहा दिवसांत जे लढून मिळवले ते सगळे गेल्यातच जमा झाले आहे असे मला वाटते कारण त्याच्या मृत्यूने जे आपण घालवले आहे ते परत मिळवण्या सारखे नाही. संजया मला सगळे इत्थंभूत समजले पाहिजे ते तुझ्या दिव्य दृष्चीने पाहून मला सांग.

भूमी पर्व भाग दहावा संपला.

# भूमी पर्व

## भाग अकरावा

संजय सांगू लागतो. "आपण जे बोलता ते योग्य आहे. आपल्या सगळया शंकांचे निरसन मी करणार आहे. अहो महाराज, आपण सगळा दोष दुर्योधनावर टाकून मोकळे होऊ शकत नाही. स्वताच्या चुकांचे खापर दुसर्यावर फोडणे ही चांगली पद्धत नाही. जे दुसर्याला त्रास देतात त्यांना कधी तरी त्या सगळ्या कृत्याचा जाब द्यावा लागतो, असा सृष्टीचा नियम आहे. पांडव निष्पाप आहेत, त्यांनी कधी कोणाला त्रास दिला नाही त्यांना आपण आपल्या निष्क्रीयतेने अनेक प्रकारे पिडा दिली आहे ते सगळे आपल्यावर उलटले तर त्याबद्दल दुःख करण्यात काय अर्थ आहे"? तुमच्या कडून पांडवांशी जे दुष्कृत्य होत होते ते भिष्मांना थांबवता आले असते परंतु, ते त्यांनी केले नाही त्याची किंमत त्यांना द्यावी लागली तर त्यात काय अयोग्य झाले ते सांगा. दुर्योधनाच्या प्रत्येक दुष्कृत्यात आपण आणि भिष्म समान प्रमाणात भागीदार होता त्याची किंमत आता आपण भरत अहात, असा नियतीचा नियम आहे त्याचा तुम्हाला विसर पडला आहे कां? हे युद्ध होऊ नये म्हणून परोपरीने सगळे सांगत होते, त्यात कृष्ण, पराशराचे पुत्र, नारद, कण्व असे सगळे सांगत होते तेव्हां तुम्ही बोलत होता कीं, जे नियतीला मंजूर ते होणार. मग आता कां दुःख करत अहात. नियतीच्या मंजूरीचे आपण स्वागत कां करत नाही"? मला व्यासांच्या कृपेने दिव्य दृष्टी प्राप्त झाली आहे ती जे दाखवते ते मी तुम्हाला आता सांगत आहे. ते नीटपणे ऐका. भारताच्या युद्धाचा वृतांत मी आता तुम्हाला सांगणार आहे. ते ऐकून तुमच्या अंगावर कांटा उभा राहील.

जेव्हां दोनही सैन्ये समोरासमोर लढण्यासाठी उभे राहिले, दुर्योधन त्याच्या भावाला, दुःशासनाला उद्देशून बोलला, अरें दुःशासना, भिष्मांच्या संरक्षणासाठी जास्तीत जास्त रथ त्यांच्या भोवती रचा. आपल्या सगळया फौजांना आक्रमक व्हावयाला सांगा. ज्या घटनेची प्रतिक्षा मी इतकी वर्षे करत होतो ती येऊन ठेपली आहे. ह्या युद्धात सर्वात महत्वाचे आहे ते असें कीं आपण भिष्माचार्यांना संरण द्यावे. त्यांना संरक्षण दिले कीं ते पांडवांचे जास्तात जास्त सैनिक मारू शकतील. त्याबरोबर पांचालांचे आणि सोमकांचे आणि श्रींजयाचे सुद्धा लझवय्ये ते मारून टाकतील जे आपल्यासाठी महत्वाचे आहे. म्हणून भिष्म विशेष करून सुरक्षित असतील असे पहावे. उरलेले माझे सेनिक शिखंडीला मारण्याचा प्रयास करतील. आपले सगळे सैन्य भिष्माना संरक्षण देण्यासाठी रचले पाहिजे. सिंहाला सुद्धा संरक्षणाची गरज असते नाहीतर एकादा कोल्हा त्याला मारू शकतो. युधमन्यू डावीकडील बाजू  पाहील, उत्तमौजस उजवी बाजू पाहील, तो

फाल्गुनीला पाहील. फाल्गुनी शिखंडीला संरक्षण देत आहे. जर आपल्या कडून कांहीं चुक झाली तर भिष्माला शिखंडी मारू शकेल व ते झाले नाही पाहिजे.

भूमी पर्व भाग अकरावा संपला.

# भूमी पर्व

## भाग बारावा

संजय पुढे सांगतो, पहाट झाली व सगळे सैनिक व्युह रचना करण्याच्या कामात लागले. जो तो ओरडून सांगत होते त्या दिवशी व्युहरचना कशी असावी. शंखूनाद आणि ढोलक्यांचा आवाज सगळीकडे ऐकू येत होता. त्या बरोबर घोड्यांचे खिंकाळणे, हत्तींचे चित्कार सर्वकडे ऐकू येत होते. पांडवांचे आणि कौरवांचे अशी मोठी सेना युद्धासाठी तयार झाली होती. सकाळच्या प्रकाशात त्यांच्या घोड्यांचे व हत्तींचे संरक्षक आवरणं चमकत होती. दोनही बाजूनी रथांच्या रांगा अशा होत्या कीं ती एकाद्या नगराची रचना आहे. सर्व शस्त्र सज्ज सैनिक लढण्याच्या आदेशाची वाट पहात उभे होते. रथावरील ध्वजावर केलेली सोन्याची सजावट सूर्याच्या प्रकाशात चमकत होती. सैनिक त्यांची शस्त्रं घेऊन सज्ज होते. त्यांच्या हातात, गदा, तलवारी, भाले, धनुष्य बाण असें होते. शकूनी, सल्य जयद्रथ, अवंतीचे दोन राजपुक्ष विंद आणि अनुविंद, केकयाचे दोन बंधू, सुदक्षिना कंबोजचा राजा, श्रूतयुद्ध कलिंगचा राजा, राजा जयत्सेन, वृहद कोसलचा राजा, कृतवर्मन हे महत्वाचे योद्धे त्यांच्या पलटणांसह सज्ज होते. त्यांच्या बरोबर इतर राजेसुद्धा त्यांच्या पलटणी घेऊन लढण्यासाठी सज्ज होते. मोठे महारथी त्यांच्या फौजा रचून दुर्योधनाची आज्ञा येण्याची वाट पहात असतात. कौरवांची मोठी पलटण सर्वांच्या पुढे होती ती धृतराष्ट्राची स्वताची फौज होती. त्यांच्या मध्ये शंतनुपुत्र भिष्म त्याच्या रथात उभे होते, त्यांच्या डोक्यावर छत्री होती. तो त्यांचा मान होता. पांडवांचे व कौरवांचे योद्धे त्याना पहातात. भिष्मापुढे पांडवांचे धृष्टद्युम्न लहान मुलासारखे वाटत होते. ती तुमच्या फौजेची अकरावी पलटण होती. दोनही फौजा एकमेकांना न्याहळत होत्या. असें दृष्य ह्या आधी पहावयाला मिळाले नाही.

भूमी पर्व भाग बारावा संपला.

# भूमी पर्व

## भाग तेरावा

संजय पुढे सांगतो, पवित्र कृष्ण द्वैपायन जसे बोलले होते तसे सगळे पृथ्वीचे राजे कुरुक्षेत्री जमा झाले होते. ज्या दिवशी युद्ध आरंभ होणार त्या दिवशी चंद्र पितरांच्या भागात गेला होता. सोम म्हणजे चंद्र मेघा नक्षत्राच्या भागात शिरला होता. त्याचा अर्थ असा समजला जातो कीं, त्या परिस्थितीत जे योद्धे लढाईत मरतात त्यांना त्वरित स्वर्गात प्रवेश मिळतो. त्यासाठी तो मुहूर्त पांडव कौरवांच्या युद्धासाठी निवडला होता. सूर्य उगवला तो दुभंगलेला दिसत होता. लढाईत मेलेल्यांची कलेवरे खाणार्या कोल्हे, लांडगे, गिधाडं हे जोराजोरानो ओरडू लागले होते. कुरुघराण्याचे पितामह भिष्म आणि द्रोण त्या दिवशी उठले, ते त्यांच्या जपात बोलतातकीं, ह्या युद्धात जय पांडवांचा होवो. तरी त्यांने जे वचन दिले होते दुर्योधनाला त्याप्रमाणे ते दोघे कौरवांसाठी लढणार होते. देवदत्त त्याच्या कामाप्रमाणे सगळ्या राजांना बोलावतो. बोलतो, अहो क्षत्रियांनो, आता तुम्ही चांगली लढाई खेळून स्वर्गात जाण्याची तयारी करत अहात. कारण चंद्र मेघात शिरला आहे व अशा प्रसंगी जे लढाईत मरतात त्यांना प्रेतयोनीमध्ये जावे लागत नाही. ते थेट स्वर्गात जातात. असें ऋषी व दृष्टे सांगत आहेत. तुम्ही इंद्राच्या किंवा ब्रह्माच्या लोकात जाणार अहात जसे तुमचे पुण्य कर्म असेल. युद्ध मन लावून करा. त्यात नितीशास्त्राचे नियम मोडू नका. लढतांना प्रतिस्पर्ध्याबद्दल राग, द्वेष, दुष्टपणा ठेवू नका. एक यमाचे दूत म्हणून तुम्ही तुमचे काम करा म्हणजे तुमचे स्वर्गातील स्थान पक्के होईल. ह्या आधी नभंग, ययाति, नहुष, मंधत्री, नृग असें राजे ह्याच मार्गाने स्वर्गात गेले आहेत, क्षत्रियांसाठी हांच श्रेयस्कर मार्ग स्वर्गारोहणासाठी सांगितलेला आहे. अशारितीने जे गेले त्यांचे श्राद्ध करावे लागत नाही. कारण ते थेट स्वर्गात जातात. ते स्वतः पितर होतात. ते भाषण ऐकणारे राजे व सैनिक मोठे उत्साही दिसत होते. त्यावेळी भिष्म सेनानी आहेत म्हणून कर्ण लढाईत भाग घेत नसतो. ते बाजूला असतात. कर्णाचा मुलगा विकर्तन आणि इतर मात्र त्या लढ्यात सामील असतात. ते सिंहगर्जना करत रणभूमीत प्रवेश करतात. त्यांच्या छत्र्या, पताका, ध्वज, फडकत होते. त्यांचे घोडे, हत्ती आणि पाईक मोठया दिमाखाने पुढे सरकत होते. ढोलकी, तुतार्या आणि शंखनादाने सगळी पृथ्वी दणाणून निघाली होती. रथांच्या चाकांचा खडखडाट सगळीकडे ऐकू येत होता. चिलखतं चमकत होती. सगळे योद्धे तेजांनी चमकत होते. भिष्मांचा रथ त्यावरील झेंड्याने विशेष नजरेत भरत होता. अशारितीने पुढे होऊन त्या शूरवीरांनी रणभूमितील आपापल्या जागा घेतल्या होत्या. शंतनुचा मुलगा सैव्यास आज्ञा करतो जो गोवशनाचा राजा आहे, कीं त्यांने इतर राजांना त्यांच्या पलटणासह आपापल्या

जागा घ्याव्यात. अश्र्वत्थामा त्याला दिलेल्या जागी तयार होतो. त्याचे स्थान पलटाणीच्या अग्र भागी होते. त्याचा झेंडा होता त्यावर सिंहाचे चित्र होते. श्रुतायुध आणि घित्रसेन, पुरुमित्र, विविंसती, सल्य, भुरिश्र्वर, विकर्ण हे सात वीर त्यांच्या रथातून द्रोणांच्या मुलाच्या नेतृत्वाखाली भिष्मांना संरक्षण देण्यासाठी योजलेले होते. द्रोणांचा ध्वज जे सगळयांचे गुरू होते, त्यांच्या ध्वजावर यज्ञवेदीची मुद्रा होती त्यावर एक पाण्याचे पात्र आणि धनुष्य होते. दुर्योधनाच्या ध्वजावर हत्तीचे चिन्ह होते, त्याच्या बरोबर मोठी फौज होती. पौरव आणि कलिंगचा राजा आणि शल्य ह्यांना आपले रथ दुर्योधनाला संरक्षण देण्यासाठी उभे केले होते. मगधचा राजा त्याच्या मौल्यवान रथात होता. त्याच्या ध्वजावर वृषभाचे चित्र होते. एक मोठे सैन्य पूर्वेकडील राजांचे होते त्याचे नेतृत्व अंगच्या मुख्याने जो कर्णाचा मुलगा होता, वृशकेतु त्याच्या कडे होते. शक्तीमान कृपाचार्य मोठ्या उत्साहात आपला रथ घेऊन त्यांच्या पलटणाचे नेतृत्व करत होते. त्यांच्या ध्वजावर डुकराचे चिन्ह होते. त्यांचा ध्वज जरीचा होता. जयद्रथ जो दुर्योधनाच्या बहिणीचा पती होता तो त्याची एकलक्ष फौज घेऊन तयार होता. त्याचे सैन्य मोठे दिमाखदार दिसत होते. त्या सैन्यात हत्तीदल, घोडदळ, रथदल असें सगळे होते. कलिंगचा राजा केतुमत सुद्धा त्या कौरवांच्या सैन्यात दिसत होता. त्याचे हत्ती फार प्रचंड दिसत होते. त्यांवर शत्रूघ्न यंत्रे बसवलेली होती. त्या राजाच्या डोक्यावर शुभ्र छत्री होती. त्याला वारा घालण्यासाठी त्याच्या दोनही बाजूंस चावर्या झुलत होत्या. केतुमत त्याच्या हत्तीवर बसलेला होता. त्यामध्ये राजा भागादत्त सूर्यासारखा तळपत होता. तो त्याच्या हत्तीवर बसलेला होता. अवंतीचे दोम राजपुत्र विंद आणि अनुविंद जे भागादत्तच्या तोडीचे समजले जात होते केतुमताच्या बाजूंने होते. द्रोण, भिष्म, अश्र्वत्थामा, कृप आणि कौरव व्युह त्यांच्या पलटणी घेऊन ज्यात असंख्य हत्ती  घोडे आणि रथ होते, शत्रूवर तुटून पडण्याच्या तयारीत होते. त्यातल्या त्यात व्युहाचा उत्साह विशे, दिसत होता.

भूमी पर्व भाग तेरावा संपला.

# भूमी पर्व

## भाग चौदावा

संजय पुढे सांगत असतो, त्या सुमारास एक मोठा गदारोळ ऐकू येतो. शंखनादाने सगळे आकाश भरून गेलेले होते. सगळे योद्धे लढण्याच्या तयारीत होते. हत्तींचे चित्कार आणि घोड्यांचे खिंकाळणे ह्याने सगळे आसमंत दुमदुमून निघत होते. रथांच्या चाकांचा आवाजाने पृथ्वी थरथरत होती. जसें दोनही बाजूंचे सैन्य एकमेकांत भिडण्यास निघाले त्या सैनिकांचा श्वास ऐकू येत होता. कारण आता त्यांची अंतीम परीक्षा होणार असते. हत्तींच्या आणि घोड्यांच्या पायाने आकाशात धूळ उडालेली होती व त्यामुळें सगळे अस्पष्ट दिसत होते. दोनही पक्षांचे ध्वज फडकत होते. एकंदर दृष्य रुद्र रुप धारण करून होते. आकाशाच ढगे नसतांना विजा चमकू लागल्या होत्या. दोनही बाजूंचे ध्यज सारखेच दिसत होते कारण ते दोघे एकाच घराण्याचे होते. सैनिकांच्या अंगावरील कपडे व चिलखतं सूर्याच्या प्रकाशात सोनेरी चमकत होते. धनुर्धारी त्यांचे तिरकमटे ताणून बसवत होते म्हणजे इशारा मिळतांच ते बाण मारण्यास सुरुवात करणार होते. दोनही बाजूचे वीर दुसर्या बाजूच्या कोणत्या वीराला प्रथम मारावयाचे त्याचा वेध घेत असलेले दिसत होते. तुझ्या मुलांपैकी भिष्माला संरक्षण देण्यात अग्रेसर होते, दुःशासन, दुर्मुख, दुःसह, विविन्सती, चित्रसेन, विकर्ण, सत्यव्रत, पुरुमित्र, जय, भुरिश्रवस, साल, त्यांच्या दिमतीला वीस हजार रथ होते. अभिसाहस, सुरसेना, सिवी, वस्तीस, स्वल्य, मत्स्य, अमवश्त, त्रिगर्त, केकया, सौवीर, कितव, त्यांच्या सह, पूर्व भागातील, पश्चिम भागातील, उत्तरेकडील देशांचे राजे प्राणपणाला लावून कौरवांसाठी लढण्यास तयार होते असें दिसत होते. ते सगळे भिष्माला संरक्षण देत होते. दहा हजार हत्तींची मोठी पलटण घेऊन मगध देशांचा राजा सज्ज होता चढाई करण्यासाठी. रथाचे व हत्तीचे पहाणी करणारे हजारो तज्ञ त्या जनांवरांवर लक्ष देऊन होते. पायदळ तिरकमटे बाण घेऊन आक्रमण करणारे कांहीं लक्ष होते. त्यांत तलवारी, गदा भाले असें इतर शस्त्र धारीसुद्धा होते. कांहीं अंगाला भिडून हाती मारामारी करणारे गळे दाबून मारणारे असेसुद्धा होते त्यांना शस्त्रधारी मदत करणारे होते. अहो राजे अशी आहे तुमच्या मुलांची सेना.

भूमी पर्व भाग चौदावा संपला.

# भूमी पर्व

## भाग पंधरावा

धृतराष्ट्र विचारतो, आपली अकरा अक्षौहीणी सेना व्यवस्थित रचलेल्या स्थितीत आहे हे पाहून युधिष्ठीरांने त्याच्या फौजा कशा रचल्या होत्या ते सांग. त्यांची सेना आपल्यापेक्षा लहान आहे, तिची व्यवस्था कशी केली होती ते सांग. कुंतीच्या मुलांनी कोणता व्युह रचला होता? भिष्माला सगळे व्युह माहित आहेत, जसे मानवी, दैवी, गंधर्वी अथवा आसुरी.

संजय सांगतो, युधिष्ठीराने कौरवांची व्युह रचना पाहून धनंजयाला सांगितले, वृहस्पतीने शिकवले आहे कीं, जेव्हां आपल्याकडे सैनिकांची संख्या कमी असेल तेव्हां चोखंदळपणे व्युह रचना करावयाची असते. लष्कर मोठे असेल तर व्युह रचना करणे सोपे असते. पुढे तो सांगतो कमी सैन्य आहेत म्हणून चंचूप्रवेशाचा व्युह रचला पाहिजे. त्याप्रमाणे आपली व्युहरचना करा असें युधिष्ठीर सांगतो. ते ऐकल्यावर अर्जुन बोलतो, इंद्राने सांगितलेली वज्र रचना मी व्युहासाठी वापरणार आहे. ती ह्या परिस्थितीत योग्य ठरेल. त्या रचनेत भिम त्याची फौज घेऊन पुढे जाईल. तो आपला नेता असेल. तो शत्रूचा नाश करण्यास सुरूवात करील. भिमाची चाल पाहून दुर्योधनाची सेना मागे सरकेल असे ते समजतात. त्याच्या आधाराने आपण नंतर पुढे सरकू. जेथे भिम आहे तेथे लोक बचकून वागतात. त्याच्या रुद्रावताचा आपल्याला फायदा घेता येईल. असें बोलल्यानंतर तसे करण्याचे ठरले. त्यानंतर धनंजय त्याची पलटण घेऊन रणभूमीकडे निघाला. पांडवांचे लहान पण धूर्त असें सैन्य कौरवांच्या सैन्यापुढे झपाट्याने सरकू लागले, जसे गंगेचे पाणी सरकावे. भिमसेन, धृष्टद्युम्न, नकूल आणि सहदेव राजा धृष्टकेतू असें सगळे प्रमुख पांडवांच्या सैन्याचे मार्गदर्शन करू लागले. राजा विराट त्याच्या अक्षौहीणी सेनेसह आणि त्याच्या भावांबरोबर व मुलांबरोबर भिमसेनाच्या पलटणी मागून जात होते. माद्रीची दोन तेजस्वी मुलं भिमाचे संरक्षक झाले. द्रौपदीची पांच मुलं आणि सुभद्रेचा मुलगा जे मोठे योद्धे होते, भिमाला दुसर्या बाजूने संरक्षण देऊ लागले. धृष्टद्युम्न महारथी पांचाल देशाचा राजपुत्र, अर्जुनाला संरक्षण देण्याचे काम घेतो. त्याला संरक्षण देण्यासाठी महापराक्रमी प्रभाद्रकाची योजना केली होती. त्यांच्या मागे द्रुपदाचा मुलगा पराक्रमी राजपुत्र शिखंडी होता. शिखंडीला अर्जुनाचे संरक्षण होते. अशाप्रकारे ते एकमेकांना संरक्षण देण्याची व्युहरचना करत होते. शिखंडी त्याचे एकचित्त करून भिष्माला ठार मारण्याच्या उद्देशाने त्या दिशेने सरकत होता. अर्जुनाच्या मागे युयुधन होता. त्यांच्या मागे पांडालचे दोन युवराज, युधमन्यु आणि उत्तमौजस होते. ते पुन्हा अर्जुनाला संरक्षण देत होते. त्याला केकया बंधू आणि धृष्टकेतू, चेकीतन मदत करत होते. भिम त्याची पोलादी गदा जोरात फिरवत रणांगणात

वेगांने फिरू लागला. त्यांच्या सगळया हालचालींवर कौरवांच्या निरीक्षकांचे बारीक लक्ष होते. ते विभत्सु भिमसेनाकडे पहात युधिष्ठीराला बोलला, ते होत असतांना त्यांच्या सगळया सैन्याने युद्धभूमीची प्रार्थना करण्यास सुरूवात केली. युधिष्ठीराने त्यानंतर सैन्याच्या मध्यभागी स्वताला ठेवले होते. त्याच्या भोवती प्रचंड आकाराचे हत्ती होते त्यांच्या संरक्षणासाठी. उच्चात्मा यज्ञसेन पांचाल नरेश राजा विराटाच्या मागे होते. विराट त्यांचे अक्षौहिणी सैन्य घेऊन पांडवांना मदत करत होता. त्यांच्या रथांवर उत्तम यंत्रे बसवलेली होती ज्यांच्यातून बाणांचा जोरदार मारा करता येत होता. त्यांना शत्रूघ्न म्हणतात. त्या यंत्रांना सोनेरी चमक होती. ती यंत्र सूर्या सारखी तेजस्वी वाटत होती. धृष्टद्युम्न त्याच्या भावांबरोबर आणि मुलांबरोबर युधिष्ठीराला संरक्षण मागून देत होते. त्या तेथे असलेल्या सगळया ध्वजांच्या स्तंभात सर्वात जास्त उंच स्तंभ होता अर्जुनाच्या रथाचा. त्यावर असलेल्या ध्वजावर कपी मुद्रा होती ज्यात मंत्र सामर्थ्य होते. तो ध्वज फार मोठा होता व जोराने फडकत होता. त्यांच्या बाजूने पायदळ चालले होते. त्यांची संख्या कित्येक हजार होती. त्यांच्याकडे तलवारी, भाले, दाणपट्टे, गदा अशी द्वंद्व करण्याची हत्त्यारे होती. ते तयार दिसत होते. ते सुद्धा भिमाला संरक्षण देण्यासाठी होते. दहा हजार मदनमस्त हत्ती युधिष्ठीरा मागून चालत होते त्यांची एक प्रचंड भिंत तयार झालेली होती ज्या संरक्षणात तो जात होता. हत्तींच्या अंगावर सोन्यानी मढवलेली चादरं होती. त्या भोवती कमळांचा सुगंध पसरलेला होता. भिम्न त्याच्या गदेने अरे राजा तुझ्या सैन्याचा पुरता बिमोड करण्याच्या तयारीत होता जसे तुम्ही फार पूर्वी अंदाज केला होता तसे होणार असें दिसत होते. त्या दोनही सैन्यांचे ते हिंस्र स्वरुप कोणी पाहू शकत नव्हते. त्यानी वज्र नांवाचा व्युह रचला होता ज्यामुळें कोठूनही हल्ला करत येत होता. त्या भयंकर सैन्याला अर्जुनाच्या गांडीवाचे संरक्षण मिळाले होते. अशारितीने व्युह रचना करून पांडव युद्धाच्या प्रारंभाची प्रतिक्षा करत होते. पांडवांच्या त्या वज्र रचनेमुळें ते सैन्य अजिंक्य होणार होते.

दोनही सेना सूर्य उगवण्याची वाट पहात होते. पहाटेचा वारा वाहू लागला होता. त्यातून दंवाचे थेंब पडत होते. आकाशात ढगे नसूनही ढगांचा गडगडाट ऐकू येत होता. सुका वारा वाहू लागला होता. त्या वार्याबरोबर आकाशातून टोकदार खडे त्या सैनिकांवर पडू लागले. ते अशनी होते. इतक्या मोठ्या प्रमाणात ते आकाशातून पडत होते पूर्वेकडून. सूर्य उगवत असतांना ती दोन सैन्ये सज्ज असतांना मोठ्याने आवाज ऐकू येऊ लागले होते. पृथ्वीला भेगा पडत आहेत कीं काय, असे वाटत होते.

संजय पुढे सांगतो, अहो राजश्री, तो आवाज असहय्य होण्या इतका मोठा होता. त्यावेळी जोराने पहाणार्या वार्यामुळें वातावरणात धूळीचे वादळ उठलेले होते. कोणी कांहीं पाहू शकत

नव्हता. रथांवरील उंच ध्वजस्तंभ त्या वार्याने मोडून पडू लागले. जसें वादळात माडाची झाड मोडून कोसळावीत. त्या युद्धात ते योद्धे मोठ्या हुशारीने भाग घेत होते. त्यांना मरण्याची खंत नव्हती कारण जर मेले तर ते स्वर्गात जाणार होते. ते सगळे भिमाच्या प्रचंड आकाराकडे पहात होते व त्याच्या हातातील गदा ते पहात होते.

भूमी पर्व भाग पंधरावा संपला.

# भूमी पर्व

## भाग सोळावा

धृतराष्ट्र संजयाला विचारतात, मला सांग सूर्य उगवल्यावर प्रथम कोणी हल्ला केला त्या युद्धात, माझ्या सैनिकांनी कां पांडवांच्या? सूर्य कोठल्या बाजूला होता? ते अशुभ प्राणी जे मेलेल्यांना खातात कोणाच्या बाजूने ओरडत होते? तो भयंकर वारा कोणाच्या बाजूने होता? त्यांतील कोणते ते शूर वीर होते जे लढण्यासाठी उत्सुक होते ते सगळे मला सांग.

संजय सांगतो, दोनही सैन्यातील सैनिक सारखेच उत्सुक होते लढण्यासाठी. दोनही सेना अफाट होत्या, त्यांच्याकडे हत्ती होते त्याशिवाय इतर सैन्य सारखेच तेजस्वी वाटत होते, कोणी जास्त असें मला सांगता येणार नाही अहो राजश्री. दोघांमध्ये जिंकण्याचा हुरूप सारखाच होता. कौरव जे तुमच्यासाठी लढत होते ते पश्चिमेकडे तोंड करुन उभे होते व पांडवांचे सैन्. पूर्वेकडे तोंड करून होते. दोघे एकमेकांना पहात होते. कौरवांचे सैन्य दानवांचे सैन्य वाटत होते आणि पांडवांचे सैन्य देवांचे वाटत होते. पांडवांच्या मागून वारे वाहू लागले होते. त्यावेळी वारा कौरवांच्या अंगावर येत होता आणि त्यावेळी ती श्वापद जी मेलेल्या माणसांचे भक्ष्य करणार ते धृतराष्ट्राच्या सैन्याकडे पहात भयंकर रित्या ओरडू लागले होते. कौरवांच्या सैन्यातीव हत्तींना पांडवांच्या हत्तींच्या डोक्यातून येणारा मदाची गंध सहन होईना.

दुर्योधन हत्तीवर बसला होता. त्याच्या डोक्यावर छत्री होती. त्याचा हत्ती सुंदर प्रकारे शृंगारलेला होता. त्याच्या भोवती भाट त्याची स्तुतीकरत गाणी गांत होते. संपूर्ण हत्ती पोलादी चिलखताने संरक्षित केलेला होता. गांधारचा युवराज त्यांच्या गांधारी पहाडी सैन्यासह त्याच्या मागी सज्ज दिसत होता. भिष्म सगळया कौरव सेनेच्या पुढे होते. त्यांच्या डोक्यावर शुभ्र छत्री होती. त्यांच्या कडे धनुष्य बाण, तलवार, जांबिया अशी शस्त्र होती, अंगावर शुभ्र कपडे होते. त्यांचा रथ सुद्धा पांढर्या रंगाचा होता. घोडेसुद्धा सफेत होते. भिष्माच्या पलटणात धृतराष्ट्राचे सगळे पुत्र होते. त्याशिवाय साल, जो वल्हीकांच्या गांवचा होता त्याशिवाय इतर क्षत्रिय होते जे अमवस्त म्हणून ओळखले जात होते. त्याशिवाय सिंधू प्रदेशातील होते. सौवीरचे होते, सगळे मोठे लढवय्ये होते. ते पांच नद्यांच्या प्रदेशातून आलेले होते लढण्यासाठी.

सोनेरी रथात होते द्रोण. त्यांचे घोडे लाल रंगाचे होते. त्यांच्या हातात धनुष्य होते. ते सगळया सैन्याला संरक्षण देण्यासाठी त्यांच्या मागून येत होते. कृपाचार्य जे कौरव आणि पांडवांचे शिक्षक होते ते ज्यांना गौतम म्हणून सुद्धा बोलले जाते, त्यांचे युद्ध कलेतील श्रेय अतुलनीय आहे

ते त्यांच्या रथातून सज्ज होते. त्यांना शक, किराट, यवन पल्हव ह्या योद्ध्यांची साथ होती. कारण ते त्यांचेसुद्धा शिक्षक होते. ते कौरवांच्या सैन्याच्या उत्तरेकडील भागाचे संरक्षण करत होते. एक मोठा फौजफाटा जो वृश्नींचा होता तो  वत्यात भोज वंशाचे लोक होते. त्याशिवाय सौराष्ट्रचे योद्धे त्यात होते. त्यांचे नेतृत्व कृतवर्मन करत होता. ते सैन्याच्या दक्षिणेकडील भागाचे संरक्षण करत होते. दहा हजार रथ घेऊन समसप्तक अर्जुनाचे संरक्षक म्हणून सज्ज होते. शूर वीर त्रिगर्त त्यांची फौज घेऊन तुमच्या कौरवांच्या पलटणीत होते. त्यांच्या प्रत्येक हत्ती बरबर शंभर रथ तैनात होते. प्रत्येक रथामागे दोनशे पाईक होते. अहो भारत, अशारितीने भिष्मानी तुमच्या सैन्याची व्यवस्था केलेली होती. सरसेनापती भिष्म, शंतनुचे पुत्र, दर दिवशी त्यांच्या व पांडवांच्या फौजांतील असंख्य सैनिकांना यमाकडे पाठवत होते. कांहीं स्वर्गात कांहीं गंधर्व लोकांत असें जात होते. कांहीं असुर लोकात जात होते. महारथांच्या त्या लष्कराची व्युहरचना भिष्म दररोज बदलत होते परिस्थिती नुसार. तुमचे सैन्य अमर्याद होते. त्याचा व्याप पाहून कोणी घाबरून जाईल असे ते सैन्य होते. पांडवांचे सैन्य त्यामानाने लहान होते परंतु, मला ते मोठे वाटत होते कारण, अहो विचित्रवीर्याच्या मुला, त्यात कृष्ण आणि अर्जुन होते.

भूमी पर्व भाग सोळावा संपला.

# भूमी पर्व

## भाग सतरावा

संजय सांगत असतो, अफाट सैन्य पाहून युधिष्ठीराच्या अंगाला घाम फुटतो. तो काळजी करू लागतो. त्यात सुद्धा त्या सज्ज लष्कराचे नेतृत्व भिष्म करणार आहेत ह्या जाणीवेने तो आणखीनच गर्भगळीत होतो. त्या परिस्थितीत तो अर्जुनाला बोलतो, "अरे महाबली धनंजया, आपण अशा मोठ्या लष्कराचा सामना कसा करणार त्याची मला चिंता वाटत आहे. त्यात त्या सैन्याचे सरसेनापती आहेत आपले आजोबा भिष्माचार्य, त्यांचे व्युह अभेद्य असणारच, त्यात आपले सैन्य तुलनेने लहान आहे. त्यांच्या विविध व्युहाच्या रचनात आपले सैन्य अडकले जाऊन आपल्याला माघार तर नाहीं ना घ्यावी लागणार"? त्यांचे सैन्य सर्वगुणांनी युक्त आहे अशा परिस्थितीत आपल्या सैन्याला ते सहज मारू शकतील त्याची मला चिंता वाटत आहे. ते ऐकल्यावर अर्जुन त्याला उत्तर देतो, अरे राजा त्याची तू फिकीर करू नकोस. नारदांनी सांगितल्या प्रमाणे, जे भिष्म आणि द्रोण जाणतात, अशा परिस्थितीत जसे इंद्राने असुरांच्या भल्या मोठ्या सैन्याचा देवांच्या लहान सैन्याने पाडाव केला होता तसेच आपण करणार आहोत. युद्ध संख्येने जिंकले जात नाही, तर ज्याच्याकडे सत्य आहे, ज्याच्यात पुण्यप्रभाव आहे, आणि ज्याच्याकडे संयम आहे अशा दलाला अखेरीस जय प्राप्त होत असतो. जे नैतिकतेला धरून लढतात त्यांना विजय माला प्राप्त होत असते. आपल्या कडे ते सगळे उत्तम गुण पुरेपुर आहेत म्हणून विजय आपलाच होणार आहे. त्याशिवाय जेथे भगवान तेथे जय हा नियम आहे. कृष्ण आपल्याबरोबर असल्यामुळें आपण विजयी होणार ह्याबद्दल निश्र्चिंत रहावे. कारण विजय हा कृष्णाचा (नारायणाचा) एक महत्वपूर्ण गुणविशेष आहे. जेथे तो आहे तेथे कोठल्याही प्रकारचा गोंधळ होत नाही. त्या असुर देवांच्या युद्धात सुद्धा तेंच झाले आणि देवांचा विजय झाला आणि इंद्र देवांचा राजा झाला ते फार प्राचीन काळी घडले, त्याची आता पुनरावृत्ती होणार आहे.

भूमी पर्व भाग सतरावा संपला.

# भूमी पर्व

## भाग अठरावा

संजय पुढे सांगतो, युधिष्ठीराचे सैन्य भिष्माच्या सैन्याच्या विरोधात उभे होते. तो बोलतो, शास्त्रात दिले आहे त्या प्रमाणे त्याच्या सैन्याची व्युहरचना झाली आहे. आता पुण्याला सामरुन लढा. ज्यामुळें मेलात तर स्वर्गात जाल. पांडवांच्या लष्कराच्या मध्यभागी शिखंडी होता. त्याच्या पलटणाला अर्जुनाचे संरक्षण होते. पांडवांचे हुशार तिरंदाज त्यांचे लक्ष्य साधण्यासाठी सज्ज होते. त्यांचा प्रमुख होता युयुधन, सतावत घराण्याचा योद्धा. तो इंद्रासारखा तेजस्वी दिसत होता. त्यांचे रथाचा ध्वज उत्तमरित्या शृंगारलेला होता. त्याचे हत्तीदळ सुद्धा सज्ज होते. अनेक ऋषी पांडवांना शुभेच्छा देत फिरत होते त्यांच्या सैन्यामधून. अनेक पुरोहित देव देवतांची स्तुती करत त्यांच्या कृपेसाठी प्रार्थना करत होते. मोठे कर्मकांड सिद्ध होत होते त्यासाठी. लोकपाल देवतांना संतुष्ट करण्यासाठी विविध पुजा केल्या जात होत्या. त्यासाठी ब्राह्मण काम करत होते. अनेक दानं दिली जात होती इंद्राची विशेष पुजा केली जात होती. अर्जुनाचा रथ सुशोभित केलेला होता, त्याच्या भोवती अनेक लहान घंटा लावलेल्या होत्या. त्यांचा सुंदरसा नांद होत होता. त्याचे घोडे शुभ्र रंगाचे होते. संपूर्ण रथ सूर्यासारखा चमकत होता. त्या कपीमुद्रा असलेल्या ध्वजाच्या रथाचे सारथ्य साक्षात भगवान करत होते. अर्जुन त्याचे गांडीव घेऊन तयार होता युद्धासाठी. पलिकडे भिमसेन तुझ्या मुलांचा नाश करण्यासाठी सर्व तयारीनिशी सज्ज होता. त्याला लोक भयापोटी वृकोदर म्हणून बोलत असतात. त्याचे संरक्षण करण्यासाठी माद्रीची दोन मुलं सज्ज होती. त्या भिमसेनाची तयारी पाहून तुझे सैन्य घाबरून गेलेले दिसत होते. चिखलात अडकलेल्या हत्तीसारखी त्यांची अवस्था झालेली मला दिसत आहे. तो अजिंक्य पांडव गुडाकेशा त्यांच्या सैन्याच्या मधोमध होता. जनार्दन बोलतो, जो आम्हाला सतावण्याचा प्रयत्न करील, त्याचा आम्ही नाश करणार आहोत. ज्यांने तिनशे अश्वमेध यज्ञ केले त्या भिष्माला उद्देशून तो बोलतो, तुझ्या भोवती चांगले संरक्षण ठेव नाहीतर आम्ही तुला मारून टाकणार आहेत.

भूमी पर्व भाग अठरावा संपला.

# भूमी पर्व

## भाग एकोणीसावा

संजय पुढे सांगत असतो, धृतराष्ट्राचे सैन्य जवळ येत आहे ते पाहून कृष्ण अर्जुनाला त्याच्या भल्यासाठी बोलतो, अरे धनंजया तू स्वताला प्रथम शुद्ध करून घे, त्यासाठी दुर्गा स्तोत्र गावयाला सुरूवात कर. त्यामुळें तुझ्या शत्रूंचा नाश होईल. संजय पुढे सांगतो, वासुदेव असे युद्धाच्या प्रारंभी बोलल्यानंतर कुंतीचा मुलगा पार्थ त्याच्या रथातून खाली उतरतो. त्यानंतर हात जोडून तो स्तोत्र गाऊ लागतो, त्याचा अर्थ असा, "अहो योगिनी, तू साक्षात परब्रह्म स्वरुप आहेस. तू मंदार पर्वताच्या अरण्यास वास करत असतेस. जे पापविरहीत आहेत व जे दुष्कर्म करत नाहीत, अहो काली, तू कपालाचे अर्धांग आहेस, तुझा वर्ण सावळा आहे, मी अशा तुला वंदन करत आहे. अहो महाकाली, विश्वनाशीनी, मी तुला वंदन करत आहे, तू तुला शरण आलेल्यांना संरक्षण देतेस अशी तुझी ख्याती आहे, तुझ्यात सगळे उत्तम आणि पवित्र गुणविशेष आहेत, ते तुझे अंगीभूत आहेत. अशा तुला जेवढे पुजावे जेवढे कमीच आहे. अहो महाभयंकर नाशीनी, तुझे चिन्ह आहे मोराचा पिसारा, तुझ्या अंगावर सगळे उत्तम दागिने असतात, तुझ्या कडे सगळी शस्त्र, अस्त्र असतात. ती घेऊनच तू तुझ्या भक्तांना दर्शन देत असतेस. तू गोपालाची मोठी बहिण आहेस, तू नंदाच्या घरात जन्मलीस आणि मेलीस. तुला म्हशीचे रक्त प्यायला आवडते. तो तुझा प्रसाद असतो. तो देऊन तुझे भक्त तुला प्रसन्न करत असतात. तू कौशिकाच्या घरात अवतरली होतीस. तुझे वस्त्र पिवळे असते, तू लांडग्याचे रुप घेईन असुरांना खात होतीस, मी अशा तुला नमस्कार करतो कारण तू शौर्याची देवता आहेस. तू शकांबरी होतेस, त्यावेळी तुझा रंग शुभ्र असतो, एरवी तुझा रंग काळा असतो, तू असुर कैतभाचा वध केलास, त्यावेळी तुझे डोळे पिवळे होते, तुझ्या डोळयांचे रंग बदलत असतात. कधी त्यांतून धूर येतो खधा ज्वाळा येतात. अशा तुला मी वंदन करत आहे. तू वेद आहेस, तू श्रृती आहेस, तूंच पुण्य आहेस, तूंच समृद्धी आहेस, ब्राह्मण तुलाच दान करतात जे तू बळी म्हणून स्वीकारत असतेस. तू भूत भविष्य आणि वर्तमान सगळे जाणत असतेस. तू जंबूद्विपात तुझ्या पवित्र वास्तूत वास करत असतेस. अशा तुला मी वंदन करत आहे. तू विज्ञान आहेस, तू ज्ञान आहेस, तूंच कला आहेस, तूंच चराचरांचा मृत्यूसुद्धा आहेस. तू स्कंदाची माता आहेस, तुलाच स्वाहा म्हणतात, तुलाच स्वाध म्हणतात, तूंच काळ आहेस, तूंच कश्थ सुद्धा आहेस. तूंच सरस्वती आहेस, तूंच सावित्री आहेस, तू सगळया वेदांची जननी आहेस, मी माझे चित्त शुद्ध ठेवून तुझी प्रार्थना करत आहे. अहो महादेवी, मला ह्या व नंतरच्या सर्व युद्धात जय मिळो असा मला आशिर्वाद दे. तू पाताळात सुद्धा असतेस, तेथे तू दानवांना हरवतेस. तू जागृती आहेस, तू निद्रा

आहेस, तू भ्रम आहेस, तू नम्रता आहेस, तूंच प्रकाश आहेस, तूंच सावित्री आहेस, थूंच सगळयांची माता आहेस. तूंच समाधान आहेस, तूंच विकास आहेस, तूंच जीवंतपणा आहेस, तूंच सूर्य व चंद्राना चालना देत आहेस, सिद्धांची सिद्धी तूं आहेस, चरण सदैव तुझ्या ध्यानात असतात. अशा तुला मी वंदन करत आहे अहो महादेवी.

संजय पुढे सांगत असतो, त्यातून पार्थाची भक्ती किती थोर आहे ते समजत होते. दुर्गा जी माणसाला सदैव सदत करण्यासाठी तत्पर असते, आकाशात उभी राहिली पार्थाची प्रार्थना ऐकून. गोविंदासमोर येऊन ती पार्थाला म्हणाली, "थोडयाच अवधीत तू तुझ्या शत्रूला पादाक्रांत करणार आहेस. अरे पांडवा, तू तसासुद्धा अजिंक्यच आहेस, त्यात तुला नारायणाची साथ आहे, अशा तुला हरवणे कोणालाही शक्य नाही. इंद्रसुद्धा तुला हरवू शकणार नाही". असें बोलून ती वरदाईनी अदृष्य होते. तो वर मिळाल्यावर त्या कुंतीपुत्राचा आत्मविश्वास वृद्धींगत होतो. ते स्वतांला आधीच जिंकलो असे समजू लागतो. त्यानंतर तो त्या हुरूपात त्याच्या त्याच्या रथात चढतो. त्यानंतर ते दोघे त्यांची रणवाद्ये शंखू बाहेर काढतात व वाजवू लागतात.

जे हे स्तोत्र पहाटे उठून पूर्ण भक्तीने गातील त्यांना कोणाही पापशक्तीचे भय रहाणार नाही. राक्षस, यक्ष, पिशाच्च असें कोणीही त्या माणसाला उपद्रव करू शकणार नाहीत असें संजय धृतराष्ट्राला सांगतो. त्या भक्ताला शत्रू रहाणार नाहीत, त्याला साप चावणार नाही, तो सगळया प्रकारच्या वादात जिंकत राहील, त्याला चोरांची भिती रहाणार नाही, तो कधी बंधनात जाणार नाही, तो सदैव समृद्ध राहिल. कारण ते स्तोत्र गाणार्यावर अंबा माता नेहमी कृपा करत राहील. तू दीर्घायुषी होईल. ते मला व्यासांच्या कृपेने समजले असें संजय धृतराष्ट्राला सांगतो. तुझ्या पाप करण्यात गुंतलेल्या मुलांना हे माहित नाही कीं, अर्जुन व कृष्ण प्रत्यक्षात नर आणि नारायण आहेत त्यांमुळें ते ह्या समरात जिंकणे केवळ अशक्य आहे हे तू समजून घे. ते निष्कारण ह्या लढण्यात गुंतत आहेत, नारद, द्वैपायन, कण्व आणि राम सगळे त्यांना सांगून थकले पण व्यर्थ. जेथे पुण्यप्रभाव आहे तेथे अंतीम यश असते हे त्यांना समजत नाही. जेथे नम्रपणा, चांगुलपणा, माणूसकी आणि भूतदया आहेत तेथे कृष्ण असतो म्हणून तेथे सगळे यश प्राप्त होत असते.

भूमी पर्व भाग एकोणीसावा संपला.

# भूमी पर्व (संपले)

## भाग विसावा

धृतराष्ट्र विचारतात, "अरे त्या युद्धभूमीवर कोणाच्या योद्ध्यांना पहिला वार केला ते मला सांग. कोण जास्त आत्मविश्वास व्यक्त करत होत? कोण अस्वस्थ वाटत होते? कारण युद्ध म्हंटले कीं भिती वाटत असतेंच. मला सांग कोणी पहिला वार केला व कोणावर. माझ्या वीरांनी कां पांडवांच्या? कोणाच्या गळयातील हारांचा गंध जास्त दरवळत होता? कोणते योद्धे जोराने शिव्यागाळी करत लढत होते"?

ते ऐकल्यावर संजय बोलतो, दोनही बाजूंचे यौद्धे उत्साही होते, कोणीही शिव्यागाळी करत नव्हते. दोनही पक्षांच्या सैनिकांच्या गळयातील हारांचा सुगंध सारखाच दरवळत होता. त्यात जो धमाका झाला तो फारच भयंकर होता. कोणीही कमी ठरत नव्हते. रणवाद्ये जोरांनी वाजवली जात होती त्यातसुद्धा दोनही कडचे वाजंत्री सारखेच प्रवीण होते. शूरवीरांचे ओरडणे सारखेच होते. दोनही पक्ष सारखेच उत्साही होते, त्या सगळयांना जणू स्वर्गात जाण्याची घाई झाली होती असे वाटत होते. हत्तींचे चित्कार वाढत होते. अशाप्रकारे त्या युद्धाला प्रारंभ झाला होता.

भूमी पर्व भाग विसावा संपला.

# भगवत गीता पर्व (सुरू)

# भाग एकविसावा

## पहिला अध्याय ,अर्जुन विषाद योग

धृतराष्ट्र विचारतात, अरे संजया, त्या पवित्र कुरुक्षेत्री माझे आणि पंडुचे पुत्र लढण्यासाठी जमले होते ते त्या ठिकाणी काय करत होते ते मला सांग.

संजय सांगतो, पांडवांचे सैन्य समोर उभे पाहून दुर्योधन द्रोणाचार्यांना बोलतो. "पहा अहो गुरू, ते पांडवांचे अफाट सैन्य आता युद्धासाठी तयार आहे. त्याची व्युहरचना धृष्टद्युम्नानी केली आहे. तोसुद्धा तुमचा हुशार शिष्य होता. त्यांच्या सैन्यात बरेच महाबली तिरंदाज आणि तलवार बहादर आहेत. जे लढाईत भिम आणि अर्जुनाच्या सारखे आहेत. त्यात युयुधन आहे, विराट आहेत, महाबली द्रुपद आहेत, चेकीतन आहे, राजा काशीचा आहे, त्याशिवाय पुरुजित आहे, कुंतीभोज आहे, शैव आहे, युधमन्यू आहे, त्याशिवाय उत्तमौजस आहे, सुभद्रेचा मुलगा आणि द्रौपदीची मुलं आहेत. अहो गुरूजी, मला सांगा त्यांच्या योग्यतेचे आपल्यात कोण आहेत.

द्रोण सांगतात, मी तुझ्यासाठी त्यांची नांव सांगतो. तू स्वतः आहेस, त्याशिवाय भिष्म, कर्ण, कृप, अश्र्वत्थामा, विकर्ण, सौमदत्त, जयद्रथ, ह्यांच्या शिवाय तुझ्यासाठी जीव पणाला लावणारे आहेत जे सिद्धहस्त योद्धे आहेत. तरी आपले सैन्य भिष्म असूनही अपूर्ण आहे असे वाटते. आपल्याला आघाडीला ठेवून भिष्माचार्यांना संरक्षण देण्याची व्यवस्था करावी लागत आहे. कुरु घराण्याचे महापिता दुर्योधनाला समाधान वाटावे म्हणून सिंह गर्जना करत आहेत, त्यांचे शंखू वाजवत आहेत. ते बोलत असतांना रणवाद्ये वाजू लागली. एकच गदारोळ सुरू झाला. त्यावेळी माधव आणि धनंजय त्यांचा रथ घेऊन रणभूमीच्या मध्य भागी आले. त्यांनी त्यांची शंखू, कृष्णाचे पांचजन्य आणि अर्जुनाचे देवदत्त ते वाजवू लागतात. भिमाने त्याचा प्रचंड आकाराचा पौंड्र शंख वाजवायला सुरूवात केली. युधिष्ठीर त्याचे शंख, अनंतविजया,  काढतो व वाजवू लागतो. नकूल त्याचे शंख सुघोष आणि सहदेव त्याचे शंख मनीपुष्पक वाजवू लागतात. पांडवांच्या बाजूचे इतर योद्धे शिखंडी, धृष्टद्युम्न, विराट, सत्यकी, द्रुपद, द्रौपदीची मुलं आणि अभिमन्यू आपापले शंख वाजवू लागतात. त्या घोषाने सगळे आसमंत दुमदुमून निघते. त्या आवाजाने धृतराष्ट्रचे लोक बेचैन होतात.

त्या सुमारास धृतराष्ट्राचे सैन्य पुढे सरकू लागते ते हल्ला करण्याच्या बेतात होते. त्या वेळी अर्जुन त्याचे गांडीव वर उचलून कृष्णाला बोलतो, अरे कृष्णा, जरा हा आपला रथ दोन सैन्याच्या मध्ये नेऊन ठेव, मला ते सगळे योद्धे जे माझे आप्त आहेत त्यांना पहावयाचे आहे. जे आमच्याशी त्यांच्या वाईट मतलबासाठी लढण्यास उत्सुक आहेत.

संजय पुढे सांगतो, अशाप्रकारे विनंती झाल्यानंतर कृष्ण तो रथ ज्यावर कपीचे चिन्ह आहे व ज्या ध्वजातून दैवी शक्ती डोकावत आहेत, दोन सैन्यांच्या मध्ये आणून ठेवतो. तेथून त्यांना भिष्म, द्रोण, कृप आणि इतर अनेक राजे जे पृथ्वीवर राज्य करत होते ते पहातो. थोडावेळ ते पाहिल्यावर अर्जुन बोलतो, "ते सगळे माझे नातेवाईक आहेत, त्यात माझे आजोबा, माझे गुरू आहेत, माझे अनेक मित्र आहेत. त्यात आमचे सासरे आहेत, चुलत भावंड आहेत". ते पाहिल्यावर त्याला त्या सगळयांची किंव येते व तो बोलतो कृष्णाकडे पहात, "पहा ते आम्हाला मारण्यासाठी उत्सुक आहेत एका जमिनीच्या तुकड्यासाठी. ते पाहून माझे हात व पाय कांपू लागले आहेत. माझे तोंड कोरडे पडले आहे. माझ्या अंगावर कांटा उभा राहिला आहे. माझ्या हातून माझे गांडीव गळून पडते कीं काय असे झाले आहे. माझे मन द्विधा झाले आहे. काय योग्य व काय अयोग्य त्याचे ज्ञान मला होत नाही अशी माझी परिस्थिती झाली आहे. अरे कृष्णा, ह्या सगळयांना मारून तो जमिनीचा तुकडा मिळवावा इतका तो महत्वाचा नाही असे मला वाटते, आणि जरी तो मिळाला तरी त्यात सुख ते कोणते असणार? मला समजत नाही काय योग्य आणि काय अयोग्य? अरे केशवा, मला वाटते युद्ध करू नये कारण त्या युद्धात जरी जिंकलो तरी ह्या सगळयांचा वध करून जे मिळेल ते पुण्यकारक कसे असेल? राज्यसत्ता, त्यातून मिळणारे सुख हे सगळे मला पापकारक वाटते. अरे गोविंदा, तसले सुख व तसली सत्ता मला नको असें वाटते. ज्यांच्यासाठी पृथ्वी जिंकावयाची ते आमचे आप्तच मी मारणार असेन तर त्या विजयात कोणते श्रेय असणार? त्यांना मारण्यापेक्षा त्यांच्या हातून मरणेच जास्त श्रेयस्कर आहे असें मला वाटते. हे सगळे धृतराष्ट्रीई जरी आमचा द्वेष करत असले तरी ते आमचे आप्त आहेत, त्यांना मारणे हे पाप ठरणार नाही कां? आपल्या नातेवाईकांना मारून जे मिळेल त्यात आम्हाला आनंद कसा वाटणार"? मला माहित आहे कीं, त्यांची नियत बिघडलेली आहे, त्यांचा नाश करून त्यांची नियत आम्ही सुधारू शकणार नाही. मग हे कशाला करावयाचे. अशामुळें आम्ही आमचे कुळ संपवले त्याचे दोषी ठरणार आहोत ते कितपत योग्य असेल ते मला तू सांग. कारण अरे मित्रा, तू मला त्यांना नष्ट करण्यास सांगत आहेस व त्यासाठी वेळोवेळी उत्तेजन सुद्धा देत आहेस. आम्ही ह्यांचा नाश कां करावा ते मला समजावून दे कारण, माझ्या अल्पमती नुसार ते अयोग्य आहे. मला तुझ्या मार्गदर्शनाची आवश्यकता आहे. असे पहा जनार्दना, वंश नष्ट झाला कीं, त्याची संस्कृती संपते, पाप वाढत

जाईल, त्या परिस्थितीत त्या कुळातील बायका असुरक्षित झाल्याने भ्रष्ट होतील. वर्णसंकर होईल. अशास आम्ही कारणीभूत झाल्याने आम्हाला पाप लागेल त्याचे प्रायश्चित्त कसे घेणार"? कुटूंबाचे संस्कार नष्ट केल्याचे पाप लागेल. त्यामुळे आमचे पितर उपाशी रहातील त्यांची श्राद्ध कोणी करण्यास नसतील. असे मी ऐकले आहे कीं, जर पितर उपाशी राहिले तर आम्ही नरकात जाऊ. मग युद्धात मरण्याचे श्रेयसुद्धा आम्हाला मिळणार नाही. मला वाटते हे युद्ध करण्याचे ठरवून आम्ही मोठी चूक केली आहे. एका जमिनीच्या तुकड्यासाठी आम्ही फार मोठे पाप पदरात बांधून घेण्यास निघालो आहोत ते बरोबर नाही असें मला वाटते. त्यापेक्षा त्यांच्या हातून मरणे जास्त श्रेयस्कर होईल असें मला वाटते.

संजय पुढे सांगतो, अशाप्रकारे खंत व्यक्त करत अर्जुन त्याचे गांडीव जमिनीवर ठेवतो व रथात शांतपणे जाऊन बसतो.

हा भगवत गीतेचा पहिला अध्याय आहे, त्यात विचारलेल्या प्रश्नांचा आपण विस्तार पूर्वक विचार पुढे करणार आहोत. तो झाल्यानंतर भगवत गीतेच्या दुसर्या अध्यायाचे वाचन करणार आहोत.

*हा भाग महाभारताच्या भाषांतराचा नाही म्हणून तिरक्या अक्षरात दिला आहे. ज्यांना ह्या अध्यात्म शास्त्रात विशेष कुतूहल आहे त्यानी जरूर वाचावा, ज्यांना फक्त महाभारत वाचावयाचे आहे त्यानी वाचण्याची आवश्यकता नाही.*

## ***गीता बोध अभ्यास***

*गीतेतील अर्जुनाच्या बोलण्यातून जे प्रश्न उपस्थित झाले होते ते येथे दिले आहेत.*

*१ युद्धात स्वजनांना मारून कसे हित होईल?*

*२ परजनांना मारून कसे हित होईल?*

*३ कोणालाही मारून यश मिळवणे कसे योग्य होईल?*

*४ हे युद्ध विजयासाठी आहे कां कोणत्यातरी इतर उद्देशाने योजले आहे विधात्याने?*

*५ स्वप्रियजनांना सोडून हे सर्व शूरयोद्धे युद्धात मरण्यासाठी कां जमले आहेत?*

*६ हे सगळे माझे प्रियजन आम्हाला मारण्यासाठी कां एवढे उतावीळ झाले आहेत?*

*७ जरी हे आम्हाला मारण्यासाठी उतावीळ असले तरी मी मात्र त्यांना मारण्यासाठी तयार नाही. केवळ पृथ्वीचे राज्य मिळवण्यासाठी अशी हिंसा करणे कितपत योग्य असेल?*

*८ कौरव जरी दुष्ट असले तरी त्यांना मारून आम्हाला पापच लागणार नाही कां?*

*९ स्वजन कितीही वाईट असले तरी त्यांना मारणे व त्या द्वारा राज्य मिळवणे हे कसे सुखप्रद होईल?*

*१० स्वजनांचा नाश केल्यामुळें कुळक्षय होणार हे स्पष्ट दिसत असतांना मी हे युद्ध कसे करू?*

*११ कुळक्षयातून कुळधर्म (कुळाचे रितीरीवाज, परंपरा इत्यादी) बुडेल त्यामुळें अधर्माचा पगडा समाजावर बसतो, त्यामुळें कुलिन स्त्रिया भ्रष्ट होतात, ते पाप माझ्या पदरी पडेल, ते मी कां करावे?*

*१२ कुळस्त्रियां भ्रष्ट झाल्या कीं, वर्णसंकर होईल, त्यामुळे कुळाचार (श्राद्ध, तर्पण इत्यादि विधी) लुप्त होतील. तसें झाले कीं, आमचे पितर अधोगतीला जातील. ह्या सगळ्या गोष्टींना मी जबाबदार असणार, तर हे करण्याने मला फक्त त्यात नुकसान दिसत आहे, तर अरे भगवंता, तू ज्ञानी आहेस म्हणून मला योग्य मार्ग सांग, माझी मति कुठीत झाली आहे, मला कांहीं सुचत नाही.*

*१३ केवळ राज्य प्राप्तीसाठी आम्ही हा केवढा मोठा प्रमाद करण्यास तयार झालो व तू त्यात आम्हाला उत्तेजन देत आहेस, हे केवढे मोठे आश्चर्य!*

*१४ असे महापातक करण्यापेक्षा मी निःशस्त्र राहून प्रतिकार न करतांही जर सशस्त्र कौरवांच्या सेनेकडून मारला गेलो तर ते मला कल्याणप्रद नांहीं कां ठरणार?*

*१५ हे भगवंता, तू सगळे जाणतोस, माझी मति कुंठीत झाली आहे, तरी धर्म व अधर्म ह्यातील फरक जाणण्यास माझे मन असमर्थ झाले आहे, म्हणून मी तुला विचारतो कीं, जे खरे व श्रेयस्कर असेल ते मला सांग. दुसर्या शब्दात विचारावयाचे म्हणजे, ह्या युद्धामागील खरा उद्देश व त्या बद्दलचे ज्ञान तू मला सांगावेस, म्हणजे माझ्या मनातील शंकांचे निरसन होईल. मी हे युद्ध करण्यास योग्य अशा मनस्थितीत राहीन असे करावे.*

*गीतेच्या पहिल्या अध्यायात अर्जुनाने वरील पंधरा प्रश्न उपस्थित केले आहेत. त्याची*

*उत्तरं श्रीकृष्ण पुढे देतात, ती अशी,*

*प्रश्न १ते ७ चे उत्तर असें दिले आहेत,*

*हे अर्जुना, तू विचारलेल्या सर्वच प्रश्नांचा संबंध एकाच शंकेशी आहे, व ती अशी कीं, तू असं समजून बोलतोस कीं, तू त्यांना मारणार आहेस. परंतु, हा तुझा केवळ गैरसमज आहे कीं, तू कोणाला मारतोस. अरें जर तू त्यांना मारले नाहीस तर ते मरणार नाहीत असा तुझा समज आहे. जन्मलेला प्रत्येक जीव मरणारच हा निसर्गाचा नियम आहे. ह्याचा अर्थ त्यांना निसर्ग मारत असतो व तू फक्त कारणमात्र असतोस. हे सत्य प्रथम लक्षात घे. सगळ्या योद्ध्यानी व खाटकांनी हे सत्य लक्षात घेऊन जर आपले कर्म केले तर ते स्वर्गात जाऊ शकतात. त्या मनोवृत्तीला निष्काम व म्हणून निष्पाप हत्या असे म्हणतात जी सगळ्या योद्ध्यांना व खाटकांना त्यांच्या धर्मानुसार करावी लागते.*

*आता प्रश्न निर्माण होतो, जर असे आहे तर, तू त्यांना कां मारावेस? तुला असे वाटते कीं, मी तुला व सगळ्या तुझ्या भावांना व त्यांच्या बरोबर त्या सगळ्या योद्ध्याना करावयास लावत आहे तर ते एका अर्थाने योग्य आहे कारण, अरे मी म्हणजेच निसर्ग त्यांना मारत आहे कारण, त्यांची वेळ येऊन ठेपली आहे. एक गोष्ट प्रथम लक्षात घे कीं, तू किंवा कोणी कोणाला मारू शकत नाही, जे मारतात ते केवळ कारण मात्र असतात. निसर्गाचे साधन तू बनला आहेस एवढेच खरे असते. बाकी सगळ्या निव्वळ कल्पना असतात म्हणून त्यात अडकून घेऊ नकोस. असे असले तरी त्या कृत्यात तू कोठे गुंतला जाऊ शकतोस व म्हणून पाप करण्यास उद्युक्त होऊ शकतोस ते मी तुला नंतर समजावून देईन. तू आत्ताच बोललास कीं, तू त्यांना मनापासून मारू इच्छित नाहीस. त्यात तुझा निष्पापपणा सिद्ध होतो. जर परिस्थितीत सापडल्यामुळें जेव्हां तू अथवा कोणीही मारण्यास उद्युक्त होतो तेव्हां त्या हत्त्येत पाप नसते. जसें संरक्षणासाठी, एकाद्याला तुला मारावे लागले तर ती कृती पापास कारणीभूत समजली जात नाही. युद्धात सैनिक जी हत्त्या करतात ती संरक्षणासाठीची हत्त्या समजली जाते कारण जर तू त्याला नाही मारलेस तर तो तुला मारणार असतो, म्हणून तू त्याला मारून तुझे संरक्षण करत असतोस. त्याला मारतांना जर तुझ्या मनात त्याच्या बद्दल कणव (दयाबुद्धी) असेल तर तुला उलट पुण्य लागत असते व म्हणूनच त्या मनस्थितीत लढणारे योद्धे युद्धात मरतात ते स्वर्गात जातात. खाटकाचे सुद्धा तसेंच असते, त्याच्या मनात मारल्या जाणार्या प्राण्याबद्दल दयाबुद्धी असेल तर ती हत्त्या त्याला बाधत नाही. कारण तो समाजाच्या भल्यासाठी त्या प्राण्याला यमाकडे पाठवत असतो अशी त्याची मनाची धारणा असावी लागते.*

*तू विचारतोस कीं, ते युद्ध तू व तुझे बंधू राज्य प्राप्तीसाठी करत आहेत व त्याला मी मदत करत आहे. वस्तुतः परिस्थिती तशी नाही, हे युद्ध ज्या कारणाने होत आहे ते (मूळ) कारण नंतर पाहू, तूर्त एकच गोष्ट लक्षात घे कीं, युद्धात विजय झाल्यावर राज्य मिळणार हा एक अवांतर भाग असून त्यासाठी मी (विधात्याने) हे युद्ध योजलेले नाही. एकाद्या गोष्टीमुळें कांहीं अवांतर फायदे होत असतात, राज्य मिळणे वगैरे, परंतु, तो मुळ उद्देश नसतो तसे हे होत आहे.*

*तू विचारतोल कीं, हे सर्वजण तुम्हाला मारण्यासाठी स्वताच्या प्रियजनांना बाजूला करून कां एवढे उतावीळ झाले आहेत, अरे अर्जुना, तू व्यवहार चतूर आहेस, तुला माहित आहे कीं, हे सगळे कौरवांचे मिंधे आहेत. त्या उपकाराची फेड करण्यासाठी ते ह्या युद्धात मरायला तयार झाले आहेत. तुझ्या प्रमाणेच ते सुद्धा नाईलाजाने ह्या युद्धात मरण्या मारण्यासाठी आले आहेत म्हणून त्यांना त्यांनी मारलेल्यां बद्दल पाप लागणार नाही. तेसुद्धा म्हणूनच जर मेले तर स्वर्गात जाणार आहेत. ते व तू सुद्धा निसर्गाला त्यांना मारून मदत करत अहात. अरे अर्जुना, हे विश्र्व चालवण्यासाठी कित्येक गोष्टी कराव्या लागतात. हे युद्ध त्याचाच एक भाग आहे असें लक्षात घे. जसे वादळं होतात, धरणाकंप होतात, राक्षशी लाटा उठतात, नद्यांना पूर येतात, रोगांच्या साथी पसरता व त्यामुळें मोठी जीवितहानी होत असते तसेंच हे आहे. जर कोणी दुष्ट बुद्धिने कोणाची हत्त्या करत असेल तर त्याला हिंसा म्हणतात व जर अशी हिंसा झाली तर त्यात पाप लागते हे लक्षात घे. ह्या युद्धात भाग घेणार्या कोणालाही ह्या मोठ्या संहारा मागील खरे कारण माहित नाही ते सगळे ह्या बद्धल अनभिज्ञ आहेत. काळ त्यांना वापरत असतो. म्हणून नसत्या विवंचना करून स्वताला त्रास देऊ नकोस.*

*प्रश्न ८ ते १५ ची उत्तरं अशी आहेत.*

*कौरव दुष्ट असले तरी त्यांना मारून आम्हाला पापच लागणार असें तू कां समजतोस. पाप म्हणजे काय ते प्रथम समजून घे. कोणाला मारून पाप लागत नसते. पाप उद्देशामुळें लागू शकते केवळ इच्छा नसतांना कर्तव्य म्हणून मारले तर त्यात पाप नसते. जर विचारात मद अथवा मत्सर भाव असेल, त्यामुळें उत्पन्न होणारा दुष्टपणा असेल तर हत्या जरी नाही केली तरी पाप लागत असते. माणसे मनाने पाप करतात, शरीराने नाही हे लक्षात घे. जर मन शुद्ध असेल तर कृती कोणती करता त्याला महत्व नसते. अशा कृतीला निष्काम कृत्य समजले जाते ते निष्पाप कृत्य समजले जाते. ह्या युद्धात तू फक्त कर्तव्य भावनेने दया बुद्धी ठेवून हत्त्या केलीस तर तुला पाप लागत नाही. ज्या विचाराने माणूस त्याची अध्यात्मिक उर्जा कमी करतो त्या विचारात पाप असते आणि ज्या विचारामुळें त्याची अध्यात्मिक उर्जी वाढते त्या विचारांना पुण्य समजले जाते.*

*माणसाचा जन्म त्याची अध्यात्मिक उर्जा वाढवण्यासाठी असतो हे तू समजून तुझे विचार जर नियंत्रित केलेस तर तू सदैव पुण्यवान रहाशिल.*

*तू म्हणतोस, स्वजन कीतीही वाईट असले तरी त्यांना मारणे व त्या द्वारा राज्य मिळवणे हे सुखप्रद ठरणार नाही असें तू बोलतोस. परंतु, पार्था, तू तीच तीच चूक करत आहेस ह्याचे मला आश्र्चर्य वाटते. कौरवांना व त्याच्या सारख्या विकृत प्रवृत्तीच्या लोकांचा नाश करण्यात तुला निश्चित सुख मिळेल कारण तू व तुझे बंधू त्यामुळें मोठे पुण्य मिळवणार अहात. तू स्वजनाना मारणार नसून पाप वाढवणार्यांना मारणार आहेस हे लक्षात घे. ते तुझे स्वजन असतील तर तो केवळ अपघात आहे. त्याचा विचार तू करू नकोस.*

*स्वजनांचा नाश केल्यामुळें कुलक्षय होणार तो होऊ नये म्हणून युद्ध न करण्याचा तुझा विचार अध्यात्मिक दृष्ट्या पोरकटपणाचा आहे. कोणतेही कुळ निरंतर नसते. प्रत्येक कुळाचा अखेरीस नाश होणे हा निसर्गाचा नियम आहे. तू मार किंवा नको मारू, ती कुळं यथावकाश (निर्वंश) नष्ट होणारच हे तुझ्या ध्यानात कसे येत नाही. जुनी कुळं नष्ट होणे व नवीन कुळं उदयास येणे हा निसर्गाचा स्वभाव आहे. तू मार अगर नको मारू, ती कुळ काळाच्या ओघात संपणार असतील तर ती संपणारच. जसे मृत्यूला तू केवळ कारणीभूत असशिल तसेंच त्या कुळांच्या नाशास सुद्धा तू केवळ कारणमात्र असशिल.*

*कुळक्षयामुळें कुलधर्म बुडण्याची गोष्ट तू करत आहेस. परंतु, तू कोणतेही कुळ ह्या युद्धाच्या निमित्ताने बुडवणार नाहीस. तुझ्या कुळाच्या स्त्रिया सुरक्षित असतील. युद्धामुळे सगळेच मरत नाहीत. जे रहातील ते त्या स्त्रियांचे संरक्षण करत असतील. हे सगळे तू बोलतोस तो तुझा अहंकार आहे व ते तुला जास्त हानिकारक आहे. तुझ्या अहंकारावर तुला नियंत्रण ठेवले पाहिजेस. हे युद्ध संपल्यावर जे धर्मशिल राज्य युधिष्ठीर चालवेल त्यात कोणत्याही स्त्रीचे शिल असुरक्षित कसे असेल? असले वाह्यात प्रश्न तुझ्या मनात कां तू आणतोस? तुमच्या पितरांची काळजी युधिष्ठीराच्या राज्यात उलट जास्त चांगल्या प्रकारे होईल हे तू कसे नाही समजत?*

*पार्था, मघा सांगितल्या प्रमाणे, हे युद्ध केवळ तुमच्या राज्य प्राप्तीसाठी विधात्याने आयोजलेले नाही, त्यामागे इतर जास्त महत्वाचे उद्देश आहेत. कौरवांनी जी पापवृद्धीची परंपरा आरंभलेली आहे ती थांबवणं हा ह्या युद्धामागील प्रमुख उद्देश आहे. कौरव जे महापातक सांप्रतच्या काळात वाढवत आहेत त्याला आवर घालणे हा ह्या युद्धामागील उद्देश आहे हे तू लक्षात घ्यावयाला पाहिजेस, तुम्हाला राज्य मिळणे हा त्यातील एक छोटासा भाग आहे. कौरवांच्या हातून जर तू निःशस्त्र राहून मारला गेलास तर तू नरकात जाशिल कारण तू विधात्याच्या कार्यात*

*त्याला मदत न करण्याचा निर्णय केवळ अज्ञानाने घेतला आहेस असे होईल. विधात्याचा पवित्र उद्देश न लक्षात घेणे हे स्वतः पाप कृत्य आहे हे समजून विचार कर.*

*अरे अर्जुना, एक गोष्ट तू लक्षात घे कीं, जर तू कौरवांच्या हातून मारला गेलास व हे युद्ध कौरव जिंकले तर पृथ्वी पुन्हा पापमय होईल, ते होण्यास तू कारणीभूत असशिल. त्यामुळे तुझे पितर तुझ्यावर नाराज होती, स्वर्गात शंतनु तुम्हा सगळ्यांना पहात आहेत. तसे झाले तर ज्या पितरांची तुला फिकीर पडलेली आहे तेच पितर तुझ्यावर नाराज होतील म्हणून असले पोरकट विचार सोडून दे. मी तुला धर्म काय व अधर्म काय ते थोडक्यात सांगितले आहे. आता धनंजया युद्धाला तयार हो.*

धृतराष्ट्राला संजय पुढे सांगतो, असे बोलून अर्जुन आपली शस्त्रं टाकून देतो व कृष्णाला बजावतो कीं, ह्या सर्व विश्वाच्या व्यवहाराचे ज्ञान त्याने रितसरपणे त्याला सांगावे. त्याचे पूर्ण समाधान करावे. म्हणजे निःशंक मनाने तो युद्धास तयार होईल. कोणतीही शंका मनात राहिली तरी तो गुडाकेश युद्धात लढू शकणार नाही.

अर्जुनाचा तो बालहट्ट पाहून कृष्ण विस्मय चकीत होतो. गालातल्या गालात हसू लागतो. त्यानंतर तो अर्जुनाला ते विश्वाचे ज्ञान देऊ लागतो.

भगवत गीता पर्व भाग एकविसावा संपला.

# भगवत गीता पर्व

# भाग बाविसावा

## अध्याय दुसरा – सांख्ययोग

संजय म्हणाला – याप्रमाणे करूणेने व्यापलेल्या अश्रूने भरलेले डोळे असा खिन्न होऊन बसलेल्या अर्जुनाला श्रीकृष्ण विचारतो, हे अर्जुना, आर्यांना न शोभणारा, स्वर्गप्राप्तीच्या आड येणारा, अपकिर्ती करणारा असा मोह तुला या संकट प्रसंगी कोठून उत्पन्न झाला बरे? हे पार्था, असल्या भ्याडपणाला थारा देऊ नकोस. हा तुला शोभत नाही. शत्रूंना ताप देणारा तू, हे क्षुद्र मनोदुर्बल्य टाकून देऊन युद्धाला उभा हो.

अर्जुन बोलतो, हे मधुसूदना, ज्यांची पुजा करणे हेंच आम्हाला योग्य अशा भिष्म, द्रोण, कृप ह्यांच्यावर मी युद्धात बाणांचा उलट प्रहार कसा करू? ह्या गुरूजनांना मारण्या ऐवजी ह्या जगात भिक्षा मागून उदरनिर्वाह करणे अधिक श्रेयस्कर मला वाटते. कारण, हे जरी द्रव्याने कौरवांचे मिंधे आहेत तरी अशा वडिलांना मारले तर त्यांच्या रक्तांने माखलेले भोग मला भोगावे लागतील. आम्ही त्यांना जिंकू अथवा ते आम्हाला जिंकतील, ह्या दोनहीपैकी कोणती गोष्ट चांगली, हे ही मला कळत नाही. ज्यांना मारून जगण्याची माझी इच्छा नाही ते हे कौरव आमच्या समोर उभे आहेत. मानसिक दैन्यदोषामुळे माझी स्वाभाविक वृत्ती नष्ट होऊन धर्माधर्म जाणण्यास माझे मन असमर्थ झाले आहे. म्हणून मी तुला विचारतो, जे खरोखरच श्रेयस्कर असेल ते मला सांग. मी तुझा शिष्य आहे. मला शरणागताला उपदेश देऊन उपकृत कर.

पृथ्वीचे निष्कंटक व समृद्ध राज्य अथवा स्वर्गाचे राज्य सुद्धा मिळाले तरी माझ्या इंद्रियांना शोषून टाकणारा हा शोक कसा नाहीसा होईल ते मला कळत नाही.

संजय धृतराष्ट्राला पुढे सांगतो, शत्रूला ताप देणारा अर्जुन याप्रमाणे श्रीकृष्णाशी बोलला आणि, "मी युद्ध करणार नाही", असें सांगून स्तब्ध झाला.

दोनही सैन्यांच्या मध्ये असा हातपाय गाळून बसणार्या अर्जुनाला पाहून किंचित हसत भगवान बोलले, हे अर्जुना, ज्याचा शोक करू नये त्याचा शोक तू करत आहेस व त्यावर मोठ्या मोठ्या बाता मारत आहेस, खरे जाणकार कधीही अशा गोष्टींमुळें म्हणजे मेल्या जित्यांचा शोक

करत नाहीत. ह्या विश्र्वात जन्म आणि मृत्यूची व्यवस्था कशी आहे ते प्रथम सांगतो. म्हणजे तुझ्या मनातील सगळे संशय दूर होतील.

आपल्या येथे ह्या विश्र्वाचे ज्ञान अनेक पद्धतीने समजून घेण्याचा प्रयास होत असतो. त्यातील एक सांख्य विचार आहे. त्यानुसार काय सांगितले आहे ते मी तुला सांगतो. त्याशिवाय योग विचारसरणी व इतर विचारसरणींचा सुद्धा आपण परामर्श करणार आहोत, तरी नीट ऐक,

खरे तर पहाता, मी, तू व हे सगळे जे आज लढण्यासाठी येथे जमा झालेलो आहेत ते सगळे, ह्या पूर्वी केव्हाही नव्हते असें नाही. त्याच प्रमाणे पुढील काळात ते व आपण पुन्हा असणार नाही असेंही नाही. माणसाच्या आयुष्यात जसें बालपण, तरुणपण आणि म्हातारपण ह्या अवस्था देहाला प्राप्त होतात, त्याप्रमाणे, आत्म्याला एका मागून एक असें वेगवेगळे देह प्राप्त होऊन तो अनेक जन्म घेत असतो. हे असें कां होते तेसुद्धा तुला आताच सांगतो, कारण, असें कीं, आत्म्याला इच्छा होते. ज्या इच्छेला शास्त्रीय भाषेत आपण "काम", म्हणतो, तो काम सर्व जन्मांचा कारक आहे. म्हणजे जर आत्म्याला काम झाला नाही तर तो पुन्हा पुन्हा जन्म घेण्याचे थांबेल. म्हणजे त्याला पुनर्जन्म मिळणार नाही. आत्म्याला होणारा काम पूर्ण करण्यासाठी त्याला देह (साधन) आवश्यक होते. देह वास्तविक असल्यामुळें त्याला थंडी, वारा, गरमी असें व इतर सुख दुःख देणारी इंद्रियं प्राप्त होतात. तसेंच अखेरीस त्या देहाचा नाश होणे निसर्ग नियमांनुसार क्रमप्राप्त असते. ते माहीत असलेले खरे ज्ञानी त्यांचा विचार न करता आपली बुद्धि स्थिर करून सर्व सहन करत असतात. जो देहाचे विकार मनाला लावून घेत नाही तो ज्ञानी समजला जातो. जसें अंगावरील वस्त्र जीर्ण झाल्याने फाटते व ते आपण टाकून देतो त्याप्रमाणे आत्मा तो जीर्ण झालेला देह टाकून देतो. त्याला आम्ही मृत्यू म्हणतो. देह टाकल्यावर तो देह नसलेला आत्मा अनंतात तरंगत असतो पुन्हा इच्छा असल्यास नवीन देह प्राप्त होईस्तोवर.

हे, अरे अर्जुना, सतत होत असते प्रत्येक आत्म्याबाबत. जोवर त्या आत्म्याला काम म्हणजेच वासना आहे तोवर होत रहाणे त्या आत्म्याच्या अंतिम उद्धारासाठी अनिवार्य असते. जेव्हां त्याच्या सगळया इच्छा, काम, वासना नाहीशा होतात तो आत्मा जन्म मरणाच्या अशा फेर्यातून मुक्त होतो, त्याला आपण योग शस्त्रात "मोक्ष", असें म्हणतो. आत्म्याचा देह जीर्ण झाल्याशिवाय इतर कारणाने सुद्धा निकामी होऊ शकतो जसें रोग, इजा, अपघात अशी बरीच कारणे त्याचा देह निरुपयोगी करण्यास कारणीभूत होऊ शकतात. अशा कारणानेसुद्धा त्या आत्म्याला देह सोडावा लागत असतो. अशी अनेक कारणे माणसाला मृत्यू येण्याची असू शकतात.

असें इच्छासक्त आत्मे फार थोडाच काळ देह धारण करून पृथ्वीवर वावरत असतात, एरव्ही ते अवकाशात अव्यक्त स्वरुपात तरंगत असतात. अशा वासनांपासून मुक्त न झालेल्या आत्म्यांना त्यांच्या वासनांचे शेपूट चिकटलेले असते त्याला लिंगदेह असें म्हणतात. त्याच्या वासनांमुळें तो आत्मा तुझ्यासारखा कामासक्त होऊन लोभ आणि मोहात अडकून शोक अथवा हर्ष व्यक्त करत असतो. हे असे होते कारण परिस्थितीचे अज्ञान आहे.

आत्मा अव्यक्त असल्यामुळे त्याला वास्तविकतेची बंधन नसतात म्हणून तो नष्ट होत नाही, त्याला पकडता येत नाही, तो सुकत नाही किंवा तो ओला होत नाही, त्याला कशाही साधनाने धरता येत नाही. तो कुजत नाही, तो जाळला जाऊ शकत नाही. तो सर्वव्यापी असतो, तो स्थिर, अचल, सनातन (प्राचीन, अनादि अनंत) आहे. कारण तो स्वयंभूचे एक रुप आहे. स्वयंभूला इच्छा झाली म्हणून हे विश्र्व उत्पन्न झाले त्याच सत्याची हे आत्मे एक छोटी आकृती असते असें समजले तर ते योग्य होईल. जसें स्वंयभू त्याच्या विचारांने बद्ध असतो त्याप्रमाणे हे बद्ध आत्मे त्यांच्या विचार आणि त्या पासून उत्पन्न होणार्या वासनांने बद्ध झालेले असतात. त्या वासनिक विचारामुळें तो पुन्हा पुन्हा जन्म घेत असतो व मरत असतो आणि पुन्हा जन्म घेत असतो. अशी जन्म मरणाची शृंखला अव्याहतपणे चालू रहाते जोवर तो त्याच्या कामरुपी वासनांतून मुक्त होत नाही. म्हणून आपण असें समजू शकतो तो कीं, "विचार", ह्या अव्यक्त परिमाणाने, आत्मा बद्ध असतो जसा स्वयंभू त्याच्या विचाराने बद्ध आहे. त्यासाठी अरे धनंजया, तुला तुझे विचारविश्र्व नियंत्रित करावे लागते. सगळे चांगले, वाईट, पाप, पुण्य अशा विचारांच्या माध्यमानेच ते होऊ शकते. विश्र्वाचे मूळ विचार आहेत. त्यातून माया निर्माण करून मी म्हणजे अविनाशी परमात्मा (स्वयंभूचे प्रकट रुप) हि सृष्टी उत्पन्न करतो. मी किंवा तू म्हणजे तो देह नाही तर त्यात स्थीत असलेला आत्मा असतो हे तू प्रथम लक्षात घे. देह मरतो त्यातील आत्मा मरत नाही, म्हणून देह मेला म्हणून शोक करणे, तुझ्यासारख्या समजदार माणसाला शोभणारे नाही. जे आहे ते असणारच आणि जे नाही ते नसणारच असे सांख्य विचार सांगतात. कारण तो विश्र्वाचा एक महत्वपूर्ण नियम आहे. मेला म्हणजे तो कायम गेला असे होत नाही त्याची जागा आणि स्वरुप बदलले एवढेच झालेले असते. वस्तु अथवा त्यातून प्राप्त होणारी उर्जा विनाशी असते त्यांचे रुप फक्त बदलत असते. थोडक्यात सांगावयाचे असें कीं, ह्या विश्र्वात जे आहे ते कधीच नाहीसे होणारे नसते. ते केवळ जागा, स्वरुप बदलून विश्र्वात कोठेतरी उपस्थित असतेच. ते माहीत नसलेली तुझ्या सारखी माणसे विनाकारण शोक करत असतात. हे विश्र्व ज्या नित्य शक्तीने भरलेले आहे तिला "शक्ती", असें म्हणतात. परमात्मा ह्या मूळ शक्तीचे प्रकट रुप आहे. त्यातून त्याच्या प्रेरणेने विविध वस्तुमात्र निर्माण होत असतात. त्यांच्या मदतीने चराचर आपली रुप धारण करत

असतात. उदाहरणार्थ, आघातातून ध्वनी व उष्णता, उष्णतेतून प्रकाश, वीज, विजेतून गती, पुन्हा उष्णता, प्रकाश, ध्वनी असें निर्माण होत असतात. अशा प्रकारे एकातून दुसरे व त्यातून तिसरे अशा प्रकारे विश्वात स्थित्यंतरं होत असतात व विश्वाचा कारभार चालू रहातो. ह्याला कांही ज्ञानी माया म्हणतात.

परमात्मा हे मूळ शक्तीचे प्रकट रुप आहे ते नित्य आहे. त्यात बदल होत नाही. ते "विचार", ह्या परिमाणात असते. त्याच्या आधाराने ह्या विश्वाची सगळी कामं होत असतात.

शाक्तांच्या तत्त्वज्ञानानुसार, विचार ही मुलभूत शक्ती मानली गेली आहे. बाकीच्या त्यातून मायेच्या माध्यमातून उत्पन्न झाल्या आहेत.

अर्जुन त्याला विचारतो, अरे कृष्णा तू हे जे सांगत आहेस ते निरपेक्ष ज्ञान आहे, परंतु, मला सापेक्ष ज्ञानातून कांहीं समजेल असे स्पष्टीकरण दिलेस तर बरे होईल.

कृष्ण बोलतो, तुझे बोलणे योग्य आहे, परंतु, विश्वाचे खरे ज्ञान तू विचारलेस व म्हणून ते मी तुला सांगितले. आता सापेक्ष ज्ञानानुसार काय ते सांगतो. त्यामध्ये आपण प्रथम मृतात्म्याची अवस्था काय ते पहावे लागेल. माणूस मेला तरी त्याचा आत्मा ज्याला आता सापेक्ष विचारानुसार "मृतात्मा", असें समजले जाते. त्याची विचारांची स्पंदने चालूच असतात. त्याला चिकटून असलेली त्याच्या कर्मविपाकाची शेपूट ज्याला योगशस्त्रात "लिंगदेह", असे म्हणतात, ती असतेंच. त्यासह तो मृतात्मा विश्वात कोठेतरी तरंगत असतो. पुन्हा योग्य संधी प्राप्त झाली कीं तो पुन्हा जन्म घेत असतो. त्यानंतर त्याची काम वासना पूर्ती करण्याची धडपड पुन्हा चालू होत असते. असे हे अव्याहतपणे होत असते. ह्याचा अर्थ असा कीं, तू ज्याना मारलेस ते वीर त्यांच्या मृतात्म्याच्या रुपात येथेच तरंगत रहाणार. ते यथावकाश पुन्हा जन्म घेणार आहेत.

आणखीन सापेक्ष ज्ञान मी तुला देतो, तू तुझ्या आप्तांना मित्रांना त्यांच्या सहकार्यांना असें सगळयांना मारणार आहेस, त्याचे दुःख होते त्याचे कारण प्रथम लक्षात घे. दुःखाचे कारण ते मेले हे नसते तर ते तुला पुन्हा कधीच त्या रुपात तुला भेटणार नाहीत, हे असते. त्यांना भेटण्याचा तुला मोह आहे हा मोह त्या दुःखाचे खरे कारण असते. हा मोह हा सुद्धा एक दोष आहे व त्यामुळें तुला पाप लागू शकते. त्या मोहापासून तुला मुक्त व्हावे लागेल. आता तुला ह्या युद्धाचा मूळ उद्देश समजला असेल तर त्याशिवाय इतर ऐहीक गोष्टींचा सुद्धा तुला विचार करावा लागेल.

त्यात मी निर्माण केलेले चतुरवर्ण येतात. त्यात तुझा क्षत्रिय वर्ण येतो. ज्या नुसार तू युद्ध जिंकण्यासाठी करावयाचे असते. त्यासाठी जे कांही करावे लागेल ते सगळे तू निःसंकोचपणे

करावयास पाहिजे. म्हणजे प्रतिस्पर्ध्याची हत्त्या करणे मग ते कोणीही असो, हे तुझे धर्मकर्तव्य आहे. ते पहाता, जर तू मघा म्हणाल्याप्रमाणे, युद्ध सोडून गेलास तर कोणीही तुला मोठा समजणार नाही. तुझी तुझ्या समाजात छिःथू होईल. ते तुला मूर्ख, भित्रा समजतील व तुझे समाजात रहाणे तुला मुष्किल होईल. सगळे तुझी निंदा करतील. हे पार्था, तू क्षत्रिय आहेस व तुझे कार्य न्यायासाठी लढणे असे आहे. ते जर तू करणार नाहीस तर अरे कुरुनंदना, तुझा व्यवसाय तुला सांगतो कीं, तू हत्या करणार न्यायासाठी. कोणताही व्यवसाय म्हणजे कार्याचा निश्चय व त्यासाठी त्या प्रकारची बुद्धि एकाग्र असावी लागते. तू बुद्धिची एकाग्रता करत नाहीस, ज्याच्या बुद्धिची एकाग्रता होत नाही, त्याच्या बुद्धिला व कार्याला वासनांमुळें अनेक फाटे फुटतात.

चतुर्वर्णातील ब्राह्मणांला कार्य असते अध्यात्मिक साधना करणे, जर एकादा ब्राह्मण ते सोडून राहिला तर तो निंद्य ठरतो. तसेंच वैश्याचे कर्तव्य प्रामाणिकपणे व्यापार, शेती करणे व त्यातून संपत्ती जमवणे. जर एकाद्या वैश्यांने ते केले नाही तर तो निंद्य ठरतो. शुद्र सेवा करत नसेल तर तोसुद्धा निषिद्ध ठरतो. म्हणजे कुरुनंदना, प्रत्येकांनी त्याच्या वर्णाचे विहीत कार्य करावयालाच पाहिजे. त्यानेच तो धन्य होतो.

हे पार्था, पुरोहित वर्गांने सांगितलेल्या वेदातील कर्मकांडात्मक फलश्रुतीच्या व काल्पनिक चमत्कारांना भुललेले व त्या खेरीज दुसरे कांहीं नाही असे म्हणणारे जे मुढ लोक विश्वाच्या मूळ उद्देशाला न समजता मोह, मद आणि मत्सर अशा दोषांत रमून भोग व ऐश्वर्य यांत गढून जातात, त्यांची व्यवसायात्मक (विश्वार्थाला समजून वागण्याची रीत) म्हणजे कार्या कार्याचा निश्चय करणारी बुद्धि कधीच एकाग्र म्हणजे समाधिस्थ होत नाही. सामान्य माणूस असा होऊन रहाण्यात धन्यता मानतो परंतु, तू तसा होऊ शकत नाहीस.

पृथ्वीचे वास्तविक ज्ञान सत्त्व, रज तम ह्या त्रिगुणांच्या गोष्टीने भरलेले आहे. म्हणून तू त्रिगुणातीत द्वंद्वापासून अलिप्त सतत सात्त्विक गुणांनी संपन्न व योगक्षेमादि (योगक्षेम म्हणजे शरीराच्या गरजेचे कार्य) स्वार्थात न गढतां आत्मनिष्ठ हो. असे केलेस तर तुला पृथ्वीचे अध्यात्मिक ज्ञान प्राप्त होऊन तू धन्य होशिल.

विश्वाच्या घडणार्या घटनांचा अर्थ विवेकांने व विज्ञानाने शोधून काढणे हा खरा पराक्रम आहे. ह्या विश्वाच्या कांहीं तत्त्वांचा तू परिचय करून घे. वस्तु आणि त्या पासून निर्माण होणारी उर्जा वातावरणात विलीन होणारी आणि म्हणून नश्वर आहे, हे समजून घे.

जगाचे मुलतत्त्व आत्मा आहे. आत्मा हे शक्तीचे अंतिम रुप असून ती सर्व प्रकारच्या क्रियांस कारणीभूत असते. "उर्जा-वस्तु सातत्य", व "क्रिया-प्रक्रिया", ह्यांतील शक्तीचा संचार हे न समजणे अज्ञानाचे लक्षण असते. रसायनाची मुलतत्त्वे विविध रुपे घेतात. त्यांचा क्रम नित्य असतो. अनेक मुलतत्त्वांतून संयुगे बनतात व पुन्हा नष्ट होतात. परंतु, त्यांतील मुलतत्त्व तशीच रहातात. जीवांचा जन्म होणे म्हणजे रसायनांच्या विविक्षित रचनेतून चेतना उत्पन्न होणे, त्यामुळें ते रसायन सजीव झाले असे आपण समजतो. आत्मा रुपी शक्ती जीवाला (रसायनिक बुद्धिमत्ता) पकडून देह धारण करते. वस्तुमात्रातील मुलतत्त्वे फक्त विशिष्ट रचनेमुळें सजीव झाल्याचे प्रत्यंतर येते. तरी त्यांत आत्मा नसतो. कारण आत्मा त्या रचनात्मक व्यवस्थेने तयार होत नाही तो स्वतंत्रपणे असतो. हे विश्र्व शक्तीरुप आहे, त्यातूनच सगळे जग घडत असते. त्यात जडणं, घडणं, मोडणं अशा क्रिया होत असतात. एकदा घडलेले सजीव रसायन बिघडणार आहे (त्याचा मृत्यू होणार आहे) व पुन्हा त्यातून वेगळे सजीव उत्पन्न होणार आसतात. त्यालाच आपण जन्म मृत्यू असें बोलतो. हे तू लक्षात घे. शक्तीची ही लिला न समजणारे त्याला चमत्कार समजतात.

मृत्यूपेक्षा त्या मागील कारण समजणे जास्त महत्वाचे असते. जर चांगल्या कारणासाठी मृत्यू घडला तर ते चांगले समजले जाते. कौरव वाईट प्रवृत्ती धरून आहेत, त्या वाईट प्रवृत्तीचा नाश करण्यासाठी जेव्हां मृत्यू होतात तेव्हां ते हितकारक समजले जाते. अनिष्ट प्रवृत्ती नष्ट करण्यासाठी जर एकाद्याचा मृत्यू होणे योग्य असेल तर ते घडवण्यात क्षत्रियांने पुढाकार घेणे श्रेयस्कर असते. त्याला अयोग्य समजून ते न करणे श्रेयस्कर नसते. तसे केले तर तू तुझे क्षत्रिय कर्तव्य केले नाहीस असें समजले जाईल, तुला दोष लागेल.

चमत्काराला खरे मानून रहातात ते दैववादी होतात. त्यांचा पुरुषार्थ संपला असें होईल. शोध बुद्धीने निसर्गाला समजण्यास सुरूवात केली व ते समजू लागलास तर तो चमत्कार न रहाता ते एक वैज्ञानिक सत्य म्हणून समजले जाईल.

जे कार्य निवडले ते निश्र्चयांने करत रहावे ज्यांना निश्र्चय करता येत नाही ते खरे सत्य शोधत नाहीत व अज्ञानात रमून दैववादी बनतात. असे लोक पुरूषार्थ घालवून बसतात.

अरे पार्था, तू हत्त्येचा बाऊ करत आहेस. माणसाची हत्त्या आणि पशुची हत्त्या ह्यात फरक काय? पाप हत्त्ये मुळे होत नाही, त्या पाठील उद्देशाने होते. त्याचा तू विचार करत नाहीस. सुख, दुःख, लाभ, हानि, जय, पराजय हे मद, मत्सर ह्या दोषांमुळें होत असतात. म्हणून हे दोष पापकारक असतात.

माणसाचा अधिकार कर्म करण्यापुरता असतो. त्या कार्याचे फल त्याला मिळणे अथवा न मिळणे हे त्या माणसाच्या अधिकारात नसते. परंतु, अरे पार्था, जर त्यांने ते कार्य बिनचूक व विधात्याला अर्पून केले तर त्याला फळ मिळण्याची शक्यता असते.

हे धनंजया, कर्मफलाची आसक्ती सोडून आणि यशापयशाविषयी समबुद्धि ठेवून योगयुक्त (शिस्तबद्ध) होऊन तू तुझे काम करत जा, अशा काम करण्याच्या बुद्धीला "योग", म्हणतात.

असे जरी असले तरी जेव्हां तू समाजात इतर व्यक्ती बरोबर व्यवहार करतोस तेव्हां तुला अशी निरामय समबुद्धि हानिकारक होऊ शकते. तशा परिस्थितीत तू जशास तसे ह्या न्यायाने वागून स्वसंरक्षण केले पाहिजेस. परंतु ह्या ठिकाणी तशी परिस्थिती नसल्यामुळें समबुद्धिचा विचार केला पाहिजेस. म्हणजे समबुद्धिने वागावयाचे कीं स्वसंरक्षण बुद्धिने ते परिस्थितीवर अवलंबून असते.

जेव्हां तुझी बुद्धि मोहरुपी गढूळ आवरणातून बाहेर पडेल तेव्हां तुला ऐकावयाच्या व ऐकलेल्या गोष्टींचा कंटाळा येईल. वेदातील (कर्मकांडातून मिळणार्या) कर्मफलांच्या भ्रामक (खोट्या) कथा ऐकून तुझी बुद्धि चंचल झालेली जेव्हां स्थिर होऊन समाधी वृत्तीत राहील तेव्हां तुला खरा बुद्धियोग प्राप्त झाला असें समज.

अर्जुन विचारतो, "अरे केशवा, समाधिस्थ स्थिती मध्ये असलेला स्थितप्रज्ञ कोणाला समजावे? त्याची लक्षणे कोणती? कर्मकांड (यज्ञ, उपास तापास, व्रतवैकल्ये, पुजा इत्यादि धार्मिक कार्य) करून देवतांना प्रसन्न करून त्याद्वारा आपले पाप धुतले जाईल आणि आपले भाग्य सुधारेल असें समजणारे मूर्ख लोक कधीच त्या अवस्थेत जाऊ शकत नाहीत. हे खरे आहे कां"?

भगवान श्रीकृष्ण सांगतो, "अरे अर्जुना, मनुष्य जेव्हां सर्व वासना टाकून व आपल्या ठायीच संतुष्ट होऊन रहातो त्याला स्थितप्रज्ञ असें म्हणतात. ज्याचे मन दुःखात विषण्ण होत नाही आणि सुखामुळें आनंदी होत नाही, प्रिती, भय, क्रोध ज्याला होत नाहीत त्याला स्थितप्रज्ञ (कोणत्याही कारणाने बुद्धि विचलित न होणे) समजले जाते. जो सर्व गोष्टींबाबत अनासक्त असतो, बरे वाईट प्रसंग प्राप्त झाले म्हणून अस्वस्थ किंवा खूष होत नाही, त्याची बुद्धि स्थिर झाली असें समजले जाते. असा माणूस कमी बोलतो म्हणून त्याला मुनी (मुनी हा शब्द बर्याच वेळा स्थितप्रज्ञ ह्या अर्थी योजला जातो), असेसुद्धा बोलतात.

जो निराहारी (उपाशी) आहे त्याच्या भूके शिवाय इतर वासना नष्ट झालेल्या असतात. परंतु, त्याला खाणे मिळाले कीं, त्याच्या सुप्त झालेल्या वासना पुन्हा सक्रीय होत असतात. म्हणून

विनाकारण उपवास करत रहाण्याने कांहीं साध्य होत नाही. ब्रह्मानंदाचा अनुभव आल्यावर त्याच्या सगळया आवडी निवडी संपुष्टात येतात. कारण तो आत्मा त्याला चिकटून असलेल्या लिंगदेहाच्या बहकाव्यात येत नाही. तसे झाले म्हणजे समजावयाचे कीं त्याची योगसाधना कामयाब होत आहे. ह्या चाचण्या साधकांनी स्वताच्या स्वतः घ्यावयाच्या असतात.

अरे धनंजया, आता तुला सांगतो माणसाला इच्छा कशी प्राप्त होते. विषयाचा प्रथम परिचय होतो. त्यानंतर जर त्याबद्दल कुतूहल उत्पन्न झाले तर ती दुसरी अवस्था असते. त्यानंतर जर त्याचा वारंवार विचार करत राहिले कीं, त्याची गोडी उत्पन्न होते. त्या अवस्थेत तो जर रमला तर त्याची इच्छा निर्माण होते. म्हणजे कुतूहल, गोडी आणि इच्छा अशा तीन पायर्यानी माणसात इच्छा निर्माण होत असते. जर कुतूहल ह्या अवस्थेतच त्याचा त्याग केला (संशय, तिरस्कार, अनास्था, औदासिन्य अशा धोरणांने ते शक्य असते.) तर इच्छा होत नाही. इच्छांचा त्याग करण्याची ही पद्धत असते. अशारितीने निर्माण झालेली इच्छा पूर्ण करण्यासाठी तो प्रयत्न करत असतो. ती पूर्ण झाली तर आणखीन नवीन इच्छा निर्माण होते अशाप्रकारे हे इच्छांचे निर्माण होणे व पूर्ण होणे चालू रहाते व त्यात तो मनुष्य पुरता अडकत जातो. इच्छा पूर्ण झाली नाही तर बलवान माणूस क्रोधी होतो व तो दुसरा दोष माणसाची अध्यात्मिक उर्जा खर्च करू लागतो. जर कमजोर असेल तर त्याला दुःख होते व त्यामुळेसुद्धा त्याची अध्यात्मिक उर्जा खर्च होत जाते. अशारितीने तो माणूस म्हणजे त्यातील आत्मा त्या इच्छांच्या मालिकेत अडकत जातो. त्यामुळें त्याचा विवेक सुटतो. तो त्याची सारासार बुद्धि हरवून बसतो. अशारितीने त्याचा अध्यात्मिक र्हास होऊ लागतो. माणसाचे जन्म त्याची अध्यात्मिक उर्जा वाढवण्यासाठी असतात परंतु, विविध इच्छांत आत्म्या गुंतत गेला तर ती कमी होते. म्हणून माणसाच्या आत्म्याने शरीराच्या इच्छांत गुंतणे श्रेयस्कर नसते.

प्रितीद्वेषरहीत व पूर्णपणे स्वाधीन अशा इंद्रियांनी (जीवानी) विषयात वावरणार्या स्वाधीन अंतःकरणाच्या मनुष्याला (योग्याला) समाधान प्राप्त होते ते होताच त्याच्या सगळया दुःखांचा नाश होतो. कारण त्याला कांहीं नको असते, ते नाही मिळाले म्हणून त्याला दुःख, क्रोध होत नाही. तो स्थीर बुद्धिने त्याचे जीवन जगत असतो.

योगरहीत मनुष्याला निश्चित स्थीर बुद्धि नसते, त्याचे विचार दोलायमान अवस्थेत असतात. हे करू कां ते करू असें तो सतत करत असतो. त्यामुळे तो संभ्रमावस्थेत रहातो. त्यामुळें तो कायम अशांत असतो परिणाम स्वरुप अशा माणसाला विविध व्याधी लागू शकतात. त्याचे

मानसिक, बौद्धीक व शारिरीक असें तिनही स्वास्थ बिघडलेले असते. पार्था असा मनुष्य कसा सुखी होणार?

त्याचा लिंगदेह त्याला त्याच्या गतजन्माच्या इच्छांची आठवण करून देत त्यांत गुंतवत ठेवतो. त्यांपासून दूर रहाणे हांच खरा मार्ग आहे. ज्याला ते जमले त्याला संयमी असे म्हणतात.

कर्माचे चार प्रकार आहेत. योगक्षेम, छंदक्षेम, पापक्षेम आणि पुण्यक्षेस असें ते आहेत. त्यानुसार त्यांची फल प्राप्ती होत असते. योगक्षेम म्हणजे शरिराच्या निजी गरजा पुरवणे. त्यात खाणे पिणे, विश्रांती, विरंगुळा, सुखोपभोग असे येतात. त्यातील जे शरीराच्या निजी गरजेपेक्षा जास्त असतात ते पापक्षेमात येतात. जे चांगले कार्य होते ते पुण्यक्षेमात येते. विरंगुळा व सुखोपभोग हे छंदक्षेमात येतात. ते सगळे शरीराच्या गरजेनुसार असतात. त्यांत आत्म्याने लक्ष घालावयाचे नसते. ते सगळे लिंगदेहाच्या प्रेरणेने होत असते.

मनुष्याला वास्तवापेक्षा खोट्या गोष्टींचे विशेष आकर्षण असते व त्यात तो रमतो परिणामतः तो निसर्गापेक्षा इतर कृत्रिम गोष्टीत अडकत जातो. चुका करू लागतो, जर त्याने निसर्गाला समजण्याचा प्रयत्न केला तर तो विवेकी होतो, काल्पनिक गोष्टीत रमणारे कवी होतात.

योगयुक्त होऊन सर्व इंद्रियांवर संयमन करून त्यात आत्म्याने औदासिन्य बाळगून ज्याने त्याच मन स्थिर केले आहे अशा माणसाला सामान्य वासना त्रास देऊ शकत नाहीत. सर्व वासनांबद्दल औदासिन्य बाळगून तो त्या वासनांच्या व्यसनात जाण्यापासून स्वतःला संरक्षित करत असतो. ज्याला त्या वासनांचे व्यसन लागते ते त्याच्या आत्म्याला बाधत असते म्हणून कोणत्याही वासनांचे व्यसनात रुपांतर होणार नाही ह्याची दक्षता योगी बाळगत असतो. वासनांचे व्यसन जीवाला लागत नाही तर आत्म्याला लागते म्हणून त्यावर ध्यान द्यावयाचे असते.

वेदांतील कर्मकांड आणि उपास तापास व्रतवैकल्ये ही माणसाला त्याच्या खर्या योग साधनेपासून दूर करतात म्हणून त्यात तू पार्था अडकून घेऊ नकोस. (सनातन धर्मातील हा भ्रष्टाचार समजावा असें भगवान सांगत आहेत)

देह धारण करणार्या सर्व जीवात्म्यांना त्या देहामुळें प्राप्त होणारे विकार ज्यात भूक, तहान, विषय, छंद आपोआपच चिकटत असतात. त्यामुळें स्वाभाविकपणे तो त्या प्रकारच्या वासनांच्या आहारी जात असतो. म्हणून हे लक्षात घेऊन जो सावध होत्साता, देहाचे विकार योग्य मर्यादेत ठेवून राहतो तो सिद्धयोगी समजला जातो.

जरी जीव आणि आत्मा वेगळे असले तरी सामान्य माणसासाठी ते एकच वाटतात. योग्यासाठी त्यातील भेद महत्वाचा असतो. त्याच प्रमाणे लिंगदेह आणि आत्मा ह्यांचे संबंध समजणे योग्याला आवश्यक असते.

खोट्या कल्पनाना त्या खर्या आहेत असे दाखवतात कवी, त्यावर विश्वास ठेवणारे निसर्गरुपी परमेश्वरापासून दूर जातात. ते कायम अज्ञानी रहातात. त्यांची खरे खोटे ह्यातील फरक समजण्याची क्षमता नष्ट झालेली असते.

काल्पनिक गोष्टी मध्ये रमणार्या विचारांना भावनिक विचार समजतात व तर्क शुद्ध विचारांना विवेक म्हणतात. ज्ञानी विवेकात रमतात व सामान्य माणसे भावनिक विचारात रमतात. भावनिक विचार मनाचे असतात व विवेक बुद्धिचा असतो. माणसाची विविध स्वरुपाची असमर्थता त्याला खोट्या कल्पनांत रमण्यास भाग पाडते. खर्या कल्पनानुसार जो काम करतो तो समर्थ ठरतो. खर्या कल्पनानुसार काम करणारा खोट्याचा आनंद घेऊ शकतो कारण तो ते खोटे आहे हे समजून त्याकडे पहात असतो.

निसर्गाचे बारीक सारीक नियम ओळखून जो माणूस त्याची कामं करतो तो यशस्वी होतो. कारण त्याची बुद्धि जागृत असते. असा माणूस सदा सुखी राहू शकतो.

भगवत गीता पर्व भाग बाविसावा संपला.

# भगवत गीता पर्व

# भाग तेविसावा

## कर्मयोग – अध्याय तिसरा

अर्जुन श्रीकृष्णाला विचारतो, "हे कृष्णा, जर तुला कर्मापेक्षा साम्यबुद्धी (कर्मफलतील फायदा व तोटा समान मानण्याची चित्तवृत्ती) श्रेष्ठ वाटते तर मग हे संहार करण्याचे घोर कर्म करण्यासाठी तू मला कां सांगत आहेस"? संदिग्ध अशा तुझ्या बोलण्यामुळे तू माझा बुद्धिभेद करून मला मोहात कां टाकतोस"? म्हणून ज्याने माझे भले होईल असा एकच मार्ग निश्चित करून सांग.

भगवान त्यावर सांगतात, हे भोळयाभाबडया अर्जुना, ह्या जगात ज्ञानयोग (सांख्य) मार्ग आणि कर्मयोग मार्ग असें दोन आहेत. आता पुन्हा ते सगळे मी तुला सांगतो. ते नीट समजून घे.

कर्माचा आरंभ न केल्याने पुरूषाला नैष्कर्म्य प्राप्त होत नाही. म्हणजे त्याने काम केले नाही असें होत नाही. किंवा कर्माचा त्याग केल्याने त्याला सिद्धी मिळत नाही. कारण, जन्मलेला कोणीही असो, त्याला कर्म केल्यावाचून रहाता येत नाही. प्रकृतीच्या गुणांनी सर्व जीव, चराचर, परतंत्र असल्यमुळें ते गुण त्याच्या कडून त्या प्रकारचे कार्य करून घेतातच.

जो मूर्ख असें समजतो कीं, इंद्रियदमनाने तो त्या कर्मातून मोकळा होईल, तो तसे करीत असल्यास त्याला योगी न म्हणता ढोंगी म्हणावे लागेल.

मनुष्य प्राणी निसर्गाचा एक अविभाज्य भाग असल्यामुळें निसर्गाच्या कार्यक्रमात त्याला सहभागी होण्याशिवाय गत्यंतर नसते. म्हणून माणसाने त्या कर्माच्या योग्य पद्धतीनुसार न कंटाळता ते विहीत कर्म करीत रहावयाचे असते. ह्यालाच कर्तव्य धर्म असें समजतात. आपली कर्तव्ये कोणती ती नीट ओळखून त्याप्रमाणे बिनचूक आपली कर्तव्ये पार पाडणारा निसर्गाच्या व्यवहारात मान्यता प्राप्त होतो. जो तसे करत नाही, त्याला निसर्ग आणि मानव समाज विसरून जातो. आपली कर्तव्ये करतांना चूक होईल म्हणून ती न करणारा इसम सर्वांच्या दृष्टीने तुच्छ ठरतो. त्यापेक्षा अनवधानाने परंतु चुका करत जो आपले कर्तव्य चुका सुधारत पार पाडतो तो समाजात मान्यता पावतो.

जी कामं माणूस त्याच्या वासनाने प्रेरीत होऊन करतो त्यामुळें तो त्यात अडकून जातो. त्याला त्या वासनांचे व्यसन लागण्याची शक्यता असते. असें होत गेल्यास त्यात तो अधिकाधिक

अडकत जाऊन आणखीन नवीन वासनांत फसत राहून पुढे नष्ट होतो. कारण त्यामुळें त्या माणसाची अध्यात्मिक प्रगती कुंठीत होते. अध्यात्मिक उन्नती करणे हांच मानव जन्माचा प्रधान उद्देश असल्यामुळे तसे होणे, त्याच्यासाठी हानिकारक असते. निसर्गाने नेमून दिलेले कार्य आणि स्वताच्या वासनांत अडकल्यामुळें केले जाणारे कार्य ह्यातील फरक बरोबर ओळखून जो त्याचे कार्य करतो तो त्याच्या वासनावेगामुळें होणार्या कार्यावर यथावकाश विजय मिळवतो व त्या वासनांना आवरू शकतो. शरीराच्या गरजेनुसार वासना ह्या योगक्षेमाच्या समजल्या जातात. त्याहून जास्त करण्याची इच्छा होत (जी आत्म्याच्या दोषामुळे होत असते) असल्यास ते पाप कारक समजून त्याचा त्याग करणे ह्यालाच वासनांवरील विजय असें समजतात. आपल्या वासना योगक्षेमाच्या मर्यादेत रहातील ह्याची दक्षता बाळगणे ह्यालाच प्रापंचिकाची अध्यात्म साधना म्हणतात.

निसर्गाने नेमून दिलेले कार्य बिनचूक करण्याचा ध्यास धरण्याने निसर्गरुपी परमेश्र्वर त्या व्यक्तीला सहाय्यभूत होत असतो. प्रत्येक व्यक्तीचा निसर्ग त्याच्या भोवतीच्या पर्यावरणात असतो. त्याला समजून कर्तव्य करीत राहिल्यास त्या निसर्गाकडून योग्य प्रतिसाद मिळू लागतो. पुष्कळ वेळा निसर्ग आपल्याला फळं देणार असतो परंतु, आपण आपले कर्तव्य बिनचूक न केल्यामुळे त्या फळाचा भोग आपल्याला मिळत नाही. ह्याकरतां केवळ कर्तव्य करतो ह्यावर समाधान न मानता, ते बिनचूक करतो कीं नाही ते पहाणे अगत्याचे असते. तशी दक्षता बाळगणारा त्याच्या कामात यशस्वी होतो. आपले विहीत (ठरलेले) कार्य न कंटाळता करणे, ही एक जीवन पद्धती म्हणून मनुष्य ती बिनातक्रार स्वीकारेल तर तो हमखास त्याच्या कामात विजयी होतो. उदाहरणार्थ, सूर्य उगवणे व मावळणे नित्य नियमांने बिनचूकपणे होत असते. अशारितीने निसर्गरुपी परमेश्र्वर नित्य कार्यरत असतो. तशी नित्य कार्यरत असलेली माणसें निसर्गाला आवडतात. निसर्गाच्या कामात अज्ञानाने, आळसांने, बेजबाबदारपणामुळें, विकृत मनोवृत्तीमुळे अशा कोणत्याही कारणाने विरोध करतात ते यथावकाश नष्ट होतात. माणूस ज्ञानी असो अगर अज्ञानी असो, त्यांना निसर्गाचे नियम सारखेच बंधनकारक असतात. उदाहरणार्थ, जर खाटीक जो समबुद्धीने प्राणी मारण्याचे कार्य करत आहे ते त्यांने थांबवले, अज्ञानाच्या आहारी जाऊन कीं, प्राणी मारणे पाप आहे, तर मांस खाणारे लोक ते प्राणी दुष्टबुद्धीने मारतील व समाजात पाप वाढेल. समाजाची अध्यात्मिकता त्या समाजातील सगळया सदस्यांना उपयोगाची असते ती र्हास पावेल. म्हणजे ते निसर्गाच्या विरोधात जाईल. म्हणून खाटकाने त्याचे कार्य जे समाजाने त्याला दिले आहे ते योग्य पद्धतीने करण्यातच समाजाचे व त्याचे हित असते. दुसरे उदाहरण, शिपायाचे घेता येईल, शिपाई गुन्हेगाराला त्याच्या गुन्ह्यासाठी योग्य शिक्षा करण्या ऐवजी जर

तो शिपाई तुझ्या खोट्या तत्त्वज्ञानाच्या आहारी जाऊन ते न करता गुन्हेगाराला सोडून देऊ लागला तर समाजात अनर्थ माजेल. अरे धनुर्धरा, हे युद्ध सुद्धा अशाच कोणा गुन्हेगांराना (कौरव) शासन करण्यासाठीच आरंभलेले आहे. कर्तव्य कितीही कठोर असले तरी ते योग्य मर्यादेत राहून पूर्ण करावेच लागते. तरच परमेश्र्वर रुपी निसर्गाची ती सेवा ठरते.

अरे पार्था, मला स्वताला ह्या त्रैलोक्यात कांहींच करण्यासारखे उरलेले नाही. कारण, मला मिळवावयाचे अथवा मिळालेले नाही असें कांहींच नाही. तरीसुद्धा मी कर्म करतच आहे. मी जर कर्म सोडले तर माझी भक्ती करणारेसुद्धा तसे वागतील व अनर्थ होईल. म्हणून, कर्मासक्त लोक जसे कर्म करत असतात तसेंच ज्ञानी लोकांनीसुद्धा त्यांची विहीत कर्मे विनासक्ती करत रहावयाचे असते. त्यालाच कर्मयोग असें म्हणतात. ते करतांना ज्ञानी लोकांनी काळजी घ्यावयाची असते कीं, कर्मासक्त असलेल्या अज्ञानी लोकांना चुकीचा संदेश जाणार नाही, ज्यामुळें त्यांचा बुद्धीभेद होईल. त्यासाठी ते त्यांची कर्मं योग्याला शोभतील अशाप्रकारे समबुद्धी राखून करावयाची असतात.

वस्तुतः सगळी कामं माणसात असलेल्या प्रकृतीच्या सत्त्व - रज - तमो गुणांकडूनच केली जात असतात. पण अहंपणाने ज्याच्या अंतःकरणाला मोह पडलेला असतो तो मूर्ख इसम आपणच सगळे करत आहोत असें समजत रहातो. आपले कर्तव्य करत असतांना हे निसर्गाचेच कार्य आहे अशी भावना ठेवून आपण ती केली पाहिजेत. निसर्गाची प्रतारणा करणारा नष्ट होतो कारण निसर्ग सर्वश्रेष्ठ असतो. मनुष्य त्याचा एक भाग आहे त्याचा मालक नाही हे ध्यानात ठेवून माणसाने त्याची कामं केली पाहिजेत. निसर्गाचे कर्तव्य करतांना जर मनुष्य त्यात स्वताची वासनापूर्ती करण्याची अपेक्षा धरून ती कामं करू लागला तर ते कार्य दुषित होते. ते पाप ठरू शकते. असे झाल्यास त्या माणसाचा अधःपात होतो. निसर्गरुपी परमेश्र्वर त्याला माफ करत नाही. निसर्गाचा कार्यक्रम आणि माणसाचा जीवनक्रम काळ, ह्यात फारकत असल्यामुळे अनेक गोष्टी आपल्याला मनाप्रमाणे घडत नाहीत त्या कारणांने, मनुष्य क्रुद्ध होतो किंवा दुःखी होतो. तसे न होता जर माणूस त्याचा व निसर्गाचा कसा मेळ जमवता येईल ते पहातो तो सुज्ञ समजला जातो कारण निसर्गावर रागावणे हे मूर्खपणाचे असते. क्रोधात अथवा दुःखात अडकलेला तो अज्ञानी इसम तमोगुणात जातो व आणखीन मोठ्या चुका करू लागतो. क्रोध एक महत्वाचा दोष आहे जो माणसाचे जीवन बरबाद करू शकतो. तमोगुणी माणसं निसर्गाला देव समजून त्याची गुणगान करू लागतात. त्या कामात समाजातील धूर्त पुरोहितवर्ग मोठी मदत करून स्वताचे पोट भरत असतात. कर्मकांड उदयास येते ज्यात कांहींच तथ्य नसते हे मी तुला आधीच सांगितले आहे.

निसर्ग केवळ त्याच्या नियमानुसारच काम करणारा असतो, त्याची स्तुती करणे वगैरे गोष्टी म्हणजे एक प्रकारचा अध्यात्मिक भ्रष्टाचारच असतो. समाजातील रजो व तमोगुणी लोक त्या कर्मकांड रुपी भ्रष्टाचारात पुरते डुबलेले असतात. त्यामुळें त्यांची कर्तव्यनिष्ठा नष्ट होते ते दैववादी होतात. अरे अर्जुना, हा कर्मकांडाचा भ्रष्टाचार फार प्राचीन काळापासून चालू आहे. कारण रजोगुणी व तमोगुणी माणसे तेव्हां सुद्धा होतीच. अशा कर्मकांडात डुबलेले लोक अयशस्वी होतात. ते त्या खोट्या देवाला दोष देत रहातात. त्याचा फायदा फक्त पुरोहित वर्गाला होतो व म्हणून ते पुजारी लोक समाजात कर्मकांड वाढेल असे पहातात.

ह्या जगाचे आपले ज्ञान आपल्या पंचेंद्रियांच्या कुवतीनुसार मर्यादित असते. परंतु, बुद्धीची झेप, प्रतिभा वापरून ह्या मर्यादा ओलांडू शकते. मनाची कल्पकता माणसात भावनिकता वाढवते तर बुद्धीची कल्पकता तर्कावर असल्यामुळें त्याच्या मदतीने माणूस अशा कांहीं गोष्टींचे आकलन करू शकतो ज्या केवळ इंद्रियांना समजण्या सारख्या नसतात. त्यातूनच विज्ञान गणित असे विषय माणसांने विकसित केले आहेत.

मनाचे भावनिक निर्णय हमखास चुकीचे ठरतात परंतु, तर्कावर आधारीत बुद्धीने घेतलेले निर्णय बरोबर ठरतात. म्हणून निसर्गाला समजण्यासाठी माणसाने बुद्धीचा उपयोग करण्यास सुरूवात केली. आपले निर्णय किती भावनिक आहेत व किती तार्कीक आहेत ते तपासून त्यावरून आपले निर्णय यश देणार कां अपयश ते ठरवता येते. रजोगुणी व तमोगुणी माणसे भावनिक विचारात जास्त रमतात म्हणून प्रायः अयशस्वी ठरतात.

हे महाबाहो, जीवात्म्याच्या धारण केलेल्या शरीराचे कांहीं गुण असतात व तसेंच कांहीं कर्मे असतात. ती त्यांच्या स्वभावानुसार कार्यरत असतात. त्यामध्ये जीवात्म्याने स्वताला गुरफाटून घ्यावयाचे नसते. जसें भूक लागणे, तहान लागणे, लैंगिक भूक ह्या योगक्षेमाच्या मर्यादेत त्यांने ठेवावयाच्या असतात. इतर बरीच कामें आहेत जी शरीराला त्यांच्या संरक्षणासाठी व संवर्धनासाठी आवश्यक असतात त्यात जीवात्मा जास्त गुंतून जाणे श्रेयस्कर नसते. शरीराच्या त्या नित्य गरजा जीवाला पूर्ण करण्यात आत्म्याने त्याची अध्यात्मिक उर्जा देऊन मदत करावयाची असते त्या करता जीव आणि आत्मा एकत्र येतात त्या करता त्यांचा उल्लेख जीवात्मा असा करावा लागतो. हे होत असतांना अज्ञानी सामान्य माणसांचे आत्मे त्यांत गुंततात, ते होणार नाही ह्याची दक्षता योगी बाळगत असतो. शरीराच्या जीवाची सचेतना आत्म्याच्या अध्यात्मिक उर्जेतून मिळत असते. जोवर तो आत्मा त्या शरीरात आहे तोवर ते शरीर व म्हणून त्यातील जीव सचेतन असतो.

इंद्रिय आणि त्यांचे शब्दस्पर्शादि विषय यांच्या तील प्रितीद्वेषांच्या ताब्यात आपण जाऊ नये कारण, ते मनुष्याचे वाटमारे शत्रू (त्याच्या अध्यात्मिक र्हासास कारणीभूत) असतात.

सुखाने आचरता येणार्या परधर्मापेक्षा गुणाने उणा वाटणारा स्वधर्म पाळावा असें कृष्ण सांगतो. येथे धर्म शब्द वर्ण ह्या अर्थी योजलेला आहे हे समजून घ्यावे. म्हणजे क्षत्रियांने क्षत्रियच रहावे, ब्राह्मणांने ब्राह्मणच पहावे वगैरे. अर्जुन त्याचा क्षत्रिय धर्म (वर्ण) सोडण्याच्या गोष्टी करत होता त्या संदर्भात ते विधान भगवंताने केलेले आहे. प्रत्येक वर्णाचा कर्मयोग कोणता ते परंपरेने ठरवले आहे तोंच कर्मयोग करावा असें भगवंत सांगत आहेत. अरे पार्था, अशारितीने जे आपले कर्मयोग त्यात न गुंतता समबुद्धीने करत असतात ते शेवटी माझ्यात येऊन मिळतात. परंतु, जे त्यात गुंततात ते त्यात अडकलेले असल्यामुळें अस्वस्थ मनाने प्रसंगी दुःखी होतात.

अर्जुन विचारतो, "हे कृष्णा, तर मग हा मनुष्य स्वताची इच्छा नसतांना जणू बळजबरी केली आहे अशा प्रकारे कोणाच्या प्रेरणेने पापाचरण करतो"?

कृष्ण सांगतो, मघा सांगितलेल्या रजोगुणा व तमोगुणांपासून उत्पन्न झालेला महाखादाड अत्यंत पापकारक असा काम (वासना विकार) आणि क्रोध, त्यालाच तू ह्या जगातील तुझा वैरी समज. तो वासनामय काम (तीव्र इच्छा) माणसाचा योग्य अयोग्य सांगणारा विवेक झाकून टाकतो. त्या कधीही तृप्त न होणार्या वासना एकाद्या भडाग्नी सारख्या माणसाचे शोषण करत रहातात. आपली इंद्रिये, मन आणि भ्रष्ट बुद्धी ह्या कामाची वस्तीस्थाने आहेत. तो काम गत जन्माच्या अतृप्त वसनांचा आधार घेऊन ह्या जन्माच्या शरीरातील इंद्रिये, मन आणि बुद्धि बिघडवत असतात. एकाप्रकारे माणूस त्याच्या गत जन्माकडून तो रोग घेत असतो. त्यासाठी माणसाचा आत्म्याला चिकटलेला लिंगदेह काम करत असतो.

ते होऊ नये म्हणून माणसाला त्याची इंद्रिय, मन आणि बुद्धी ह्यांचे संयमन औदासिन्याच्या धोरणाने करावयाचे असते. जर ते जमले तर त्या कामरुपी वैर्याचा नाश तू करू शकतोस.

भगवत गीता पर्व भाग तेविसावा संपला.

# भगवत गीता पर्व

# भाग चोविसावा

## कर्मब्रह्मार्पण योग – अध्याय चौथा

श्री भगवान म्हणाले, "हा अविनाशी व कधीही क्षीण न होणारा योग मी प्रथम सूर्याला सांगितला होता सूर्याने तो मनूला सांगितला व मनुने तो इक्ष्वाकूला सांगितला ह्या प्रमाणे परंपरेने आलेला हा योग राजर्षी जाणत आसतं. परंतु, कालांतराने हा योग लुप्त झाला. तो हा पुरातन कर्मयोग मी तुला मित्र म्हणून आता पुन्हा सांगत आहे".

अर्जुन विचारतो, "हे कृष्णा, तुझा जन्म अलिकडला व सूर्याचा जन्म प्राचीन काळाचा, असें असतांना तू त्याला हा योग सांगितला हे मी कसे मानावे"?

श्रीकृष्ण सांगतो, हे शत्रूतापना अर्जुना, माझे व तुझे आजवर अनेक जन्म झाले आहेत. ते मी सर्व परमेश्र्वर रुपाने जाणतो परंतु, अज्ञानात अडकल्यामुळें तू ते मात्र जाणत नाहीस.

प्रत्येक व्यक्ती आत्मरुप आहे म्हणजे विश्र्वाचा आत्मा व आपला आत्मा हे एकच आहेत. म्हणजे, प्रत्येक जण मुलतः निसर्गरुपी परमेश्र्वराचे स्थान आहोत.

मी जन्मरहीत व ज्याच्या स्वरुपात फरक होत नाही असा असूनही व सर्व प्राणिमात्रांचा कर्ता असूनही, प्रकृतीच्या ठायी अधिष्ठीत होऊन आपल्या मायेने पुनः पुन्हा जन्म घेत असतो. मला जन्म घेण्याचे कारण हे अर्जुना असे असते कीं, जेव्हां समाजातून शिस्त व विवेक (अनेक विचारांतून हितकारक तेवढे निवडण्याची क्रिया) नाहीसा होतो व त्यामुळें अनर्थ पसरतो तेव्हां ते सुधारण्यासाठी मला पुन्हा पुनः जन्म वेळोवेळी घ्यावे लागतात. बेशिस्ती आणि अविवेक ह्यांमुळे सज्जन लोकांचे हाल होतात व एकंदर परिस्थिती दुर्जनांच्या हातात जाते अशावेळी मी अवतार घेऊन पुन्हा शिस्त आणि विवेक प्रस्थापित करतो दुर्जनांचा नाश करून.

जी व्यक्ती स्वतामधील परमेश्र्वराला जाणते ती व्यक्ती इतरांना मार्गदर्शन करूं शकते म्हणून अशा व्यक्तीस आपण परमेश्र्वराचा म्हणजे माझा अवतार समजून त्याचे ऐकू लागतात. त्याच्या स्वरुपातच मी कार्य करून शिस्त व विवेक पुन्हा त्या समाजात प्रस्थापित करत असतो. अशाकारणांने अरे अर्जुना, एकाच वेळी माझे अनेक अवतार तुला ह्या पृथ्वीवर उपस्थित असल्याचे दिसेल.

गुण व कर्म हे शरीराचे म्हणजे जीवाचे असून त्यात न गुंतून जाता ते आचरावेत हे तत्त्व व्यवस्थितपणे ओळखून जे लोक आसक्ति, क्रोध आणि भय टाकून देऊन माझ्यात चित्त एकवटून जगतात ते मला येऊन मिळतात. म्हणजे त्यांच्यात व माझ्यात कांहीं फरक रहात नाही. अशा माणसाला आर्य म्हणजे सुसंस्कृत म्हणतात. परंतु, जो इसम गुण व कर्म शरीराचे आहेत हे विसरून त्यांना स्वताचे (आत्म्याचे) आहेत असें समजून त्यांत रमतो तो अनार्य म्हणजेंच असुसंस्कृत समजला जातो.

ही गीतेची आर्य, अनार्य म्हणजे सुसंस्कृत अथवा असुसंस्कृत ह्यांची व्याख्या आहे.

निसर्गात चांगले वाईट असें सगळे होत असते. त्यातील चांगले तेव्हढे ते आर्य (सुसंस्कृत) वाढवत असतात आणि वाईट तेव्हढे अनार्य (असुसंस्कृत) माणसे वाढवत असतात. त्याचा दुसरा अर्थ असा कीं, परमेश्र्वराकडे चांगले मागितले तर चांगले मिळते व वाईट मागितले तर वाईटसुद्धा मिळते. म्हणून निसर्ग नेहमी चांगलेच करील असे समजणे अशा भ्रमात अज्ञानी माणसे रहातात. हे सांगण्याचे कारण, अर्जुना, निसर्गाला चांगले वाईट असें कांही नसते. कारण निसर्ग पाप अथवा पुण्य करत नसतो. जिवात्म्याला मात्र ते लागू असतात. म्हणून सावध राहून मनुष्य आपली कामं करील तर ते त्याच्यासाठी हितकारक ठरते. हिताचा संबंध मोक्ष प्राप्तीशी असतो. निसर्गाला (प्रकृतीला) मोक्षाचे प्रयोजन नसते. कारण ते एक केवळ माध्यम असते. माणसाला त्याचा अध्यात्मिक उद्धार करावयाचा असतो म्हणून त्याला ह्या गोष्टींचा विचार करावयाचा असतो.

माणसाला मग तो चांगला असो अगर वाईट असो, शेवटी निसर्गाच्या नियमांनुसारच सर्व कामं करावी लागत असतात. प्रत्येक मनुष्य त्याच्या त्याच्या प्रवृत्तीनुसार त्याची कामं करत असतो. विशेष म्हणजे, हेसुद्धा निसर्ग नियमानुसारच होत असते.

एकादी व्यक्ती तिच्या प्रवृत्तीनुसार काम करत नसेल तर ती ते काम चांगल्यारितीने करू शकत नाही. तरी ते काम तो करत राहीला तर त्याच्या कामात सतत चुका होत असतात. म्हणून शक्यतर माणसांने त्याच्या स्वाभाविक आवडीची कामं निवडावयाची असतात. असें केल्यास त्यात तो यशस्वी होतो.

आपल्या कर्तृत्वावर विश्र्वास नसलेले लोक काम करतांना कांहीं देवांची आराधना करतात. असें समजून कीं, त्यामुळें त्यांला यश प्राप्त होईल. परंतु, हे अर्जुना, एक गोष्ट लक्षात ठेव कीं, जोवर काम व्यवस्थितपणे होत नाही तोवर अशा पुजा करून कांहीं उपयोग नसतो. स्वताच्या

कार्यक्षमतेवर विश्वास नसलेले लोक प्रायः देवांदिकांच्या (हे देव म्हणजे परमेश्वर नाही हे ध्यानात घ्यावे) पुजेत आपला काळ व्यर्थ घालवत असतात असें दिसते.

कर्मफळाची इच्छा करणारे या देवतांची पुजा करतात. ह्या ठिकाणी देवता म्हणजे ब्रह्म अथवा परमेश्वर असा अर्थ नसून त्या काम्य शक्ती जसे यक्ष, गंधर्व, पिशाच्च, राक्षस इत्यादि ज्यांच्या सहाय्याने विविध सिद्धी प्राप्त करता येतात त्या, असा घ्यावयाचा आहे. त्यासाठी व्रत, वैकल्ये, उपास, तापास, जप जाप केले जातात, त्यांना कर्मकांड असें म्हणतात. परंतु, त्या काम्य शक्ती सात्त्विक माणसासच प्रसन्न होत असतात. रजोगुणी आणि तमोगुणी माणसास त्या प्रसन्न होत नाहीत. म्हणून बहुधा ते सगळे कर्मकांड व्यर्थ जात असते. अशा कर्मकांडांतून पुरोहित वर्ग जो मुलतः वैश्य वृत्तीचा असतो त्याची वाढ झाली.

कामाच्या निमित्ताने, मी म्हणजे निसर्गरुपी परमेश्वरानी माणसाचे चार वर्ण त्यांच्या गुणकर्मानुसार केलेले आहेत. ते त्या त्या माणसाच्या प्रवृत्तीचे द्योतक असतात. मी त्यांचा कर्ता असूनही अकर्ता व अविनाशी आहे हे जाण.

कर्मफळाच्या ठायी ज्यांची वासना नाही व जे केवळ कर्तव्य म्हणून कामं करतात ते मला येऊन मिळतात व सुखी होतात. कर्मफळांच्या ठायी ज्यांची वासना नाही त्यांना त्या फळांचे बंधन नसते.

गुन्हेगाराला शासन करणारा कोतवाल जर गुन्हेगाराला होणार्या शिक्षेमुळे ज्या यातना तो (गुन्हेगार) भोगतो त्यामुळें आनंदी अथवा दुःखी होत असेल तर तो त्या कामात अडकला आहे असें होते व तो त्या कामाच्या चांगल्या अथवा वाईट परिणामांना बद्ध होतो. परंतु, जर तसे होत नसेल तर तो बद्ध होत नाही, म्हणजे त्याला ते काम केल्यामुळें पाप किंवा पुण्य असें कांहींही लागत नाही. असा कोतवाल निर्विकल्प मनाने ते करतो असे समजले जाईल. जसे निसर्ग त्याचे काम करत असतो तसे ते समजले जाते. त्याच प्रमाणे, खाटीक प्राण्याला मारतांना प्रभावित होत असेल तर तो त्या हत्त्येत बद्ध झाला असें समजले जाईल. परंतु, जर तो प्रभावित होत नसेल तर तो बद्ध होत नाही. त्याला त्या प्राण्याच्या हत्त्येचे पाप लागत नाही. एकाद्या यंत्राने ती हत्त्या केली असे ते असेल. हे साध्य होण्यासाठी त्या माणसाचे चित्त परमेश्वराकडे असावे लागते. म्हणजे तसले कार्य तो परमेश्वराला अर्पण करत असतो. सर्व क्षत्रिय अशा मनस्थितीत असावे लागतात.

चांगले काम कोणते व वाईट कोणते हे ठरवणे मोठ्या मोठ्या जाणकारांना सुद्धा अवघड असते. म्हणून मी तुला आता जे सांगतो ते नीटपणे ऐक. कर्म म्हणजे काय ते प्रथम तू समजून घे.

कर्माचे कांहीं प्रकार आहेत ते असें, स्वकर्म, अकर्म, विकर्म, निष्कर्म. स्वकर्म म्हणजे स्वताचे ठरवलेले काम (कर्तव्य), ते न करणे म्हणजे अकर्म, त्या विरुद्ध करणे म्हणजे विकर्म आणि कांहीच न करणे (आळसात रहाणे) हे निष्कर्म असते. ह्याचा अर्थ माणूस कोणत्या तरी प्रकारचे कर्म करतच असतो. कांहीं नाही तर निष्कर्म तरी तो करत असतोच. विश्रांतीसाठी झोपला तर तेसुद्धा स्वकर्म असते. आळसात बसला तरी ते निष्कर्म असते. म्हणून असे जाणकार सांगतात कीं, स्वकर्म करणे उचित असते.  कर्म करतांना त्यात न बद्ध होता रहाणे (फलेच्छा विरहीत) हा योगाचा प्रकार ठरतो. त्या प्रकारे माणूस योगी होऊ शकतो. माणसाचा योगी होणे ही क्रिया त्याच्या अध्यात्मिक उद्धाराचे लक्षण समजले जाते. जीवनाचे मर्म समजलेला माणूस ते आपसुकपणे करत असतो.

अरे पार्था, हे विश्र्व तर्क आणि गणिताने बद्ध आहे. म्हणजे विश्र्वाची रचना व कार्यपद्धती बुद्धिने आकलन होण्यासारखी असते. म्हणून ती समजण्यासाठी माणसाला सदैव बुद्धिनिष्ठ व्हावे लागते. अशा वेळी जर तो मनाच्या म्हणजे भावनिक किंवा कवी कल्पनात अडकला तर त्याला हे विश्र्व कधीच समजत नाही तो भ्रष्ट होतो व भरकटत जातो. अशारितीने जो निसर्गाला समजून घेतो व आपली कामं करत असतो तो खरा सूज्ञ (पंडित) समजला जातो. अशा माणसाकडून मार्गदर्शन घ्यावयाला हरकत नसते.

शरीरमात्रे करून जी कामं योगक्षेमा प्रित्यर्थ अथवा इतर योगांसाठी (योगक्षेम, छंदक्षेम, पापक्षेम, पुण्यक्षेम) तो करील तर ती कर्मे त्याला बद्ध करत नाहीत. कारण त्या कामात तो (आत्मा) गुंतलेला नसतो केवळ जीव म्हणजे शरीर गुंतलेले असते.

जे चार कर्म प्रकार येथे दिले आहेत त्याची विशेष माहिती अशी, योगक्षेमाने शरीर सांभाळण्याचे व संवर्धनाचे ज्यामुळें जीवन जगणे सुकर होते ती सगळी येतात. योगक्षेमाची व्याप्ती माणसा माणसा प्रमाणे सापेक्ष असते, जसे कुटूंब प्रमुखाचे शरीर, त्याचे सगळे त्याच्यावर विसंबून असलेले लोक, असते. राजाचे शरीर त्याचे राज्यातील सगळे लोक, त्यांचे योगक्षेम असते. सामान्य माणसासाठी त्याचे शिक्षण घेणे, उद्योग करणे, धन मिळवणे, जीवन सुखकर करण्यासाठी जे करावयाचे ते सगळं कर्म येते. व्यापार्याच्या योगक्षेमात त्यावर अवलंबून असणारे सगळे त्याच्या कामाशी संबंधित लोकांचे योगक्षेम येतात.

छंदक्षेमात मनुष्याची करमणूकीची, विरंगुळयाची जे जीवनासाठी किमान आवश्यक असते ते सगळे येते. ज्यात त्याचे सगळे छंद जे त्याचे व्यसन झाले नाहीत ते येतात.

पूर्व जन्माच्या कर्मामुळें जे पापकर्म त्याच्या मागे लागलेले असते ते ह्या जन्मात तो करू लागतो स्वाभाविकपणे ती येतात. त्याच प्रमाणे गेल्या जन्मातील पुण्यप्रभावाच्या परिणामामुळे जे पुण्य कृत्य तो आपसुकपणे करू लागतो ते येतात. ते होण्यामागे त्या आत्म्याला चिकटून असलेला लिंगदेह कारणीभूत असतो.

ज्याचे सगळे व्यवहार फलेच्छा विरहीत असतात आणि आत्मज्ञानाच्या प्रेरणेने असतात, तो खरा पंडित समजला जातो. जीवाच्या गरजेसाठी कर्म करणारा आत्मा ते करूनही कांहींच करत नसतो. परंतु, जर त्याच्या लिंगदेहाच्या प्रभावाखाली येऊन तो योगक्षेमांच्या कामात ढवळाढवळ करू लागला तर तो आत्मा त्या कार्यात बद्ध होतो. म्हणून छंदक्षेम, पापक्षेम आणि पुण्यक्षेम हे बंधनकारक म्हणून वर्ज समजले जातात.

आपल्या कामावर समाधानी असलेला, सुखदुःखादि द्वंद्वापासून अलिप्त राहून मत्सर रहित, यशापयशाविषयी समदृष्टी ठेवणारा सात्त्विक मनुष्य ती कर्मे करूनही त्यांत अडकत नाही. म्हणजे ती कामं त्याचे अध्यात्मिक नुकसान करत नाहीत. अनासक्त, रागद्वेषांपासून मुक्त समबुद्धिरुपी ज्ञानाच्या ठायी चित्त स्थिर झालेला व केवळ यज्ञासाठी (ध्येयासाठी) कर्म करणारा असा जो सात्त्विक मनुष्य, त्याचे सर्व कर्म करूनही ती न केल्यासारखीच असतात.

ज्यांने विश्वाच्या हितासाठीच्या कर्तव्यात सहकार्य करण्याच्या उद्देशाने सर्व कार्य केले तो कोणत्याही कर्मात बद्ध होत नाही व शेवटी असा सात्त्विक मनुष्य ब्रह्मपदाला जातो.

अरे धनंजया, तामसी वृत्तीने भ्रष्ट असलेले लोक अशांच प्रकारे वागतांना दिसतात पण त्यांच्या त्या अवस्थेला कारण असलेला तमोगुण त्याना ते अध्यात्मिक तेज प्राप्त करून देत नाही. फक्त वरकरणी अशा लोकांत साम्य आढळले तरी ते दोघे तत्वतः पूर्णपणे दोन विरुद्ध टोकांना असतात.

कोणी कर्मयोगी, देवतांच्या कर्मकांड रुपी (पुजा आर्चा इत्यादि) यज्ञाने साधना करतात तर कोणी केवळ संयमाने (इंद्रियदमन) यज्ञ करून साधना करत असतात. आणखीन कांही, ज्ञानाने प्रदीप्त झालेल्या आत्मसंयमरुपी अग्नीत इंद्रियांची व प्राणाची (जीवाची) सर्व कर्मं हवन करतात, म्हणजे इंद्रिय भोगांबद्दल औदासिन्याचे आचरण करतात.

शरीराच्या गरजा शरीराबरोबर वाढत वाढत अखेरीस स्थिर होतात व नंतर कमी कमी होत जातात जसे वृद्धत्व प्राप्त होते. हे निसर्गनियमानुसार होत असते. ज्यांने योग साधना केली नाही अशा सामान्य माणसाच्या बाबत त्याचा जीवात्मा त्या भोगात अडकून राहिल्यामुळें

शरीराची गरज कमी अथवा संपुष्टात आलेली असतांनासुद्धा त्यात रमण्याचा मूर्खपणा करत असल्याचे दिसते. त्याचे कारण तो मनुष्य त्या भोगांच्या आधीन झालेला असतो, त्याला त्या भोगाचे व्यसन लागलेले असते असा मनुष्य अध्यात्मिक दृष्ट्या भ्रष्ट होतो. कोठल्याही शारिरीक भोगांच्या व्यसनाने मनुष्य अध्यात्मिक दृष्ट्या भ्रष्ट होतो.

सामान्य माणसाचा जीव आणि आत्मा सदैव एकत्र असे असतात म्हणून त्या अवस्थेला जीवात्मा असे म्हणतात. जसें योग साधनेने ते सुटे होऊन कार्य करू लागतात तसे जीव आणि आत्मा असा त्यांचा स्वतंत्र उल्लेख होत असतो.

आत्म्याच्या समोर एका बाजूला शरीराच्या गरजा (जीवाच्या गरजा) असतात व दुसर्या बाजूला मन (ही लिंगदेहाची प्रेरणा) व बुद्धी (ही आत्म्याची प्रेरणा) असते. शरीराच्या गरजा शरीराच्या वृद्ध होण्यामुळें कमी होत असतात. त्याप्रमाणे शहाणा माणूस त्यातून बाहेर पडण्याचे ठरवतो व अध्यात्मिक साधनेत लक्ष घालतो. मूर्ख माणूस मात्र त्यात गुंतून रहाणेच श्रेयस्कर समजून त्यात आणखीन आणखीन अडकून स्वताचा अध्यात्मिक र्हास अजाणतेपणाने करत असतो असे आपण पहातो. ते टाळण्यासाठी मन आणि बुद्धी ह्यांचा सुयोग्य वापर त्यांने करावयाचा असतो. ह्यासाठी अध्यात्म साधना करण्याचे संस्कार माणसाच्या तरुणपणापासून असावे लागतात. जो तरुणपणापासून हे समजून जीवन जगतो कीं, **त्याचा जन्म वासनांत अडकण्यासाठी नसून त्याचा अध्यात्मिक उद्धार करण्यासाठी आहे,** त्या लोकांना वृद्धकाळी साधना करणे सोपे असते. त्यासाठी तसे संस्कार सुरूवातीपासून असावे लागतात. ह्यालाच कर्मयोग असे म्हणतात. ज्यांच्यात ही प्रेरणा लहानपणापासून चांगल्या संस्काराने भिनली आहे ते अध्यात्म साधना सहज करू शकतात. असे सुशिक्षित लोक त्यांच्या विविध वासनांना फाजिल महत्व देत नाहीत.

लिंगदेह जो त्या माणसाच्या गत जन्माचे कर्मविपाक स्वरुप कर्म असते, ते त्याला जीवनभर सतावत असते. त्याप्रमाणे माणसाच्या उपजत प्रवृत्ती असतात. पापी माणसाच्या लिंगदेहाच्या उचापतीमुळें तो माणूस ह्या जन्मातसुद्धा पापाचरणास उद्युक्त होत असतो व पुण्य कर्मी त्याच्या पुण्यकर्मी लिंगदेहामुळें उपजत बुद्धीने पुण्यकर्माकडे उद्युक्त होत असतो. माणसाच्या उपजत बुद्धीला हा लिंगदेह कारणीभूत असतो. माणसे जन्मताच कांहीं चांगले वाईट गुण घेऊन येतात ते त्या त्यांच्या लिंगदेहामुळे होत असते.

[लिंगदेहाचे अस्तित्व हल्लीच्या डीएनेच्या संशोधनाने सिद्ध झाले आहे]

थोडक्यात सांगावयाचे म्हणजे जीव आणि लिंगदेह ह्यांच्या जुगलबंदीत आत्मा होरपळून निघत असतो. तो कधी जीवाची बाजू घेतो तर कधी लिंगदेहाची असे अज्ञानामुळे होत असते. सुयोग्य संस्काराने ते सुधारता येते.

हे करत असतांना, त्या संयमांचा अतिरेक होणे सुद्धा श्रेयस्कर नसते. हे लक्षात ठेवावयाचे असते. औदासिन्य हे इंद्रियांच्या संयमाचे उत्तम धोरण असते. वासना उद्दिपीत असतांना संयम करणे केवळ शक्य नसते. म्हणून वासनांबद्दल औदासिन्य वाढवणे हांच इंद्रियदमनाचा योग्य मार्ग असतो. म्हणूनच अरे अर्जुना, तरूणपणी गृहस्थाश्रम सांगितला आहे. गृहस्थाश्रम सर्व आश्रमात श्रेष्ठ आहे कारण तो ब्रह्माचा आश्रम आहे. ब्रह्मदेव विश्वाचा गृहस्थाश्रम नित्य चालवत असतो. "शरीर माध्यमं खलू धर्म साधनं", असें सांगितले आहे ते ह्याच साठी. हे सगळे समजून जी साधना होते ती ज्ञानमय साधना समजली जाते. बळजबरीने इंद्रिय दमन करणे शरीराला त्रास देण्यासारखे असते म्हणून त्या जोराच्या काळात गृहस्थाश्रम सांगितला आहे तो आचरावा व आपल्या शरीराच्या योगक्षेमाला मदत करावी तोच त्या काळातील कर्मयोग समजावा.

ब्रह्मचर्य पालन करण्यासाठी पुरूषाला स्त्रियांबद्दल अत्यंत आदराची व सन्मानाची भावना असणे जरूरीचे असते त्या संस्कारामुळें अध्यात्म साधना सोपी होते. ब्रह्मचर्य हे स्वाभाविक असते जर योग्य संस्कार असतील. जगातील सगळया स्त्रिया माताभगिनीकन्या असा भाव बाळगणारा, आणि पत्नीसुद्धा अनंत काळाची माता व क्षणाची पत्नी असे धोरण मनाशी बाळगणारा, गृहस्थ ब्रह्मचारी समजला जातो.

हे ज्ञान प्राप्त झाल्यावर तू असा मोहात पडणार नाहीस, ज्या ज्ञानाने संपूर्ण सृष्टी तू आपल्या ठायी व नंतर माझ्या ठायी पहाशिल.

सुरूवातीला चुका करणारा मनुष्य निसर्ग नियमांना समजून कार्य साधना करू लागला कीं, पुढे तो यशस्वी होतो. योग्य नियमन करून शरीराची कुचंबणा न करतां, तसेंच त्या शरीराच्या गरजांत जास्त न अडकता जो कामं करतो तो सूज्ञ समजावा. त्याचे त्याच्या इंद्रियांवर सहज नियंत्रण असते कारण तो त्याचा स्वभाव झालेला असतो. अशा इसमाला पूर्ण शांती मिळते.

जो मनुष्य निसर्गाची पर्वा न करता वाटेल तसे काम करतो तो पूर्णतया मनाने व बुद्धिने शरीराच्या ताब्यात जाऊन बरबाद होतो कारण, वृद्धत्व आल्यावर शरीर त्याच्या सर्व प्रासंगिक गरजा कमी करते परंतु, मन मात्र त्यात कायम गुंतल्यामुळें तो मनुष्य अशांत होऊन उध्वस्त होतो.

कारण अरे अर्जुना, आपले शरीर जरी वृद्ध होत असले तरी मन व बुद्धि मात्र कधी वृद्ध होत नसते. शरीराची साथ न मिळाल्यामुळें वासनांत गुंतलेले मन व बुद्धि भ्रष्ट होऊन त्या वासनांच्या विचाराने होरपळून जाते. अशा अवस्थेत जर तो मेला तर त्याचे पिशाच्च अनंत काळ व्यथित अवस्थेत यातनामय भोग भोगत रहाते. म्हणून माणसांने त्याच्या मृत्यू आधी त्याच्या सगळया वासनांचा त्याग केलेला असेल तर तो सुखात पिशाच्च अवस्था काढू शकतो. हे पार्था, दोन जन्मात असलेला हा पिशाच्च अवस्थेचा काळ फार मोठा असू शकतो.

शरीराचे (इंद्रियांचे) चोचले न पुरवता जेवढ्यास तेवढे असे मर्यादा राखून सगळे भोग भोगण्याची सवय ज्याला आहे तो त्याच्या मृत्यूनंतरसुद्धा सुखात असतो. त्याला पाप लागत नाही. शरीराच्या (जीवाच्या) गरजा ह्या माझ्याच (आत्म्याच्या) गरजा आहेत असें समजणे अज्ञानाचे लक्षण असते.

लिंगदेह त्याच्या प्रवृत्तीनुसार शरीराला वागवण्याचा प्रयत्न करत असतो त्याला आवर न घालता उलट उत्तेजन देणे अज्ञानाचे लक्षण असते. जो ह्या दोन अज्ञानातून बाहेर आला व जीवाचे कोणते, लिंगदेहाचे कोणते व आत्म्याचे कोणते विचार आहेत हे जो स्पष्टपणे ओळखतो तो खरा योगी व ज्ञानी होय.

मन शांत ठेवून त्रयस्थाच्या दृष्टीने सर्व व्यवहार पारखणारा साधक हे साध्य करतो व हे अर्जुना, हींच खरी साधना असते. जीवन म्हणजे जीव (प्राण) व लिंगदेह ह्यांची जुगलबंदी असते. त्यांत वस्तुतः आत्म्याने पंचाचे काम करावयाचे असते. परंतु, अज्ञानामुळे कधी जीवाच्या आग्रहाखातर तर कधी लिंगदेहाच्या बहकाव्यात येऊन आत्मा बहकून जाऊन त्या दोघात अडकतो ते होऊ न देणे हांच खरा व्यक्तिगत धर्म आहे.

मनुष्याचे नांव हे त्या शरीराचे नांव असते. कारण आत्म्याला नांव नसते. त्या शरीरावर आरूढ झालेला तो आत्मा त्याच नांवाने ओळखला जातो. मेल्यावर तो आत्मा त्यांच नांवाने शरीर सोडून बाहेर पडतो. प्रत्यक्षात मृत्यू देहाचा म्हणजे जीवाचा होत असतो. दुसर्या जन्मात तोंच आत्मा वेगळया नांवाने पुन्हा नवीन देहात आरूढ होऊन आपले कर्मविपाक पूर्ण करण्यासाठी जगू लागतो. ह्याचा अर्थ जीवाला एकच जन्म असतो. तर आत्मा अनेक जन्म घेत असतो. सन्यास घेतांना साधक आपले नांव (त्याच्या जीवाचे नांव) बदलून वेगळे नांव घेतो अशी प्रथा आहे. त्या मागीत उद्देश हा असतो कीं, सन्यासी जीवांचे नांव सोडून आत्म्याचे नांव धारण करतो.

लहान बालक वयाच्या तीन वर्षापर्यंत त्याच्या जीवाच्या प्रेरणेने काम करत असते, त्यानंतर सावकाशपणे त्याचा आत्मा जागृत होतो व त्यामुळे त्याचा लिंगदेह जीवाच्या कामात ढवळाढवळ करू लागतो. ही जुगलबंदी पुढे आयुष्यभर चालू असते.

लिंगदेह म्हणजे त्या आत्म्याच्या गत जन्मातील कर्म विपाकांचे गाठोडे असते. त्यामुळेंच तर तो आत्मा पुनः पुन्हा जन्म घेत असतो. त्या जन्मात जे घडत असते त्यांची नोंद लिंगदेहात होत असते. त्यामुळें जेव्हां मनुष्य मरतो तेव्हां त्याचा आत्मा तो नव्याने घडलेला लिंगदेह घेऊन त्या शरीरातून बाहेर पडतो. नवीन लिंगदेह घेऊन तो पुढच्या प्रवासास जातो. त्यामुळें पुण्य कर्मात गुंतलेल्या माणसाच्या आत्म्याचा लिंगदेह त्या पुण्यप्रभावाच्या विशुद्ध प्रेरणा घेऊन शुद्ध झालेला असतो. त्यामुळें पुढच्या जन्मी तो माणूस चांगले जीवन जगत असतो. पापमय जीवन जगणार्यांचा लिंगदेह त्या अशुद्ध प्रेरणा घेऊन निघतो व त्याच्या पुढच्या जन्मात तो ते पाप भोग असलेले वाईट जीवन जगू लागतो. ह्याचा अर्थ मनुष्य त्याच्या पुढील जीवनाचा लेखाजोखा ह्या जन्मात रचत असतो, दुसरा कोणी ते करत नाही, मी (परमेश्वर) त्यात हस्तक्षेप करत नाही.

प्रकृतीची परिमाणे तीन (काळ, भार आणि दिशा) असतात. सगळी सृष्टी त्यामध्ये बद्ध असते. आत्मा त्याहून वेगळया परिमाणात असतो, ते आहे "विचार". म्हणजे आत्मा, लिंगदेह आणि जीव हे व इतर अव्यक्त गोष्टी विचार ह्या परिमाणात असतात. म्हणून त्यांचे वेगळेपण तू जाणू शकतोस. रचना हे विश्वाचे प्रमुख परिमाण आहे. तेसुद्धा विचार असते. सगळी विश्वाची रचना त्या एका परिमाणामुळें शक्य झाली आहे. काळ, भार आणि दिशा ह्यांना जसे गणिताचे म्हणून तर्काचे बंधन असते ते विचार आणि रचना ह्या परिमाणांना नसते.

भगवत गीता पर्व भाग चोविसावा संपला.

# भगवत गीता पर्व

# भाग पंचविसावा

## कर्मसंन्यास योग – अध्याय पांचवा

अर्जुन विचारतो, हे कृष्णा, तू एकदा कर्मसन्यासाची व पुन्हा कर्मयोगाची प्रशंसा करतोस, तेव्हां या दोह्योपैकी अधिक श्रेयस्कर जे असेल तेंच निश्चित करून मला सांग.

भगवान त्यावर बोलतात, कर्मयोग व कर्मसंन्यास योग हे दोनही मार्ग मोक्षदायक आहेत. तरी त्यातील विशेष योग्य असतो कर्मयोग कारण, तो विश्वाच्या कार्याला पोषक असतो. अरे अर्जुना, जो कशाचीही अपेक्षा न ठेवता कामं करतो तो संन्याशी समजला जातो. असा मनुष्य ते कर्म करूनसुद्धा त्यापासून मुक्त असतो. कारण, तो मनाने व बुद्धिने त्या पासून मुक्त असतो. वस्तुतः हे दोनही एकच आहेत. फक्त अडाणी पढीक लोक अज्ञानामुळे त्यांना वेगवेगळे समजून गोधळ करतात. कोणालाही कर्म चुकवता येत नाही हे तू समजला आहेस. म्हणून निष्काम कर्म (कर्म करूनही न केल्यासारखे) करणे म्हणजेच न गुंतता काम करणे हांच खरा मार्ग (यज्ञ) ठरतो. ज्या माणसाला त्याच्या कामातील निसर्ग नियमांचे व मर्यादांचे पूर्णज्ञान आहे तो मनुष्य कधीही कार्यभ्रष्ट होत नाही. खरा कर्मयोगी तो जो पहातांना, ऐकतांना, स्पर्श करतांना, वास घेतांना, खातांना, पितांना, गिळतांना, चालतांना, झोपतांना, संभोग घेतांना, श्वासोंश्वास करतांना, त्याग करतांना, ग्रहण करतांना, डोळे मिटतांना व उघडतांना, मुततांना, हगतांना व इतर येथे न सांगितलेली कर्मे सदैव असें समजून ते सगळे करत असतो कीं त्याची इंद्रिये आपापल्या विषयाच्या ठायी आपोआप प्रवृत्त आहेत व असें समजून ती ते करत आहेत. अशा वैचारीक अवस्थेमुळें अशा सर्व कर्मांपासून तो मुक्त असतो. अशा विचारसरणीमुळें त्याची अध्यात्मिक उर्जा त्या कामांमुळें बाधत नाही.

पापमय ढोंगी इसम मात्र हे सगळे विधी मनाने व बुद्धिने बद्ध होऊन करत असतो तरी ते तसे करत नाही असा कांगावा करतो व त्या द्वारा स्वताची आणि इतरांची फसवणूक करण्यात धन्यता मानतो त्याला मिथ्याचारी म्हणतात. असे ढोंगी लोक खर्या ज्ञानी माणसाचे सोंग घेऊन समाजाची फसवणूक करत असतात. म्हणून अरे परंतपा, अशा माणसांपासून समाजाचे संरक्षण करण्यासाठी खर्या कर्मयोग्याला शस्त्र घेऊन त्या ढोंगी मिथ्याचारी लोकांचा विध्वंस करावयाचा असतो. त्या कामात मी, परमेश्वर, त्याला सहाय्य करत असतो. ह्या युद्धामागील उद्देश सुद्धा

तसांच आहे. अशा विध्वंसाला पाप समजले जात नाही. कारण त्यामुळे त्याची अध्यात्मिक उर्जा कमी होत नाही, उलट प्रसंगी वाढत असते. जी हत्त्या मद, मत्सर, गर्व, मोह आणि लोभामुळें होते ती पापकारक असते. जी हत्त्या चांगल्या उद्देशांमुळे हितकारक असते ती पुण्यकर्म समजली जाते.

अरे अर्जुना, प्रकृतीच्या कार्य व्यवहारात हत्त्या होणे अपेक्षित आहे. कारण हत्त्येचा संबंध मृत्यूशी असतो व जन्म आणि मृत्यू हे निसर्गाचे दोन प्रमुख कार्यक्रम आहेत. त्या हत्त्येबद्दल नाराजी दाखवणे अज्ञानाचे लक्षण आहे. कर्मयोगी मनाने, शरीराने, बुद्धिने आणि केवळ इंद्रियानीही आसक्ती सोडून (केवळ निसर्गाचे पालन करण्यासाठी) आत्मशुद्धी करीता कर्में करत असतो.

जो मनुष्य त्याच्या बुद्धिचा उपयोग न करता मनाने कवीकल्पना करून त्यानुसार कामे करत असतो तो चुका (क्षम्य पापं) करत असतो. तसे होत असेल तर मात्र त्या चुका जर सतत होत असतील तर त्याला बद्ध करून अडकवू शकतात. त्यातून त्याची सुटका होणे कालांतराने मुष्किल होते. असे होण्याचे कारण तो त्याच्या चुकांचे समर्थन अयोग्य सबबी सांगून करू लागतो. त्याद्वारा तो स्वताची व त्याच्यावर विश्वास ठेवणार्यांची फसवणूक करत असतो.

आत्म्याने अशारितीने शरीराच्या विविध गरजा निष्काम बुद्धिने पूर्ण करण्याची सवय केली कीं, शरीराच्या विविध गरजा आपोआप क्रमा क्रमांने कमजोर होत असतात. त्याच बरोबर लिंगदेहाच्या फाजिल मागण्यांकडे तो दुर्लक्ष करण्याचे धोरण योजतो तर त्यासुद्धा आपोआप आटोपते घेतात व नष्ट होतात. त्यामुळें साधना सोपी होते.

लोकांची कर्तृत्व शक्ती, त्यांनी करावयाची कर्मे आणि कर्माशी होणारी फळांची जोड ह्या गोष्टी परमात्मा ठरवत नाही, त्या प्रकृती स्वभावानुसार होत असतात, तसा हा खेळ होत असतो. हे न समजल्यामुळें मनुष्य अनेक गैरसमज करून त्यात फसत असतो. ह्याचा अर्थ, परमात्म्याचा स्वभाव प्रकृती आहे. प्रकृती आणखीन एक खेळ करत असते तो ऐक, प्रकृती शरीरात एक कार्यक्रम व्यवस्था निर्माण करून ते शरीर उत्पन्न करत असते. त्या कार्यक्रम व्यवस्थेला जीव (रसायनिक बुद्धि) असे म्हणतात. अर्थात् जीव (प्राण) म्हणजे आत्मा नाही ते तुला समजले असेल. शरीराच्या सर्व नित्य आणि प्रासंगिक गरजा व त्यांचे नियंत्रण जीव ही व्यवस्था करत असते. त्यामुळें शरीर त्याची नित्य कामं आपसुकपणे करत असते. जसें यंत्रमानव दिलेल्या आज्ञासूत्रानुसार आपले काम करते तसे हे असते. जसें मोटार गाडी चालवण्यासाठी चालक असतो तसे शरीर (मोटार गाडी) चालवण्यासाठी जीव (चालक) आपण लावतो तसे हे असते, आत्मा त्या गाडीतील प्रवासी असतो.

ज्याचे मन व बुद्धि  योग्य ज्ञानाने प्रभावित झाली त्यांची आधीची पापं नष्ट होतात. अशा मनुष्याचा कायम उद्धार झालेला असतो. म्हणून माणसाने निराश न होता स्वतः मध्ये सुधारणा करत रहावे हेंच त्याच्यासाठी श्रेयस्कर असते.

सर्व प्राणिमात्र शरीराने भिन्न असले तरी एकच आहेत हे समजून जो सर्व प्राणिमात्रांशी समभावाने वागतो तो ब्रह्मात विलीन होतो. मी उच्च हा नीच असे आज्ञानामुळे येणारे विचार त्याच्या मनात येत नाहीत. जो खरोखरच अशा समभावात असतो त्याच्याशी सगळे चराचर समभावाने वागतात, वैरभाव तेथे आढ़ळत नाही. मान अपमान ह्या उपाधींपासून तो मुक्त होतो. हितकर्ता, मित्र, वैरी, तटस्थ, द्वेषी, बांधव, सज्जन, दुर्जन अशा जीवांच्या विकारांविषयी (हे विकार जीवाला शरीराच्या संरक्षणासाठी अथवा संवर्धनासाठी आवश्यक असतात) समबुद्धि ठेवणारा असा तो होतो.

आत्मा जरी जीवावर आरुढ असला तरी जीवाचे हे विकार जे संरक्षणासाठी निसर्गतया त्यात उत्पन्न होतात त्यांपासून मुक्त असतो.

असा मनुष्य प्रिय व अप्रिय असे कांही मानत नाही. त्यामध्ये म्हणून आनंदी अथवा दुःखी अशा अवस्था नसतात. असा माणूस विषय आणि इंद्रिये ह्यांपासून होणारे भोग, दुःखाला कारणीभूत असतात. अशा भोगांना उत्पत्ती व नाश असतो. जो त्यात अडकतो तो अशा मुळे खूष किंवा नाराज होत असतो व सदैव अस्वस्थ असतो. त्याला कधीच समाधान प्राप्त होत नाही.

कोणतेही काम कसे करावे त्याची निसर्ग नियमानुसार माहिती नसल्यामुळें त्या कामात रमणारा अपयशी होतो. काम करत व त्यातून चुका झाल्यास त्या सुधारत जो जातो तो अखेरीस यशस्वी होतो. तो त्याच्या कर्मयोगात कामयाब होतो. जो निसर्गाचे नियम रितसर शिकून त्याप्रमाणे काम करतो त्याला ज्ञानयोगी म्हणतात. म्हणून कर्मयोगी कर्मात गुरूशिवाय यशस्वी होतो. ज्ञानयोग्याला गुरू लागतो. अरे अर्जुना, तुला माहित आहे एकलव्य. तो तुझ्यापेक्षा श्रेष्ठ धनुर्धर झाला होता कारण तो कर्मयोगी होता. तू ज्ञानयोगी आहेस. तरी सिद्ध झाल्यावर ते दोघे एकाच योग्यतेचे होतात.

ज्याच्या अंगवळणी हे समजणे निश्चित झाले आहे कीं, आपल्या होणार्या सर्व इच्छा शरीराच्या गरजांतून उत्पन्न झाल्या आहेत व त्यात आत्म्याने लक्ष घालावयाचे नाही. शरीराला त्यांचे करू द्यावे, तो क्रोधापासून मुक्त होतो. त्यामुळें त्याला आत्मिक शांती लाभते. असा मनुष्य सर्व भोगांच्या विचाराकडे औदासिन्य प्रवृत्तीने व सहानुभूतीने पहातो व त्यात जास्त रमत नाही,

मर्यादा सांभाळून ठेवतो. तशा धोरणात जीव आणि लिंगदेह आत्म्याला मदत करत नाही म्हणून साधना तरूणपणी करणे अवघड असते. तशा साधनेला तपस्या म्हणतात.

अशारितीने अनेक जन्म सर्व भोगांपासून अलिप्त अवस्थेत राहून जो तपस्या करतो तो ब्रह्मनिर्वाणरुप मोक्ष प्राप्त करत असतो. अशारितीने तयार झालेला असा योगी नंतर दुसर्याला शिकवू शकतो, तो गुरू बनू शकतो. असा ज्ञानी ज्ञानयोगांने सिद्ध झाला कां कर्मयोगाने ते महत्वाचे नसते.

भगवत गीता पर्व भाग पंचविसावा संपला.

# भगवत गीता पर्व

# भाग सव्विसावा

## अभ्यास योग  अध्याय सहावा

श्री कृष्ण म्हणतात, कर्मांच्या फळांची इच्छा न ठेवता जो आपले कर्तव्य करतो तो सन्यासी व तोंच योगी समजावा. गृहस्थाश्रमाचा त्याग करून कोणतीही जबाबदारी न घेता जो केवळ कर्मकांडात व तशाच निरर्थक व्रत वैकल्यात वेळ फुकट घालवतो तो सन्यासी किंवा योगी नसतो.

कर्मसंन्यास म्हणजे कांहींही काम न करता असा अर्थ घेऊन जे केवळ आळसात त्यांचा वेळ घालवतात ते मूर्ख असतात. असें लोक स्वताची व इतरांची निव्वळ फसवणूक करत असतात. कर्मसंन्यास म्हणजे खर्या अर्थाने निष्काम वृत्तीने आपली कर्तव्ये करीत रहाणे असा आहे. योगसिद्धी संपादन करू इच्छिणार्यास निष्काम कर्म हे साधन सांगितले आहे, आणि जो योग संपन्न झाला त्याला समबुद्धि स्थिर राखण्यासाठी शांती हेंच साधन होय.

वासना अथवा इच्छा जी केवळ शरीर धर्माने (योगक्षेमाने) प्राप्त होते ती पूर्ण करण्यामुळें प्रकृतीला ती चालू रहाण्यात मदत करत असते. म्हणून अशा प्रपंची लोकांना निसर्गरुपी परमेश्वर मदत करत असतो. परंतु, केवळ वांसनेच्या व्यसनात जे अडकतात त्यांच्या वासना भोगाच्या कर्मामुळे प्रकृतीला तीच्या विहीत कार्यात पिडा होते व म्हणून त्या लोकांचा सर्व प्रकृतीला त्रास होत असतो.

मनुष्याने स्वतः स्वताचा उद्धार करावा. आपला नाश आपणच करून घेऊ नये. कारण, अखेरीस आपणच आपले हितचिंतक व शत्रू असतो. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे शरीराच्या (जीवाच्या) बंधनातून सुटका करण्यासाठी दुसरा कोणीही आत्म्याला मदत करत नसतो. दुसर्या शब्दात सांगावयाचे म्हणजे वासनांचे व्यसनात रुपांतर न होऊ देऊन मनुष्य स्वताला व त्याच्या समाजाला तारू शकतो. योग्याने एकांतात राहून मन व बुद्धि यांचा निग्रह करून कोणत्याही इच्छा न करता आणि लोभपाश सोडून सतत योगाभ्यासाकडे मन लावावे.

येथे योगाभ्यास म्हणजे, शरीराच्या वासनां पासून (गरजां) मुक्त राहण्यासाठी व त्या वासनेचेच विचार मनात सतत येऊ नये म्हणून दुसर्या कोठल्यातरी विषयात मन रमवावयाचे असते. जसें शास्त्राभ्यास, कलाविकास, संशोधन कार्य, इत्यादि. कांही वेळा केवळ इष्ट देवतांचे ध्यान करणे हेसुद्धा योगाभ्यासात येते. मन एका वेळी फक्त एकाच गोष्टीचे एकाग्र चिंतन करू

शकते ह्या त्याच्या गुणाचा येथे वापर केला जातो. म्हणजे असें कीं, जर योगी शास्त्राभ्यास करत असेल अथवा इष्ट देवतेवर एकाग्र चिंतन करत असेल तर त्यावेळी तो कोणत्याही वासनांचा विचार करू शकत नाही.

अशा योगाभ्यासाने तो माणूस शरीराच्या वासनांपासून दूर राहतो व असें सतत होत राहीले तर यथावकाश शरीराच्या वासना सुद्धा कमी कमी होत जाऊन नष्ट होतात. ह्यालाच अभ्यास योग असें म्हणतात.

हे अर्जुना अति खाणारा, किंवा मुळीच न खाणारा तसेंच अति झोपणारा किंवा मुळीच न झोपणारा अशा मनुष्यास अभ्यास योग साध्य होत नाही. शरीर उत्तम रहाण्यासाठी जे सर्व लागते ते सर्व योग्य मर्यादेत करून जो हा योग करतो तो हा दुःखनाशक योग चांगल्या प्रकारे साध्य करू शकतो. जेव्हां त्याचे आवरलेले चित्त आत्म्याच्या ठिकाणी स्थिर होते आणि जेव्हां तो साधक सर्व वासना सोडून पूर्ण निरीच्छ होतो तेव्हां तो योगी झाला असें म्हणतात.

भावनाविवश होऊन काम करणार्याची बुद्धि चंचल होते व त्याचे निर्णय बुद्धिने न घेता तो मनाने म्हणजे भावना विवशतेच्या प्रभावा खाली घेत जातो. म्हणून ते निर्णय हमखास चुकीचे असतात. अशा परिस्थितीत हा योग किंवा इतर कोणतेही काम अपयशी होते. म्हणून कामा संबंधित सर्व निर्णय तर्कशुद्ध बुद्धिने घ्यावयाचे असतात. बुद्धि तर्कशुद्ध निर्णय घेते व मन भावनिक निर्णय घेते हे लक्षात असू दे. बुद्धि एकच निर्णय घेते त्या कामाबद्दल परंतु, मनात अनेक कल्पना येत असतात व त्यामुळे निर्णयाबाबत ते चंचल असते. अशा चंचलतेमुळें कार्याचा नाश होत असतो.

शरीराच्या विविध आवडी अनुभवतांना त्यातील क्षणभंगूरता न्याहाळण्याचे काम करणारा योगी यथावकाश त्या आवडीतून उदास होऊन त्यांबाबत निरीश्च्च होतो व त्यांचा त्याग करतो. जसे लहान मुल बाल वयात ज्या खेळांत रमते त्या खेळाकडे मोठे झाल्यावर ढुमकून बघतसुद्धा नाही. याच प्रमाणे अज्ञानात ज्या गोष्टीत मनुष्य रमतो त्यात तो योगी झाल्यावर रमत नाही.

असा योगी कशाचीच आवड नाही अशा स्थिर अवस्थेत असतो. त्यामुळें कांहीं मिळो अगर न मिळो त्यांने त्याला कांहीं फरक पडत नाही. परंतु तो गृहस्थाश्रमी असल्यास गरजेपुरते तो त्या इच्छांत लक्ष घालतो जे गृहस्थाश्रम चालवण्यासाठी जरुरीचे असते. जसें लहान मुलाला खेळवण्यासाठी तो त्या बालिश खेळात रमल्याचे दाखवून त्या मुलाला जिंकवण्यात आनंद मानतो

व स्वता हरत रहातो. म्हणजे तो पोक्त माणूस खेळत असला तरी त्या खेळात नसतोसुद्धा, तसे योग्याचे होत असते.

कर्म करतांना येणार्या अपयशाने दैवाला दोष देणारी माणसं प्रगती करीत नाहीत. त्या ऐवजी अपयशाचे कारण शोधून त्यावर इलाज करण्याचा प्रयत्न करणारा अंती यशस्वी होतो.

चिडणे, उदास होणे, कंटाळणे हि भावनाविवशतेची लक्षणे असतात. आपल्या कामातील बारकाव्यांकडे विशेष लक्ष देतो त्याच्या कामाला तेज प्राप्त होते. त्या कामाची सर्वत्र वाखाणणी होते.

आपण जे कार्य निवडले त्याशी जो एकरुप होतो, तनमन अर्पून ते काम करतो, थकत नाही, हलगर्जीपणा करीत नाही तो खरा कर्मयोगी  समजावा.

निसर्ग नियमांनुसार काटेकोरपणे काम करण्याचा ज्याला ध्यास लागला तो कर्मयोगी म्हणून उदयास येतो. तरुणपणी विषय चिंतन करण्याचा मोह जीवाच्या संगतीने आत्म्याला होतो. तरी माणसांने, गरजे पुरता विषय उरकून बुद्धिच्या मदतीने त्यातून बाहेर पडावे व मन आत्मस्वरुपाच्या ठायी स्थिर करावे.

स्वभावतः चंचल असे मन जिकडे तिकडे धांव घेईल तिकडून तिकडून ते आवरावयाचे असते. तरुणपणी हे विशेष अवघड असते परंतु जसे जीवाची गरज वयोमानाने विषयातून कमी होत जाते ते सोपे होते. साधनेचे मुख्य कर्तव्य असते जेणेकरून चित्त आत्मस्वरुपाकडे लागेल, हे साधनेचे मुख्य उद्दिष्ट असते. अशा तपस्येने रजोगुण शांत होऊन मन पूर्णपणे स्वस्थ झाले आहे, त्या ब्रह्मस्वरुप झालेल्या निष्पाप योग्याला उत्तम सुख प्राप्त होत असते. असा योगी सर्वत्र परमेश्र्वराला पहातो. त्याला मी कधीही अंतर देत नाही व तोही मला अंतर देत नाही. जो दुसर्याच्या सुख दुःखा बाबत जागृत राहून त्या प्रमाणे सावधानतेने आपले स्वार्थ साधतो तो परमेश्र्वराला प्रिय होतो. अशा वागण्याला सामान्य शब्दात चांगुलपणा असें म्हणतात.

कोणाच्याही अज्ञानाचा, गरीबीचा, भोळेपणाचा, कमजोरीचा गैरफायदा न घेणे ह्यालाच **माणूसकी** असे म्हणतात. मला समाजाने कसे वागवावे असे मला वाटते तसेंच मी समाजातील लोकांशी वागणे ह्यालाच **चांगुलपणा** असे म्हणतात. सर्व प्राणिमात्रांबद्दल सन्मानाची भावना बाळगून त्याप्रमाणे जगणे आणि सगळया प्राणिमात्रांचा आदर करणे ह्याला **भूतदया** असे समजले जाते. ही सनातन (हिंदू) धर्मातील मुलभूत नितीतत्त्वं आहेत ती, अरे पार्था, जो आचरतो तो मला

प्रिय असतो.

अर्जुन विचारतो, हे कृष्णा, समबुद्धि प्राप्त होणारा जो हा योगी तू सांगितला, तो मनाच्या चंचलतेमुळें कायमचा टिकेल असें मला वाटत नाही. कारण, मन हे चंचल, दांडगे, बालिश आणि हट्टी म्हणून वळण्यास अवघड असते. त्याला आवरणे हे वार्याला मोट बांधण्या इतके अत्यंत अवघड आहे.

कृष्ण त्याला सांगतो, तू जे बोलतोस ते योग्य आहे पण सतत प्रयत्न, विरक्त वृत्ती (औदासिन्य) स्वीकारून ते यथावकाश साध्य होते. कारण मन हे सवयप्रधानसुद्धा आहे. ज्या प्रकारचे विचार करण्याची त्याला तू सवय लावशिल त्या प्रकारच्या विचारात ते रमू लागते. वाढत्या वयात वासना कमी होते त्या वयात साधना सोपी जाते. तरुणपणी त्यासाठी गृहस्थाश्रम सांगितला आहे त्यामुळे त्याच्या योगक्षोमाच्या वासनांना वाट मिळते व अनर्थ टाळता येतो. ते भोग भोगत असतांना त्या भोगांतील निरर्थकता समजून घेणे हे खर्या साधकाचे काम असते. त्यामुळे वासनांचा जोर कमी होत जातो. सवयीनी ते शक्य असते.

वासनामुक्त होण्याचा प्रयत्न करणार्या योग्याला सृष्टीतील श्रेष्ठ अव्यक्त शक्ती त्याच्या प्रयत्नांना मदत करीत असतात हे समजून घे, निसर्ग ह्याबाबत बराच सहनशिल आहे कारण, हे अर्जुना, ज्याप्रमाणें, चांगले काम करणार्याला मदत चांगल्या शक्ती करत असतात तशा वाईट काम करणार्याला निसर्गातील वाईट शक्ती मदत करत असतात. एकंदर निसर्ग सगळ्यांना मदत करत असतो कारण, त्याला हे विश्व चालवावयाचे असते. हे विश्व चालवण्यासाठी ह्या दोनही प्रवृत्तींचा समन्वय साधावा लागत असतो.

अर्जुन विचारतो, अरे मित्रा एकादा योगी साधना करतांना त्याची श्रद्धा कमी पडली व तो त्या निग्रहापासून दूर झाला तर त्याचे काय होते, काय त्याची आधी केलेले सगळी साधना व्यर्थ जाते कां?

कृष्ण सांगतो, प्रामाणिक प्रयत्न करणारा योगभ्रष्ट झाला तर त्याच्या मृत्यूनंतर तो त्याने जेवढे मिळवले आहे त्या योग्यतेच्या पुण्य लोकात तो जातो व तेथील भोग संपल्यावर पुन्हा पुन्हा मानव जन्म घेतो, त्यावेळी त्या नवीन जन्मात त्याने जे आधीच्या जन्मात मिळवले आहे त्या पर्यंतची योग्यता घेऊन तो येत असतो म्हणजे त्याच्या पुढची साधना तो त्या नवीन जन्मात प्रारंभ करतो. म्हणजे अरे पार्था, त्याची साधना व्यर्थ जात नाही.

भगवत गीता पर्व भाग सव्विसावा संपला.

# भगवत गीता पर्व

# भाग सत्ताविसावा

## ज्ञान विज्ञान योग  अध्याय सातवा

भगवान श्रीकृष्ण बोलतो, हे अर्जुना, माझ्या ठिकाणी मन लावून आणि माझाच आश्रय करून योगाभ्यास करीत असतां, तू मला निःसंशय व संपूर्णपणे कसे जाणशील ते ऐक. मी हे तुला त्यातील विज्ञानासहित पूर्णपणे सांगतो. ते जाणल्यावर या लोकीं आणखीन कांहीं जाणण्यासारखे उरत नाही. हजारो माणसांपैकीं एकादाच सिद्धीसाठी झटतो आणि त्या सर्व झटणार्यांपैकी एकाद्यालाच माझे खरे ज्ञान होते.

पृथ्वी, पाणी, तेज, वायू, आकाश, मन, बुद्धि आणि अहंकार मिळून माझी प्रकृती आठ प्रकारांनी विभागली आहे. ही माझी अपरा (खालच्या पातळीची) म्हणजे जड प्रकृती आहे. त्याशिवाय ज्याच्या योगाने या जगताचे धारण होते अशी पराप्रकृती (श्रेष्ठ पातळीची) म्हणजेच माझी जीवनरुपी चेतना प्रकृती आहे. ते समजून घे.

सर्व सृष्टी माझ्या ह्या अपरा व परा प्रकृतींपासून उत्पन्न होते. म्हणून मींच ह्या अखिल जगाचे उत्पत्ती स्थान आणि विलय स्थान आहे. अरे अर्जुना, माझ्याहून श्रेष्ठ व वेगळे असे कांहीं नाही. त्यासाठी जे मुलभूत तत्त्व ज्याला रचना म्हणतात त्याचा अर्थ असा कीं, दोर्यात ओवलेल्या अनेक मण्यांप्रमाणे, हे सगळे विश्र्व माझ्या ठायी ओवलेले आहे. ह्या विश्र्वातील सर्व गोष्टी, त्यांच्या रचना तत्त्वानुसार एकमेकांना बांधलेल्या आहेत. म्हणून ह्या विश्र्वातील कोणतीही एक गोष्ट इतर कोणत्याही गोष्टीशी बद्ध असते. हे जाणणे म्हणजेच ज्ञान व त्या स्वतंत्र आहेत असे समजणे हे अज्ञान असे लक्षात घे.

हे अर्जुना, पाण्यातील रस मी, चंद्रसूर्यांमधील प्रभा मी, सर्व वेदातील ओंकार मी, आकाशातील शब्द मी, पुरूषांतील पराक्रम मी आहे. पृथ्वीवरील उत्तम सुवास मी, अग्नीतील तेज मी, सर्व प्राणिमात्रातील प्राण मी, आणि तपस्व्यांतील तेज मी आहे.

हे पार्था. सर्व पदार्थांचे अनादी बीज मी, असें समज. बुद्धिमंतांची बुद्धि मी, तेजस्वी लोकांतील तेज मी, बलवंतांतील वासना आणि आसक्तीविरहीत बळ मी, सर्व भूतांच्या ठिकाणी धर्माला (नैतिकतेला) विरुद्ध न जाणारा काम मीच आहे. जे जे सात्त्विक राजस आणि तमस भाव व पदार्थ आहेत ते ते सर्व माझ्यापासून उत्पन्न झाले आहेत असे तू जाण, परंतु मी त्यांच्यात नसतो. ते मात्र

माझ्या आश्रयाने असतात. ह्या सत्त्व रज तम गुणात्मक पदार्थांनी मोहित होऊन हे जग त्यांच्या पलिकडे असणारा निर्गुण अविनाशी असा जो मी (परमेश्र्वर) त्याला ते जाणत नाहीत.

ही माझी त्रिगुणात्मक अलौकीक माया पार होण्यास कठीण आहे असें जे जाणतात, ते मलाच शरण येतात तेंच या मायेला तरून पार करू शकतात. ह्या मायेलाच सत्य समजून त्याचाच आग्रह करून जे त्यात गुरफटून जातात व विवेकहीन होतात, ते मूढ व निष्कर्मी नराधम आसुरी बुद्धित पडून मला विसरतात, मला भजत नाहीत. सदैव दुःख पिडीत असणारे, ज्ञानाची इच्छा करणारे, द्रव्यादि विषयेच्छू व ज्ञानी असें चार प्रकारचे सदाचारी लोक माझी उपासना करत असतात. ह्या चारात नेहमी निष्कामतेने वागणारा व अनन्य भक्ती करणारा असा जो समजूतदार (सूज्ञ) तो श्रेष्ठ होय. कारण, सूज्ञ भक्ताला मी अत्यंत प्रिय असून ते मला प्रिय असतात.

अर्जुन विचारतो, अशा प्रेमाचे कारण काय?

श्रीकृष्ण सांगतो, त्याचे कारण, मी व तो एकच आहोत. हे खरे व केवळ सत्य तो जाणतो परंतु, मायेच्या आविष्कारामुळें जसे धुक्यामुळें कांहीं दिसत नाही, तसे तो मला नीटपणे समजू शकत नसला तरी तो हे जाणत असल्यामुळे माझीच म्हणजे त्याच्या खर्या रुपाची भक्ती करत असतो. अशाप्रकारे अनन्यभावाने तो ती करीत असल्यामुळें शेवटी मायेचे धुके नाहीसे होते व तो माझ्या पर्यंत येतो. ते करीत असतांना मायेच्या लिलांवर न रागावता तो तिचे कौतुक करत ते सर्व प्रकार अनुभवत असतो. ते अनुभवत माझ्याच आठवणीत रमलेला असतो.

निसर्गाला समजण्याच्या विविध शाखा आहेत, जसें पदार्थ विज्ञान, रसायन, वनस्पतीशास्त्र, वैद्यक, अभियांत्रिकी, तर्क, गणित इत्यादि जो ज्या शाखेने अचूक अभ्यास करील तो त्या शाखेत यशस्वी होईल. त्यासाठी ती शाखा त्याला दैवता प्रमाणे असते.

मुलभूत अशा रचना तत्त्वामुळे निसर्गातील ह्या सर्व शाखांच्या नियमांवरून एक समानता असते, त्यामुळे एक शाखेच्या नियमांवरून दुसर्या शाखांचा अभ्यास करता येतो. त्यासाठी गणित व तर्क ह्यांचा नेहमी उपयोग करता येतो. निसर्गातील सर्व शाखांचे ज्ञानमार्ग एकच असल्यामुळें ह्या शाखा जरी वरकरणी भिन्न वाटत असल्या तरी अंतर्यामी त्या एकच होऊन निसर्गात विलीन होतात. जे जाणकार सर्व शाखांचे मुलतत्त्व एकच आहे हे जाणून काम करतात त्यांना निसर्गाला समजणे सोपे असते.

आपापल्या प्रकृती नियमांप्रमाणे, त्या त्या काम वासनांनी वेडावलेले लोक तो तो उपासनेचा नियम पाळून दुसर्या निरनिराळ्या देवतांच्या भजनी लागतात. परंतु, तो तो भक्त त्या त्या

देवतेची उपासना श्रद्धापूर्वक करू इच्छितो, म्हणून मी त्याची श्रद्धा त्या त्या देवतेवर स्थिर करतो. सृष्टीचा कारभार चालवण्यासाठी अनेक उपशक्तीपिठ मी निर्माण केली आहेत. जसे, एकाद्या उद्योगात विविध कार्य करण्यासाठी अनेक अधिकारी नेमले जातात तसें हे असते. त्या अधिकार्यांना कांहीं खास अधिकार असतात जेणेकरून ते त्या अधिकारांचा वापर करून आपले कार्य व्यवस्थित पार पाडू शकतील. त्या प्रमाणे, मी त्या उपशक्तीपिठांना, ज्यांना देवता म्हणतात सिद्धी दिल्या असतात. त्यांची भक्ती करीत ते अज्ञानी लोक अशामुळें अल्पकाळ टिकणारी फळं प्राप्त करतात व त्या देवतेकडे जातात. जे माझी भक्ती करतात ते मात्र माझ्याकडे येतात. अशा देवता त्यांची ताकद वाढवण्यासाठी असे अनेक भक्त मिळावेत म्हणून प्रयत्न करतात. जितके जास्त भक्त तितकी त्यांची ताकद जास्त होत असते. ह्यामुळें, अशा देवतांकडे गेलेले लोक त्या देवतेच्या आकर्षणात कायम अडकून पडतात. असे असले तरी अशा भक्तांना त्या त्या देवतेच्या सिद्धींचा फायदा होत असतो. माझ्याकडे येणार्या भक्तांना तसा फायदा होत नाही. तसे होण्याचे कारण, अरे अर्जुना, माझ्या भक्तांचा योगक्षेम मी स्वतः पहात असतो. माझ्या असंख्य सिद्धी त्यांचे संरक्षण करत असतात. अशा उपशक्ती म्हणजेच देवता सहजपणे प्रसंन्न होत असल्यामुळे जास्त करून सामान्य भक्त त्यांच्याकडे आकर्षित होत असतात. त्या जेवता मायेचा एक हिस्सा असतात. म्हणजे त्या स्वतः सुद्धा भ्रम असतात. मी मात्र मायेच्या धुक्याबाहेर असतो. त्यामुळें मला सामान्य माणूस समजू शकत नाही. माझे भक्त मला प्रत्यक्ष पाहू शकत नसल्यामुळे माझी अनेक काल्पनिक रुप तयार करून त्यांच्या माध्यमातून ते मला पहाण्याचा प्रयत्न करत असतात. त्या चित्रांपुढे अथवा मूर्त्यांपुढे ते माझी आळवणी करत असतात. त्यातून मूर्तीपुजा उदयाला आली. ते भक्त त्यांच्या अज्ञानामुळें त्या विविध मूर्त्यींच्या करता एकमेकात भाडत असतात. कोणती मूर्ती खरी असें ते वाद घालतात. ते सगळे त्यांच्या अहंकारामुळे निर्माण झालेल्या अज्ञानामुळे होत असते. मी पुजतो तेंच श्रेष्ठ इतर पुजतात ते खोटे अशा प्रकारचा मूर्खपणा त्यांच्या होत असतांना मी पहात असतो परंतु, त्यात मी पडत नाही कारण यथावकाश त्यांतील खरे भक्त सगळे सत्य समजून शांत होणार हे मी जाणून असतो. देवतांची पुजा करणारे त्यांच्या मृत्यू नंतर त्या देवतेच्या गणात सामील होतात. माझे उच्चपदाला गेलेले भक्त माझ्या गणात येतात.

हे अर्जुना, मी भूत वर्तमान आणि भविष्य काळातील सर्व प्राणिमात्रांना जाणतो पण मला मात्र कोणीही जाणत नाही.

हे परंतपा अर्जुना, जीवावर आरुढ झालेला अज्ञानी आत्मा जीवाच्या अनेक इच्छा व त्यातून उत्पन्न होणारे द्वेष द्वंद्वाच्या मोहाने सृष्टीत भ्रम पावतो. ह्याही परिस्थितीत सत्कर्माचरणी लोकांचे पातक त्यांच्या वाढत्या अध्यात्मिक उर्जेच्या प्रभावाखाली नष्ट झालेले असते. त्यांचा पुण्यप्रभाव

त्यामुळें वाढत असतो व ते माझ्या अधिकाधिक जवळ येत असतात. त्याच्या मृत्यूवेळी सुद्धा ते मलाच स्मरत असतात. जे देवतांचे भक्त त्यांची आराधना करत त्यांची पुण्य पातळी उच्च करत असतात ते त्या प्रभावामुळें अखेरीस माझ्यात येऊन मिळतात. कारण अरे अर्जुना, त्या देवतासुद्धा माझाच भाग असतात. त्यांचा भ्रम नाहीसा झालेला असतो. ते त्यांच्यात व माझ्यात एकच तत्त्व आहे त्याचा साक्षात अनुभव घेत असतात. त्यांची सर्व दुःखे नाहिशी झालेली असतात.

भगवत गीता पर्व भाग सत्ताविसावा संपला.

# भगवत गीता पर्व

## भाग अठ्ठाविसावा

## अक्षर ब्रह्मयोग अध्याय आठवा

अर्जुन विचारतो, "ब्रह्म म्हणजे काय"? अध्यात्म कशाला म्हणतात? कर्म म्हणजे काय? अधिभूत कशाला म्हणतात? आणि अधिदैवत कशाला म्हणतात? ते सांग". "हे मधूसुदना, अधियज्ञ तो कोणता व तो या देहात कसा आहे"? त्याच प्रमाणे, मनोनिग्रही पुरूषांनी तुला कसे जाणावे ते सुद्धा सांग.

श्री भगवान सांगतात, अत्यंत श्रेष्ठ व अविनाशी असें जे आदितत्त्व ते ब्राह्म होय. स्वयंभूने हे प्रथम त्याच्या विचाराने निर्माण केले. प्रत्येक वस्तुचा जो मूळ भाव (स्वभाव) ते त्याचे अध्यात्म होय. सचेतन आणि अचेतन अक्षरब्रह्मा पासून भूतांची उत्पत्ती करणारा जो व्यवहार त्याला ब्रह्मकर्म अशी संज्ञा आहे.

हे अर्जुना, अधिभूत म्हणजे नाशवंत कार्यरुप पदार्थ अर्थात् जीव होय. या पदार्थात जो पुरूष म्हणजे सचेतन अधिष्ठाता तो अधिदैवत म्हणजेच आत्मा. अधियज्ञ म्हणजे सर्व यज्ञांचा अधिपती म्हणतात तो मीच ह्या देहाच्या ठायी (अधिदेह) देह धारण करणार्यांमध्ये श्रेष्ठ आहे. म्हणून जो मनुष्य मरणसमयी माझेच स्मरण करीत देह सोडतो तो माझ्यात विलीन होतो. किंवा हे अर्जुना, मरणसमयी जीवात्मा (देहधारी आत्म्यास जीवात्मा असे म्हणतात) ज्या देवतेचे स्मरण करत प्राण (जीव) सोडतो त्या दैवतेत जाऊन मिळतो.

एकचित्ताने अभ्यासपूर्वक (सतत प्रयत्न करून) परमेश्र्वराचे स्मरण करत तू जगलास तर शेवटी मलाच येऊन मिळणार, तसें न करता केवळ वासनामय विचारात आयुष्य घालवलेस तर त्या वासनांच्या विचारात अडकलेला असा तू मरणोत्तर अतिदुःखमय सतत अस्वस्थ असा अंतराळात भरकटत राहशिल. मद (घमेंड) व मत्सर (द्वेष) ह्या विचारात आयुष्यभर रहाणारे लोक त्यामुळें दुर्गंधयुक्त नरकात गटांगळया खात बराच काळ तडफडत राहतात. त्यांना पुनर्जन्म सुद्धा अत्यंत त्रासदायक अशा कुळात मिळतो. अशा घरात ते जन्म घेतात जेथे आधीपासून त्या दोषांचेच साम्राज्य आहे. त्यांतून त्यांची सुटका होणे दुरापास्त असते. ज्या दोषांना तू ह्या जन्मात वाढवतोस ते दोष (काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर) जेथे प्राधान्याने आहेत तसे कुळ तुला मिळते व तुझे जीवन कष्टमय होते. म्हणून पार्था, स्वताच्याच विकृत विचारांच्या कचाट्यात

सापडलेले ते आत्मे अधिकाधिक खोल सतत जातात, त्याचे ते दोष अधिकाधिक वृद्धिंगत होत जाऊन तो शेवटी दिशाहीन असा होतो. त्याला त्यातून बाहेर काढणे सोपे नसते. कारण ते त्यांनीच स्वताच्या चुकांनी मिळवलेले असते. अशा आत्म्यांना समजत नाही आता काय करावे. म्हणून वासनामय विचारांत जास्त रमण्याची घोडचूक तू कधींच करू नकोस. सुरूवातीला गोड वाटणार्या त्या वासना विषासारख्या त्या माणसाचा अध्यात्मिक नाश करतात. जीवांने वासनांत योगक्षेमा पुरते रमणे हे हितकारक असते पण त्यात आत्म्याने रमणे त्या आत्म्यासाठी भयंकर बाधक असते. वासना आत्म्यासाठी गोडवीष असते हे लक्षात ठेव. त्या वासना आत्म्यासाठी नसतात म्हणून त्यात तू लक्ष घालू नकोस. जीवात्म्याचे भवितव्य अंधकारात ढकलणारे हे वासना विचार अर्जुना सोडून दे. देहाच्या जगण्यासाठी जीवाला ज्या सहा प्रेरणा आवश्यक असतात त्यांत आत्म्याने गुंतणे श्रेयस्कर नसते. हे ज्याला समजले तो चांगला योगी होतो.

देवतांची भक्ती करणारे शेवटी त्या देवतेला मिळतात तितकी त्या देवतेची शक्ती जास्त होते. जितके चांगले लोक तिला भक्त म्हणून मिळतात तितकी ती जास्त ताकदवान होत असते परंतु, जितके वाईट लोक तिची भक्ती करतात त्या देवतेची ताकद कमी होते. त्या देवता त्यांचा अव्हेर करतात व ते वासनासक्त आत्मे वाईट शक्तीच्या आहारी जातात. त्यानंतर ते पापात अडकलेले जीवात्मे त्या पापशक्तीचे गुलाम होतात. त्यांची ताकद जी नकारात्मक असते, वाढत जाते.

अर्जुन विचारतो, मनुष्य चुका कां करतो व निसर्ग कां त्या चुका करत नाही ते सांग.

भगवात सांगतात, माणसांत अहंकार त्यातील आत्म्यामुळे अंगीभूत असतो. त्यातून काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर हे सहा दोष असतात. ते वस्तुतः शरीराच्या संवर्धनासाठी आणि संरक्षणासाठी आहेत व त्यात आत्म्याने गुंतण्याचे कारणच नसते पण ते होते व सगळे चुकू लागते. निसर्गाला अहंकार नसतो कारण त्याला ह्या सहांची गरज नसते त्याचे व्यवहार करण्यासाठी. निसर्गाचे सगळे व्यवहार यंत्राप्रमाणे होत असतात. त्याच्या कामात तर्क आणि गणित असते भावना नसतात ज्या ह्या सहा दोषामुळें माणसाच्या मनात उत्पन्न होत असतात. म्हणजे निसर्गाला भावना नसतात. जर मनुष्य ह्या दोषांपासून मुक्त झाला तर तो निसर्गासारखाच होईल. मनुष्याने अंतर्मुख होऊन त्याच्यातील त्या सहा दोषांचे (प्रेरणांचे) वेळोवेळी परिक्षण करावे व त्यांचा आपल्या अध्यात्मिक उद्धारात त्रास होत नाही ह्याची तजवीज करावी. असे करणारा अध्यात्मिक उच्चतेला सहज जाऊ शकतो. ब्रह्मदेवाच्या दिवसाच्या काळात सृष्टीची निर्मिती होते व त्याच्या रात्री पुन्हा ती सृष्टी त्यामध्ये विलीन होते. असे हे अव्याहतपणे होत आले

आहे. हा प्रकृती परावश पदार्थ समुदाय व्यक्त व पुन्हा अव्यक्त असें होत असतांना दुसरे एक सनातन अव्यक्त तत्त्व आहे, ते सर्व भूतमात्रांचा नाश झाला असतांना स्वतः विनाश पावत नाही. ज्याला अक्षर अविनाशी म्हणतात असे जे परम अव्यक्त स्वरुप तींच सर्व प्राणीमात्रांची शेवटची परमश्रेष्ठ अवस्था होय. जो त्या स्थानाला पोहोचला तो परत ब्रह्मदेवाच्या सृष्टीत व्यक्त अथवा अव्यक्त अशा कोणत्याही स्वरुपात येत नाही. हे ज्या सूज्ञांने जाणले तो कधीही ह्या सहा दोषांच्या मोहात पडत नाही तो परम अवस्थेत कायम रहातो ज्याला मोक्ष म्हणतात.

भगवत गीता पर्व भाग अठ्ठाविसावा संपला.

# भगवत गीता पर्व

# भाग एकोणतिसावा

## अनन्यभक्तियोग  अध्याय नववा

श्री भगवान बोलतात, अर्जुना तू आता समजण्यास योग्य झाला आहेस म्हणून तुला एक माहिती ज्ञान विज्ञाना सहित देतो ती ऐक. ती नीटपणे समजलास तर तू कर्मबंधनातून मुक्त होशिल.

हे सर्वश्रेष्ठ ज्ञान, पवित्र, उत्तम, प्रत्यक्षबोधी, आचरण्यास सुखकारक, अव्यय आणि धर्म्य (धर्माने मान्य केलेले) आहे.

मी स्वतः अव्यक्त रुपाने हे जग व्यापलेले आहे. माझ्याठीयी सर्व सृष्टी आहे पण मी तिच्यात नाही. सृष्टी निर्माण करणारा मी ती उत्पन्न करूनही तिच्यात नसतो. असे असले तरी मी माझ्या प्रकृतीला हाती धरून तिच्या ताब्यात गेल्यामुळे परतंत्र असलेल्या ह्या सृष्टीत पुनः पुन्हा स्वताला आणत असतो. मी सृष्टीत असूनही तिच्या कर्मबंधनात अडकत नसल्यामुळे अध्यक्ष होऊन सर्व चराचर सृष्टी प्रसवत असतो म्हणून, ह्या जगाची घडामोड होत असते. माझे सर्वश्रेष्ठ स्वरुप न जाणणारे लोक मला मनुष्य देही  समजून माझी अवज्ञा करतात.

अज्ञानी माणसे मी मूर्तीत अथवा मानव देहात आहे असें समजून माझी त्यात पुजा करतात. माझी वृथा शब्दाने भजन पुजन करत असतात. त्यांना माझे निसर्गरुपी परमेश्वरी रुप कधीही समजत नाही. ते मला त्या मूर्तीतच पहाण्याचा प्रयन करत असतात. ते अज्ञानातच रहातात. ते भ्रष्ट चित्त लोक मोहात पाडणार्या राक्षसी व आसुरी स्वभावाचा आश्रय घेऊन वागतात म्हणून त्यांच्या सर्व आशा व्यर्थ होतात. त्यांची कर्मे (पुजापाठ इत्यादि कर्मकांड) निरर्थक होतात. त्यांचे परमेश्वारा बद्दलचे ज्ञानही खोटे ठरते. त्या उलट दैवी प्रकृतीचा आश्रय घेतलेले महात्मे मी सर्व भूतांचे आदिस्थान व अव्यय आहे हे लक्षात घेऊन अनन्यभावे मलाच भजतात. निसर्गाचे अनादि अनंत व्यवहार व त्या पाठील नियम समजण्यासाठी मनुष्याला विवेक (योग्य अयोग्य समजण्याची विचार पद्धती) शक्ती दिली आहे. त्यातील बुद्धि म्हणजे तर्क व गणित ह्यांच्या मदतीने तो पंचमहाभूतांना समजू शकतो परंतु, जीव, चेतना आणि रचना तत्त्व समजण्यासाठी त्याला मनाच्या कल्पना विचार प्रतिभेचा उपयोग होतो. कारण हे पार्था, ह्या तीन तर्क आणि गणिताने

समजण्यासाख्या नाहीत. अशारितीने प्रथम विवेक आणि मग कल्पना विचार वापरून तो सूज्ञ साधक म्हणजेच योगी मला समजून घेतो. त्यालाच भजन पद्धती समजावे.

मनाच्या विचारांचे दोन भाग आहेत ते असें, एक वैकल्पिक आणि दुसरा प्रतिभा. वैकल्पिक हा अहंकाराने होतो. प्रतिभा निसर्गाची शक्ती असते. सर्वच माणसांना प्रतिभा ही निसर्गाची शक्ती प्राप्त असेलच असें नाही, ज्यांना प्राप्त होते ते विलक्षण शोध लावतात. निसर्गाची विचारशक्ती म्हणजे निसर्गाचे संपूर्ण ज्ञान, प्रतिभासंपन्न व्यक्तीला अंशत्वाने ही प्राप्त होत असते. त्यामुळे विलक्षण रित्या अशी माणसं निसर्गात घडणार्या गोष्टींचे आकलन करत असतात. ते ज्ञान त्याला कसे झाले ते त्यालासुद्धा माहित नसते. असे जेव्हां आढळून येते तेव्हां ते निसर्गाच्या विचारशक्तीमुळें त्याला झाले असे समजावे. ह्याला कांहीजण चमत्कार म्हणतात.

ह्या विश्वात जे आहे व जे नाही (अव्यक्त) ते सर्व मींच आहे, सर्वांची गति, पोषणकर्ता, प्रभू, साक्षी, निवासी, शरण, सखा, उत्पत्ती, लय आणि स्थिती, निधान आणि अव्यय बीज मींच आहे. जगातील उष्णता, प्रकाश, पाऊस, अमृत आणि मृत्यू तसेंच सत् व असत् म्हणजे जे आहे व जे नाही (अव्यक्त) ते सर्व मींच आहे.

निसर्गाला समजण्यासाठी बुद्धि (तर्क, गणित) व प्रतिभा (मनाचे काल्पना विचार) ह्यांची गरज असते. बुद्धिला प्रयोगशीलता आवश्यक असते. प्रतिभा मात्र कांही लोकांना स्वाभाविकपणे अवगत असते. ती प्रयत्न करून मिळवता येत नाहीत. जे लोक निसर्गाच्या सर्व बारकाव्यांचा अभ्यास करून त्यानुसार आपली कामं रितसर पार पाडतात त्यांची कामं विना अडचण होतात. त्यांना कशाचीच काळजी नसते. शुद्ध मनाने माझी भक्ती करणारे मेल्यावर स्वर्गलोकी जातात व कालांतराने पुन्हा पृथ्वीवर जीवात्मा होऊन शरीर धारण करून जन्म घेतात, पुढची अध्यात्मिक प्रगती करण्यासाठी. अशारितीने ते माझे भक्त अनेक फेर्या मारत स्वर्ग – पृथ्वी करत करत शेवटी मला मिळतात. जे शरीर व भोग हे माझे नसून ते शरीराचे आहेत असें समजून त्यात विशेष न रमता एकाग्रचित्ताने माझे स्मरण करण्यात रमतात ते मात्र, माझी जबाबदारी बनतात. मी त्यांचे संरक्षण, संवर्धन, योगक्षेम पहात असतो. जे मला न स्मरता इतर देवतांची भक्ती करतात ते त्या देवतेला मिळतात. तिची ताकद वाढवतात. मेल्यावर ते त्या देवतेचे गण बनून रहातात. असे अज्ञानी लोक हे जाणत नाहीत कीं, त्यांची भक्ती व्यर्थ गेलेली नाही कारण, ते ज्या देवतेची आराधना करतात, ती देवता अनन्यतेने माझेच स्मरण करत असते.

बुद्धिने व्यक्त निसर्गाला समजणे सोपे असते. परंतु, अव्यक्त अशा परमेश्वराला समजण्यासाठी मनाची प्रतिभा असावी लागते. निसर्गाला कोणाचाही राग नसतो तसेंच त्याला

कोणीही जास्त प्रिय किंवा अप्रिय नसते. निसर्गाला समजून वागणारे वैज्ञानिक असतात ते सगळे तर्क आणि गणिताच्या मदतीने निसर्गाच्या व्यक्त रुपाचा अभ्यास करत असतात.

मी प्रथम माया उत्पन्न केली, तिने निसर्ग (प्रकृती) निर्माण केली. त्यात माझा अशुद्ध झालेला भाग अर्थात आत्मा, शुद्ध करण्याचे कार्य सुरू झाले आणि म्हणून हा सगळा व्याप मांडलेला आहे. ज्याला कांहीं प्रपंच म्हणतात. म्हणून अरे धनंजया, निसर्ग हे माझे अशुद्ध रुप आहे म्हणून मी निसर्गात नसलो तरी निसर्गाच्या उत्पत्तीच कारण आहे. त्याच्या मार्फत ही सृष्टी चालवत असतो. मला समजण्याचे काम कोणीही करू शकतो. जो मला समजला तो आत्मा मला मिळतो मग तो कोणीही असो जसे, स्त्री, पुरूष, वैश्य, शुद्र, क्षत्रिय, ब्राह्मण, कुलवान, कुलहीन, दस्यु, आर्य, अनार्य कोणीही कारण ती सगळी माझीच रुप आहेत फक्त त्यांना ते माहीत नाही. भगवत गीता पर्व भाग एकोणतिसावा संपला.

# भगवत गीता पर्व

## भाग तिसावा

## विभूति योग  अध्याय दहावा

भगवान श्री कृष्ण बोलतात, अर्जुना आणखीन एक माझे हितकारक भाषण ऐक, माझा जन्म केव्हा झाला ते देव, ऋषी अशा कोणालाही माहित नाही. कारण, मी त्यांचे आदिकारण आहे. म्हणजे त्यांच्या निर्मिती आधी पासून मी आहे. जो मला जन्मरहीत अनादि अनंत महेश्र्वर असें जाणतो तो मनुष्य मोह रहीत होऊन सर्व पापांपासून मुक्त होतो. निसर्ग सुद्धा अनादी अनंत असून त्याच्या उत्पत्तीचा शोध घेण्यात मानवाला कांहींच फायदा नाही म्हणून त्या फंद्यात माणसांने पडू नये. त्याचे कारण माणूस ज्या काळमानाने ते शोधण्याचा प्रयत्न करणार ते माझ्यानंतरचे आहे. म्हणजे मी व निसर्ग काळाच्याही आधीचे आहोत.

माणसातील विविध भाव जसें बुद्धी, ज्ञान, मन, जागरुकता, क्षमा, सत्य, इंद्रियनिग्रह, शांति, सुख, दुःख, उत्पत्ती, लय, भय, अभय,अहिंसा, हिंसा, समता, संतोष, तप, दान, यश, अपयश, इत्यादि माझ्यापासूनच उत्पन्न होतात. मी सर्व गुण, अवगुण ह्यांचा कारक आहे.

सप्तर्षी, चार मनु, ज्यांच्या पासून ही सृष्टी उत्पन्न झाली ते माझेच मानस म्हणजे मनाने (विचारांनी) निर्माण केलेले भाव आहेत. जो योगी माझीही विभूती, विस्तार आणि योगशक्ती जाणतो त्याला स्थिर कर्मयोग प्राप्त होतो.

मी सगळयांचे उत्पत्ती स्थान असून मजमुळे सर्व जग कार्यरत असते हे जाणून शहाणे लोक मला स्मरतात. निसर्गाचे व्यवहार स्वतः समजणे व दुसर्याला समजावणे तसेंच दुसर्याकडून शिकणे अशा परंपरेने मानवप्राणी अनेक पिढ्यांतून सतत निसर्गाला पर्यायाने मला अधिकाधिक चांगल्या प्रकारे समजू लागला व जर ही ज्ञानाची देवाणघेवाण परंपरेने चालू राहिली तर मानव समाज प्रगत होतो व नाही चालू राहिली तर मात्र तो मानव समाज मागासलेला राहतो. प्रगत समाज अशा मागासलेल्या समाजावर अधिराज्य स्थापन करतो. त्यांचे शोषण करतो. तेथे मी माझी इच्छा असूनही त्या मागस समाजाला मदत करू शकत नाही. म्हणून मानव समाजाने नेहमी जागृत राहून ज्ञान संपादन करत राहिले पाहिजे. जो स्वताला मदत करतो त्याला परमेश्र्वर मदत करतो. जो परावलंबी रहाणे पसंत करतो त्यांना निसर्ग नष्ट करतो. परंत, माझे नित्य स्मरण करणार्यांच्या वर कृपा करतो व त्यांच्यात शिरून तेजस्वी ज्ञानरुप आत्मे तेथे पाठवून त्या समाजाचे अज्ञान

नाहीसे करत असतो. मग असे जागृत झालेले समाज प्रगती करू लागतात. त्यानंतर ते इतर मागास समाजांना जागृत करतात ते माझे भक्त ठरतात. मानव समाजाचा विकास त्यात जन्मणार्या बुद्धिमान आणि प्रतिभासंपन्न लोकांवर अवलंबून असतो.

अर्जुन विचारतो, हे परमेश्र्वरा, श्री कृष्णा, तूंच सर्व सृष्टीचा कर्ता करविता आहेस हे सर्व ऋषी, महर्षी सांगतात आणि तू सुद्धा तेंच सांगत आहेस. तेव्हां तुझ्या विभूती (उच्च बिंदू) कोणत्या ते तू मला सांग म्हणजे मी त्या ओळखू शकेन. हे योगेश्र्वरा, मी कशारितीने तुझे निरंतर चिंतन करावे म्हणजे मी तुला व्यवस्थितपणे ओळखू शकेन ते सुद्धा सांग.

भगवान बोलतात, माझ्या अनेक विभूती आहेत. परंतु, त्यातून तुला समजतील अशा महत्वाच्या ज्या आहेत त्या तुला सांगतो. असें पहा, निसर्ग फार विशाल आणि माणसाच्या आकलन कुवतीच्या मर्यादे बाहेरचा आहे. अशा परिस्थितीत मानव निसर्गाचे नेहमी अंशात्मक ज्ञान प्राप्त करू शकतो. संपूर्ण निसर्गाला समजणे मानवाला केवळ अशक्य असते. म्हणून माणसाने त्याकरता दुःखी न होता जेवढे जमेल तेवढे ज्ञान संपादन करून घ्यावे त्यातच मनुष्याचा पुरूषार्थ आहे.

माणसाला बाहेरची माहिती मिळवण्यासाठी पांच ज्ञानेंद्रिये (नेत्र, कान, नाक, जिव्हा, त्वचा) व दोन वैचारीक इंद्रिये, मन आणि बुद्धि, अशी सात साधनं असतात. त्या प्रत्येकाची आकलन क्षमता मर्यादित असते. त्या मर्यादे पलिकडील जे आहे त्याचे आकलन आपल्याला स्वताच्या कुवतीने प्राप्त होऊ शकत नाही. त्यासाठी जे त्यांच्या आवाक्या बाहेरचे आहे ते मिळवण्यासाठी आपण दुसर्या कोण्या ज्ञानी माणसाची मदत घेत असतो. त्याच्या सांगण्यावर अंधपणे विश्र्वास ठेवूनच ते मिळवत असतो, त्यासाठी आपल्याला सात्त्विक अंधश्रद्धा (वैचारिक दृष्ट्या विश्र्वसनीय अशी श्रद्धा, त्याविरुद्ध असते ती तामसी अंधश्रद्धा) असावी लागते. आपल्याला जी माहिती मिळते त्यातील नव्वद टक्क्याहून जास्त माहिती ह्या प्रकारे मिळत असते म्हणून सात्त्विक अंधश्रद्धा हा ज्ञान मिळवण्याचा एक महत्वपूर्ण स्रोत असतो. तामसी अंधश्रद्धेने चुकीचे निष्कर्ष निघत असतात म्हणून ती अग्राह्य आहे.

आता अर्जुना, माझ्या प्रमूख विभूती सांगतो त्या ऐक, सर्व माणसांच्या अंतर्गातील असणारा मी आहे. सर्व सृष्टीचा आदि मध्य व अंत मींच आहे. अदितीच्या बारा मुलांतील विष्णू मी आहे, तेजस्व्यातील सूर्य मी आहे, एकूण चाळीस मरुतातील मरिची मी आहे, नक्षत्रांत चंद्र मी आहे, तीन वेदांत सामवेद मी आहे, स्वर्गीय देवांत इंद्र मी आहे, इंद्रियांत मन मी आहे, जीवातील चैतन्य मी आहे. पर्वतात मेरू मी आहे. पुरोहितांत जो मुख्य बृहस्पती तो मी आहे, सेनापतींत कार्तिकेय मी

आहे, जलाशयांत समुद्र मी आहे, महर्षींमध्ये भृगु मी आहे, वाणीतील ओंकार मी आहे, सर्व प्रकारच्या मंत्रांत जपमंत्र मी आहे, स्थावरातील हिमालय मी आहे, सर्व वृक्षात पिंपळ मी आहे, देवर्षींमध्ये नारद मी आहे, घोड्यांत उच्चैःश्रव मी आहे, गंधर्वात चित्ररथ मी आहे, सिद्ध लोकांत कपिल मुनी मी आहे, गजेंद्रात ऐरावत मी आहे, मनुष्यात त्यांचा राजा मी आहे, शस्त्रांत इंद्राचे वज्र मी आहे, गाईंत कामधेनू मी आहे, प्रजोत्पत्ती करणारा काम (लैंगिक कामांत दोन प्रकार सांगितले आहेत त्यातील भोग काम तामसी म्हणून त्यज्य समजला जातो) मी आहे, सर्पांत वासुकी मी आहे, नागांत अनंत (शेष) मी आहे, जलाचरांत वरुण मी आहे, पितृगणांत अर्यमा मी आहे, निग्रह करणार्यात यमधर्म मी आहे, दैत्यांत प्रह्लाद मी आहे, ग्रासणार्यांत काळ मी आहे, पशुंमध्ये सिंह मी आहे, पक्षांत गरूड मी आहे, वेगवान वायू मी, शस्त्रधार्यांत राम (भार्गव) मी आहे. जलचर प्राण्यात मगर मी आहे, नद्यांमध्ये गंगा मी आहे, पृथ्वीचा आदि व अंत मी आहे, सर्व विद्यांमध्ये अध्यात्म विद्या मी आहे, तसेंच तत्त्व निर्णयासाठी केलेला वाद मी आहे, वर्णमालेतील "अ", मी, शब्दांच्या समासात द्वंद्वं मी आहे, अक्षय काल मी, चारी बाजूनी मुखे असणारा ध्राता म्हणजे ब्रह्मदेव मी आहे, सर्वांचा नाश करणारा मृत्यू मी आहे, पुढे उत्पन्न होणार्या वस्तुमात्रांचा उगमसुद्धा मी आहे. स्त्री सिद्धींपैकी श्री, वाणी, स्मृती, मेधा, धृती आणि क्षमा मी आहे. सामवेदातील बृहत्साम स्तोत्र मी आहे, छंदांत गायत्री मी आहे, मांसामध्ये मार्गशिर्ष मी आहे, ऋतुमध्ये वसंत ऋतु मी, कपटाचरणात जुगार मी आहे, तेजस्वी लोकांचे तेज मी आहे, विजयी पुरूषाचा विजय मी आहे, निश्चय मी आहे, सात्त्विकांचा सत्त्वगुण मी आहे, यादवांत वासुदेव मी आहे, पांडवांत धनंजय मी आहे, मुनींत व्यास मी आहे, कवींमध्ये शुक्राचार्य मी आहे, शासन करणार्यात दंड मी आहे, जयाची इच्छा करणार्यात निती म्हणजे मसलत मी आहे, गुह्यांपैकी मौन मी आहे, ज्ञानी लोकांतील ज्ञान मी आहे.

अर्जुना, त्याशिवाय आणखीन सर्व पदार्थातील बिज ते मींच आहे, मी नाही अशी गोष्ट ह्या सृष्टीत असणार नाही. मी सर्वव्यापी आहे. त्यांत मी असलो तरी ते माझ्यात नसतात. अरे मित्रा, माझ्या दिव्य विभूतींना अंत नाही. माझ्या विभूतींचा विस्तार तुला समजावा म्हणून थोडक्यात येथे दिला आहे.

जो जो पदार्थ लक्ष्मी वैभव हयांच्या प्रभावात आहे तो तो माझ्या तेजाच्या अंशापासून उत्पन्न झाला आहे असे समज. मी हे विश्व कांहीं अंशाने व्यापून धारण केले आहे. ज्यात तेज नाही, जे पाप प्रवृत्तीने प्रभावित आहे ते सर्व सुद्धा माझ्याच मायेतून म्हणजे अप्रत्यक्षपणे माझ्यातूनच आलेले आहे. माया माझ्या प्रत्येक विभूतीची प्रतिकृती करून मनुष्याला फसविण्याचा सदैव प्रयत्न

करत असते, हे लक्षात ठेव. उदाहरणार्थ, आत्मा ह्या माझ्या विभूतीची जीव (प्राण) ही मायेने तयार केलेली प्रतिकृती आहे जी देहाला नियंत्रित करत असते.

भगवत गीता पर्व भाग तिसावा संपला.

# भगवत गीता पर्व

# भाग एकतिसावा

## विश्र्वरुपदर्शन योग  अध्याय अकरावा

अर्जुन बोलतो, अध्यात्म नामक जे ज्ञान तू मला सांगत आहेस, त्यांने माझा मोह गेला आहे. भूतांची उत्पत्ती व लय कसा होतो ते मी तुझ्याकडून विस्तार पूर्वक ऐकले, तुझे अविनाशी महात्म्य सुद्धा ऐकले, तुझे परमेश्र्वरी रुप मी पाहू इच्छितो.

भगवान बोलतात, हे अर्जुना, तू माझी विविध प्रकारची अनेक रंगाची आणि असंख्य आकाराची शेकडो रुप पहा. हे बघ बारा आदित्य, आठ वसु, अकरा रुद्र, दोन अश्र्विनीकुमार, तसेंच एकोण पन्नास मरुद्गण याना आता पहा. त्याशिवाय माझ्यात एकत्रित असलेले सर्व चराचर जग पहा, आणखी जे कांहीं तुला पहावेसे वाटते ते पहा, पण तुझ्या याच डोळ्यांनी ते तू पाहू शकणार नाहीस म्हणून मी तुला दिव्यदृष्टी देतो म्हणजे तू ते माझे दिव्य भव्य रुप पाहू शकशिल. त्या दृष्टीने तू माझा इश्र्वरीयोग म्हणजे योगसामर्थ्य पहा.

संजय धृतराष्ट्राला सांगतो, हे राजा, याप्रमाणे, बोलून महायोगेश्र्वर व सर्व पापं हरण करणारा श्री कृष्ण आपले परमेश्र्वरी रुप पार्थाला दाखवतो. ज्याला असंख्य मुखं डोळे आहेत, ज्यामध्ये अनेक आश्र्चर्योत्पादक गोष्टी दिसत आहेत, ज्यावर अनेक दिव्य अलंकार आहेत, ज्याच्या हाती अनेक दिव्य शस्त्रास्त्रे सज्ज आहेत, ज्याने दिव्य पुष्पाहार व वस्त्रं परिधान केले आहेत, ज्याने दिव्य सुगंध अंगाला सावलेले आहेत, जिकडे पहावे तिकडे तोंडच तोंडं आहेत, ज्याच्या विशालपणाला सीमाच नव्हत्या, असे सर्व आश्र्चर्याने भरलेले ते भव्य दिव्य रुप अर्जुन पहात राहीला. आकाशात हजार सूर्यांची प्रभा एका वेळी प्रकट होईल तर ती त्या महात्म्याच्या प्रभेशी तुलना करण्यासारखी असेल. अनेक भागांतून विखुरलेले सर्व जग त्या देवाधिदेवाच्या देहात एकत्र झालेले होते. तेव्हां अर्जुन आश्र्चर्यचकीत झाला. त्याच्या अंगावर रोमांच उभे राहिले. हात जोडून व मस्तक लवून प्रणाम करून तो श्री कृष्णाला म्हणाला,

हे जनार्दना, तुझ्या विश्र्वरुप शरीरात सर्व देव, निरनिराळया प्राण्यांचे समुदाय, कमलासनस्थ सर्व श्रेष्ठ ब्रह्मदेव, सर्व ऋषी, दिव्य सर्प (कुंडलीची रुप) मला दिसत आहेत. तुला अनंत बाहू, अनंत उदरं, अनंत मुखं, अनंत नेत्र, असून सर्व बाजूंनी अनंतरुपी तुलाच मी पहातोय. पण हे विश्र्वेश्र्वरा, तुझा आदि मध्य व अंत मला दिसत नाही. मला तू किरीट, गदा व चक्रधारी,

सर्व बाजूंनी प्रज्वलित अशा अग्नीप्रमाणे व सूर्यासारखा प्रभा फांकलेला तेजःपुंज व लखलखाटणारा, अपरंपार भरलेला व सामान्य डोळयांनी पहाण्यास अशक्य असा जिकडे तिकडे दिसत आहेस.

ज्ञेय असें श्रेष्ठ अविनाशी ब्रह्मतत्त्व तू आहेस, तूंच ह्या विश्वाचा अखेरचा आधार आहेस, तू अविनाशी असून सनातन धर्माचा संरक्षक आहेस आणि अनादि पुरूष तूंच आहेस ह्याबद्दल माझी खात्री झाली आहे. आदि मध्य अंत रहित असा अनंतशक्ती, अनंतभूजा, चंद्रसूर्य हेंच ज्याचे डोळे व प्रज्वलित अग्नी हेंच ज्याचे मुख असा तू या विश्वाला आपल्या तेजांनी पहात आहेस असें मी पहात आहे.

पृथ्वी व आकाश यांमधील अंतर आणि दहाही दिशा तू एकट्याने व्यापलेल्या आहेस, तुझे हे अद्‌भुत उग्ररुप पाहून त्रैलोक्य भयभीत झाले आहे.

देवांचे समुदाय तुझ्या मध्ये प्रवेश करत आहेत, त्यात कोणी भयभीत होऊन हात जोडून तुझी प्रार्थना करीत आहेत, मोठे मोठे ऋषी व सिद्ध यांचे समुदाय स्वस्ति, स्वस्ति असें म्हणून अनेक स्तोत्रांनी तुझी भक्ती करत आहेत.

रुद्र, आदित्य, वसु, तसेंच साध्य, विश्वदेव, अश्विनीकुमार, मरुद्गण, पितर, गंधर्व, यक्ष, असुर, सिद्ध यांचे समुदाय विस्मयचकीत होऊन तुझ्याकडे पहात आहेत.

हे महाबाहो, तुझे हे अनेक तोंडांचे व अनेक नेत्रांचे अनेक बाहू, मांड्या, उदरं असलेले अनेक दाढ्यांमुळें विक्राळ दिसणारे रुप पाहून सर्व लोक भयव्याकूळ होऊन गेले आहेत. तसांच मी सुद्धा भयव्याकूळ झालो आहे.

हे विष्णो, आकाशाला भिडलेले तेजस्वी अनेक वर्णांनी युक्त, तसेंच जबडा पसरलेले प्रदीप्त व विशाल नेत्रांचे अशा तुम्हाला पाहून माझा अंतरात्मा व्याकूळ होऊन गेल्यामुळें माझा धीर सुटला आहे व शांतीही नाहीशी झाली आहे.

तुझ्या दाढांनी विक्राळ दिसणारी व प्रलयकाळाच्या अग्नी सारखी प्रदिप्त मुखे पाहून मी अवाक झालो आहे. माझ्या मनाचे स्वास्थ्य नाहीसे झाले आहे, म्हणून हे देवाधिदेवा, जगन्निवासा, आता तू माझ्यावर प्रसन्न हो.

अनेक राजांच्या समुहाबरोबर धृतराष्ट्राचे अनेक पुत्र तसेंच भिष्म, द्रोण, कर्ण, आम्हातील मुख्य योद्धे, या तुझ्या दातांखाली चिरडले जात आहेत हे मी पहात आहे. कांहींजण दातांत अडकून

ज्यांच्या मस्तकाचा चुराडा होत आहे ते मी पहात आहे. कांहीं त्या अक्राळ विक्राळ तोंडात शिरत आहेत. असें मला स्पष्टपणे दिसत आहे. ज्या प्रमाणे नद्यांचे वेगवान प्रवाह समुद्राकडे धावत असतात तसे हे मनुष्यांचे मधील वीर पुरूष तुझ्या प्रज्वलित मुखात प्रवेश करत आहेत. जसा पतंग वेगांनी ज्योतीत घुसतो तसे ते ते वीर तुझ्या मुखात स्वताचा नाश करून घेण्यासाठी घुसत आहेत.

हे विष्णो, सर्व लोकांना आपल्या मुखांनी गिळण्यासाठी निघालेला तू सगळीकडून जिभल्या चाटत आहेस. तुझ्या उग्र दीप्ति प्रखर प्रकाशांने सगळे जग व्यापून गेले आहे.

हे देवो, तुला नमस्कार असो, माझ्यावर प्रसन्न हो. असे भयंकर रुप धारण करणारा तू आहेस तरी कोण? ते सांग, तू आदिपुरूष कोण हे जाणण्याची मला उत्कंठा लागली आहे. कारण, तुझी ही करणी मला कांहींच कळत नाही.

भगवान बोलतात, मी लोकांचा संहार करणारा व वृद्धिंगत झालेला काळ आहे आणि येथे मी लोकांचा संहार करण्यासाठी निघालो आहे. सैन्यासैन्यातून उभे असलेले हे योद्धे तू नसलाल तरी म्हणजे तू कांहीं केले नाहीस तरी मरणार आहेत. ह्यासाठी, तू उठ, यश मिळव आणि शत्रूंना जिंकून धनधान्याने समृद्ध अशा राज्याचा उपभोग घे. मी हे पूर्वीच मारले आहेत. हे सव्यसाची अर्जुना, तू नुसता निमित्तमात्र आहेस. द्रोण, भिष्म, जयद्रथ, कर्ण, इत्यादि वीर मी पूर्वीच ठार मारले आहेत. त्यांना तू मार. भिऊ नकोस, कारण ह्या रणात तू जिंकणार आहेस.

संजय पुढे सांगतो, भीतीने थरथरा कांपणारा अर्जुन श्रीकृष्णाला पुन्हा पुन्हा हात जोडून नमस्कार करून सद्गदित कंठाने विचारतो, हे कृष्णा, तुझ्या गुण वर्णनाने जगाला अतिशय हर्ष होतो व ते जग त्यात अनुरक्त होते. भयभीत झालेले राक्षस, दहादिशा पळत आहेत, तर सिद्ध समूह तुला प्रणाम करत आहेत. हे योग्यच आहे. हे महात्म्या, अनंता, देवाधिदेवा, जगन्निवासा, ज्या अर्थी सत् व असत् आणि त्या पलिकडले जे अविनाशी तत्त्व आहे ते तूंच आहेस. त्याअर्थी अतिशय श्रेष्ठ व ब्रह्मदेवाचाही आदि कर्ता असा जो तू त्याला सगळे जग कां नाही नमस्कार करणार! तू आदिदेव, पुराणपुरूष, विश्वाचा आधार, विश्वाला जाणणारा व जाणण्यास योग्य आणि परमधाम आहेस. हे अनंतरुपा, तूंच हे सारे विश्व विस्तारले आहेस. तूंच वायू, वरुण, चंद्रमा आहेस. तूंच प्रजापति म्हणजे ब्रह्मदेव आहेस. तुला हजारो वेळा नमस्कार असो, आणखीन पुनरपी नमस्कार करतो.

हे सर्वात्मका, तुला समोरून पाठीमागून आणि सर्व बाजूने नमस्कार असो, कारण तुझा पराक्रम अगणित व शक्ती अपार असून तू सर्वव्यापी आहेस. तसेंच सर्वरुपी सुद्धा आहेस. अरे

जनार्दना, केवळ अज्ञानामुळें मी तुला बरोबरीचा मित्र समजून चुकीने आणि सलगीने अमर्यादा करून जे कांहीं बोललो असेन त्या करता मला क्षमा कर. त्याच प्रमाणे, क्रिडा, शयन, भोजन इत्यादि प्रसंगी थट्टेत एकांतात, सर्वांसमक्ष, मी जो तुझा अपमान केला असेल त्यासाठी अरे अच्युता, अचिंत्य प्रभावा अशा तुझी, मी पुन्हा पुन्हा क्षमा मागतो. तू या चराचर जगाचा उत्पाता, पुज्य आणि गुरूंचाही गुरू आहेस. तीनही लोकांत तुझ्यासारखा अप्रतिम प्रभावशाली असा कोणीही नाही, मग तुझ्याहून वरचढ कोण असणार? म्हणून तुला परमपुज्य परमेश्र्वराला नमस्कार घालून प्रार्थना करीत आहे. हे देवा, प्रेमळ पिता जसा त्याच्या पुत्राच्या कल्याणासाठी किवा प्रेमळ मित्र जसा मित्रासाठी त्याचे अपराध सहन करतो तसें माझे अपराध सहन करण्यास तू समर्थ आहेस.

हे कृष्णा, पूर्वी कधीही न पाहिलेले असे तुझे विश्र्वरुप पाहून मी हर्षित झालो आहे. त्याच वेळी माझे मन भयाने व्याकूळ झाले आहे. आता प्रसंन्न हो आणि आपले ते पूर्वीचे सामान्य रुप धारण कर. मस्तकावर मुकुट धारण केलेला असाच मी तुला पाहू इच्छितो. हे सहस्रबाहो, विश्र्वमूर्ती, तू त्या चतुर्भूज रुपानेंच आता प्रकट व्हावे.

श्री भगवान बोलतात, हे अर्जुना, तुझ्या वरील असीम प्रेमाने मी माझे परमश्रेष्ठ विराट, असीम व अपूर्व रुप माझ्या ईश्र्वरी सामर्थ्याने तुला दाखवली. हे रुप तुजवीन इतरांनी पूर्वी कधी पाहिलेले नाही. हे कुरुश्रेष्ठा, वेदांनी, यज्ञानी, स्वाध्यायांनी, दानानी, विधीयुक्त कर्मानी अथवा उग्र तपानी सुद्धा हे रुप कोणाला पहाता येत नाही. माझे हे भीषण रुप पाहून तू भिऊ नकोस. गांगरल्यासारखा होऊ नकोस. भय सोडून संतुष्ट मनाने तू तेंच माझे रुप पुन्हा पहा.

संजय सांगतो, याप्रमाणे, वासुदेव अर्जुनाला ते रुप पुन्हा दाखवतो. परंतु, तो पुन्हा भितो व त्याला ते थांबवण्यास विनंती करतो. कृष्णाने त्याचे सौम्यरुप घ्यावे असे तो त्याला सागतो. कृष्ण त्याचे नेहमीचे सौम्य रुप धारण करून त्याला धीर दिला.

अर्जुन बोलतो, हे जनार्दना, तुझे हे सौम्य मानवी रुप पाहून माझे मन पुर्ववत सावध व स्वस्थ झाले आहे.

कृष्ण बोलतो, हे माझे रुप तू पाहिलेस ते रुप पहावयास मिळणे अति दुर्मिळ आहे. देव देखील सदोदित या रुपाच्या दर्शनासाठी उत्कठीत असतात. परंतु, हे शत्रूतापना, केवळ अनन्य भक्तीनेच या प्रकारे मला यथार्थपणे जाणणे, पहाणे व माझ्याठायी तत्त्वाने प्रवेश करणे शक्य आहे. हे अर्जुना, जो योगी सर्व कर्मे माझी म्हणजे परमेश्र्वराची इच्छा म्हणून आहेत असें ध्यानात घेऊन

त्या बुद्धिने जगतो, ते भोग घेतो तो योगी मत्परायण होऊन राहतो. माझी भक्ती करतो. आसक्तिरहित असतो, कोणत्याही भूतांचे अथवा गोष्टींचे ठायी वैर ठेवत नाही तो मला येऊन मिळतो.

भगवत गीता पर्व भाग एकतिसावा संपला.

# भगवत गीता पर्व
# भाग बत्तिसावा
## सगुण भक्ती योग  अध्याय बारावा

अर्जुन बोलतो, जे तुझ्या सगुण स्वरुपाची उपासना करतात व जे तुझ्या निर्गुण अव्यक्त स्वरुपाची उपासना करतात त्यांपैकी श्रेष्ठ कोण ते मला सांग.

श्री कृष्ण सांगतो, जे माझ्या ठायी मन लावून नेहमी एकाग्र चित्त होऊन परमश्रद्धेने माझी उपासना करतात ते मला सर्वश्रेष्ठ योगी वाटतात. परंतु, जे इंद्रियांचे संयमन करून सर्वत्र समबुद्धी ठेवून सर्व प्राणिमात्रांचे हित करण्याच्या उद्देशाने तत्पर होऊन अनिर्वाच्य (शब्दापलिकडील), अव्यक्त, सर्वव्यापी, अचिंत्य (ज्याचा अदाज घेता येणार नाही असे), अविकार्य (विकार नसलेले), अचल आणि नित्य अशा निर्गुण ब्रह्माची उपासना करतात तेही मलाच येऊन मिळतात.

अव्यक्त ब्रह्माच्या उपासनेत ज्यांचे मन गढून गेले आहे, त्यांना कष्ट अधिक पडतात. कारण देहवान मानवाला अव्यक्त ब्रह्माची प्राप्ती मोठ्या कष्टाने होते. ज्यांना तशी निर्गुण पुजा जमत नाही, ते भक्त माझ्या मूर्तीची पुजा करतात. जोवर हे अर्जुना, जे भक्त मत्परायण होऊन व आपली सर्व कर्मे मला अर्पण करून अनन्य भावाने माझे ध्यान व भजन करतात, त्या माझ्याशी एकरुप झालेल्या भक्तांचा, विलंब न लावता भवसागरातून त्वरित उद्धार मी करतोच मग ती भक्ती निर्गुण आहे कां सगुण आहे ते महत्वाचे नसते.

अर्जुन विचारतो, हे भगवंता, हे जे तू आता मला सांगितलेस ते पुन्हा नीट समजावून सांग.

श्रीकृष्ण सांगतो, त्याचे असे आहे कीं, जे माझी भक्ती करत लिंगदेहापासून आत्म्याची सुटका करण्याचा प्रयत्न करतात, त्यांना विश्वातील सिद्ध पुरूष जे माझ्याच अंश असतात ते मदत करतात. त्यांची योगसाधना सोपी होते. ते असें होते, जर खड्ड्यात पडलेला इसम जोरजोरांने ओरडून हांका मारू लागला खड्ड्यातून बाहेर येण्याचा प्रयत्न करत असेल तर खड्ड्याबाहेरील माणसे तो ओरड ऐकून जमा होतात व त्याची सुटका सोपी होते. त्या उलट अव्यक्त ब्रह्माच्या उपासनेत ज्याने मन गढून गेलेले  आहे ते भक्ती न करता निमुटपणे प्रयत्न करतात. म्हणजे असे योगी त्या खड्ड्यात पडलेल्या इसमासारखे असतात जो ओरडा न करता गुपचुप बाहेर येण्याचा प्रयत्न करत असतो. त्याला अर्थातच खड्ड्यातून बाहेर येणे जास्त अवघड असते. असे असले तरी हे धनुर्धारी, एक गोष्ट लक्षात ठेव कीं, योगी कसाही साधना करीत असला तरी माझे त्याकडे चांगले लक्ष असते, व त्याची त्या अज्ञानरुपी खड्ड्यातून बाहेर येण्याची धडपड किती प्रामाणिक

आहे ते पाहून विश्वातील सिद्ध पुरूष जे माझांच अंश असतात ते त्याला न मागता मदत करत असतात. म्हणून साधना सोपी होण्यासाठी योग्यांने माझ्याच ठिकाणी आपले मन स्थिर करून काम करावे. हे धनंजया माझ्या ठिकाणी चित्त चांगल्या प्रकारे स्थिर ठेवणे जर तुला शक्य नसेल तर अभ्यासांने व पुन्हा पुन्हा प्रयत्न करून ते साध्य करून मला प्राप्त करून घेण्याची इच्छा ठेव.

असा प्रयत्न करण्यासाठी तू असमर्थ असशिल तर सर्व कर्मे मला अर्पण कर म्हणजे कर्माचा मोह न ठेवता ती करत रहा असें केल्याने तू सिद्ध पावशिल आणि हे करण्याला देखील तू असमर्थ असशिल तर मग सतत चित्ती माझे ध्यान ठेवून केल्या काम्यफलांचा लोभ न ठेवता त्यांच्या फलाची हाव न ठेवता अशारितीने सावकाशपणे संयम करून तू सर्व फलांचा त्याग करून माझ्या पर्यंत येऊ शकशिल.

अभ्यासाहून ज्ञान श्रेष्ठ, ज्ञानाहून ध्यान श्रेष्ठ, ध्यानाहून कर्मफलांचा त्याग जास्त श्रेष्ठ, त्या त्यागापासून त्वरित शांती प्राप्त होते.

जो माझा भक्त निरपेक्ष, अंतर्बाह्य पवित्र, कर्तव्य तत्पर, फलांबद्दल अनासक्त, ज्याला कोणताच विकार चाळवू शकत नाही व ज्यांने काम्यफलांचे आरंभ म्हणजे उद्योग सोडलेले असा असतो तो मला प्रिय होतो.

जीवांचे कार्य व आत्म्याचे कार्य ह्यातील फरक ज्याने पूर्णपणे ओळखला ह्या योगात हमखास यशस्वी होतो. असा जीवाच्या भोग कामनांपासून मुक्त झालेला योगी कशाचाही आनंद मानत नाही अथवा दुःख मानत नाही कोणाचाही द्वेष करत नाही, कधी शोक करत नाही, इच्छासुद्धा बाळगत नाही तसेंच शुभाशुभ कर्मफलांचा त्याग करणारा असतो, तो माझा भक्त मला प्रिय असतो.

जीवाला त्याचे भोग काम्य कृत्य करण्यात न मदत करता वा न विरोध करणारा अशा योग्याला शत्रू, मित्र, मान, अपमान, शीत, उष्ण, सुख, दुःख, ही समान असतात. निंदा, स्तुती त्याला समान असते. असा मौनी जे मिळेल त्यात संतुष्ट असतो. घरदार, मुलबाळं, बायको, आई आणि नातलग अशांच्या मोहात तो नसतो. असा स्थिर बुद्धि भक्तीत रमलेला, योगी मला प्रिय होतो. असें असले तरी जीव (प्राण) त्यामुळे आत्म्यावर सदैव नाराज असतो. म्हणून तो त्या आत्म्याला त्याच्या साधनेत मदत करत नाही. त्याच्या मृत्यूनंतर तो मला मिळतो, माझा गण बनून राहतो.

भगवत गीता पर्व भाग बत्तिसावा संपला.

# भगवत गीता पर्व

# भाग तेहतिसावा

## क्षेत्र क्षेत्रज्ञ योग अध्याय तेरावा

श्री भगवान बोलतात, हे अर्जुना, या शरीराला (कार्य)क्षेत्र असें म्हणतात, या क्षेत्राला जो सांभाळतो त्याला क्षेत्रज्ञ असें म्हणतात. सर्व क्षेत्रांत म्हणजे विश्र्वात जो क्षेत्रज्ञ तो मींच आहे. क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ ह्यांच्यात जे संबंध असतात त्याचे ज्ञान, ते खरे ज्ञान समजावे. हे क्षेत्र म्हणजे काय?कोणत्या प्रकारचे, त्याचें विकार कोणते? त्याचा प्रभाव काय? ह्याची माहिती मी तुला संक्षेपात सांगतो, ती नीट ऐक.

क्षेत्र क्षेत्रज्ञ ज्ञान ऋषींनी बहुत प्रकारे विविध छंदांत कार्यकारण रुपे दाखवून दिले आहे. ते निश्र्चित केलेल्या ब्रह्मसुत्रांतून गायले आहे. पंचमहाभूते, अहंकार, बुद्धि आणि अव्यक्त प्रकृति, अकरा इंद्रिये (हात, पाय, लिंग, तोंड, गुद आणि मन ही कर्मेंद्रिये, नेत्र, कान, नाक, जिभ, त्वचा ही ज्ञानेंद्रिये), पांच ज्ञानेंद्रियांचे पांच विषय, जीवाच्या इच्छा, जीवाच्या इतर प्रतिक्रीया जशा, द्वेष, सुख, देहातील इंद्रियांची जुळवणी, सचेनत्व, धैर्य इत्यादि घटक व त्यांचे विकार यांचा समुदाय असें हे क्षेत्र समजले जाते. अशा क्षेत्राची जी चेतना असते तिला जीव किंवा प्राण असें म्हणतात. आत्मा त्यांवर आरुढ झालेला असतो. क्षेत्राच्या सर्व व्यवहाराची जबाबदारी जीवाची असते. त्या सगळ्या कामापासून आत्मा मुक्त असला पाहिजे असे अपेक्षित असते. परंतु, आत्म्याबरोबर आलेल्या लिंगदेहाच्या दबावामुळें तो जीवाच्या कामात जाणून अथवा अजाणता हस्तक्षेप करू लागतो. त्यात तो अधिकाधिक गुंतत जातो. त्याला जास्त करून त्याचा लिंगदेह कारणीभूत असतो. आत्म्याचे लिंगदेह म्हणजे त्याच्या गत कर्माचा लेखाजोखा असलेले एक विचार तत्त्वातील गाठोडे असें समजावे. असें होणे हि एक मोठी चूक असते कारण ब्रह्माच्या नियमांप्रमाणे आत्म्याने जीवाच्या कारभारात लक्ष घालावयाचे नाही असे आहे. त्यातून आत्म्याची सुटका करण्यासाठी जी साधना करावयाची असते त्यालाच योग साधना असें समजले जाते.

दूरभिमानाचा अभाव, दंभ नसणे, शांतता, क्षमाशिलता, वागणूकीतील सरळपणा, वडीलधार्यांची सेवा करण्याची प्रवृत्ती, स्वच्छ रहाण्याची इच्छा, मनाचे स्थैर्य, मनोनिग्रह, इंद्रियोपभोगांबद्दलचे औदासिन्य हे प्रमुख गुण मानावेत. जन्म व्याधी वार्धत्य आणि मृत्यू हे आपल्याला लागणारे रोग (दोष) आहेत असें समजणे, तसेंच संभोग, संतति, परिवार इत्यादिकांत

लंपट न होणे, इष्ट, अनिष्ट फलांबद्दल समभावाने पहाणे, जो माझ्याशी अनन्यभावाने अढळ भक्ति राखतो, निवडक अथवा एकांतात रहाण्याची इच्छा, सामान्य जनांचा चव्हाटा न आवडणे, अध्यात्म ज्ञाना बद्दल उत्सुकता असणे, तत्त्वज्ञानातील सिद्धांतांचे परिशिलन, या सर्व गुणांना व त्यातून उत्पन्न होणार्या निष्पत्तीस ज्ञान म्हणतात. त्याच्या विरुद्ध ते अज्ञान समजावे. अशा ज्ञानाच्या मदतीने जीव व इंद्रियांच्या ऐहिक व्यवहारांपासून आत्मा मुक्त होऊ शकतो. त्या उलट अज्ञानामुळे तो त्यांत अधिकाधिक गुंतत जातो. जे जाणल्याने जे अमृत म्हणजे मोक्ष मिळतो ते ज्ञेय (जाणण्याचे ज्ञान) मी तुला आता सांगतो. खरे पहाता, ज्ञेयाचे वर्णन करणे शब्दांच्या पलिकडले आहे, तरी मी प्रयत्न करणार आहे. सर्व श्रेष्ठ ब्रह्म हेंच ज्ञेय (जाणण्या सारखे) असून ते अनादि अनंत आहे. तें सत् आणि असत् ह्यापेक्षा वेगळे आहे. ते सर्वव्यापी असून त्याला सर्व इंद्रियांचे ज्ञान आहे व ते सर्व कर्ता असून त्यापासून विमुक्त असें असते. ते निर्गुण असूनही सर्व गुणभोक्ते असें असते. म्हणून त्याचे वर्णन करता येत नाही. फक्त कल्पना करून ते समजण्याचा प्रयास करता येतो. ते सगळ्या सृष्ट (अस्तित्वात असलेल्या) पदार्थांत आणि त्याच्या बाहेर सुद्धा असते. ते अचल आहे व चल सुद्धा आहे, ते जवळ आहे पण त्याच वेळी दूर सुद्धा आहे, ते ब्रह्म सर्वत्र अखंड असून सर्व प्राण्यांच्या रुपात विभागलेल्या सारखे दिसते. ते भूतमात्रांचे धारण पोषण करणारे, त्याला ग्रासणारे, आणि उत्पत्ती करणारे आहे. दुसर्या शब्दात सांगावयाचे म्हणजे, ब्रह्मातून माया तिच्यातून प्रकृती, तितून सृष्टी असें निर्माण होत गेले आहे. हे समजून रहाणे ह्यालाच ज्ञेय म्हणतात.

हे असें असते, जसें मोठा माणूस आपल्या लहानग्याला खेळवत असतां त्याच्या खेळात असूनही नसतो कारण ते लहान मुल ज्या प्रेरणेने तो खेळ खेळते त्यात व मोठ्या माणसाच्या तोंच खेळ त्याच्या बरोबर खेळण्यात गुणात्मक फरक असतो. एक जण (बालक) खेळत असतो तर मोठा त्याला खेळवत असतो. तसे असते ब्रह्म आणि सृष्टीचे नाते. ब्रह्म मायेच्या माध्यमाने जगरहाटी चालवत असते. त्याचे त्यात भाग घेणे मोठ्या माणसाचे त्या खेळात भाग घेण्यासारखे असते. शाळेत शिक्षक व विद्यार्थी दोघे जातात. दोघे अभ्यास करतात पण विद्यार्थ्याची भूमिका व शिक्षकाची ह्यात टोकाचा फरक असतो, एक शिकवण्यासाठी जात असतो तर दुसरा शिकण्यासाठी जात असतो. असा फरक आहे ब्रह्माच्या आणि मायेच्या व्यवहारात. ब्रह्म तेजस्वी असूनही अंधारमय सुद्धा असते. असे ब्रह्म सांगून समजण्यासारखे नाही. ते अनुभवाने समजावयाचे असते. आता मी तुला अरे पार्था, ब्रह्माची माहिती दिली परंतु, जेव्हां त्याचा तुला अनुभव येईल तेव्हां त्या माहितीचे ज्ञानात रुपांत होईल आणि तेव्हांच ते तुला समजेल. हे तुला संक्षेपांने सांगितले. साखर गोड आहे हे सांगून त्याची चव समजत नाही, परंतु, जेव्हां साखर चाखतो तेव्हां समजते

गोड आहे म्हणजे काय. तसेंच ब्रह्म अनुभवल्यानंतरच ते समतजे. हा ज्ञान आणि माहिती ह्यातील फरक असतो. माहितीचे ज्ञानात रुपांतर करण्यासाठी अनुभव व त्यासाठी साधना करावी लागते ज्याच्या बद्दल मी तुला सांगत आहे.

अर्जुन विचारतो, हे कृष्णा तू मला सांग प्रथम बुद्धि म्हणजे काय?

श्री कृष्ण सांगतो, बुद्धि ही अशी क्षमता आहे कीं, जिच्यामुळें परिस्थितीतील होणार्या बदलांची तर्कशुद्ध नोंद होत असते. मी तुला अत्यंत प्राथमिक बुद्धिचे उदाहरण देतो, एक खांब आहे, त्यावर ओझे ठेवले आहे, जोवर त्या खांबाच्या वजन पेलण्याच्या क्षमते पर्यंत ओझे ठेवले जाते तोवर त्या खांबाकडून कोणतीही सुचना मिळत नाही. जेव्हां त्या क्षमतेपेक्षा जास्त ओझे ठेवले जाते तो खांब आवाज करू लागतो. त्याला बारिक चीरा पडू लागतात, हे होते कारण, त्या खांबात असलेली सुक्ष्म चेतना बुद्धि ते करते. म्हणजे अगदि निर्जीव समजलेल्या वस्तूतसुद्धा चेतना बुद्धि असते. त्याही पेक्षा उच्च दर्जाची बुद्धि आपण प्राण्यांकडून अनुभवत असतो. ह्या उदाहरणाने मी तुला दाखवले कीं, निर्जीव समजल्या गेलेल्या गोष्टीत सुद्धा चेतना व त्याची बुद्धि असते. मनुष्याची बुद्धि अति विकसित असल्याने त्यात असंख्य छटांचा अनुभव येतो.

अर्जुन विचारतो, हे कृष्णा, मला सांग मन म्हणजे काय?

श्रीकृष्ण सांगतो मन ही एक विचारांची अवस्था आहे. ती फक्त आत्म्यालाच लिंगदेहाच्या माध्यमातून शक्य होते. जीवाला पोषण, संरक्षण, प्रजनन आणि विरंगुळा इत्यादि कामात मदत करत असते. आत्म्याला अधिक व्यापक बुद्धि व मन अशा दोन विचारांच्या अवस्था उपलब्ध असतात. त्यांच्या मदतीने आत्मा आपले व्यवहार करत असतो. हे अर्जुना, या बद्दल अधिक माहिती मी तुला नंतर सांगणार आहे. प्रकृती (जड समुदाय) व परमात्मा ही दोनही अनादी आहेत असें जाण. रागद्वेष अशा विकारांने आणि गुणांनी जे प्रकृतीपासून उत्पन्न होत असतात, त्यांचे चैतन्य जोवर तो देह आहे तोवर कार्यरत असते जसें देह कार्यरत रहात नाही (मृत्यू) तसें ते चैतन्य म्हणजे जीव सुद्धा नष्ट होतो. आत्म्याचे चैतन्य व जीवाचे चैतन्य ह्यात हा मोठा भेद असतो. म्हणून अर्जुना, हे लक्षात घे कीं, जीवाचे ते चैतन्य मायावी असते व आत्म्याचे खरे असते. ते आत्म्याचे चैतन्य सत् आणि जीवाचे चैतन्य असत् असें समज.

मनुष्यात ज्याप्रमाणे, पांच कर्मेंद्रिये, पांच ज्ञानेंद्रिये, पांच विषय आणि मन असे मिळून सोळा कार्ये असतात, तसेंच पांच महाभूते, अहंकार, बुद्धि मिळून सात कारणे असतात, त्याप्रमाणे प्रकृतीत सुद्धा ती (कर्मेंद्रिये, ज्ञानोंद्रिये, विषय, मन ही कार्ये व पांच महाभूते, अहंकार बुद्धि, ही

कारणे असतात. त्यामुळें त्यांचे कर्तृत्व जे आपल्याला दिसते त्यामागे ती प्रकृति असते. थोडक्यात सांगावयांचे म्हणजे जसे आत्मा आणि शरीर ह्यांचे नाते असते तसेंच ब्रह्म आणि प्रकृतीचे नाते असते, प्रकृती ब्रह्माचा देह असतो असे समज. त्यात गुंतून गेल्यामुळें आत्मा सुखदुःखांच्या भोगाला कारण असतो. कारण प्रकृतीत तो परमात्मा अधिष्ठीत झाला कीं, तो तिच्या गुणांचा भोग घेऊ लागतो. त्यामुळें त्याचा त्या गुणांशी संबंध येतो. जसें एकाद्या घरात मनुष्य राहीला कीं, त्या घराचा उपभोग तो घेतो व त्याची त्याला सवय होते तसे हे असते. ते घर सोडतांना त्या घराच्या सवयीमुळे तो त्या घरात गुंतलेला असतो तसे हे होत असते. त्या घराच्या प्रेमात पडतो, त्याचा अहंकार त्या घराला जोडला जातो असे झाले कीं, तो त्या घरात अडकून जातो तसे हे होत असते. असा मनुष्य नवीन घरात जातांना आपल्या पहिल्या घराची आठवण ठेवून तसंच घर असावे अशी इच्छा करतो व त्यामुळें पुन्हा जन्म घेतांना आत्मा नवीन जन्म पहिल्या सारखाच असावा असे पहात असतो. त्या प्रमाणे त्याला तसे घर (शरीर अथवा कुळ) पुढच्या जन्मी मिळण्याची शक्यता असते. म्हणजे आपले जन्मसुद्धा आपल्या इच्छेनुसारच होत असतात. त्यात ब्रह्म हस्तक्षेप करत नाही. त्या रचनेचे जे गणित आखून ठेवलेले आहे त्याप्रमाणे सगळे आपसुकपणे होत असते. परंतु, जर त्याला त्याचे रहाते घर (कुळ, शरीर) आवडत नसेल तर तो नवीन घराची कल्पना वेगळी करू शकतो व तसे त्याला मिळते.

लहान मुलाच्या खेळात रमलेला मनुष्य जसा त्यात अडकू शकतो त्याप्रमाणे, आत्मा देहात अडकत असतो. परमेश्वाने प्रथम माया त्याच्या विचारातून उत्पन्न केली, त्यातून प्रकृती, त्यातून चराचर तयार झाले, त्यातील जीव (रसायनिक बुद्धि) अनेक झाल्या, शेवटी मनुष्य निर्माण झाला, त्यात मनुष्याचा जीव आत्म्यासाठी सुयोग्य ठरला. त्यानंतर आत्मा त्यावर आरुढ झाला. अशारितीने "मी" (अहंकार) झालो.

जीवाच्या देहांत कालोघात अनेक स्थित्यंतरे होत गेली. परंतु, आज जसे समजतात तसे कीं, एका प्रकारच्या प्रजाती पासून दुसरी तयार झाली, हे गीतेला मान्य नाही. माकडापासून माणूस झाला हे खरे नाही. माकडांपासून माकडांच्याच विविध जाती उपजल्या आणि माणसापासून माणसांच्या अनेक जाती तयार झाल्या असें आपले धर्मशास्त्र सांगते.

यथावकाश आत्मा इंद्रियांचा भोग घेत त्यात गुंतून गेला व स्वताला विसरून आपणच देह आहोत असें समजू लागला. अशारितीने क्षेत्रात क्षेत्रज्ञ फसला. प्रत्येक जन्माचे भोग व त्या मागील वासना आणि विचार त्याला चिकटत गेले अशी अनेक जन्मी पुटे लिंगदेहाच्या रुपाने त्या आत्म्यावर चढत गेली. सुरूवातीला जो जन्म आत्म्याने घेतला त्याचे जे लिंग होते ते त्या

लिंगदेहाचे असते व तो आत्मा नेहमी त्याच लिंगाच्या शरीरात आरुढ होत असतो. म्हणून साधारणपणे एकदा पुरूष म्हणून जन्म घेणारा आत्मा नेहमीच पुरूष म्हणूनच जन्म घेत असतो. केव्हातरी त्या आत्म्याला उमगते कीं, तो त्या प्रकृतीत अडकला आहे, त्यासाठी बर्याच वेळा सिद्ध ऋषी चांगल्या सात्त्विक आत्म्यांना तशी प्रेरणा देऊन जागृत करतात. त्यानंतर तो आत्मा त्याच्या खर्या रुपाच्या शोधाला लागतो. त्यासाठी जी विद्या त्याला मदत करते तिला अध्यात्म विद्या असें म्हणतात.

साधनेच्या पहिल्या टप्प्यात तो जीव आणि आत्मा त्याच्यातील फरक लक्षात घेतो. सामान्य माणूस जो अजून इंद्रियांच्या भोगात गुंतला आहे तो ह्यांतील फरक सहसा समजत नाही. तो जीव आणि आत्मा हे एकच आहेत असे समजत असतो. त्यावेळी जीव आणि आत्मा एकत्रच असल्यामुळे त्या अस्तित्वाला जीवात्मा असे म्हणतात. योग्याच्या बाबत हे वेगळे असतात. त्या प्रमाणे योगी त्याच्या मनात येणारे विचार जीवाचे आहेत कां आत्म्याचे ते ओळखून त्यांची यथायोग्य दखल घेत असतो.

क्षेत्रज्ञ प्रकृतीहून वेगळा असतो. अत्यंत श्रेष्ठ असा परमात्माच असतो. तो ह्या क्षेत्ररुपी देहात सापडल्यामुळें प्रकृतीचे खेळ जवळ राहून पहाणारा, त्यांना अनुमोदन देणारा देहाचा धारक, सुखदुःखांचा अनुभव घेणारा, किंबहूना ह्या प्रकृतीरुप खेळाचा सुत्रधार समजला जातो. अशाप्रकारे आत्मा निर्गुण व प्रकृती सगुण हा फरक जो जाणतो तो कसाही वागला तरी त्याला दोष लागत नाही. तो पुन्हा पुन्हा जन्म घेत नाही. परंतु, जोवर ती लिंगदेहाची पुट (कर्मफलांचे थर) आत्म्यावर आहेत तोवर तो आत्मा त्यांना नष्ट करे पर्यंत जन्म घेत असतो. हे लिंगदेहाचे आवरण नाहीसे करण्यासाठी कोणी योगी शुद्ध झालेल्या सुक्ष्म बुद्धिने ध्यानाच्या द्वारा म्हणजे भक्तीमार्गाने, कोणी ज्ञानयोगानी तर कोणी कर्मयोगाने प्रयत्न करत असतात. परंतु, असे ज्ञान नसलेले गुरूच्या कडून अंधश्रद्धेने उपदेश घेऊन त्यांचे पालन करून सिद्ध होत असतात.

हे भरतश्रेष्ठा, स्थावर (जागेवरून न हलणारी) व जंगम (हलणारी) अशी कोणतीही वस्तु उत्पन्न होण्यासाठी क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ ह्यांचा संयोग होणे जरूरीचे असते हे लक्षात ठेव.

सर्व चीजवस्तु सजीव निर्जीव अशा सर्वांत परमेश्र्वराचे अधिष्ठान असते हे समजून घे. ते जाणणारा योगी कोणत्याही वस्तु अथवा चराचराचा अपमान करत नाही. प्रत्येक गोष्टीचे ह्या प्रकृतीत कार्य आहे हे समजून तो सगळयांशी समजूतदारपणे वागतो. त्याच्या कडून होणारी सगळी कामं प्रकृती करून घेत आहे असे समजूनच ती करत असतो. त्या प्रमाणे तो त्याच्या आत्म्याला अकर्ता समजतो. ते जो जाणतो तोंच खरा तत्त्वज्ञ आणि त्याची बुद्धि स्थिर असते.

जेव्हां सर्व भूतांचा भिन्नभिन्नपणा एका आत्म्यात स्थित आहे आणि आत्म्यापासून हा सर्व विस्तार झाला आहे असें समजतो तेव्हां त्याला ब्रह्म प्राप्ती होते.

भगवत गीता पर्व भाग तेहतिसावा संपला.

# भगवत गीता पर्व

# भाग चौतिसावा

## गुणत्रयविभाग योग अध्याय चौदावा

श्री भगवान बोलतात, सर्व ज्ञानातील उत्तम ज्ञान मी तुला सांगत आहे. हे ज्ञान जाणूनच सर्व मुनी या संसारातून सुटून परमगतीला गेले. या ज्ञानाचा आधार घेऊन माझ्या स्वरुपाला प्राप्त झालेले म्हणजे माझ्याशी एकरुप झालेले पुरूष सृष्टीच्या उत्पत्ती काळी जन्मत नाहीत व प्रळयकाळी नाश पावत नाहीत. माझी तत्त्वतः ब्रह्मरुप असलेली मूळ प्रकृती हेंच सर्व भूतांचे उत्पत्ती स्थान आहे. त्या मूळ प्रकृतीस्वरुप उत्पत्तीस्थानात मी जेव्हां माझे उत्पत्तीकारक असें बीज पेरतो, तेव्हां त्यापासून सर्व भूतांची (वस्तुमात्रांची) उत्पत्ती सुरू होते. त्या बिजापासून जीवरसायनिक परिणाम, असा जीव, अनेक भूतांत निर्माण होतो, तो आत्मा नसतो. तर ती एक प्रकृतीतील माया असते. जीव ही मायेने निर्माण केलेली आत्म्याची प्रतिकृती असते. मनुष्य सोडून इतर कोणत्याही प्राण्यात आत्मा जागृत अवस्थेत नसतो. असे असले तरी त्या जीवांचा उत्पादक जनक मींच असतो. इंद्रियानी पूर्ण असलेला सजीव निकामी झाल्यावर तेथून नष्ट होतो त्याला आपण म्हणतो कीं, तो जीव मृत झाला. फक्त मनुष्याच्या मरणातून आत्मा लिंगदेहानिशी वेगळा होतो. इतर प्राण्यात तो सुप्तावस्थेत असल्याने तो निष्क्रिय असतो. मनुष्याला जीव आणि आत्मा असें दोनही असतात. असे असण्याचे कारण, फक्त मनुष्य जन्मात आत्म्याचा अध्यात्मिक उद्धार अथवा र्हास होऊ शकतो अशी रचना आहे. इतर चराचरात आत्मा त्याच्या लिंगदेहासह सुप्त अवस्थेत असतो, केवळ त्यातील जीवाला चेतना पुरवत असतो. कारण, आत्मा नसेल तर त्यात चैतन्य प्राप्त होत नाही. मृत्यूसमयी जीव शरीराची इंद्रिये निकामी झाल्यांमुळें नष्ट होतो. आत्मा आपल्या लिंगदेहाने ग्रासलेला अशा अवस्थेत तेथून बाहेर पडतो व पितर लोकांत पिशाच्च अवस्थेत रहातो. यथावकाश पुन्हा आत्म्याला जन्म घेण्याची लालसा होते तेव्हां तो सोयिस्कर जीव पाहून अखेरीस तो मिळाल्यावर त्यावर आरुढ होऊन पुनर्जन्म घेतो. आत्मा त्याच्या बरोबर असलेल्या लिंगदेहाशी साधर्म्य असलेला जीव आरुढ होण्यासाठी निवडत असतो. जोवर असा जीव उपलब्ध नाही तोवर आत्मा तसांच पितर लोकांत तात्कळत पडलेला असतो. असा आत्मा पितर लोकांत रहाणार कां स्वर्ग लोकांत हे त्या आत्म्याच्या मरणकालीन अध्यात्मिक अवस्थेवर विसंबून असते.

अर्जुना, आता मी तुला सृष्टीचे तीन गुण कसे असतात ते सांगतो. ते तू नीटपणे ऐक. अशा सजीव सृष्टीचे काम चालण्यासाठी सत्व, रज आणि तम असें तीन गुण प्राकृतीपासून उत्पन्न झाले

आहेत. त्यात सगळया गोष्टी बद्ध झालेल्या आहेत. स्वयंभूची अध्यात्मिक उर्जा अवकाशात पसरलेली असते परंतु, ती सारखी पसरलेली नसते. कांहीं ठिकाणी तीव्र तर कांहीं ठिकाणी मध्य आणि कांही ठिकाणी सौम्य अशी विभागलेली असल्याने हे तीन गुण तयार झाले आहेतच. तीव्र जेथे होती तेथे सात्त्विक भावाचा प्रभाव झाला. जेथे मध्यम तेथे रजोगुण वाढला आणि जेथे सौम्य अथवा शून्य तेथे तमोगुण व दुर्गुण ह्यांचा प्रभाव आढळतो. सृष्टीतील सगळया गोष्टी अशामुळें ह्या तीन गुणात विभागलेल्या असतात.

त्या गुणातील प्रकाशक व अल्पदोषी असा हा सत्व गुण बर्या पैकी निर्मळ असल्यामुळे सुख व ज्ञान यांच्यात जीवात्म्याला बांधून टाकतो. सत्व गुणामुळें त्याने प्रभावित असा जीवात्मा ज्ञानलालसा आणि संशोधन बुद्धि ह्यांने प्रेरित होत असतो. त्या प्रमाणे त्या प्रकारच्या देहात तो बद्ध होतो.

रजोगुण हा रंजनरुप असून भोगेच्छा, आसक्ती पासून उद्भवतो असें जाण व त्या मोहात तो आत्म्याला अडकवून ठेवतो.

सर्व लोकांना मोहात पाडणारा तमोगुण हा अज्ञानापासून उत्पन्न होत असतो. तो जीवात्म्याला प्रमाद, आळस, निद्रा यांनी बद्ध करत असतो. हे भरत कुलोत्पन्न अर्जुना, सत्वगुण सुखाची हौस वाढवतो त्या जीवात्म्यात. रजोगुण कर्माबद्दल आसक्ती वाढवतो, तमोगुण अनाडीपणा, मागसलेपणा, उनाडकी, बेजबाबदारपणा असे दुर्गूण वाढवतो. माणसाच्या जीवन काळात तो या तीन गुणात वेगवेगळया प्रसंगी सापडून फसत असतो जे त्या त्या परिस्थितीनुसार होत असते. साधारण मनुष्य त्यात अडकून आपले जीवन जगत असतो. योगी ह्यांपासून अति सावधपणे आपली कामे करत असतो. तर साधारण माणूस त्यात अडकण्यात धन्यता मानतो. तमोगुणी व रजोगुणी त्यात अडकण्याचे विविध सबबी देऊन समर्थन करत असतो. पुन्हा पुन्हा त्यामध्ये फसण्यात रहाणे पसंत करतो. अज्ञान वाढत जाते व परिणाम स्वरुप तसे लोक माझ्यापासून दूर जातात. खरा योगी त्याच्यातील रजोगुण आणि तमोगुण मोडून सत्वगुणाला प्रबळ करतो. ते विशिष्ट पद्धतीने मनाला आवरून व इच्छांचे नियंत्रण करून साध्य होते. त्याची माहीती मी तुला आधी सांगितली आहे. (समर्थ रामदासांनी त्यांच्या दासबोधात लक्षण चिकीत्सा दिल्या आहेत त्या वाचाव्या म्हणजे त्रिगुणाची अधिक चांगली माहीती मिळेल.) अज्ञानीपणात धन्यता मानणारे त्या उलट सत्व रज ह्यांना हटवून तमोगुण वाढवतात व अधोगतिला जातात कारण त्यांची अध्यात्मिक उर्जा कमजोर होत असते. सत्वगुण चांगल्या गोष्टीत माणसाला अडकवून ठेवतो, रजोगुण मध्यम गोष्टीत व तमोगुण हलक्या गोष्टीत अशारितीने हे तीनगुण

आत्म्याला पुन्हा भवसागरात पकडून ठेवण्याचे कार्य करतात. म्हणून खरा योगी ह्या सर्व गुणांपासून स्वताला मुक्त ठेवण्याचा प्रयत्न करत असतो. तरी सत्व गुणी अध्यात्मिक दृष्ट्या प्रबळ असल्याने तो अध्यात्मिक साधनेत यशस्वी होण्याची जास्त शक्यता असते. म्हणून अरे पार्था, माणसाने सत्वगुणी रहाण्याचा प्रयास केला पाहिजे कारण कोणत्या तरी गुणात त्याला रहावेच लागते. विश्वातील कोणतीही गोष्ट ह्यांच्या बाहेर असू शकत नाही. शरीरातील अशुद्ध द्रव्यांमुळे तमोगुण वाढत असतो. जसे शरीर शुद्ध असते त्या शरीरात सत्वगुण अथवा रजोगुण वाढत असतो. सत्वगुणी ज्ञान लालसा, विद्यार्जन आणि अध्यात्म ह्यात रमतो. रजोगुण सत्ता, धन, अधिकार, चढाओढ, महत्वाकांक्षा ह्यात रमतो. तमोगुणामुळें आळस, नकारात्मक प्रवृत्ती, व्यसनीपणा, निद्रा, बेजबाबदारी, गुन्हे करण्याची इच्छा असे दोष वाढतात. तरीसुद्धा जर सर्वकांहीं मनासारखे झालेले असेल तर तमोगुणीसुद्धा सत्वगुणी किंवा रजोगुणी सारखे वागत असतात. मनासारखे नाही झाले तर सत्वगुणीसुद्धा प्रसंगी तमोगुणी सारखे वागू शकतात. रजोगुणामुळें तो क्रोध, लोभ, मद, मत्सर अशा दोषांत रहातो. एकंदर अरे अर्जुना, हे तिनही गुण आत्म्याला प्रकृतीत अडकवून ठेवण्याचेच काम जास्त करून करत असतात. म्हणून खरा योगी त्या सगळयाच्या बाबत दक्ष असला पाहिजे. मुक्त आत्मा ह्या तीनही गुणांपासून मुक्त झालेला असतो. कांहीं समजतात सत्वगुणी अध्यात्मिक दृष्ट्या उत्तम परंतु ते खरे नाही. कारण सत्वगुणीसुद्धा प्रकृतीचाच हिस्सा असतो. त्यात अडकलेला कधी खाली घसरून रजो किंवा तमो गुणी होण्याचा संभव असतो, ते सांगता येणार नाही. म्हणून सत्वगुणात अडकलेला आत्मा जरी चांगला वाटत असला तरी तो मोक्षाला जाऊ शकत नाही तो जन्ममृत्यूच्या फेर्यातच अडकलेला रहातो. परंतु, असा सत्वगुणी मेल्यावर गुणीजनांच्या निर्मल लोकांत रहातो पुढचा जन्म येई पर्यंत. रजोगुणी मेला कीं पुन्हा त्वरित कामासक्त मनुष्य लोकात जन्म घेतो. तमोगुणी नीचकुळांत जन्म घेतो. ह्या दोन गुणाचे लोक मधल्या काळात पिशाच्च योनीत रखडत असतात. ते त्या काळात त्यांच्या वासनासक्त जीवनामुळें अत्यंत हालाकीच्या अवस्थेत तेथे केविलवाणे रहात असतात.

पुण्यकर्माचा परिणाम ज्ञानमय व सात्त्विक असतो. रजसचा लोभयुक्त, दुःख कारक व तमोगुणाचा मोहात अडकून रहाण्याचा असतो. प्रकृतीच्या आधारे जन्म घेणारा जीवात्मा या तीन गुणाखेरीज कर्म करू शकत नाही. हे पूर्णपणे ओळखून जो योगी त्या गुणांपासून येणार्या अनुभवाने उत्तेजित न होता त्यांपासून दूर रहातो एकाद्या त्रयस्था सारखा त्या गुणांचा प्रताप पहात असतो तो त्यांमुळें बाधित होत नाही. असा योगी ह्या तिनही गुणांच्या पलिकडे असलेले माझे तत्त्व ओळखतो असा तो माझ्या स्वरुपात मिळतो. देहाच्या उत्पत्तीला कारणीभूत असलेल्या ह्या तीन

गुणांपासून जो मुक्त होतो तो जन्म – वार्धक्य – मरण ह्यांपासून  व त्यांमुळे येणार्या दुःखापासून मुक्त होते. असा तो मोक्षाच्या दिशेने वाटचाल करू लागतो.

अर्जुन विचारतो, हे प्रभो, या तीन गुणांना उल्लंघून गेलेला योगी कसा असतो व तो ह्या गुणांपासून स्वताला कसे दूर ठेवतो.

श्री कृष्ण सांगतो, जो हे जाणून असतो कीं, या तीन गुणांशिवाय प्रकृती मध्ये काम करणे शक्य नाही व म्हणून त्यांच्यामुळें विचलीत न होता, तो आपली कामं करत असतो औदासिन्य वृत्तीने. त्या औदासिन्य वृत्तीमुळे ते जरी प्रसंगी उत्तेजित झाले तरी त्यांचा प्रभाव वाढू शकत नाही. त्यांच्याकडे तो योगी बुद्ध्या (जाणून बुजून) दुर्लक्ष करत असतो. एकदा तशा प्रकारे जगण्याची सवय झाली कीं सगळे सोपे होते. ह्या तीन गुणांचा संबंध त्या सहा दोषांशी असतो. ज्याने ते जिंकले त्याला हे तीन गुण बाधत नाहीत. असा योगी त्याच्या सगळया जीवनाकडे त्रयस्थाच्या दृष्टीने पहात असतो. जीवाच्या सर्व व्यवहारांकडे एकाद्या निरीक्षकाच्या दृष्टीने पहात त्यांत विशेष रस न घेता परंतु, युक्त चित्त अशा अवधानाने त्या व्यवहाराचे नियंत्रण करून त्यांच्या मर्यादेत ते आहेत हे पहणारा व ते उत्तमरित्या पार पाडणारा योगी या तीन गुणांवर लक्ष ठेवू शकतो. अशारितीने तो ह्या गुणांवर मात करतो. भगवत गीता पर्व भाग चौतिसावा संपला.

# भगवत गीता पर्व

# भाग पस्तीसावा

## पुराण पुरूषोत्तम योग अध्याय पंधरावा

श्री भगवान बोलतात, ज्याची मुळं वर आणि शाखा खाली आहेत, जो कधीही नाश पावत नाही व ज्याला ज्ञानाची पालवी येते त्या वृक्षाला अश्र्वत्थ वृक्ष असे म्हणतात. त्याचे यथार्थ रुप जो जाणतो तो सर्वज्ञ समजावा. सत्व, रज आणि तम या गुणांनी वाढलेल्या त्याच्या शाखा खाली म्हणजे भुलोकात पसरतात. व त्यांची मुळं कर्मविपाकाच्या वर सर्वत्र पसरत असतात. तो वस्तुतः अव्यक्त आहे. त्याप्रमाणे त्याचा अंत, आरंभ व स्थिती दिसत नाही. त्याची कर्मविपाकरुपी मुळं अनासक्तीरुपी (औदासिन्य वृत्ती) तीक्ष्ण शस्त्रांने तोडून म्हणजे कर्मविपाकाची अनेक जन्माची बंधने मोडून त्यानंतर ज्यापासून आद्य प्रवृत्ती उत्पन्न झाली त्या आदिपुरूषाला प्राप्त व्हावे ह्या हेतूने ज्या पदाच्या ठिकाणी पोहोचलेले पुरूष पुनः परत येत नाहीत ते पद शोधावे लागते. अशावेळी सद्‌गुरू प्रसाद झालेला असतो आणि त्यांच्या कृपेने पुढील साधना सिद्ध होते. प्रत्येक जीवात्म्याचा असा अश्र्वत्थ वृक्ष त्या जीवात्म्याच्या जीवन शैलीनुसार वाढत असतो.

हे अर्जुना, तुझा एक जन्म हा पहिला नाही, तर तो अनेक जन्माच्या मालिकेतील एक आहे. म्हणजे जेव्हां योगी साधना करतो तेव्हां त्याला केवळ ह्यांच जन्माचे पाप पुण्याचे हिशोब चुकते करावयाचे असें नाही तर त्या सगळया असंख्य जन्माचा तो हिशोब चुकता करावयाचा असतो. जसे हिशोब करतांना सगळी जुनी येणी देणी हिशोबात घ्यावी लागतात तसे हे असते. ते सगळे हिशोब लिंगदेह देत असतो कारण, त्याच्याकडे तो लेखाजोखा साठवलेला असतो. हे तुला समजले पाहिजे.

मनुष्य विषयांचे उपभोग मनाने घेत असतो परंतु, जेव्हां तो त्याच्या फलांचा बुद्धिने अभ्यास करतो तेव्हां, त्याला विषय उपभोगांची अपूर्णता समजू लागते व तो वैराग्याकडे झुकू लागतो. प्रथम जीव आणि आत्मा ह्यांतील फरक समजल्यावर योगी अधिकच वैराग्याकडे सरकू लागतो. पुढे ती प्रक्रिया वाढत जाते. असें असले तरी शरीराच्या बाल्य, तरूण आणि वृद्धत्व ह्या अवस्था नुसार हे शक्य होत असते. म्हणजे असें, बाल्यावस्थेत योग साधना शक्य नसते कारण, त्यासाठी आवश्यक असणारा जोर शरीराच्या कमकुवत असण्यामुळें नसतो. जीव वाढत जातो त्यानंतर तारुण्यात जीवाचा व इंद्रियांचा जोर एवढा असतो कीं, आत्म्याला कांही वाव नसतो.

तारुण्याचा जोर उतरला कीं, जीव व शरीर थकलेसे असते, आता आत्मा, बुद्धिचा वापर करून साधना करु शकतो. भोगांची निरर्थकता वगैरे बाबी तेव्हां स्पष्ट होऊ लागतात. म्हणून योगी साधना सुरू करतो त्या जन्माची. हांच योग्य काळ असतो साधना त्या जन्माची करण्याचा. त्याला सन्यासाश्रम व वानप्रस्थाश्रम असें म्हणतात. परंतु, जर तो आधीच्या जन्मापासून साधक असेल व त्यांने कांहीं साध्य केले असेल तर ते घेऊनच तो ह्या जन्मात आलेला असल्यामुळे तो त्या आधी म्हणजे तरुणपणी साधना करू शकतो. ते प्रत्येक माणसाचे वेगळे असते. त्यासाठी योग्याला दैवी संपदा प्राप्त करून घ्यावा लागते.

भगवत गीता पर्व भाग पस्तिसावा संपला.

# भगवत गीता पर्व

# भाग छत्तीसावा

## दैवी आसुरी संपदा विभाग योग  अध्याय सोळावा

अर्जुन विचारतो, मित्रा कृष्णा, तू मघा दैवी संपदांबद्दल बोलला होतास त्या कोणत्या ते नीट सविस्तरपणे सांग.

श्री कृष्ण सांगतो, हे अर्जुना, आता मी तुला दैवी संपदा कोणत्या ते सांगतो. निर्भयता, पूर्ण सात्त्विक प्रवृत्ती, ज्ञान आणि कर्मयोग या दोहोंविषयी तारतम्यांने वागणे, दानशूरता (मदत करण्याची प्रवृत्ती), इंद्रिय सुखांबद्दल जीवाच्या स्वाभाविक मर्यादीत हाव, यज्ञ (योजनापूर्वक काम करण्याची सवय), तप, सरळपणा, अहिंसा (इतरांप्रती चांगले वागणे), सत्य, क्रोध नसणे, त्यागवृत्ती, मनात कोणाबद्दल दुष्टावा न बाळगणे, शांती, प्राणिमात्रांबद्दल आपुलकी, निर्लोभता, नम्रता, जनलज्जा, अव्यापारेशू व्यापर न करणे (आपले काम बरे किं आपण बरे अशी वर्तणूक), तेजस्विता, क्षमाशिलता, कोणाचा द्वेष न करणे, धृति, शुचिर्भूतता, दुराभिमान नसणे असें चांगले गुण हे दैवी संपदा म्हणून समजले जातात. अशी दैवी संपदा प्राप्त झालेला माणूस नेहमी सुखी, शांत मनाचा, स्थिर बुद्धि असलेला, संतुष्ट असतो. तो मला सारखा स्मरत असतो. जो जे कांहीं करतो ते मला स्मरून करतो, जसे माझी परवानगी घेऊन करतो. त्याला आरोग्याचे स्वास्थ्य लाभते आणि म्हणून त्या गुणांना दैवी संपदा असें म्हणतात.

अर्जुन विचारतो, आता मला सांग आसुरी संपदा कोणत्या.

भगवंत सांगतात, अरे धनंजया, आसुरी संपदा घेऊन जन्मणारा त्याच्या अंगी दांभिकपणा, गर्विष्ठपणा, दुराभिमान, घमेंड, वेळोवेळी खरोखर रागावणारा, दुष्ट, बेपर्वाईने वागणारा, उन्मत्त, अज्ञानी ह्या दोषपूर्ण गुणांचा असतो.

अरे अर्जुना, दैवी संपदा माणसाला मोक्षप्राप्तीचा मार्ग देतात. आसुरी संपदा माणसाला नरकाचा मार्ग दाखवतात. आसुरी संपदात अडकलेला प्रकृतीच्या मायेत फसलेला असतो, कारण त्याचा अहंकार तामसी गुणांनी बिघडलेला असतो. दैवी संपदा असलेला माणूस सत्वगुणाच्या प्रभावात असतो. तुला आणखीन एक सांगतो ते नीटपणे ऐक, ह्या लोकी दैवी व आसुरी असे दोन प्रकारचे मनुष्य असतात. त्यातील दैवी प्रकारचे वर्णन मी आधी सांगितले आहे. आता आसुरी लोकांचे वागणे कसे असते ते सांगतो.

आसुरी लोकांना प्रवृत्ती आणि निवृत्ती म्हणजे काय करावे व काय करू नये ह्याचे ठरवण्याची क्षमता नसते. त्यांची तर्कगति (तर्क करण्याची क्षमता) बरोबर काम करत नसते. ते येणार्या प्रत्येक अनुभवाचा नेहमी विपर्यास करत असतात. नेमके चुकीचे अर्थ काढतात. ते समजतात कीं, प्रकृती, सत्य, ईश्वर, असत्य, निराधार, बेवारस असे हे जग एकमेकांपासून न निर्माण होता वेगवेगळया मुलद्रव्यातून उत्पन्न झालेले म्हणून आपण कांहीं करण्यास मोकळे आहोत, त्या खेरीज ह्या जगाचा दुसरा कांहीं उपयोग नाही, रचना तत्त्वाबद्दल अज्ञान असा तो असतो. कर्मविपाकाचा सिद्धांत तो मानत नसतो.

कर्मविपाक म्हणजे आपण जे कांहीं करतो ते सगळे आपल्याकडे जेवढ्यास तेवढे असे परत येत असते. चांगल्या कामाचे चांगले परिणाम व वाईट कामाचे वाईट परिणाम आपल्याला पुढच्या जन्मा भोगावे लागणार आहेत असे समजणे.

आसुरी संपदात रमणारे आत्मा, परमेश्वर मानत नाहीत. ह्या जगात आपण आपल्या अध्यात्मिक उद्धारासाठी जन्मत असतो, केवळ भोग भोगण्यासाठी नाही, ही समज त्यांना नसते. ते समजतात, भोग भोगा आणि वाट्टेल ते करून मजेत रहा. त्यांच्या मनात जगातील गोष्टींबद्दल तुच्छतेचे धोरण असते.

पहिले गृहीत तत्त्व आहे, आपल्याला **पुनर्जन्म** प्राप्त होणार आहे व त्यात आपल्या ह्या जन्माच्या चांगल्या वाईट कर्मांची फळे भोगावी लागणार आहेत.

दुसरे गृहीत तत्त्व आहे, अद्वैत, त्यानुसार हे जग काम करते असे समजले जाते. त्याप्रमाणे दुसर्याचे वाईट चिंतीले अथवा केले तर पुढच्या जन्मी स्वताचेच वाईट होते व जर दुसर्याचे चांगले चिंतीले व केले तर पुढच्या जन्मी स्वताचे चांगले होत असते. म्हणून नेहमी इतरांचे चांगले चिंतावे व करावे.

तिसरे गृहीत तत्त्व आहे कर्मविपाक, त्यानुसार ह्या जन्मी आपण केलेले कर्म आपल्याकडे फलरुपांने पुढच्या जन्मी नशीब बनून परत येते. चांगल्या कामाची चांगली फळे व वाईट कामाची वाईट फळे मिळतात. आपल्या पुढच्या जन्माचे भाग्य आपणच लिहीत असतो. म्हणून प्रत्येक गोष्ट करतांना त्याचे समप्रमाणात प्रतिक्रीया आपल्यावर पुढच्या जन्मी येणार आहे हे समजून काम करणे.

चौथे गृहीत तत्त्व आहे, शक्तिसातत्य. त्यानुसार कर्मविपाकाचे फळ जेवढ्यास तेवढे असें पुढच्या जन्मी नशीबाच्या रुपांने मिळते.

पांचवे गृहीत तत्त्व आहे इच्छापूर्ती. ह्यानुसार ह्या जन्मात आपण जी इच्छा तीव्रतेने आयुष्यभर जोपासतो ती इच्छा जर आपला पुण्यसंच पुरेसा योग्य असेल तर पुढच्या जन्मी पूर्ण होते. समजा, ह्या जन्मी तुम्ही कुरुप आहात व आपण सुंदर दिसण्याचे इच्छित असाल तर पुढच्या जन्मी तुम्ही सुंदर होता. श्रीमंत होण्याची इच्छा आहे व पुण्यसंच पुरेसा आहे तर श्रीमंत घरात जन्म घेता. ह्यासाठी माणसांने आपला पुण्यप्रभाव वाढवण्याच्या दृष्टीने सर्व जीवन निष्पाप जगले पाहिजे. त्याशिवाय ध्यान साधनेला वेळ द्यावा.

माणसे पैसा कमावण्यात व त्याचा संचय करण्याच्या मागे जेवढे असतात तितके जर ते पुण्यसंच करण्यात लक्ष घालतील तर ते जास्त सुखी व यशस्वी होतील. हा सनातन धर्माचा (हिंदूंसाठी) मूलमंत्र आहे. माणसाची खरी लक्ष्मी असते त्याचा पुण्यसंच, पैसा नाही, हे जो ओळखतो तो खरा हिंदू. पैसा फक्त ह्या जन्मी उपयोगी असतो पण पुण्यसंच अनेक जन्मात उपयोगी रहातो. कांही लोक पैशासाठी पाप करतात ते अतिमूर्ख समजावेत.

प्रत्येक हिंदूने ही पांच धोरणं समजून जगावयाचे असते. हे पांच नियम न मानणारा आसुरी संपदेत अडकलेला असतो.

ते न मानण्याच्या हट्टामुळें ते नष्टकर्मी, अल्पबुद्धि, प्रसंगी क्रूरकर्मी, घातकी व जगाच्या नाशासाठीच जणू जन्मले आहेत, कसेही कांहींही, करावे त्यामुळे कांहीं बिघडत नाही असें समजणारे, म्हणून बेजबाबदारपणे वागणारे, कोणालाही जाब देण्याची गरज नाही असें मानणारे, त्यांच्या हातून अघोरी कृत्य सहजपणे होत असते असें, सर्व सहा दोषांत (काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर) अडकलेला, विषय भोगात धुंद झालेला, व्यसनांध, मर्यादा तत्त्वाचे भान नसलेला, अशुद्ध विचारात रमणारा, असभ्य, असा तो असतो. सुविचारांची खिल्ली उडवण्यास फुशारकी समजणारे असतात. शरीरात सगळे आहे असे समजणारे, वासना पूर्ती हांच जीवनाचा मुख्य उद्देश आहे असे समजणारे, मी करतो असें समजणारे, मी माझ्यासाठी जगतो असे समजणारे,

प्रसंगी परमेश्र्वराला आव्हान देणारे, सर्व गोष्टी लैंगिक भोगांशी जोडणारे, अध्यात्म, योग साधना अशा पारमार्थिक विषयांबद्दल तुच्छता बाळगणारे, कामेच्छा तृप्ती हांच एकमेव उद्देश जीवनाचा आहे असें समजणारे, नैतिक बंधनांना न मानणारे व म्हणून चोरी, अत्याचार, अन्याय, विश्र्वासघात ह्यात भूषण मानणारे, स्त्रियांकडे उपभोग्य तुच्छ वस्तू अशारितीने पहाणारे, मीच श्रेष्ठ, मींच मालक, मला कोण विचारणार असें बोलणारे, सर्व जे चांगले ते माझे असें मानणारे, दुसर्याला पिडा देण्यात आनंद करणारे, पांच गृहीत तत्त्वे जी आधी दिली आहेत ती झुगारणारे व म्हणून अज्ञान असलेले, असें लोक जे प्रकृतीच्या मोहजालात पुरते पसलेले असतात ते आसुरी संपदा दाखवतात. वरकरणी सात्त्विकतेचे सोंग ढोग करत ते त्यांच्या विकृत प्रकारचे जीवन जगत असतात. अशा लोकांना मी विसरतो व ते मला विसरलेले असतात. आसुरी संपदेत अडकलेले त्यांचे धर्मशास्त्र तयार करतात व त्याचा प्रचार करून देवांच्या नावे सामान्य जनांची फसवणूक करत असतात. ते देवाचा अवतार म्हणून लोकांपुढे जातात व लोकांत आसुरी संपदा वाढवण्याचा प्रयत्न करतात. अशा वागण्यामुळें त्यांचा लिंगदेह पूर्णपणे बिघडलेला असतो. तो आत्मा पुरता रसातळाला गेलेला असतो. त्याला त्यातून बाहेर काढणे दुरापास्त असते. असे आसुरी लोक वरकरणी सुखी असल्याचे दाखवत असले तरी त्यांचे जीवसुद्धा अस्वस्थ असतात. त्यांचा आत्मा पशुंच्या आत्म्याप्रमाणे निद्रीस्त झालेला असतो. बुद्धि भ्रष्ट झालेली असल्यामुळे मनात सतत बेचैनी असते. ते खरेतर फार दुःखी असतात पण ते तसे वरकरणी दाखवत नाहीत. ते अध्यात्म विसरलेले असतात, त्यांची अध्यात्मिक उर्जा फार खालच्या पातळीला गेलेली असते म्हणूनच त्याला आसुरी संपदा असें म्हणतात. म्हणून माझ्या मित्रा, तू कधीही ह्या आसुरीसंपदेच्या मोहात जाऊ नकोस. जो शास्त्रोक्त विधी सोडून मनमानीचे वर्तन करतो त्याला उच्च सिद्धी, त्यातून मिळणारे चिरंतन सुख, उत्तम गति प्राप्त होत नाहीत.

अर्जुन विचारतो, असें असूनही हे लोक पुनः पुनः त्याच्या मोहात कसे जातात. ते मला सांग.

भगवान सांगतात, अरे वेड्या, हींच तर प्रकृतीची माया आहे. जगात अव्यक्त आसुरी शक्ती असतात, त्यासुद्धा माझ्या मायेतूनच निर्माण झालेल्या असतात. त्या शक्ती अशा मूर्ख लोकांना आणखीन बिघडण्यास मदत करतात. त्या शक्तींचा उद्देश असतो कीं आसुरी संपदा वाढावी. ज्याप्रमाणे चांगल्या शक्ती चांगल्या लोकांना मदत करतात तसेंच हे आहे. ह्यालाच माझी माया समजले जाते. शेवटी सगळे शून्यच असते. जसें देव चांगल्या कामाला साथ देतात व त्या माणसाला अध्यात्मिक उच्च पातळीवर जाण्यास मदत करतात त्याप्रमाणे, दैत्य आणि दानव ह्या आसुरीसंपदा मध्ये अडकलेल्याना त्यात आणखीन रुतण्यास मदत करतात. अशी माझी ही मायामय प्रकृती आहे.

अर्जुन विचारतो, मला सांग काम म्हणजे इच्छा कशी माणसांत उत्पन्न होते.

भगवान सांगतात, काम म्हणजे इच्छा, ह्या विविध प्रकारच्या असू शकतात. जरी काम हा शब्द जास्त करून लैंगिक इच्छांसाठी वापरला जात असला तरी इतर भोगेंद्रियांचे सुद्धा काम असतात परंतु, त्यामुळें माणसाचा अध्यात्मिक र्‍हास होत नसल्यामुळे त्यात जास्त मी तुला सांगत नाही. तरी इच्छा निर्मितीच्या प्रक्रीया सगळया प्रकारच्या कामांसाठी सारख्याच असतात. इच्छा उत्पन्न होण्याची प्रक्रीया सहा पायर्यानें होत असते. त्या अशा, **भेट, परिचय, कुतूहल, उत्सुकता, आवड** आणि त्यातून न आवरता येणारी **इच्छा** अखेरीस उत्पन्न होत असते. इच्छेची वाढ कुतूहलानंतर सुरू होते. म्हणून जर कुतूहलाच्या वेळीच औदासिन्य अथवा तिरस्कार असें धोरण आरंभिले तर अंती इच्छा उत्पन्न होत नाही. औदासिन्य सात्विक धोरण आहे व तिरस्कार हे रजो अथवा तमोगुणी आहे. योगी ह्या सुत्रांचा योग्य वापर करून त्याच्या इच्छा मारून टाकत असतो. विशेष म्हणजे मन सवयप्रधान असल्याने जेव्हां सगळया गोष्टींबद्दल औदासिन्य अथवा तुच्छता, तिरस्कार असें धोरण ठेवले तर इच्छांचा नाश करणे सोपे होते परंतु, अरे अर्जुना, त्यात कांहीं अडचणी आहेत. कारण जीवाच्या इच्छा शरीराच्या आवश्यकते नुसार असतात व त्या नाकारता येत नाहीत. त्यांना मान्यता द्यावीच लागते कारण त्या शरीराला आवश्यक असतात. त्या नित्य गरजा समजल्या जातात त्यांची पूर्ती होत असतांना आत्म्याने त्यांत न लक्ष घालणे हे योग्याला जमले तर त्या इच्छा जीवापुरत्या रहातात. एकदा अशाप्रकारे इच्छा मोडण्याची सवय झाली कीं, पुढचे कार्य सोपे असते.

अर्जुन विचारतो, हे भगवंता, तू मला सांग सहा दोष (षड्रीपू) आणि हट्ट कोणते व ते कसे उत्पन्न होतात, आणि तू जे सांगतोस धोरणात्मक तिरस्कार, धोरणात्मक क्रोध हे काय असते ते सुद्धा सांग.

भगवंत सांगतात, सहा दोष माणसाच्या काम ह्या दोषातून परिणाम स्वरुप सुरू होतात ते क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर असे आहेत काम साध्य झाला तर त्यातून लोभ व मोह उत्पन्न होतात. जर नाही साध्य झाला तर क्रोध किंवा दुःख उत्पन्न होतात. दुःखातून मत्सर उत्पन्न होतो. लोभाला वाढवल्यास त्यात मिळालेल्या यशामुळे मद (गर्व) उत्पन्न होत असतो. अशारितीने ते एकमेकांच्या वाढीमुळें विकसित होत असतात. माणसाचा अहंकार त्यात हट्ट वाढवतो त्यामुळें ते सहा दोष माणसाला ग्रासत असतात. परंतु, ते जर जीवाच्या गरजे पुरते असतील ते दोष अथवा शत्रू ठरत नाहीत कारण त्यांची निर्मिती मी केली आहे, जीवाच्या म्हणजे शरीराच्या नित्य गरजा पूर्ण व्हाव्यात म्हणून. आत्म्याने त्यात लक्ष घातले कीं, तेच उपयुक्त जोर दोष ठरतात व त्याहून

जास्त आत्मा त्यात गुंतत गेला तर ते शत्रू ठरतात कारण, अरे धनंजया, ते माणसाच्या अध्यात्मिक उद्धारात अडचण बनून रहातात. धोरणात्मक म्हणजे प्रत्यक्ष नसतांना ते असल्यासारखे वागणे, धोरणात्मक क्रोध म्हणजे क्रोधाचे सोंग घेणे जे परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी आवश्यक असते.

भगवत गीता पर्व भाग छत्तीसावा संपला.

# भगवत गीता पर्व

## भाग सदोतिसावा

## श्रद्धात्रय विभाग योग  अध्याय सतरावा

अर्जुन विचारतो, हे कृष्णा, जे श्रद्धायुक्त अंतःकरणाचे आहेत पण शास्त्रविधी योग्य प्रकारे पाळता, यजन (पुजन) करतात, त्यांची निष्ठा म्हणजे मनाची अवस्था सात्त्विक, रजो कीं तमोगुणी समजावयाची?

श्री भगवान सांगतात, मनुष्याची श्रद्धा त्याच्या स्वभावानुसार सत्वगुणी, रजोगुणी आणि तमोगुणी अशी तीन प्रकारची असते, त्यांची लक्षणं ऐक, हा मनुष्यप्राणी मोठा श्रद्धावान असू शकतो. त्याची ज्या ठिकाणी श्रद्धा स्थिर झाली आहे त्याप्रमाणे, तो बनतो हे समजून घे. सत्वगुणी देवांचे भजन यजन करतात, रजोगुणी राक्षसांचे, गंधर्व, यक्ष, पितर अशा कमी प्रतीच्या देवतांची पुजा करतात आणि तामसी लोक भूत, पिशाच्च, प्रेते अशा मेलेल्या पूर्वजांची अशा विरुद्ध शक्तीस्थानांची पुजा करणे पसंत करतात. विरुद्ध शक्तीस्थानं म्हणजे ते पाताळातील शक्ती स्थानं आहेत. आधी सांगितलेली स्वर्गातील आहेत. पाताळातील शक्तीस्थानांची पुजा करणे सोपे असते व ते लवकर प्रसन्न होतात परंतु, ते क्रोध, लोभ, मद आणि मत्सर ह्या दोषांने दुषित असतात. त्यामुळें कधी त्यांच्या रागाला, लोभाला तो बळी पडत असतो. आसुरी संपदात अडकलेले लोक ढोंग, अहंकार यानी भरलेले भोग, वासना व आसक्ती या विकारबलाने आत्मवश झालेले अविवेकी असतात ते, शरीरातील पंचमहाभूतादि समुहाला, त्याच प्रमाणे, अंतःशरीरातील जीवावर आरुढ असलेल्या आत्म्याला कष्ट देत देत शास्त्रविधीत न सांगितलेले अशा प्रकारचे तपोश्र्चरण (अघोरी साधना) करतात. शेवटी कांहींही साध्य न होता मरून जातात. ते आणखीन एक आसुरी संपदेचे उदाहरण आहे. सृष्टीच्या स्वभावामुळें जन्मलेले ते प्रत्येक, प्रकृतीच्या तीन गुणांनी ग्रस्त असतात. त्यामुळें त्याची नित्य कर्मे, जशी आहार, विहार आणि विचार त्यांनी व्यापलेली असतात व म्हणून वेगवेगळी असतात, ते तुला कसे ते थोडक्यात सांगतो,

आहाराचे तीन प्रकार असे आहेत, सात्विक लोकांचा आहार आयुष्य, बुद्धि, शक्ती, आरोग्य., सुख, प्रेम वाढवणारा असून रुचकर, स्निग्ध, शरीरात मुरून चिरकाल रहाणारे, मन प्रसन्न करणारे अशा प्रकारचे खाद्य पदार्थ आवडतात. त्यांच्या खाद्य पदार्थातील रुची मध्यम असाव्या लागतात. जसें फार गोड, फार तिखट, फार आंबट असें चालत नाहीत.

रजोगुणी लोकांच्या आहारात तिखट, आंबट, खारट, झणझणीत, अति गरम असें तीव्र रुची असलेले जास्त प्रिय असतात. अशा आहारांमुळें दुःख, शोक व रोगटपणा त्यांच्यात उत्पन्न होतो.

तामसी लोकांना शीळे, थंड झालेले, निरस, दुर्गंधीयुक्त व तीव्र रुची असलेले, अपवित्र जेवण आवडते म्हणजे त्यांना ते चालतात.

आता यज्ञाचे तीन प्रकार सांगतो,

सात्त्विक माणसें कर्मफलाची अपेक्षा न ठेवता त्यांची कामं एक कर्तव्य म्हणून करत असतात. त्यांची कामं शांत चित्ताने शास्त्रविधीयुक्त करत असतात. ते बहुधा दैवी संपदेने प्रभावित असतात व म्हणून त्या प्रमाणे त्यांचे यज्ञकर्म होत असते. हे दैवी संपदा असलेले लोक असतात.

रजोगुणी माणसे फलावर नजर ठेवून आणि आत्मप्रतिष्ठा वाढवण्यासाठी जे यज्ञ केले जातात त्यात त्यांची विशेष रुची असते.

शास्त्र विधी सोडून अन्न संतर्पण शिवाय, मंत्रहीन, दक्षिणारहीत व श्रद्धा हीन केवळ रिवाज म्हणून तामसी लोक यज्ञ करतात.

आता शिष्टाचारांचे तीन प्रकार सांगतो,

देव, ज्ञानी, गुरू, विद्वान अशांचा आदर सत्कार करणे, शुचिर्भूतपणा असणे, सरळपणे वागणे, ब्रह्मचर्य पाळणे, इतरांना न दुखवता असें वागणे हे शारिरीक शिष्टाचार सत्वगुणी आचरतात. गृहस्थाश्रमी माणूस सर्व स्त्रियांबद्दल सन्मानाची, आदराची भावना ठेवून ब्रह्मचर्य पाळू शकतो.

मन प्रसन्न ठेवणे, व्यवहारात सौम्यता, मुनींप्रमाणे वृत्ती (मितभाषी), मनोनिग्रह आणि शुद्ध भावना यांस मानसिक शिष्टाचार समजले जातात.

फलाची अपेक्षा न ठेवता निष्काम वृत्तीच्या माणसाने अत्यंत श्रद्धेने व योगयुक्त बुद्धिने हे त्रिविध शिष्टाचार आचरले तर ते सात्त्विक शिष्टाचार समजले जातात.

आपला सत्कार व्हावा, मान मरातब मिळावा, आपली पुजा केली जावी अशा हेतूनी त्याच प्रमाणे ढोंग माजविण्याच्या उद्देशानी जे शिष्टाचार केले जातात ते तसेंच अस्थिर व अनिश्चित वागणे हे राजस शिष्टाचार समजले जातात.

हेकटपणांने, स्वताला पिडा देणारे, दुसर्याचे नुकसान करण्यासाठी असें, जे वागणे असते ते तामसी शिष्टाचार असतात.

आता दानाचे प्रकार सांगतो,

दान करणे हे आपले कर्तव्य आहे असें मानून आपल्यावर उपकार न करणार्याला योग्य स्थळी, योग्य समयी, पात्रता पाहून सत्पात्र जे दान केले जाते त्याला सात्त्विक दान समजले जाते.

जे दान परतफेडीच्या अपेक्षेने दिले जाते आणि शिवाय ते देतांना मनाची ओढाताण होत असते ते दान रजोगुणी समजले जाते.

अयोग्य वेळी, अयोग्य जागी, अयोग्य माणसाला सत्कार न करता, अवहेलना करून जे दान केले जाते ते तामसी दान समजले जाते.

ब्रह्माचा ओम, तत्, सत्, असा तीन प्रकारचा निर्देश केला जातो. या निर्देशानेच पूर्वी ज्ञानी लोकांनी वेद (अनुभवसिद्ध ज्ञान) व यज्ञ (योजलेले कार्य) निर्माण केले आहेत. जगाला या संकल्पनानी आरंभ झाला आहे ह्यामुळे ब्रह्मवादी लोक यज्ञ, दान व तप शास्त्रविहीत कर्मे नेहमी ओम असा उच्चार करून सुरू करत असतं.

मोक्षार्थी लोक फलाची अपेक्षा न ठेवता यज्ञ, तप इत्यादि कर्मे तत् या निर्देशांने करतात.

अस्तित्व (स्वयंभू) आणि साधूत्व (चांगुलपणा, माणूसकी व भूतदया) या अर्थी सत् हा शब्द वापरत असतात.

यज्ञ, तप व दान करीत रहाणे या स्थितीला सत् असेंच म्हणतात. त्याकरता, केलेल्या कर्मालाही सत् असेंच समजतात.

हे अर्जुना, अश्रद्धेने केलेले हवन, दिलेले दान, आचरलेले तप किंवा इतर कोणतेही कर्म असत् असें समजले जाते. असे कर्म परलोकांत व इहलोकात (ह्या जगात) उपयोगी येत नाही.

भगवत गीता पर्व भाग सदोतिसावा संपला.

# भगवत गीता पर्व (संपले)

# भाग अडोतिसावा

## अर्जुनोत्थान योग  अध्याय अठरावा

अर्जुन विचारतो, हे केशी दैत्याचा वध करणार्या श्री कृष्णा, संन्यास आणि त्याग यांचे वेगवेगळे तत्त्व जाणण्याची माझी इच्छा आहे.

श्री भगवान सांगतात, ज्ञानी लोक काम्य असणार्या कर्माच्या त्यागाला संन्यास म्हणतात आणि विवेकी लोक सर्व कर्मफलाच्या त्यागाला त्याग म्हणतात. संन्यास आणि त्याग हे मनाने करावयाच्या आहेत, शरीराने नाही, म्हणून शरीराने त्या स्वीकारल्या तरी मनाने जर खरोखरच त्याग अथवा सन्यास केला असेल तर तो त्याग किंवा संन्यासच समजावयाचा असतो. ते आत्म्याला बंधन कारक ठरत नाहीत. उदाहरणार्थ, समजा तुम्ही मनाने फळ खाल्ले नसले परंतु शरीराने खाल्ले असेल तरी ते त्या माणसांने खाल्ले नाही असेंच समजावे.

कित्येक जाणकार कर्म, हे दोषयुक्त म्हणून, त्याज्य समजावे असें सांगतात, आणि दुसरे कांही यज्ञ, दान, तप व कर्म यांचा त्याग करणे योग्य नाही असें समजतात. ही झाली जाणकार व विवेकी लोकांची मते परंतु, माझी निश्चित मते सांगतो, त्यागाचे तीन प्रकार आहेत, यज्ञ, दान, तप या संबंधीचे कर्म केलेच पाहिजे. ते टाकून चालणार नाही. योग्यांसाठी यज्ञ, दान व तप ही कर्मे चित्त शुद्धिकारक असतात. म्हणून ही कर्मेसुद्धा आसक्ती व फलाशा सोडून केली पाहिजेत. असें तुला सांगतो, हे लक्षात घे. कारण, स्वधर्माप्रमाणे नियत (नियतीने दिलेले) कर्माचा त्याग करणे योग्य ठरत नसते. मोहवश होऊन कर्माचा त्याग करणे ह्याला तामसी त्याग म्हणतात. शरीराला कष्ट नकोत म्हणून भीतीने दुःखदायक आहे म्हणून जर कर्म सोडले तर तो राजस त्याग ठरतो. आसक्ती व फलाशा सोडून जे केवळ कर्तव्य म्हणून कर्म करून, मनाने जो त्याग केला त्या त्यागाला सात्त्विक त्याग समजले जाते.

जो कोणी अकुशल म्हणजे अकल्याणकारी कर्माचा द्वेष करत नाही, आणि कुशल कर्मात आसक्त होत नाही, तो त्यागवृत्तीचा मनुष्य सत्त्वशिल, बुद्धिमान व संशयरहीत त्यागी म्हणजे संन्यासी म्हणावयाचा. कारण, हे अर्जुना, देह धारण केल्यानंतर कर्माचा पूर्णपणे त्याग करणे शक्य नसते. म्हणून ही सर्व कर्मे त्याग बुद्धिने करावयाची असतात. म्हणजे तशा कर्मात आत्म्याने स्वताला गुतवून घ्यावयाचे नसते. आत्मा अलिप्त राहून ती कर्मे करण्याने ती बाधत नाहीत. अशा

त्यागात तो ते कर्म झाल्यावर त्याचा विचार करत बसत नाही व पुढचे काय कर्तव्य त्याकडे ध्यान देतो. जीवाला त्याची नित्य कर्मे शरीर संगोपनार्थ आणि संरक्षणार्थ करावीच असतात. त्या क्रियांत आत्म्याने ढवळाढवळ करावयाची नसते. हे पार्था, तू हे लक्षात ठेव. आत्म्याने जीवांच्या नित्य व प्रासंगिक कर्मात नाक खुपसावयाचे नसते. ह्या त्यागाला अध्यात्मिक त्याग समजले जाते.

कर्मफलांचा त्याग करणार्या माणसाला मरणोत्तर कर्माचे इष्ट, अनिष्ट अथवा मिश्र फल असें तीन प्रकारचे फल मिळते परंतु, अशा संन्याशाला त्याने फलाशा सोडलेली असल्यामुळें त्यातले कोणतेही फल चिकटत नाही, म्हणजे त्याची नोंद लिंगदेहाच्या नोंदीत होत नाही. म्हणजे जणू त्याने ते केलेलेच नाही असे ठरते. कर्मफल त्यागी योग्याच्या लिगदेहात मोठे बदल होऊन ते आवरण विरळ होऊ लागते. त्यामुळें तो योगी मोक्षाच्या अधिकाधिक जवळ जात असतो. लिंगदेहाचे आवरण पूर्णता निघून गेले म्हणजे तो आत्मा मुक्त झाला सर्व कर्म फलांतून असें असते.

अर्जुना, आता मी तुला सांख्यांच्या वैदांतिक शास्त्रात सर्व कर्मे घडण्याची जी पांच कारणे सांगितली आहेत ती समजावून देतो. ते नीट ऐक.

अधिष्ठान म्हणजे **स्थान**, जागा, **कर्ता**, कार्य करण्याला लागणारी नानाविध **उपकरणे** (ज्ञान व कर्मेंद्रिये), कार्य निष्पत्तीकारक शरीराचे विविध **हालचाली** (व्यापार) व त्या बरोबर पांचवे आहे **दैव** (भाग्य, नशिब). मनुष्य जे कायिक (शरीराचे), वाचिक (बोलण्याते) व मानसिक (विचारांचे) कर्म आरंभतो त्या कार्याच्या प्रेरणेला ही पांच कारणे असतात. अशी वस्तुस्थिती असतांना तो कर्म करणारा सगळयासाठी स्वतालाच कारक समजतो त्या मूर्खाला कांहींच समजत नाही असें म्हणावे लागेल. त्या पांचांपैकी तो हा एकच घटक (कर्ता) सोडता बाकीचे प्रकृतीच्या सुचनेनुसार काम करत असतात हे त्यांने लक्षात घेतले पाहिजे.

कर्मफल त्याग ही विचाराची स्थिती आहे, शरीराची नसते हे लक्षात घे. म्हणून ज्याचे अंतःकरण अहंकारयुक्त नसते व ज्याची बुद्धि फलासक्तीने मलीन झालेली नसते, त्याने केवळ ब्रह्माचे कर्तव्य ह्या उद्देशाने कसेही वरकरणी अघोरी दिसणारे कृत्य केले तरी ते त्याला बाधत नाही, ते त्याच्यासाठी पाप ठरत नाही. जसें खाटीक निरपराध प्राण्यांची यमाच्या नांवाने हत्त्या करतो कारण ते माणसाचे खाद्य विधात्याने ठरवले आहे त्याला त्या हत्त्येचे पाप लागत नाही. कारण तो खाटीक त्या कर्माला बांधलेला नसतो परंतु, जर तो खाटीक ते करतांना त्याचा आनंद उपभोगत असेल तर ते कर्म त्याला बद्ध करते. तो पापी ठरतो. तसेंच युद्धात वीर पुरूष प्रतिस्पर्ध्याची हत्त्या करतो केवळ कर्तव्य म्हणून त्या कामात त्याचा आत्मा गुंतलेला नसतो केवळ शरीर काम करत असते म्हणून ते त्याला बाधत नाही. त्या मारण्यात त्याने आनंद घेतला तर मात्र

ते कर्म त्याला बद्ध करते ते पाप होते. अरे अर्जुना, विचार हे सगळया पाप पुण्याचे कारण असते. शरीराच्या कृतीला त्या संदर्भात महत्व नसते.

कर्माच्या प्रेरणेची तीन कारणे आहेत, ती अशी आहेत, जाणण्यासारखी गोष्ट, जाणण्याची इच्छा आणि त्यात कार्य करण्याची इच्छा. त्या कर्माच्या निष्पत्तीची तीन अंगे अशी, कार्य करण्याचे साधन, साधावयाचे कार्य व कार्यकर्ता, असतात.

ज्ञान, कर्म व कर्ता ही गुणभेदाने तीन प्रकारची आहेत असें सांख्यशास्त्र सांगते. ते तू समजून घे.

प्रथम ज्ञानाचे तीन प्रकार पहा, भिन्नभिन्न दिसणार्या सर्व भूतांत एकच अविनाशी व अविभक्त भाव आहे, ह्यालाच अद्वैत असे म्हणतात. ते ज्या ज्ञानाने जाणता येते (रचना तत्त्वाची प्रचिती येणे) ते सात्त्विक ज्ञान समजावे. दैवीसंपदा असणारे ह्यात येतात.

ज्या समजूतीमुळे सर्व भूतांतील भाव भिन्न आहेत असे वाटते अशा समजाला द्वैत असें समजतात. आसुरी संपदा मध्ये अडकलेले असें समजतात.

तत्त्वार्थ न समजता निरर्थकपणे एकाद्या कार्यातच (किंवा देहात) तेंच काय ते सर्वस्व असे समजून गुरफटून जाणारे जे अल्पज्ञान म्हणजेच अज्ञान त्याला तामसी ज्ञान असें समजले जाते.

आता कर्माचे प्रकार पहा, फलप्राप्तीची इच्छा न ठेवणार्या योग्याकडून नेमलेले जे कर्म आसक्ती न धरता व प्रिती, द्वेष न ठेवता केले जाते त्याला सात्त्विक कर्म म्हणतात.

मोठ्या अभिमानाने मनुष्याकडून जे कर्म परिश्रमपूर्वक व फलाची अपेक्षा ठेवून केले जाते त्याला राजस कर्म असें समजले जाते.

पुढील परिणाम, हानि, पीडा व सामर्थ्य यांचा विचार न करता जे कर्म अविचाराने व प्रसंगी हट्टाने केले जाते ते तामसी कर्म समजले जाते.

आता कर्त्याचे प्रकार पहा,

अनासक्ती, निरहंकारी, धैर्य व उत्साह यांनी युक्त कर्मातील यशापयशाने मन विचलित होत नाही असा जो कर्ता त्याला सात्त्विक कर्ता समजतात.

विषयासक्त, कर्मफलाची इच्छा धरणारा यशाने हर्षभरित होणारा व अपयशाने चिडणारा किवा शोकग्रस्त होणारा असा कर्ता राजस समजला जातो.

अस्थिर बुद्धि, हाती घेतलेल्या कार्याचे पूर्णज्ञान नसलेला, गर्वाने ताठलेला, कोणत्याही कार्यासाठी लागणारे काळ-काम-वेग ह्यांचे भान न ठेवता काम करणारा, प्रसंगी खिन्न होणारा, चेंगट असा कर्ता तामसी समजावा.

ह्याशिवाय मी तुला आणखीन कांहीं गोष्टी सांगतो त्या बुद्धि व धृति (धैर्य) याबद्दल आहेत त्या ऐक.

ज्या बुद्धिला कोणती गोष्ट धर्मतः ग्राह्य, कोणती अग्राह्य, कोणते कृत्य योग्य व कोणते अयोग्य, कशापासून भिती बाळगून वागावे, कोणत्या पासून गोष्टींची भिती बाळगू नये, कोणती गोष्ट केल्याने जीवन कर्माच्या जाळयात बद्ध (लिंगदेहाचे आवरण वाढेल) होईल व कोणत्या गोष्टी केल्याने लिंगदेहाचे आवरण कमी होईल व मोक्ष मार्ग सुकर होईल, हे यथार्थ समजते ती सात्त्विक बुद्धि समजावी.

ज्या बुद्धिने धर्म व अधर्म ह्यापैकी कोणते कार्य करावे ते समजत नाही, फक्त तात्कालीक फायदा पहाते ती राजसी बुद्धि असते.

अधर्माला धर्म व धर्माला अधर्म समजून प्रत्येक गोष्टीचा चुकीचा अर्थ लावते ती तामसी बुद्धि समजावी.

आता धृतिच्या तीन प्रकारांची माहिती पाहू.

चित्त स्थिर असल्यामुळें प्राप्त झालेली अचंचल धारणाशक्ती व तिच्या जोरावर मन (लिंगदेहाची प्रेरणा), जीव, इंद्रिये, यांच्या सर्व क्रिया मनुष्य (आत्मा) व्यवस्थित चालवतो ती सात्त्विक धृति समजावी.

ज्या धृतीने धर्म, काम, अर्थ साध्य केले जातात व जी प्रसंगविशेषी फलांची अपेक्षा करते त्या धृतीला राजस धृति समजावे.

ज्या बुद्धि योगे मनुष्य अज्ञानी रहातो, झोपण्यात समय घालवतो, वेळ वाया घालवतो, भय, शोक, विषाद व गर्व हे दुर्गुण धारण करतो त्या धृतीला तामसी धृति समजावे.

आता आश्रमाचे गुण सांगतो, ते मनुष्याच्या निर्णयांवर अवलंबून असतात. गृहस्थाश्रम राजस समजला जातो. सन्यासाश्रम व वानप्रस्थाश्रम सात्त्विक समजले जातात. ब्रह्मचर्याश्रमाचा

निर्णय गुरू त्याच्या अंदाजाने घेत असतो पण तो सुद्धा सात्त्विक असतो. म्हणजे आश्रमात कोणताही तामसी नसतो हे समजून घे.

माणसाचे बालपण अज्ञानामुळें तामस समजले जाते परंतु, तो तामस व मोठ्या वाढलेल्या माणसाचा तामस एकच नसतात. तरुणपण रजस समजले जाते पण ते सुद्धा त्या माणसावर अवलंबून असते. वार्धक्य सात्त्विक असावे.

हे अर्जुना आता सुखाचे प्रकार सांगतो,

ज्या सुखात मनुष्याला पुन्हा पुन्हा अनुभव घेऊनही गोडी कायम रहाते व दुःखाचा अंत होतो, जे इंद्रियांवर  विशेष अवलंबून नसते, जे सुरूवातीला विषासारखे व नंतर अमृतासारखे होते असें आत्मनिष्ठ बुद्धिच्या प्रसन्नतेतून प्राप्त झाले आहे ते सुख सात्त्विक सुख समजावे.

विषय आणि इंद्रिय यांच्या संयोगाने उत्पन्न झाले आहे, जे सुरूवातीला गोड व नंतर कंटाळा वाटणारे अथवा विषासारखे असते ते राजसी सुख समजावे.

जे प्रारंभी व अंती सुद्धा माणसाला सतत मोहात पाडत असते, निद्रा, आळस, नशा व प्रमाद यांपासून निर्माण होते ते तामस सुख समजावे.

अर्जुना, जन्म घेणारा असा कोणीही नाही कीं, तो अशा विविध प्राकृतिक गुणांपासून मुक्त असू शकेल.

ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र यांची कर्मे त्यांच्या स्वभावजन्य गुणाप्रमाणे विभागलेली आहेत. व्यवहारात एकच व्यक्ती या सर्व चारही वर्णांत वेगवेगळया वेळी असू शकते. कोणीही सामान्य मनुष्य सर्व काळ एकाच वर्णात असू शकत नाही. म्हणून प्रत्येक माणसांत हे चारही गुण परिस्थितीनुसार असतात. म्हणून कोणीही माणूस एकाच वर्णाचा कधीच असत नाही, अशी विधात्याची व्यवस्था आहे.

आता मी तुला सांगतो त्या चार वर्णांचे गुण काय आहेत.

क्षमाशिलता, सहनशिलता, शिस्त, शुचिर्भूतपणा, शांति, सरळपणा, अध्यात्माकडे ओढ, विविध ज्ञान आणि ईश्वरनिष्ठा हे ब्राह्मणाचे गुण समजले जातात. जर ते गुण नसतील तर तो ब्राह्मण नाही हे समजावे.

शौर्य, न्याय, तेजस्वीता, मनोधैर्य, दक्षता, युद्धातून पळून न जाणारा, अधिकार चालवणारा, दयाळू असें क्षत्रियाचे गुण सांगितले आहेत. जर ते गुण नसतील तर तो क्षत्रिय नाही हे समजावे.

शेती, गुरांचे पालन, व्यापार, सावकारी हे वैश्यांचे गुण सांगितले आहेत.

शुश्रूषा (सेवाभाव) हा शुद्राचा मुख्य गुण समजला जातो.

माणसाने त्यात आपल्या स्वाभाविक गुणांना समजून त्या वर्णाचा स्वीकार करावयाचा असतो. असें केल्यास त्याला योग साधना करणे सहज साध्य होते. ते कसे करावे ते सांगतो ते ऐक,

*जन्मकुंडलीत **अबकहडा चक्रा** च्या तक्त्यात जातकाचा वर्ण दिलेला असतो तो त्याचा स्वाभाविक वर्ण असतो मग जन्म कोठल्याही जातीत हो.*

माणसाने त्याच्या त्या वर्णात राहून योग साधना करावयाची असते. निश्चितपणे तो यशस्वी होईल. ते कसे ते सांगतो,

जो योगी नाही व सामान्य मनुष्य आहे त्याला सिद्धि प्राप्त करण्यासाठी ज्याच्यापासून सर्व भूतमात्रांची उत्पत्ती झाली आणि ज्या परमात्म्याने हे सर्व जगत् व्यापले आहे त्याची आपल्या कुवतीनुसार उपासना प्रामाणिकपणे करावयाची असते.

हे अर्जुना, आपले प्रकृतीजन्य स्वाभाविक कर्म दोषयुक्त भासले तरी ते सोडू नये. कारण, धूराने ज्याप्रमाणे विस्तव व्यापलेला असतो त्याप्रमाणे सर्व प्राकृतिक कर्मे स्वभावतः दोषांनी व्यापलेली असतात. दोषता हा मायेचा स्वभाव असतो, तो सर्व प्रकृतीच्या व्यवहारात दिसून येतो, मात्र ब्रह्म पूर्णतया निर्दोष असते.

कोणत्याही कर्माविषयी ज्याची आसक्ती सुटली आहे, जो पूर्ण संयमी झाला आहे, ज्याची कोणतीही इच्छा राहिलेली नाही अशा माणसाला संन्यासानी पराकोटीची नैष्कर्म सिद्धि प्राप्त होते. अशी सिद्धि प्राप्त झाल्यावर मनुष्याला ज्ञानाची अत्यंत श्रेष्ठ निष्ठा असें जे ब्रह्म ते प्राप्त होते. तो प्रकार माझ्याकडून ऐक,

ज्याला जीवाच्या गरजांचे विचार समजले असून त्यात आपल्या लिंगदेहाच्या दबावाखाली न येता जो ढवळाढवळ न करता शांत चित्त राहून इंद्रियांविषयीचा त्याग करून त्याचप्रमाणे, प्रिती, भिती, द्वेष टाकून निवडक किंवा एकांत स्थळी राहून मिताहारी, मितभाषी, मितनिद्रा, मन व शरीर यांना ताब्यात ठेवणारा, ध्यानयोगात गढून गेलेला, सतत वैराग्यसंपन्न असणारा

अहंकार, बळ, दर्प, काम, क्रोध, भोगपदार्थांचा संग्रह यांचा त्याग करून ममत्वरहीत झालेला शांत असा मनुष्य ब्रह्मीभूत होण्यास पात्र समजला जातो.

त्याची भक्ती तशीच चालू राहिली कीं, तो मला व माझ्या सामर्थ्याला ओळखतो. यथावकाश तो माझ्यात विलीन होतो. तो व मी ह्यात फरक रहात नाही. माझ्यासाठी काम करणारा कर्मयोगी सर्व कर्म सतत करीत असला तरी माझ्या कृपाप्रसादाने अविनाशी शाश्वत पद प्राप्त करत असतो.

हे अर्जुना, ईश्वर सर्व जीवमात्रात राहून यंत्रावर घातल्याप्रमाणें सर्व जीवांना आपल्या मायेने फिरवत असतो. असें हे दुर्लभ गुह्य ज्ञान मी तुला सांगितले यांचे सांगोपांग मनन करून अखेरीस जसे तुला योग्य वाटेल तसे तू कर.

जो विधात्याचा द्वेष करतो, जीव (प्राण) व आत्मा यांतील फरक मानत नाही, भक्तिहीन असतो, लिंगदेहाच्या चवचाळ वासनांत (तशा विचारांत) स्वतः (आत्म्याने) रमणे योग्य समजतो त्याला हे गुह्य ज्ञान सांगणे उचित नसते, कारण त्याला ते समजणार नाही. त्याला सांगणार्याला पुण्य लाभणार नाही.

जे विश्वास ठेवतात, भक्तीपूर्ण आहेत, जीव व आत्मा ह्यांतील फरक मानतात, ज्यांना लिंगदेहाच्या चवचाळ विचारांपासून आत्म्याला दूर ठेवणे जमते, अशा भक्तांना हे ज्ञान देणे हे मोठे पुण्यकर्म ठरते.

जो दोष न काढता हे सतत अभ्यासेल तोसुद्धा पापमुक्त होईल व पुण्यलोकात जाईल.

अरे अर्जुना, मी हे गुह्यज्ञान तुला सांगितले ते तू नीटपणे ऐकलेस कां?

अर्जुन बोलतो, तुझ्या कृपाप्रसादाने माझ्या मनातील सर्व शंकांचे निरसन झाले आहे. मला माझ्या कर्तव्याची स्मृती प्राप्त झाली आहे. मी निसंदेह होऊन राहिलो आहे. मी कर्तव्य बुद्धिने तू योजलेले हे युद्ध लढणार आहे.

संजय धृतराष्ट्राला सांगतो, या प्रमाणे, भगवान श्री कृष्ण व अर्जुन यांचा हा आश्चर्य जनक व रोमांचकारी संवाद मी ऐकला.

व्यासांच्या कृपेने हे परमज्ञान सर्वांना मिळाले त्याबद्दल त्यांचे अगण्य धन्यवाद करतो.

भगवत गीता पर्व भाग अडोतिसावा संपला.

# युधिष्ठीरावरील कृष्णकृपा पर्व (सुरू)

## भाग एकोण चाळीसावा

संजय बोलतो, अर्जुन त्याचे गांडीव पुन्हा उचलतो आणि सोठी गर्जना करतो. त्याचा तो उत्साह पाहून सगळे पांडव, सोमक व इतर मित्रपक्षाचे लोक फार आनंदी झालेले दिसतात. तेसुद्धा त्यांची शंख वाजवू लागतात. त्या बाजूचे वाजंत्री ढोल ताशा वाजवू लागतात. त्या सगळयांच्या आवाजामुळें एकच गदारोळ होतो. तो गदारोळ ऐकल्याने आकाशातून देव, गंधर्व, पितर, सिद्ध आणि चरण खाली येतात काय चालले आहे ते पहाण्यासाठी. ते सगळे देहधारण करून इंद्राबरोबर तेथे येतात तो मोठा नरसंहार पहाण्यासाठी. त्या दोन सागरासारख्या पसरलेल्या सैन्यात युधिष्ठीर आपल्या रथातून उतरतो त्याचे चिलखत काढून रथात ठेवतो व चालत हात जोडून भिष्माचार्यांकडे चालत जातो. ते पाहून धनंजय सुद्धा त्याच्या रथातून उतरतो, त्याच्या मोठ्या भावाकडे जातो. ते पाहून श्री कृष्णसुद्धा त्यांच्या बरोबर तेथे जातो. ते पाहून इतर राजेसुद्धा त्यांच्या मागून जातात. अर्जुन विचारतो, "अरे राजा, तुझ्या भावांना सोडून तू त्या शत्रूपक्षाच्या सैन्याकडे कां जात आहेस"? तोंच प्रश्न भिमसुद्धा त्याच्या मोठ्या भावाला विचारतो. नकूल बोलतो, अहो ज्येष्ठ बंधो, तुझ्या अशारितीने प्रतिपक्षाकडे निशस्त्र होऊन जाण्यामुळें मला काळजी वाटू लागली आहे. सहदेव बोलतो, "ह्या अवाढव्य सैन्यापुढे तू असा कसा चालत जात आहेस"?

संजय पुढे सांगतो, ते ऐकूनही त्यांचा मोठा भाऊ कांहीं न बोलता तसांच भिष्माचार्यांकडे चालत जात असतो. ते पाहून श्री कृष्ण गालातल्या गालात हसत उद्गारतो, "मला त्याचा उद्देश माहीत आहे, तो त्याच्या वडीलधार्यांना वंदन करण्यासाठी जात आहे, त्यांना नमस्कार करून व त्यांचे आशिर्वाद घेऊन मग तो शस्त्र धारण करणार आहे. असा प्राचीन समज आहे कीं, जो आपल्या ज्येष्ठांना नमस्कार करून त्यांचे आशिर्वाद घेऊन लढतो तो निश्चितपणे युद्धात यशस्वी होतो त्या प्रमाणे हा वागत आहे. असें मला वाटते".

कृष्ण ते बोलत असतांना कौरवांच्या बाजूने लोक मोठ्याने ओरडून युधिष्ठीराच्या वागण्याचे कांहीं कौतुक करत होते तर कांहीं आश्चर्य व्यक्त करत होते. धृतराष्टाराचे पुत्र एकमेकांत कुजबुजत होते कीं, "हा भित्रा भागुबाई युद्धाला घाबरून पळून जात आहे असें वाटते. त्याच्या बाजूने अर्जुन आहे, भिम आहे, नकूल सहदेव आहेत व त्यांला कृष्णाचा आधार आहे मग हा असा काय घाबरल्यासारखा वागत आहे"? "हा क्षत्रिय वर्णात जन्मायला लायक नाही हेंच खरे, क्षत्रिय कुळांला ह्या अशा वागण्याने केवढे लांच्छन लागते". त्यानंतर कौरव स्वताची जणू जीत झाली

अशा प्रकारे एकमेकांचे अभिनंदन करू लागतात. ते त्यांचे हात हलवत युधिष्ठीराचे स्वागत करू लागले होते. ते पांडवांची छिःत्थू करू लागले. युधिष्ठीर भिष्माच्या रथाकडे गेल्यावर तेथे शांतपणे उभा रहातो. त्याला भिष्म काय बोलतात ते सगळयांना ऐकण्याची उत्सुकता होती. त्यावर भिम आणि कृष्ण काय बोलतील ह्याचा ते अंदाज करत असतात. युधिष्ठीर काय बोलणार आहे त्याबद्दल सगळया कौरवांना कुतूहल होते. ते अंदाज करत असतांना राजा युधिष्ठीर मात्र शांतपणे भिष्माच्या रथाकडे चालत होता. त्याच्या बरोबर त्याचे भाऊ सुद्धा चालत होते. हे काय नाटक आहे असें सगळयांना वाटत होते. भिष्माकडे पोहोचल्यावर तो पांडव भिष्माचार्यांचे पाय धरतो, आणि बोलतो, "मी आपल्याला वंदन करत आहे. त्यानंतर आपण लढणार आहोत, आपण आम्हाला तुमच्याशी लढण्याची परवानगी द्यावी. त्याच प्रमाणे आपले आशिर्वाद मला पाहिजेत".

भिष्म ते ऐकून बोलतो युधिष्ठीराला, "अरे पृथ्वीच्या राजा, जर तू अशा प्रकारे माझ्याकडे आशिर्वाद घेण्यासाठी आला नसतांस तर मी तुला शाप दिला असता. परंतु आता मला समाधान आहे कीं, तू आम्हाला विसरला नाहीस. त्याचा मला आनंद वाटतोय. जा प्राणपणाने युद्ध कर जसे एक क्षत्रिय करतो, माझ्या तुला व तुझ्या सैन्याला शुभेच्छा आहेत". पुढे भिष्म बोलतो कीं, पांडवांनी त्याच्या कडून कांहीं वर मागावा. मनुष्य धनाचा लोभी असतो, परंतु, धन कोणाते सेवक नसते, कारण मी आज कौरवांना त्यांच्या धनामुळें बांधला गेलो आहे. म्हणून एकाद्या नामर्दासारखा मी त्यांच्या आज्ञांचे पालव करत आहे. म्हणून ह्या युद्धाव्यतिरीक्त कोठल्याही बाबतीत तू माझ्याकडे वर मागू शकतोस.

ते ऐकून युधिष्ठीर बोलतो, "मी तुम्हाला पुन्हा वंदन करतो, मी जाणतो कीं, आपण सगळे (भिष्म, द्रोण आणि कृप) आमचे हितचिंतक अहात, हे युद्ध केवळ कौरवाच्या आग्रहाखातर होत आहे हे आपण सगळे जाणत आहोत. माझी आपल्याला एवढीच प्रार्थना आहे कीं, आमचे भले होईल असे करा हांच आशिर्वाद आपण आम्हाला द्यावा".

ते ऐकून भिष्म बोलतात, "अरे राजा, त्यासाठी मी तुला कोणती मदत करावी असें वाटते ते सांग".

युधिष्ठीर त्याला उत्तर देतो, "मला फक्त सांगा, तुम्हाला योग्य वाटत असेल तर तुम्हाला हरवण्याचा मार्ग कोणता, तो सांगा".

भिष्म त्याला सांगतो अरे राजा, मला कोणीही हरवू शकेल असा कोणी नाही, जर युद्ध खरे असेल तर अगदी इंद्रसुद्धा मला हरवू शकणार नाही.

युधिष्ठीर त्याला विचारतो, "मग मला सांगा तुमचा मृत्यू कसा होईल ते सांगा".

भिष्म बोलतात, "मला कोणी ठार मारी शकेल असा कोणी येथे असेल असे दिसत नाही तसेंच माझा मृत्यू अजून आलेला नाही".

संजय पुढे सांगतो, ते ऐकल्यावर पांडव त्याला पुन्हा एकदा नमस्कार करून द्रोणांच्या रथाकडे निघतो. तो त्यांच्या रथाकडे गेल्यावर त्यांना लवून वंदन करतो. त्याच्या सगळया हालचाली तेथे असलेले सैनिक पहात असतात. तो द्रोणाचार्यांना बोलतो, "अहो माझे गुरूवर्य मला सांगा, पाप होणार नाही अशाप्रकारे आम्ही तुम्हाला कसे हरवू शकू ते सांगा. भिष्म सांगत आहेत कीं, ते कौरवांना धनाच्या कारणानें बांधले गेले आहेत म्हणून ते कौरवांसाठी आमच्याशी लढणार आहेत शरीराने, जरी मनाने ते आमच्या बाजूंचे आहेत. आपले काय म्हणणे आहे त्याबद्दल"?

द्रोण सांगतात, "तू मला भेटण्यास आता आलास तसा जर आला नसतांस तर मी तुला शाप दिला असता. तुझा पराजय व्हावा असें मी बोललो असतो परंतु, तू आला आहेस म्हणून मी तसे करणार नाही. मला बरे वाटले कीं, तू मला विसरला नाहीस. अरे युधिष्ठीरा तुझा विजय हो असें मी तुला वर देतो. त्यात मी तुला अप्रत्यक्षपणे सहाय्य करीन. तुला आणखीन काय पाहिजे ते मांग". "मनुष्य धनाचा गुलाम असतो. मी कौरवांच्या धनाचा गुलाम झालो आहे, म्हणून मी नालायका सारखा त्यांच्यासाठी लढण्याकरता उभा आहे तुझ्या विरूद्ध. मी शरीराने कौरवांसाठी लढणार असलो तरी मनाने मी तुझ्याबरोबर आहे कारण, धनाने शरीर बद्ध होते, विचार नाहीत. अरे पांडवांनो, मी तुमच्या विजयासाठी प्रार्थना करीन".

युधिष्ठीर बोलतो असें करा कीं आमचा विजय होईल, तेवढेच आमचे मांगणे आहे.

द्रोण बोलतात, "अरें ज्यांच्या बरोबर हरी आहे ते जिंकणार म्हणून तुमचा विजय निश्चित आहे. त्यात तुमचे पुण्य आणि कृष्णाची कृपा पुरेशी आहेत. आता जा, लढण्यास सुरूवात करा असा आदेश द्रोण त्यांना देतात.

युधिष्ठीर पुन्हा त्यांना विचारतो, "मला सांगा, आपण अजिंक्य असतांना आम्ही तुम्हाला कशा प्रकारे जिंकू शकतो"?

द्रोण सांगतात, "ते जोवर लढत आहेत, पांडवांचा विजय होणार नाही. म्हणून तुझ्या भावाला माझा लवकरात लवकर नाश करण्याचे आदेश दे".

युधिष्ठीर बोलतो, "अरेरे, हे काय बोलता गुरूवर्य, परंतु मला सांगा, तुम्हाला कशाप्रकारे मारता येईल, तुमचा मृत्यू कशात आहे"?

द्रोण त्याला सांगतात अरे राजा, जोवर माझ्या हातात धनुष्य आहे तोवर मला कोणीही हरवू शकत नाही. परंतु, जर मला कांहीं भयंकर वार्ता ऐकावयाला आली तर मी दुःखाने माझे धनुष्य टाकून ध्यानात गेलो तर कोणी त्या निःशस्त्र अवस्थेत मारू शकतो. त्यात माझा मृत्यू असेल".

संजय पुढे सांगतो, ते ऐकल्यावर पांडव त्यांना वंदन करून भारद्वाजाच्या मुलाकडे जातात. तेथे त्याला नमस्कार करतात कृपाचार्य त्यांचे शिक्षक असतात. बोलण्यात चतूर असलेला युधिष्ठीर त्यांनासुद्धा तसाच प्रश्न विचारतो कीं त्याचा मृत्यू कशात आहे.

युधिष्ठीर विचरतो, "मी आपली आज्ञा घेण्यासाठी आलो आहे, युद्ध प्रारभ करण्या आधी आपले आशिर्वाद आम्ही पांडव घेऊ इच्छितो. मला कोणतेही पाप न करतां हे युद्ध जिंकावयाचे आहे ते कसे करावे त्यावर आपण सांगा".

कृपाचार्य बोलतात, अशा प्रकारे जर तू माझे आशिर्वाद घेण्यासाठी आला नसतांस तर मी तुझ्यावर फार नाराज झालो असतो पण तू माझे आशिर्वाद घेण्यासाठी आला आहेस म्हणून मला संतोष झाला आहे. अरे पांडवा, मनुष्य धनाचा गुलाम असतो त्यामुळे मी आज तुझ्याविरुद्ध लढण्यासाठी उभा आहे कौरवांच्या बाजूने. खरे तर तुमची बाजू रास्त असल्यामुळे मी तुमच्या बाजूने लढावयास पाहिजे पण तेकरू शकत नाही म्हणून मला फार खेद होत आहे. तरी तुला आणखीन काय माझ्या कडून पाहिजे ते सांग.

युधिष्ठीर ते त्यांचे बोल ऐकू फार दुःखी झालेले दिसला. त्याला कांहीं सुचेना, तो तसाच स्थब्ध उभा राहीला कांहीं बोलू शकत नव्हता.

पुढे संजय. सांगतो, पांडवाचा उद्देश समजून तो गौतम ऋषी त्याला सांगतो कीं, तो युद्धात कोणालाही हरणार नाही. तरी तुम्ही लढत रहा, माझ्या इच्छा तुमच्या बरोबर आहेत. तू मला भेटायला आलास त्यात माझे समाधान आहे. मी तुमचा विजय हो म्हणून प्रार्थना करणार आहे. हे मी माझ्या मनापासून सांगत आहे कारण तुमच्या जिंकण्यात सत्याचा विजय आहे.

त्यानंतर पांडव मद्र देशाच्या राजाला भेटतात. त्याला वंदन करतात, राजा शल्य जो सदैव अजिंक्य राहिला आहे, त्याला पांडव बोलतो, मला तुमची परवानगी पाहिजे म्हणजे आम्ही निष्पाप मनाने युद्ध करू शकू. त्यात आम्ही आमच्या सगळ्या शत्रूंचा पराभव करणार आहोत.

शल्य त्याला बोलतो, युद्ध करण्याच्या सुरूवातीला तुम्ही मला भेटावयाला आलात म्हणून मी संतुष्ट झालो आहे, मी तुम्हाला युद्ध करण्याची आज्ञा करत आहे, त्यात तुम्हाला पाप लागणार नाही. त्या युद्धात तुम्ही यशस्वी व्हाल असा आशिर्वाद देतो. कारण तुम्ही चांगल्यासाठी लढत अहात. तुम्हाला आणखीन काय पाहिजे ते सांगा. मीसुद्धा कौरवाच्या धनामुळे त्यांचा मिंधा झालो आहे. मी जरी कौरवांसाठी लढत असलो तरी माझी इच्छा आहे कीं, तुमचा जय हो. त्याशिवाय तुझी आणखीव काय इच्छा आहे ते सांग,

युधिष्ठीर बोलतो, तुमचे भले कशात आहे ते मला सांगा, राजाने लढाई धनासाठी करावयाची कां न्यायासाठी ते मला सांगा.

शल्य पांडवांना विचारतो, आणखीन काय मी तुमच्यासाठी करू शकतो ते बोला. मी कौरवांसाठीच लढणार आहे कारण तसा आमचा करार आहे.

युधिष्ठीर बोलतो, "मला एवढेच आपल्याकडून अपेक्षित आहे कीं, तुम्ही करणाची ताकद कमी करावी त्यात आपलासुद्धा फायदा आहेच".

शल्य पांडवाला आश्र्वासन देतो कीं ते करण्याचा ते प्रयत्न करील. त्यांनंतर तो पांडवांना युद्ध प्रारंभ करण्याची आज्ञा करतो.

संजय पुढे सांगतो, अशारितीने सगळया वडीलधार्यांना वंदन करून व त्यांचे आशिरवाद घेऊन पांडव परत त्यांच्या रथांकडे निघतात.

ते होत असतांना कृष्ण कर्णाच्या रथाकडे गेलेला असतो. तो गदाच्या मोठा भाऊ आहे. त्याला बोलतो, "मला फार अवघडल्यासारखे होते पण ते बोलले पाहिजे कीं, भिष्माच्या नेमणूकीमुळें तू फार नाराज झाला आहेस, परंतु, भिष्माचा वध झाल्यावर तुला संधी मिळणार आहे. त्यावेळी तू दुर्योधनासाठी लढशिल, ते बरोबर होईल कां"?

कर्ण त्याला सांगतो, "मी दुर्योधनाला वाईट वाटेल असें कांहीं करणार नाही". तो कर्माचा निश्र्चय ऐकल्यावर जास्त कांहीं न बोलता जनार्दन पांडवांच्या कडे जातो.

त्यानंतर पंडुचा मोठा मुलगा मोठ्याने ओरडून विचारतो, ज्याला कोणाला आमच्या बाजूला यावयाचे असेल त्याने यावे त्यांचे स्वागत मी करत आहे. असे बोलल्यावर तो कौरवांच्या बाजूच्या सैनिकांकडे पहातो. त्याची नजर युयुत्सुवर पडे, ते युयुत्साला समजते व तो मोठ्या आनंदाने जाहिर करतो कीं, तो पांडवांच्या बाजूंने लढणार आहे.

युधिष्ठीर त्यावर बोलतो, ये ये आमच्या गोटात तुझे स्वागत आहे. आमच्यात येऊन तू तुझ्या मूर्ख भावडांविरुद्ध लढणार आहेस. आम्ही व कृष्ण तुझे स्वागत करत आहोत. तू न्यायाची बाजू घेतलीस त्यासाठी तुझे अभिनंदन होत आहे. तू युद्ध झाल्यावर कौरवांसाठी श्राद्ध करणार आहेस. कारण तूच एकटा त्यांच्यातील जीवंत रहाणार आहेस.

संजय पुढे सांगतो, त्यानंतर युयुत्सू तुझ्या मुलांची बाजू सोडून पांडवांच्या बाजूला जातो. त्याचे स्वागत तुतार्या आणि ढोलक्यांच्या नादाने केले जाते. त्यानंतर युधिष्ठीर त्याचे चिलखत घालतो व त्याची शस्त्र हातात घेतो रथावर चढतो. ते सगळे पांडव आपापल्या रथाकडे जातात. ते त्यांच्या व्युह रचनेत आवश्यकते बदल करतात. शेकडो नगारे वाजू लागतात, शंखू वाजवले जाऊ लागतात. वीर योद्धे मोठ्या मोठ्याने ओरडून त्याला साथ देत असतात. त्यात पांडवांच्या बाजूने धृष्टद्युम्न आणि इतर मोठ्या आनंदात दिसतात. ते सगळे पांडवांचे सुस्कृत वागणे पाहून दोनही बाजूचे राजे त्यांचे अभिनंदन करतात. पांडवाच्या गुणाची तारिफ सगळीकडे होत असते. सगळीकडून वाहवा, छान छान असें उद्गार ऐकू येत असतात. ब्राह्मण सामवेदातील कवने गाऊ लागतात जी युद्धाच्या आधी गायली जात असतं. सगळे पांडवांकडे कौतुकाने पहात होते. तेथे जमलेले म्लेच्छ आणि आर्य दोनही समाजातील मंडळींच्या डोळयांतून अश्रू येत होते. पांडवांचे उदात्त वागणे त्यांना फार आवडले होते असे दिसत होते. ते राजे त्यांच्या कडील मोठे नगारे वाजवू लागले. त्यांची संख्या कित्येक हजारानी होती. शंखू वाजू लागले. ते सगळे शंखू दुधासारखे शुभ्र होते.

युधिष्ठीरावरील कृष्णकृपा पर्व भाग एकोणचाळीसावा संपले.

## - भिष्मपर्व भाग पहिला समाप्त -

# भाषांतरकाराचा परिचय -

मी अशोक कोठारे, माझ्या वयाची ७६ वर्षे झाली आहेत. गेली कित्येक वर्षे मी विविध प्राचीन ग्रथांचा एक कुतुहल म्हणून अभ्यास करत असतो. त्या काळात मला समजले कीं, आपल्या प्राचीन शिक्षण पद्धतीत चार ग्रंथांचे महत्व होते. त्यात मनुस्मृती, महाभारत, रामायण आणि योगवासिष्ठ हे महत्वाचे होते. आपल्या पूर्वीच्या शिक्षण पद्धतीत ह्या ग्रंथांचे वाचन करण्याची प्रथा होती. नंतरच्या काळात इंग्रजांनी त्यांची शिक्षण पद्धती येथे रुजवली व आपली पाठशाळा पद्धती संपुष्टात आली. आपल्या शिक्षण पद्धतीत अक्षर ओळख, नितीशास्त्र, गणित एवढेच शिकवले जात. त्याशिवाय शिकतांना घोकंपट्टी करण्याचे महत्व होते. ते सगळे आता इतिहास जमा झालेले असले तरी त्याची उपयुक्तता नाकारता येणार नाही. म्हणून एक प्रयत्न मी करावयाचे ठरवले. मी एक अतिसामान्य अभ्यासक आहे तरी व्यासंग मोठा आहे. त्या प्रमाणे, मनुस्मृती प्रथम ई-साहित्यच्या माध्यामाने तुम्हाला दिली. त्याचे चांगले स्वागत झाले आहे. त्यामुळें माझा उत्साह वाढला आणि महाभारताचे, 'जसे आहे तसे', अशाप्रकारचे भाषांतर आता देत आहे. त्याचे साधारणपणे ४० खंड होणार आहेत. संपूर्ण महाभारत येण्यास बराच अवधी लागणार आहे. इतर मंडळी महाभारताचे भाषांतर करतांना त्याचा आकार आटोपशीर करण्यासाठी त्यातील शिकवणूकीचा भाग व्यर्थ समजून सोडून केवळ कथाभागाचेच भाषांतर करतात त्यामुळे एक शैक्षणिक पुस्तक म्हणून असें भाषांतर रहात नाही. मी सगळ्या नितीशास्त्र शिकवणार्या कथा जशाच्या तशा ठेवल्या आहेत. कांहीं जागी विषय समजणे सोपे व्हावे म्हणून मी टीपा दिल्या आहेत कांही कंसात दिल्या आहेत, कारण मला माहित आहे किं, ह्याचे वाचन करणारे मराठी भाषिक सामान्य आहेत. कोणी विद्वान वाचक असेल तर त्याला त्या टीपांची गरज वाटणार नाही.

आता थोडे माझ्याबद्दल लिहीत आहे. तसे पाहता अशा कामात कोणी संस्कृतचा प्राध्यापक असला पाहिजे असें कोणाला वाटेल मग मी एक इंजिनीअर कां हे काम करत आहे असा प्रश्न पडेल पण त्याचे उत्तर असें आहे किं, एवढे मोठे काम करण्यास कोणी तयार होत नाही आणि ते सुद्धा फुकट करणारा विद्वान मला मिळाला नाही. ज्या कोणाला मी त्याचे महत्व सांगितले ते सगळे त्या

कामासाठी भरपूर मानधन मागू लागले मग मी ठरवले आपणच ते करावे. गेली २५ वर्षें मी निवृत्त जीवन जगत आहे, बराच समय माझ्याकडे आहे मग आपणच हे करावे अशा विचारांने ते करावयास घेतले व प्रथम मनुस्मृती दिली आता महाभारत देण्याचा प्रयत्न चालू आहे. त्यासाठी दैवयोगांने ई-साहित्य सारख्या ध्येयवादी मंडळींची साथ मिळाल्यामुळें माझा उत्साह द्विगुणित झाला.

१९८५ पर्यंत मी माझा उद्योग करत होतो. कारखाना भाईंदरला व रहाणार चेंबूरला त्यामुळें येण्याजाण्याची दगदग माझ्या प्रकृतीला झेपली नाही व मी हृदयाच्या झटक्याने आजारी झालो. त्यानंतर डॉक्टराच्या सल्ल्याने मी सगळे उद्योग बंद करून घरात बसलो. थोडी बचत केली होती त्याच्या जोरावर आज मी माझे साधे जीवन जगत आहे. पैशापाठी लागण्याचा स्वभाव माझा मुळातच नाही. सुरुवातीपासून वाचनाचा छंद होता त्यात कथा कादंबर्या वाचण्यात रस नव्हता. मी कांहीं माहिती देणारे ग्रंथच वाचत असें. त्यामुळें अनेक विषयांचा व्यासंग झाला त्यात ही चार पुस्तक पुढच्या पिढीस विशेष उपयुक्त ठरतील असे मला जाणवू लागले तेव्हा त्यांची भाषांतरे करण्याचे ठरवले. त्या व्यतिरीक्त माझे लिखाण शेती विषयांत बरेच आहे. कॉंटिनेंटलचे कै. रत्नाकर कुलकर्णी ह्यांनी आग्रहपूर्वक माझ्या कडून 'सेंद्रिय खत निर्मिती उद्योग', नांवाचे पुस्तक लिहून घेतले, मराठीतील हे पहिले खतविषयक पुस्तक आहे. त्याच्या चार आवृत्या झाल्या आहेत. बळिराजा मासिकाचे संपादक भोसले ह्यांच्या आग्रहामुळें त्यांच्या मासिकांत मी १९९२ ते २००५ पर्यंत शेतकर्यांना शेतीचे पद्धतशीर शिक्षण एका लेखमालेच्या द्वारा दिले आहे. त्यात ६५ लेख लिहीले. त्या शिवाय संपादक भोसल्यांच्या आग्रहामुळें निसर्गशेतीचे तंत्र शिकवणारा एक अभ्यासक्रम, 'व्यावहारिक निसर्गशेती अभ्यासक्रम' तयार करून तो स्वखर्चानें शेतकर्यांसाठी १९९४ साली उपलब्ध केला. त्यामुळें आपल्या महाराष्ट्रात निसर्गशेतीचा प्रचार झाला. आता ह्या उतारवयात जेव्हां शरीर साथ देण्यात कुचराई करू लागले आहे, माझे सगळे लक्ष आपल्या हिंदू मान्यतांचा मराठी माणसाला परिचय करण्यावर आहे. त्यासाठी महाभारत, रामायण व योगवासिष्ठ ह्यांचे 'जसे आहे तसें' अनुवाद करण्यावर भर आहे. माझे ज्योतिष शास्त्राचे ज्ञान चांगले

आहे. त्याप्रमाणे जर गोष्टी होणार असतील तर मी २०२० नंतर नसेन. त्यासाठी हे सगळे उपक्रम लवकरात लवकर उरकण्याचा मानस आहे.

आता कोणाला प्रश्न पडेल कीं, हा इंजिनियरींगचा माणूस शेतीवर कसें लिहीतो? त्या बद्दल थोडे लिहीतो. माझ्या कारखान्यात बहुतेक कामगार उरण, अलिबाग, वसईचे होते. शिक्षण बेताचे पण एकादे अवजार कसें वापरावयाचे ते शिकवले किं, ते त्यात लवकरच निष्णात होत होते. त्या मुलांना मी विचारले किं, ते एवढे हुशार असूनही शेती कां करत नाहीत? त्यांचे एकच उत्तर असें, मालक शेतीत भागत नाही. मग मी ठरवलें शेतीशास्त्राचा अभ्यास करावयाचा. अभ्यासाचाच छंद असल्यामुळें तो सुरु झाला. त्यात मला लवकरच समजले कीं, शेतीचा संबंध बॉटनी पेक्षा मायक्रोबायॉलॉजीशी जास्त आहे. मग मी त्या विषयाचा अभ्यास करून त्यात लवकरच पारंगत झालो. त्या अभ्यासाप्रमाणे मी कांहीं तंत्र विकसित केले व ते अजमावण्यास सुरुवात केली. त्यात अपेक्षेप्रमाणे परिणाम मिळू लागले त्याप्रमाणे एक शेतीतंत्र विकसित होत गेले. माझ्या कामगाराच्या शेतावर माझे प्रयोग होत होते, त्यात माझा पैसा लागत होता व त्यांचे कुटूंबिय काम करत होते. त्यावेळी मी चांगला तरुण होतो व उत्साहसुद्धा होता. माझ्या तंत्राने शेती उत्तम होते हे मी समजलो व ते सगळे तेथेच संपले. ते सगळे १९८२ ते १९८५ अशा सालात झाले होते. मीसुद्धा ते सगळे विसरून गेलो. परंतु, १९९२ साली मोठा दुष्काळ पडला होता महाराष्ट्रात त्यावेळी मी एक दृष्य टीव्हीवर पाहिले, त्यात एक ग्रामीण महिला एका खोल विहीरीत उतरून वाटीने पाणी काढून बालदीत भरत होती. त्यावेळी मला रहावले नाही व विचार केला, माझ्या ज्ञानाचा जर उपयोग होणार नसेल तर काय कामाचे ते ज्ञान. मी एक लेख लिहीला व दैनिक नवशक्तिला पाठवला. तो लेख त्यांनी प्रसिद्ध केला नाही. मग मी तो लेख बळीराजा मासिकात पाठवला. त्यात तो छापून आला. तसे पहाता नवशक्तिनेसुद्धा तो प्रसिद्ध केला. त्यानंतर बळिराजाच्या वाचकांची प्रश्न विचारणा सुरु झाली व मी माझे शेतीचे ज्ञान त्यांना त्या मासिकात लेख लिहून देऊ लागलो. अशारितीने माझे शेतीत लिखाण भरपूर झाले. त्याबद्दल आधी लिहीले आहे.

आता थोडे माझ्या ब्लॉगपोस्ट बद्दल लिहीतो. हिंदूस्तानात २००८ साली इंटरनेटवर ब्लॉग सुरु झाले व मी त्यात माझे ब्लॉग सुरु केले. माझ्या ख्रिस्ती धर्माबद्दलच्या वादग्रस्त परंतु शास्त्रशुद्ध विवेचनामुळें पहिले ब्लॉग बंद झाले. माझे पूर्वी पांच ब्लॉग होते. त्यात मी अभ्यासांने जे संशोधन करून शोधून काढत असें, ते लिहीतो. त्यात अनेक विषयावरील माझे संशोधित साहित्य प्रसिद्ध करत असतो. त्यात ब्राह्मण धर्म, जैन धर्म, ख्रिस्ती धर्म, इस्लाम, अर्थ, न्याय, नितीशास्त्र, राजकारण अशा विषयांवर बरेच लिहीत असतो. ते तुम्ही वाचू शकता. एकच ब्लॉग मराठी आहे बाकीचे इंग्रजीत आहेत. सिलीकॉन मधील ब्लॉग इस्लाम बद्दलच्या माझ्या संशोधनाचे शास्त्रशुद्ध लिखाण आल्यानंतर बंद झाला आहे. गुगलवरील ब्लॉग मात्र जोरात चालू आहेत. माझे अशा विषयावरील विचार नाकारता येणार नाहीत असें सत्याला धरून असल्यामुळे जेव्हां मला कोणी विरोध करतो तेव्हां त्यांना मी नम्रपणे सांगतो, कृपया माझ्यावर अब्रुनुकसानीचा दावा करावा, ते झाले किं, ते लोक गप्प होतात. कारण, जर ते तसा दावा करतात तर त्यात तेंच हरण्याचा संभव जास्त असतो. एवढेच नाही तर त्यांच्या खोटेपणाचा जाहिर बभ्रा होईल ते त्यांना परवडण्यासारखे नसते. मी प्रचारकी थाटाचे लिखाण करत नाही. जे समजते ते विज्ञानाच्या आधाराने सिद्ध करूनच लिहीतो, आजच्या काळात असें लिखाण बर्याच गटांना आवडत नाही. बर्याच लोकांचे खूनसुद्धा झाले आहेत हे आपण जाणताच, म्हणून मी शक्यतर माझ्याबद्दल कांहीं लिहू इच्छित नाही. सत्यापेक्षा सोइस्करचा आज जमाना आहे. माझे जीवनातील अनुभव लिहीले तर ते एक वाचनीय पुस्तक होईल पण त्यात सर्व वादग्रस्त विषय पुढे येतील. मी मांडलेला कोणताही मुद्दा आजवर कोणालाही खोटा ठरवता आलेला नाही. जाता जाता, जैन धर्माबद्दलचा वाद सांगतो एक उदाहरण म्हणून, १९०२ मध्यें सर जगदीशचंद्र बोस ह्यांनी वैज्ञानिक पुरावे देऊन जे सिद्धांत मांडले त्याचा पुरावा देऊन मी लिहीले कीं, हल्ली जो जैन धर्म प्रचारात आहे तो तीन हजार वर्षापूर्वीच्या अडाणीपणावर आधारित आहे, त्यातील सगळेंच विचार अज्ञानाधारीत म्हणून खोटे आहेत. एवढेच नाही तर व्यवहारिक जीवनात तो धर्म पाळणे केवळ अशक्य आहे. त्यामुळें जैन उखडले पण सुदैवाने ते खूनखराबा करणारे नसल्यामुळें वाचलो.

शेवटी माझ्या तब्यती बद्दल लिहीतो. मुळातच माझी प्रकृती तोळामासा असते त्यात २०१० साली बेस्टच्या बसने मला ५० फूट लांब फेकल्यामुळें पुरता जायबंद झालो होतो. मेंदूला आघात झाल्यामुळें माझी स्मरणशक्ती गेली होती. दोन बरगड्या तुटल्या होत्या. माझे शौंच व मुत्र ह्यांवर नियंत्रण राहिले नव्हते. दीड वर्ष तसेंच गेले. त्यावेळी माझे वय ६८ होते. केवळ दैव बलवत्तर म्हणून आज मी पूर्ववत झालो आहे तरी कोठल्याही वाहनाने प्रवास करण्यास परवानगी नाही. म्हणून मी कोठेही जात नाही. गेलेली स्मृति पुनः आली व आता सगळे बरे चालले आहे. त्या काळातील अनुभव विशेषकरून माझ्या ज्ञान साधनेचे, मोठे रोचक आहेत. तूर्तास एवढे पुरे.

ई-साहित्यच्या पदाधिकार्यांच्या आग्रहामुळें ही माझ्याबद्दली खरी माहिती सविस्तरपणे दिली आहे. जर शक्य असेल तर त्यातील मजकुरात बदल न करता तो प्रसिद्धीस घ्यावा.

अशोक कोठारे,

२३- २ -२०१८

ashokkothare@gmail.com ,

ashokkothare@yahoo.co.in

## ई साहित्य प्रतिष्ठान -

मराठी भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणार्यांकडे लक्ष नका देऊ.

मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार न हजार प्रती छापल्या जात. पांच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी! आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच लाख वाचकांपर्यंत जात आहेत. वर्षाला अर्धा कोटी डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर ऑर्डर करतात. व्हट्स अप, ई मेल, ऍप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायला लागली आहेत. सुसाट सुटल मराठीचं वारु. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठीवरील प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगांने सुसाट सुटलेल्या मराठीच्या गाडीला आता कोणी थांबवू शकत नाही. या धूमधडक क्रांतीत साहभागी व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही कितीही वाचक आणा. ते शंभर आणतील आणि ते हजार आणतील. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला कुठली पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत ते आपल्याला टिव्ही, पेपरची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवून देऊ.

ई साहित्यची पुस्तके www.esahity.com वरून डाऊनलोड करा.

esahity@gmail.com ला कळवून ई-मेलने मांगवा. किंवा 7710980841 हा नंबर सेव्ह करून ठेवा, या नंबरला तुमचे नांवाने Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा. लिंक ई साहित्यचे app.https://play.google.com/store/apps/details?id=com.

esahity.www.esahitybooks ह्या लिंकवर उपलब्ध आहेत. ते download करा. हे सर्व मोफत आहेत.

धन्यवाद